23-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
APR/ D/ KTG/ 11:00

**सभापतीस्थानी - माननीय उप सभापती**

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

**उप सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कांद्याचा भाव अचानकरित्या घसरणे, त्यामुळे राज्यात विशेषत: नाशिक, पुणे इत्यादी जिल्ह्यातील कांद्याचे भाव सुध्दा अचानकरित्या घसरणे, कांद्याच्या घसरलेल्या भावामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर कोसळलेले संकट, या संकटामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी कांद्याच्या घसरलेल्या भावावर शासनाकडे मार्ग काढण्यासाठी आंदोलन करणे,कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या रस्ता रोको आंदोलनामुळे वाहतुकीची कोंडी होणे, कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या मागणीकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष" या गंभीर व तातडीच्या विषयावर चर्चा करण्यासाठी सभागृहाचे सर्व कामकाज स्थगित करण्याबाबत सूचना दिलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सहा महिन्यापूर्वी देखील कांदा उत्पादकांच्या बाबतीत अशाच प्रकारचा अत्यंत जटील आणि गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. त्यावेळी संपूर्ण देशामध्ये कांदा उत्पादकांच्या संदर्भातील विषय चर्चेमध्ये होता आणि त्यामुळे शासनाचीही कोंडी झाली होती. जोपर्यंत सरकार कांदा निर्यात करण्याबाबत निर्णय घेत नाही, तोपर्यंत कोणत्याही परिस्थितीत त्या-त्या भागातील निदर्शने थांबणार नाहीत, रास्ता-रोको बंद होणार नाही इतकी समस्या गंभीर होती. त्यावेळी कांदा उत्पादकांसाठी महाराष्ट्रातील त्या-त्या भागातील सर्व खासदार, सर्व आमदार हे दिल्लीमध्ये तळ ठोकून होते आणि याबाबतीत निर्णय लागेपर्यंत येथून हलणार नाही अशी भूमिकाही त्यांनी घेतली होती. मग माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन, याबाबत माननीय पंतप्रधान यांना भेटून हा प्रश्न मार्गी लावण्या -साठी जो दबाव निर्माण केला होता, तो लक्षणीय होता. त्यानंतर कांदा उत्पादकांच्या निर्यातीला सरकारने मुभा दिल्यानंतर कांदा उत्पादकांचा प्रश्न मिटला होता.पण दुर्दैव असे की, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये कांद्याचे भाव गडगडले.त्यामुळे निर्यात बंदी नसतानाही कांदा निर्यातीबाबत प्रश्न निर्माण झाला.आता कांद्याचे मोठ्या प्रमाणावर पीक आलेले आहे आणि या पिकाला भाव मिळत नसल्याने कांदा उत्पादकांची परिस्थिती गंभीर झालेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय,आज एका शेतकऱ्याने त्या भागातील आमदार श्री.शिरीष कोतवाल यांना सांगून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.पण सन्माननीय सदस्य श्री.शिरीष कोतवाल यांनी अतिशय



श्री.दिवाकर रावते . . ..

तातडीने पावले उचलल्यामुळे शेतकऱ्याने जरी आत्महत्येचा प्रयत्न केला असला तरी त्यांना मृत्यूचा धोका नाही. परंतु सध्या त्यांना रुग्णालयामध्ये दाखल केलेले आहे इतकी गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. या सदनामध्ये चर्चा करीत असताना केवळ कापूस उत्पादक नाही तर धान उत्पादक शेतकरी, सोयाबीन उत्पादक शेतकरी, तेल उत्पादक शेतकरी सुध्दा राज्यामध्ये आत्महत्या करीत आहेत अशी स्थिती निर्माण झालेली आहे.विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख जेव्हा पणन मंत्री होते, तेव्हा देखील अशाच प्रकारची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी बैठक बोलाविली होती आणि ही कोंडी फोडण्यासाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये भाव गडगडले तरी नाफेडच्या माध्यमातून केंद्र शासनाला सांगून हमी भावामध्ये कांद्याची खरेदी केली होती आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यात आला होता. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे.

सभापती महोदय, आज एका शेतकऱ्याने आत्महत्येचा प्रयत्न केला आहे आणि जर अशा प्रकारे साखळी सुरु झाली तर फार मोठी गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणून याबाबतीत सरकारच्या माध्यमातून नेमकी कोणती भूमिका घेतली जात आहे? कांदा उत्पादकांकडून कोणत्या स्वरुपामध्ये खरेदी करणार आहात? नाफेडच्या माध्यमातून खरेदी करण्यास सांगणार की शासन त्यांना प्रती हेक्टर किंवा प्रती क्विंटल अनुदान देणार आहे हा प्रश्न आहे. आता सरकारने कांदा उत्पादकांच्या समस्येमध्ये लक्ष घालून अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी निर्णय घेणे आवश्यक आहे.त्यामुळे सभागृहासमोरील सर्व कामकाज थांबवून या प्रश्नाबाबत चर्चा होणे गरजेचे आहे. या राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आणखी हत्या होण्यापूर्वी शासनाने आणि सभागृहाने याबाबत नोंद घेतली पाहिजे अशी मी येथे भूमिका मांडत आहे. म्हणून सध्या सभागृहासमोर जे कामकाज आहे, ते थांबविण्यात यावे आणि भविष्यामध्ये आणखी जर 2-4-5 दिवसामध्ये शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या थांबवावयाच्या असतील तर कांदा उत्पादकांना शासन कशा प्रकारे मदतीचा हात देणार आहे हे समजणे आवश्यक आहे.म्हणून मी आग्रहाने ही भूमिका घेत आहे. धन्यवाद.

----


. . . .अे-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आज याठिकाणी सन्माननीय सदस्यांकडून नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत आपल्याला सूचना देण्यात आली आहे. माझे असे म्हणणे आहे की, या मध्ये प्रश्नोत्तराचा संपूर्ण तास संपतो.सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील किती मिनिटे बोलावयाचे आहे?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,मी दोन मिनिटात बोलणार आहे. मी तुम्हाला नाही असे म्हणू शकत नाही.

**उप सभापती** : ठीक आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकरजी रावते यांनी 289 अन्वये आजचे सभागृहासमोरील सर्व कामकाज स्थगित करण्याची मागणी करुन कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत चर्चा करावी अशी सूचना मांडलेली आहे.मी त्याला पाठिंबा देण्यासाठी उभा आहे.मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी सांगितलेली एक गोष्ट मी पुन्हा बोलत आहे. गेल्या वेळेला अशा प्रकारची कांद्याबाबत परिस्थिती निर्माण झालेली असताना या राज्याचे खासदारच नव्हेतर या राज्यातील मंत्री देखील रस्त्यावर आले होते. त्यावेळी आम्ही माननीय पणन मंत्री हे स्वत: नाशिकला आल्याचे टी.व्ही.वर पाहिलेले आहे आणि तेच अशी मागणी करीत होते की, याबाबतीत धोरण बदलण्यात यावे. त्यावेळी त्यांनी जाहीर केले की, कांद्याचे मार्केट वर-खाली झाले तरी राज्य शासन यासाठी कोल्ड स्टोअरेज तयार करील आणि कांद्याचे भाव स्थिर ठेवण्याबाबत एक वेगळे धोरण जाहीर करील. त्या अनुषंगाने राज्य शासनाने कोणते धोरण ठरविलेले आहे आणि यादृष्टीने कोणती भूमिका बजावलेली आहे हे या ठिकाणी चर्चेच्या निमित्ताने कळले पाहिजे आणि त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला पाहिजे अशी मी याठिकाणी मागणी करीत आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे, त्याला माझा पाठिंबा आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री.दिवाकर रावते, रामदास कदम सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत,डॉ.नीलमताई गोऱ्हे वि.प.स.यांनी आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसलेल्या बाबी संबंधात सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला ठेऊन नियम 289 अन्वये सूचना दिली आहे. मात्र सन्माननीय सदस्यांनी दिलेला प्रस्ताव कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे उपरोक्त नियम 289 अन्वयेच्या सुचनेस मी अनुमती नाकारीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विषयाच्या बाबतीत शासनाची भूमिका काय आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

हे कोणी सरकारला विचारले देखील नाही. हे बरोबर नाही. यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. आम्हाला हे मंजूर नाही. सरकारच्या वतीने या विषयाच्या बाबतीत कोणतीही भूमिका मांडण्यात आलेली नसल्याने आम्ही याचा निषेध करुन सभात्याग करतो.

(यानंतर विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी सभात्याग केला.)

श्री.भाई जगताप (खाली बसून) : हा सगळा प्रायोजित कार्यक्रम आहे असे वाटते.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, विधान परिषद नियम क्रमांक 289 नुसार विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे.

(विरोधी पक्षचे सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये येतात.)

श्री.नारायण राणे : विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी सभात्याग केलेला आहे आणि त्यानंतरच मी उठलो आहे. परंतु नियम क्रमांक 289 मध्ये सत्तारुढ पक्षाने उत्तर द्यावे असे कुठेच म्हटलेले नाही. या नियमानुसार देण्यात आलेला प्रस्ताव मांडण्यास अनुमती द्यावी की नाही याबाबतचा अधिकार माननीय सभापती यांचा आहे. सभापती महोदय, आपण जरा त्यांना याबाबत नियम काय आहे ते सांगावे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला असे विचारावयाचे आहे की, याबाबतीत आपले म्हणणे काय आहे, आपण या अनुषंगाने काही निवेदन करणार आहात काय, काही निदेश देणार आहात काय ? हा आगाऊपणा झाला. आम्ही सरकारच्या प्रवृत्तीचा निषेध करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य पुन्हा सभात्याग करतात.)

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, मला बोलू द्यावे. त्यांचे एकदा बोलून झालेले आहे. विरोधी पक्षाकडून जो प्रस्ताव देण्यात आला होता, त्याबाबत आपण रुलींग देणार होता म्हणून आम्ही गप्प राहिलो. याठिकाणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या बाबतीत प्रश्न आहे.आजच सकाळी माननीय मुख्यमंत्र्यांच्या घरी या विषयाबाबत सविस्तर चर्चा झाली.या बाबत कांदा उत्पादक अडचणीत आहेत,त्यांच्यासमोर निर्यातीचा प्रश्न आहे.याबाबत कोणती भूमिका घ्यावी आज अधिवेशन संपण्यापूर्वी माननीय मुख्यमंत्री माहिती देणार आहेत.हे सगळे ठरलेले आहे.आता याठिकाणी विरोधी पक्षाने 289 अन्वये प्रस्ताव दिल्यानंतर तो चर्चेसाठी येईपर्यंत सत्तारुढ पक्षाने उत्तर द्यावयास पाहिजे असे नाही.जर हा प्रस्ताव चर्चेसाठी आला तर मग सत्तारुढ पक्षाने त्या बाबत उत्तर द्यावयास पाहिजे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे . . . .

असे 289 नियमामध्ये म्हटले आहे.परंतु याठिकाणी विरोधी पक्षाने प्रस्ताव मांडावयाचा आणि याबाबत उत्तर देण्यात यावे असे त्यांनीच सांगावयाचे हे कसे काय? सभापती महोदय, जोपर्यंत आपण रुलींग देत नाही किंवा आपण सरकारला विचारीत नाही की, यासंबंधी तुम्हाला काही सांगावयाचे आहे काय? तोपर्यंत येथे बोलण्याचा प्रश्न येत नाही.परंतु विरोधी पक्षाने प्रस्ताव मांडावयाचा,त्यांनीच सभात्याग करावयाचा हे काय चालले आहे? खरे म्हणजे या सदनामध्ये जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी विरोधी पक्ष कमी पडत आहे म्हणून शेतकऱ्यांच्या नावावर ही पळवाट काढली जात आहे एवढेच मी म्हणेन.

-----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**राज्यातील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल करण्याबाबत**

**(१) * २३०१२ प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे , डॉ.सुधीर तांबे , श्री.रामनाथ मोते , श्री.कपिल पाटील , श्री.जयंत प्र. पाटील , श्री.सतीश चव्हाण , श्री.राजेंद्र जैन , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे,ॲड. उषाताई दराडे , प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली , श्री.दीपकराव साळुंखे : तारांकित प्रश्न क्रमांक १८४५५ ला दिनांक ११ ऑगस्ट, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**
सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल करण्याबाबत क्षेत्रीय यंत्रणाकडून मागविलेली माहिती उच्चस्तरीय समिती पुढे ठेवण्यात आली आहे काय,
(२) असल्यास, सदर माहितीच्या अनुषंगाने उच्चस्तरीय समितीने आपला अहवाल शासनास पाठविला आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालात कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत व सदर शिफारशींची अंमलबजावणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.राजेंद्र दर्डा** : (१),(२), (३) व (४) क्षेत्रीय यंत्रणेकडून माहिती प्राप्त झाली असून सदर माहिती तपासून उच्चस्तरीय सचिव समितीसमोर सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

प्रा. दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, या राज्यातील खाजगी शाळांमध्ये एक शाळा एक ग्रंथपाल या सूत्रानुसार नियुक्त्या करण्यात आल्या. दिनांक 3 ऑगस्ट, 2006 मध्ये 1000 पटसंख्येच्यावर एका पटसंख्येसाठी एक ग्रंथपाल त्या ठिकाणी मंजूर करण्यात आले त्याप्रमाणे 924 अर्धवेळ ग्रंथपाल पूर्णवेळ ग्रंथपाल झाले. त्याचवेळी 100 पटसंख्या खालील 1067 अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याच्या संदर्भात संघटनांनी आणि सभागृहाने सतत मागणी केली. पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ सेवा झालेल्या किंवा 500 पटसंख्या असलेल्या अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल करणे योग्य होईल अशी मंत्रालयीन टिप्पणी देखील झाली. शाळांची संख्या वाढत आहे त्यामुळे एका शाळेत 1000 पटसंख्या होणे अशक्य आहे.उत्तरात असे म्हटलेले आहे की, "क्षेत्रीय यंत्रणेकडून माहिती प्राप्त झाली असून सदर माहिती तपासून उच्चस्तरीय सचिव समितीसमोर सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे." माझा प्रश्न असा आहे की, या बाबत तातडीचे निर्णय होऊन शासनादेश जारी होईल काय आणि तो निर्णय किती दिवसात होईल.?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, अर्धवेळ ग्रंथपाल पदावर पाच वर्षापेक्षा अधिक काळ नियमित सेवा केलेल्या उमेदवारांना विद्यार्थी संख्येचा निकष शिथिल करुन पूर्णवेळ ग्रंथपाल करण्याची मागणी संघटनेची होती आणि त्या अनुषंगाने शासनाने दिनांक 3 ऑगस्ट, 2006 च्या शासन निर्णयानुसार काही अटींवर 924 अर्धवेळ ग्रथापालांना पूर्णवेळ ग्रंथपाल पदात उन्नत करण्यास परवानगी दिली. त्यावेळी ज्या अटी टाकण्यात आल्या होत्या त्यापैकी 1) दिनांक 1 एप्रिल, 2006 पूर्वी मागील तीन शैक्षणिक वर्षात 1000 विद्यार्थी संख्या असणे आवश्यक आहे. 2) सदर विद्यार्थी संख्या ही अनुदानित वर्ग तुकडयांची असली पाहिजे.3) मंजूर अर्धवेळ ग्रंथपाल पदावर विहित प्रक्रियेच्या माध्यमातूनच त्यांची नियुक्ती असली पाहिजे. 4) संबंधित कर्मचाऱ्यांची पाच वर्षे नियमित सेवा होणे आवश्यक आहे. अशा पध्दतीने या अटींची पूर्तता केलेल्या 675 अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल पदात उन्नत करण्यात आले आहे. मात्र त्याच वेळेला 500 ते 1000 पटसंख्या असलेल्या शाळांमधील अर्धवेळ ग्रंथपाल पदांची पूर्णवेळ ग्रंथपाल पदांमध्ये उन्नत करण्याची मागणी आली. या सभागृहात त्या बद्दल वारंवार चर्चा झाली. 1067 कर्मचाऱ्यांचा हा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मन्यतेसाठी सादर करण्यात आला आणि त्याला माननीय मुख्यमंत्र्यांनी असे निर्देश दिले की, हा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीकडे पाठविण्यात यावा. त्याप्रमाणे उच्चस्तरीय समितीची बैठक झाली. वित्त विभागाने त्यावर आक्षेप घेतले, त्यानंतर शिक्षण संचालक माध्यमिक यांनी, शासनाने याला मान्यता दिली तर 8 कोटी 51 लाख रुपयाच्या आवर्ती खर्चाचा आर्थिक भार पडेल असे सांगितले. त्यानंतर दिनांक 25 ऑक्टोबर, 2011 रोजी शिक्षण संचालक, माध्यमिक यांनी या प्रस्तावाचे समर्थन केलेले आहे त्यामुळे मला खात्री आहे की, हा प्रस्ताव संयुक्त समितीकडे जाणार आहे. संयुक्त समितीमार्फत तो उच्चस्तरीय समितीकडे जाणार आहे तेव्हा यामधून निश्चितपणे काही तरी मार्ग निघेल असे मला वाटते.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सकारात्मक भूमिका घेऊन उत्तर दिलेले आहे. हे खरे आहे की, विद्यार्थी संख्या दिवसेंदिवस कमी होत असल्यामुळे 1000 चा निकष आता कोणतीही शाळा पूर्ण करु शकणार नाही. त्यामुळे 1000 च्या निकषाच्या आधारे या अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल पदावर उन्नत करण्यात येणार असेल तर ते होणे शक्य नाही म्हणून ती अट शिथिल करुन जे 1067 कार्यरत कर्मचारी आहेत त्या कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्याच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितलेले आहे तेव्हा या संदर्भात सकारात्मक भूमिका घेऊन कार्यवाही होणे अपेक्षित आहे. या संदर्भात दिनांक 21 मार्च, 2001 रोजी एका लक्षवेधीच्या माध्यमातून या सभागृहात चर्चा झाली होती. माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले होते की, या संबंधीचा प्रस्ताव लवकरात लवकर वित्त विभागाकडे पाठविण्यात येईल. त्याचबरोबर आता जर पूर्णवेळ ग्रंथपाल होणार नसतील तर या अर्धवेळ ग्रंथपालांचे समायोजन करण्याच्या दृष्टीने साधारणत: दोन-तीन शाळा मिळून एक पूर्णवेळ ग्रंथपाल देता येईल काय हा मुद्दा विचारात घेण्यात येईल असे माननीय मंत्रीमहोदयांनी संगितले होते. तेव्हा या अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल करण्याच्या संदर्भात हा निकष लावून न्याय देता येईल काय या दृष्टिकोनातून शासनाचे नक्की धोरण काय आहे?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, आज राज्यात माध्यमिक आणि उच्च माध्यमिक अनुदानित शाळांमध्ये एकूण 2376 अर्धवेळ ग्रंथपालांची पदे मंजूर आहेत. या संबंधीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे नेण्यात येईल असे या सभागृहात आश्वासन देण्यात आले होते. हा प्रश्न आता खूप पुढे गेलेला आहे. वित्त विभागाने माहिती मागितल्यानंतर शालेय शिक्षण विभागाने सांगितलेले आहे की, 8 कोटी 51 लाख रुपयाचा आवर्ती खर्चाचा आर्थिक भार पडणार आहे. सन्माननीय सदस्यांनी विद्यार्थी पटसंख्या दिवसेंदिवस कमी होत आहे या अनुषंगाने दुसरी सूचना केलेली आहे. खरे म्हणजे ती का कमी होत आहे हे मला कळत नाही. कारण लोकसंख्या वाढत आहे.शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. शिक्षणाची टक्केवारी वाढत आहे अशा वेळेला विद्यार्थी पटसंख्या कमी होण्याचे काही कारण नाही. पण मध्यंतरीच्या काळामध्ये ज्यांनी ही पटसंख्या वाढविली होती ती काही कारणांमुळे निश्चितपणे कमी झालेली आहे. ज्या वेळी अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपालात उन्नत करणे शक्य नसेल त्या वेळी दोन-तीन शाळा एकत्र करुन पदोन्नत करण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे तिचा निश्चितपणे सकारात्मक विचार करण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, ज्या शाळांमध्ये पूर्णवेळ ग्रंथपालांच्या जागा रिक्त आहेत आणि ज्या शाळांमध्ये अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपालांचा दर्जा देणे कदापि शक्य नाही अशा ग्रंथपालांना ज्या ठिकाणी पूर्णवेळ पदे रिक्त आहेत त्या शाळांमध्ये समायोजित करता येईल,

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील. . .

तसे करावे. क्लस्टरच्या बाबतीत सांगण्यात आलेले आहे, तो एक उपाय आहे. पण जेथे रिक्त पदे आहेत तेथे या अर्धवेळ ग्रंथपालांना सामावून घेतले तर ज्यांनी वर्षानुवर्षे काम केलेले आहे त्याना किमान पूर्ण वेतन मिळण्याची काही संधी उपलब्ध होऊ शकेल तेव्हा याचा विचार करण्यात येणार आहे काय?

श्री. राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी या ठिकाणी जी सूचना केलेली आहे तिचा निश्चितपणे तपासून सकारात्मक विचार केला जाईल.

---

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मराठवाड्यातील विद्यापीठ अनुदान आयोगाचे व ज्ञान विज्ञान महाविद्यालयाचे केंद्रात प्रशिक्षण पात्र कर्मचारी वर्ग नेमण्याबाबत**

**(२) * २१९०६ श्री.सतीश चव्हाण , श्री.अरुणकाका जगताप , श्री.विक्रम काळे , श्री.एम.एम.शेख :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील अभ्यासू होतकरु तरुणांना आय.ए.एस. व आय.पी.एस.बनवण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे व ज्ञान विज्ञान महाविद्यालयाचे आय.ए.एस/ आय.पी.एस. कोचिंग सेंटर २९ वर्षापासून सुरु असून आतापर्यंत या केंद्रातून एकही आय.पी.एस. अधिकारी झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही केंद्राकडे अद्ययावत ग्रंथालय, रीडिंग रुम, क्लासरुम व कोणत्याच निधीची कमतरता नसतानाही प्रशिक्षित कर्मचारी नसल्यामुळे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोन्ही केंद्रावर प्रशिक्षित पात्र कर्मचारी वर्ग नेमण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ?

**##श्री.राजेश टोपे** : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

औरंगाबाद येथे अद्ययावत ग्रंथालय, वाचन कक्ष, वर्ग खोली व इंटरनेट सुविधा उपलब्ध आहेत. तसेच विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी तज्ञ व्यक्तींना पाहुणे व्याख्याते म्हणून बोलविण्यात येते.

(३) व (४) बाहेरील तज्ञ व्यक्तींना बोलावून त्यांचे मार्फत प्रशिक्षण देण्याची सदर योजना आहे.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, मराठवाडयामध्ये यु.पी.एस.सी.साठी शासकीय कॉलेजमध्ये प्रशिक्षण केंद्र आहे. या केंद्रामधून एकही आय.ए.एस. झालेला नाही असा प्रश्न मी विचारला होता त्याला उत्तर देताना 'हे खरे नाही' असे म्हटले आहे. गेल्या 29 वर्षामध्ये या केंद्रातून फक्त एकच विद्यार्थी आय.पी.एस. झाला आहे. या विद्यार्थ्याची या केंद्रात नॉमिनल ॲडमिशन होती आणि तो बाहेर शिकायला होता. मुंबई येथील केंद्रातून 230 आय.ए.एस., आय.पी.एस. झालेले आहेत. म्हणजे मराठवाडयातील या केंद्रामध्ये काही तरी कमतरता निश्चितपणे आहे. या केंद्रात प्रशिक्षित स्टाफ नाही असा प्रश्न मी विचारला होता त्याला उत्तर देताना 'हे खरे नाही' असे म्हटलेले आहे. या ठिकाणी 7 लोकांचा स्टाफ आहे. त्यामध्ये एक पार्ट टाईम डायरेक्टर आहेत आणि बाकी शिपाई, लिपिक अशा लोकांची भरती करण्यात आलेली आहे. त्यांचा या प्रशिक्षणासाठी काही उपयोग होत नाही.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.21906. . .

श्री. सतीश चव्हाण. . .

सन्माननीय मंत्री महोदय, श्री. राजेश टोपे यांनी मागच्या अधिवेशनामध्ये उत्तर दिले होते की, चालू अधिवेशन संपताच या ठिकाणी पूर्णवेळ संचालक नेमण्यात येतील. पण या ठिकाणी अद्याप पूर्णवेळ संचालक नेमण्यात आलेले नाहीत. तेव्हा या ठिकाणी पूर्णवेळ संचालक नेमण्यात येतील काय आणि त्यांना व्हिजिटिंग फॅकल्टी नेमण्याचे अधिकार देणार काय? तसेच या व्हिजिटिंग फॅकल्टीला पर अवर फक्त 150 रुपये देण्यात येतात. एवढया कमी पैशात त्याठिकाणी शिकविण्यासाठी कोण येणार आहे? या केंद्राला स्वत:ची इमारत नाही, वसतिगृह नाही. सगळे भाडयाच्या जागेत चालते तेव्हा या केंद्रासाठी स्वतंत्र इमारत आणि वसतिगृह बांधण्यात येईल काय? या केंद्रातील प्रशिक्षण हे केवळ एका वर्षाचे आहे. या एका वर्षापैकी 6 महिने ॲडमिशन प्रोसिजरमध्ये जातात उर्वरित 6 महिन्यात विद्यार्थी यु.पी.एस.सी.ची काय तयारी करणार? तेव्हा विद्यार्थ्यांची निवासी वसतिगृहात दोन वर्षे सोय करण्यात येणार आहे का आणि त्यांची शिष्यवृत्ती वाढविण्यात येईल काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जवळ जवळ चार प्रश्न या ठिकाणी विचारलेले आहेत. ही वस्तुस्थिती आहे की, औरंगाबादच्या प्री आय.ए.एस. केंद्रातून पास होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. मुंबईत असलेले प्री आय.ए.एस. केंद्र हे अतिशय नावाजलेले असून या केंद्राच्या स्थापने पासून नाही पण गेल्या आठ-दहा वर्षातील माहिती मी सांगतो. या केंद्रातून 230 विद्यार्थी यु.पी.एस.सी. झालेले आहेत. त्यापैकी आय.ए.एस. 23 आहेत आणि आय.पी.एस.33 आहेत. औरंगाबाद येथील केंद्र रिजनल दृष्टिकोनातून मुंबईच्या केंद्राप्रमाणे विकसित होणे अपेक्षित आहे.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 21906..... श्री. राजेश टोपे ....

कारण रिजनल दृष्टीकोनातून ते आवश्यक आहे. त्या ठिकाणी ज्या उणिवा आहे त्यामध्ये एक बाब नक्की आहे. त्याची लिडरशीप करणारा जो डायरेक्टर असतो तो महत्वाचा विषय असतो. त्या ठिकाणी फुलफ्लेज डायरेक्टर दिला पाहिजे. त्या ठिकाणी फुलफ्लेज डायरेक्टरची पोस्ट आहे पण आज इन्स्टिटय़ूट ऑफ सायन्स, औरंगाबाद यांचा चार्ज सुध्दा त्याच डायरेक्टरकडे आहे. त्यांच्याकडे ॲडिशनल चार्ज देण्यात आलेला होता. निश्चितपणे ॲडिशनल चार्ज ताबडतोबीने आजच्या आज काढण्यात येईल आणि त्या प्री आयएएस केंद्राला फुलफ्लेज डायरेक्टर देण्यात येईल.

दुसरा महत्वाचा विषय असा आहे की, कोणत्या व्हिजिटींग फॅकल्टीज लावावयाच्या किंवा कोणाला बोलवावयाचे याबाबत डायरेक्टरला पूर्ण अधिकार असतो. एक बाब नक्की आहे की, डायरेक्टरचा परफॉर्मन्स बघणे सुध्दा निश्चितपणे आवश्यक आहे. बेस्ट ऑफ द फॅकल्टीज किंवा बेस्ट ऑफ द टिचर्स जर आपण त्या ठिकाणी लावले, जी फ्रेश आय.ए.एस. पास झालेली मुले असतात त्यांना पण त्यातील खूप ज्ञान असते तसेच तेथे शिकवत असलेले जे आय.ए.एस. असतात त्यांना सुध्दा त्या ठिकाणी घेऊ शकतो. चांगल्यातील चांगल्या फॅकल्टीज त्या मुलांना शिकविण्यासाठी उपलब्ध व्हाव्यात अशा पध्दतीची जी अपेक्षा सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली त्या बाबतीत डायरेक्टरला अधिकार आहेतच पण त्या संदर्भात अधिक चांगल्या पध्दतीने बघितले जाईल.

ही वस्तुस्थिती आहे की, आपल्या राज्यात मुंबई, कोल्हापूर, नागपूर आणि औरंगाबाद अशी चार सेंटर्स आहेत आणि त्यातील हे एकमेव सेंटर असे आहे की, ज्या ठिकाणी वसतिगृहे आणि स्वत:ची इमारत नाही. त्यामुळे या निमित्ताने मी निश्चितपणे सभागृहाला सांगू इच्छितो की, याच वर्षी त्यासाठी 50 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे परंतु एकूण जे 3 कोटी रुपये लागणार आहेत ती सर्व रक्कम या दोन वर्षात उपलब्ध करुन दिली जाईल आणि त्या ठिकाणी 60 मुलांसाठी म्हणजे मुले आणि मुली मिळून जे 30-30 विद्यार्थी असतात तेवढ्या क्षमतेचे वसतिगृह आणि इमारती दोन वर्षाच्या आत पूर्ण केल्या जातील. स्टायफंडच्या संदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो 4 महिन्यापूर्वीच जे 1 हजार रुपये प्रतिमहा प्रशिक्षणार्थींना स्टायफंड किंवा मानधन मिळत

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होते ती रक्कम आता 1 हजार रुपयांवरुन 2 हजार रुपये करण्याचा निर्णय 31 मे, 2011 रोजी घेण्यात आलेला आहे. त्याचबरोबर जे एक्स्पर्टचे लेक्चर्स असतात त्यांचे मानधन सुध्दा 150 रुपये प्रती लेक्चर असे नसून 300 रुपये प्रती लेक्चर होते आणि ती रक्कम सुध्दा 600 रुपये प्रती लेक्चर करण्याचा निर्णय 31 मे, 2011 रोजी घेण्यात आलेला आहे.

**उप सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी आपले प्रश्न अतिशय संक्षिप्त स्वरुपात विचारावेत. जर सविस्तर स्वरुपात प्रश्न विचारले तर पुढचे सगळे प्रश्न थांबतात.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी अतिशय सकारात्मक उत्तर दिलेले आहे. त्यांनी त्या ठिकाणी काय उणिवा आहेत ते सांगितले. त्या केंद्रातून 29 वर्षात एकूण किती आय.ए.एस. आणि आय.पी.एस तयार झाले याची माहिती सुध्दा माननीय मंत्री महोदयांनी सांगावी. त्यांची संख्या सभागृहासमोर आणि लोकांसमोर येऊ द्यावी. आपण या गोष्टीची दखल घेऊन तत्काळ त्यावर निर्णय घेतला या आपल्या भूमिकेचे मी स्वागत करतो. परंतु तेवढ्याने सर्व काही सुधारेल असे समजण्याचे कारण नाही. माननीय मंत्री महोदयांनी स्टायपेंडबाबत सांगितले. स्टायफंड 1 हजार रुपयावरुन 2 हजार रुपये केल्याने काय होणार आहे ? आज आपल्याकडे कंत्राटी शिक्षकांचे मानधन सुध्दा 3 हजार रुपयांवरुन 6 हजार रुपये केले. ते मला माहीत आहे कारण त्या प्रक्रियेमध्ये आम्ही सुध्दा होतो. अशा वेळेला आय.ए.एस. सारखा विषय ही मुले ज्या ठिकाणी शिकणार आहेत त्यांना त्या ठिकाणी 2 हजार रुपये स्टायफंड मिळणार आहे. जर त्या ठिकाणी दर्जेदार फॅकल्टीज आल्या नाहीत, जर दर्जेदार लोक त्या ठिकाणी आले नाहीत तर ते होणार नाही. विद्यार्थ्यांसाठी जो स्टायपेंड आहे तो सुध्दा आपल्याला वाढविणे आवश्यक आहे. आम्ही सगळ्यांनी 5 हजार रुपयांची मागणी केलेली आहे. 2 हजार रुपयांमध्ये त्यांचा उदरनिर्वाह होणार आहे का ? तो स्टायफंड शासन 5 हजार रुपये करणार का ? त्या केंद्रातून आतापर्यंत किती आय.ए.एस. तयार झाले ? या संस्थेच्या इमारतीसाठी 3 कोटी रुपयांची जी तरतूद करणार आहात ते काम 2 वर्षामध्ये इफेक्टिव्हली होईल यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ? माननीय मंत्री महोदयांनी 2 वर्षाचा कालावधी सांगितला. दोन वर्षात ते होईल याची खात्री करण्यासाठी एखादी कमिटी नेमणार काय ?

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

ता.प्र.क्र. 21906 ....

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी त्या केंद्रातून आय.ए.एस. किती झाले असा पहिला प्रश्न विचारला. सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे त्या केंद्रातून 1 आय.पी.एस. झालेला आहे. त्या ठिकाणी युपीएससीची तयारी करतात पण त्या ठिकाणाहून असंख्य विद्यार्थी एमपीएससी पास झालेले आहेत. त्या केंद्रातून विद्यार्थी आय.ए.एस. होऊ शकले नाहीत परंतु एमपीएससीमध्ये उप जिल्हाधिकारी किंवा गट विकास अधिकारी झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. मी हे मान्य केले आहे की, या केंद्राचा निकाल कमी आहे. त्यामुळे त्या ठिकाणी सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. वसतिगृहाची बांधकामे आणि इमारतीचे बांधकाम करावयाचे आहे त्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी प्रश्न विचारला. त्याबाबत सांगू इच्छितो की, निश्चितपणे इमारत आणि वसतिगृहे या दोन्ही कामाचे साधारणत: 3 कोटी रुपयांचे जे एस्टिमेट आहे ती रक्कम 2 वर्षात देण्यात येईल. विद्यार्थी ग्रॅज्युएट झाल्यानंतर तो युपीएससीची तयारी करतो. त्यामुळे त्या ठिकाणी प्रशिक्षणार्थीला राहण्यासाठी वसतिगृह मोफत देण्यात आलेले आहे आणि त्याला महिन्याचा मेस वगैरे बाकीच्या गोष्टीचा जो खर्च असतो त्यासाठी 2 हजार रुपये दरमहा अशा पध्दतीने आपण दिलेले आहेत. त्या ठिकाणी मोफत ग्रंथालय आहे. त्या ठिकाणी वाचन कक्ष असतो. त्या ठिकाणी मोफत इंटरनेटची सुविधा आहे. त्या ठिकाणी वायफायची सुविधा आज नाही पण ते सर्व त्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येईल. ग्रंथालय अधिक अद्ययावत करण्याच्या दृष्टीकोनातून सुध्दा व्यवस्था करण्यात येईल.

मुंबईचे सेंटर आणि औरंगाबादचे सेंटर यामध्ये फरक असा आहे की, मुंबई केंद्राच्या ठिकाणी तेथील डायरेक्टर नवीन पध्दतीने काम करतात. त्या ठिकाणी बऱ्याचदा मराठमोळी मुले, ग्रामीण भागातील मुले इंटरव्ह्यूच्या बाबतीत न्यूनगंड बाळगतात. त्यांच्या मनामध्ये न्यूनगंड असतो आणि त्यामुळे एक प्रकारचा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये नसतो. म्हणून त्या ठिकाणी ग्रुप डिस्कशनची पध्दत अधिक वाढविण्याची आवश्यकता आहे. मुंबईची ही जी पध्दत आहे ती त्या ठिकाणी सुरु करण्याच्या सूचना दिल्या जातील. मुलाखतीच्या दृष्टीकोनातून मुलाखतीचे प्रशिक्षण जाणीवपूर्वक त्या ठिकाणी घेऊन जे मॉक इंटरव्ह्यूज असतात म्हणजे जवळजवळ डमी इंटरव्ह्यू अशा पध्दतीचे मॉक इंटरव्ह्यूज घेण्याचे काम त्या ठिकाणी केले जाईल. त्या ठिकाणी जर त्या सर्व इंटरव्ह्यूचे

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 21906..... श्री. राजेश टोपे ....

व्हिडिओ शुटींग करणे आणि त्यांच्यामध्ये काय कमतरता आहे ते जर आपण त्या विद्यार्थ्याला किंवा प्रशिक्षणार्थ्याला दाखविणे आणि त्या बाबतीत दुरुस्ती करण्याचा प्रयत्न करणे असे जे प्रयोग आहेत ते त्या ठिकाणी करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अशा पध्दतीचे मॉक इंटरव्ह्यूज, मुलाखत प्रशिक्षण, ग्रुप डिस्कशन्स, इंटरॲक्शन पध्दतीने शिक्षणाची पध्दत तसेच मॅनरिझम वगैरे ज्या गोष्टी आहेत त्या अधिक प्रभावीपणे मुंबईच्या सेंटरमध्ये जशा केल्या जातात त्या औरंगाबादला सुध्दा करण्याची जी गरज आहे ते सुध्दा केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी या ठिकाणी हा प्रश्न उपस्थित केला आणि माननीय मंत्री महोदयांना उत्तर देण्याची संधी मिळाली त्याबद्दल मी सन्माननीय सदस्यांना मनापासून धन्यवाद देतो. माननीय मंत्री महोदय मराठवाड्यातील आहेत. आपल्याकडे हे खाते आहे. आता आपण सांगत आहात की, आजपासून आम्ही ते करु. मी आपल्या माहितीकरिता सांगतो की, मी वैधानिक विकास मंडळाचा अध्यक्ष असताना 2 कोटी रुपयांची व्यवस्था करुन जागा मिळवून इमारत उभारण्याची व्यवस्था केली होती त्या गोष्टीला आता 12 ते 15 वर्षे झालेली आहेत. आता ती वक्फ बोर्डाची जागा नाही हे सिध्द झालेले आहे. पण त्या गोष्टीमुळे ते काम त्यावेळी थांबले. या पंधरा वर्षामध्ये आपल्याकडे गेली चार वर्षे हे खाते आहे असे असताना संभाजीनगरला ज्यावेळी मंत्रीमंडळाची बैठक होते त्यामध्ये आपण कधी हा विषय मांडल्याचे ऐकिवात नाही. त्या ठिकाणी 29 वर्षात फक्त एक अधिकारी पास होतो. आज आपण सांगत आहात की, आता आम्ही हे करणार आहोत. ते सुध्दा आज या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला म्हणून आपण सांगत आहात. हे सर्व झाले आहे आणि आपण जी सूचना मांडत आहात ती आम्ही स्वीकारतो असे जर आपण सांगितले असते तर मला अभिमान वाटला असता.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.21906.... श्री.दिवाकर रावते...

ते न करता प्रश्न मांडला आहे म्हणून सांगत आहात. आपण मराठवाड्याचे मंत्री आहात. यापुढे काय केले जाणार आहे हे सांगण्यापेक्षा ही इमारत कोठे बांधली जाणार आहे ते सांगावे. माननीय अर्थ मंत्री या कामासाठी 2 कोटी रुपये देतील ते तुम्ही घ्याल. ते पैसे कधी मिळतील ते देव जाणो. शासनाने या इमारतीची जागा कोठे निश्चित केली आहे ते सांगावे.

या सेंटरसाठी मुंबईचे पूर्ण वेळ प्राध्यापक उपलब्ध करुन दिले जाणार आहेत असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. या केंद्रातून आयएएस व आयपीएस अधिकारी तयार होणार आहेत. तेथे शिकणारे विद्यार्थी हे लहान विद्यार्थी नाहीत. पदवीधर झालेले हे विद्यार्थी आहेत. म्हणजे माधुकरी मागून मी मोठा झालो असे सांगण्यासारखे आहे. हे अधिकारी भविष्यात असे सांगतील की, मी 2 हजार रुपये स्टायपेंड घेऊन 1 लाख रुपये पगार घेणारा मी पगारदार झालो आहे. हे कशासाठी, कॉलेजमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शासन स्टायपेंड देते काय ? या सेंटरसाठी जागा निश्चित केली आहे काय, पैसे मिळाले तरी जागा मिळाली नाही असे घडण्याची शक्यता आहे. त्यावेळी जे घडले ते आताही घडणार आहे. मुंबईत शिकविणारे जे प्राध्यापक असतील त्यांनी संभाजीनगरला एवढे तास शिकविले पाहिजे, एवढे तास नागपूरला शिकवले पाहिजे, अशी अदलाबदल केली तरच उत्तीर्ण होणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या वाढेल. अशी संकल्पना तयार करावी. अंबेजोगाई येथील मेडिकल कॉलेजमध्ये कोणीही शिकविण्यासाठी येत नाही. त्या कॉलेजची जी परिस्थिती निर्माण झाली आहे तशी या सेंटरची होईल. अशी सिस्टिम तयार करुन हे सेंटर चालवावे ही सूचना आहे. मी त्यातील तज्ज्ञ नाही. या सेंटरचे माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन केव्हा करणार आहे ते सुध्दा जाहीर करण्यात यावे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगेन की, मी आज त्याची घोषणा करतो असे नाही. मी जबाबदारीने सांगतो की, या वर्षीच्या बजेटमध्ये इमारत व वसतिगृहाच्या पैशाची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे कोणत्याही क्षणी या केंद्राचे भूमिपूजन करता येईल. हा प्रश्न आला आहे म्हणून मी हे बोलतो असे नाही. तज्ज्ञांचे मानधन आता वाढविलेले नाही. ते मे महिन्यातच वाढविलेले आहे. या संदर्भात निर्णय

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घेतले नाहीत असे नाही. प्रत्येक लेक्चरसाठी 300 रुपयांऐवजी 600 रुपयांचे मानधन देण्याचा आणि प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांस प्रति माह 2 हजार रुपये स्टायपेंड देण्याचा निर्णय मे महिन्यातच घेतलेला आहे. या केंद्राची व्यवस्था तेथील सायन्स इन्स्टिटयूटमध्ये करण्यात येईल. मुंबईत चांगल्या फॅकल्टीज आहेत. आता इंटरनेट फॅसिलिटी आहे, व्हिडिओ कॉन्फरन्सिंगची सोय आहे. त्याद्वारे सहज केंद्रे सुरु करता येतात. आज 4 ठिकाणी केंद्रे आहेत आणि या चारही ठिकाणी व्हिडिओ कॉन्फरन्सिगची सुविधा दिली तर तेथील बेस्ट लेक्चरचे ऑन लाईन इन्टरॲक्टिव्ह सेशन पध्दतीने करता आले तर सहज करता येऊ शकेल. 2 केपीबीएसची लाईन उपलब्ध करुन दिली तर व्हिडिओ कॉन्फरन्सिगद्वारे लाईव्ह व्हर्च्युअल क्लास रुम औरंगाबाद सेंटरमध्ये, नागपूरला सुध्दा सुरु करता येईल.

मध्यंतरी बोंगिरवार कमिटी गठित झाली होती त्यांनी या सेंटर्सची संख्या वाढवावी अशी शिफारस केली होती. त्यांच्या शिफारशीनुसार नाशिक व अमरावती या दोन ठिकाणी सन 2011-12 मध्ये सुरु करीत आहोत. पदवीधर झालेली मुले या परीक्षेला बसतात. या मुलांनी शालेय स्तरापासून पदवीधर होईपर्यंत त्यांच्यात एमपीएससी व युपीएससीच्या परीक्षा त्यांच्यासाठी कशा उपयोगाच्या आहेत यासंबंधीची जागरुकता आणली आणि तशा पध्दतीचे वातावरण निर्माण केले पाहिजे. बिहार राज्यात सध्या सगळयात जास्त आयएएस अधिकारी तयार होतात. याबाबत विभागाने माहिती घेतली आहे. तेथे पदवीधर व पदव्युत्तरचा जो अभ्यासक्रम असतो तो अभ्यासक्रम व आयएएसचा अभ्यासक्रम यामध्ये समानता ठेवलेली आहे. तशा प्रकारचा अभ्यासक्रम राज्यात सुरु करता येईल काय यासंबंधीच्या सूचना कुलगुरुंना देण्यात आलेल्या आहेत.

**उप सभापती** : मी या प्रश्नाच्या अनुषंगाने छोटीशी सूचना करु इच्छितो. ठाणे येथे आम्ही 1987 साली सी.डी.देशमुख आयएएस प्रशिक्षण संस्था ठाणे महानगरपालिकेच्या वतीने सुरु केली आहे. आज ती संस्था उत्कृष्टपणे सुरु आहे. यापूर्वीचा या संस्थेचा परफॉर्मन्स खूप चांगला आहे. त्याची तुलना करता गेल्या वर्षी तेथून तब्बल 6 आयएएस अधिकारी निवडले गेले. मला असे वाटते की, सर्व जगाचे उदाहरण देत असताना मुंबईपासून ठाणे जवळ आहे. अत्यंत अल्प खर्चामध्ये आमची ही शिक्षण संस्था सुरु आहे. हे मी मुद्दाम आपल्याला उदाहरणादाखल सांगितले आहे.

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.21906.....

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, युपीएससीच्या परीक्षेची तयारी करुन घेण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात 4 ठिकाणी संस्था सुरु करण्यात आलेल्या आहेत. या परीक्षेसाठी फक्त पदवीधर हा निकष आहे. आयएएस किंवा आयपीएस परीक्षा पास होणारे हे विद्यार्थी आर्टस्, कॉमर्स फॅकल्टीची पदवी घेतलेले असतात. सध्याच्या आयएएस अधिकाऱ्यांकडे चौकशी केल्यास असे लक्षात येईल की, आयआयटी या संस्थेतून इंजिनिअरिंग, मेटॅलॉजी, मेडिकल अशा व्यावसायिक पदव्या घेतलेले उमेदवारही आयएएस व आयपीएसच्या परीक्षेकडे आकर्षित होत आहेत. त्यांच्यात ही क्षमता आहे. त्यामुळे ते त्यांच्या हुशारीच्या जोरावर पुढे जात आहेत. ज्या विद्यार्थ्यांमध्ये अशी क्षमता नाही पण त्यांच्या टॅलेन्ट आहे, ते ओळखून त्यांना प्रोत्साहन देणे व त्यांना आयएएससाठी तयार करणे हा या संस्थेचा मूळ उद्देश आहे. या उद्देशाचे दोन भाग होतात. संगणकाच्या भाषेत हार्डवेअर व सॉफ्टवेअर म्हणतात. सॉफ्टवेअर हे अकॅडेमिक इनपूटसारखे आहे. आता मंत्री महोदयांनी सांगितले की, व्हर्चुअल क्लास रुमच्या माध्यमातून राज्यातील सर्व ठिकाणी लेक्चरचे प्रसारण केले जाईल. या केंद्रांमधील ग्रंथालयांची अवस्था वाईट आहे. यासाठी इमारतीची सोय, सपोर्ट स्टाफची व्यवस्था केली जाईल. पण यातील अकॅडेमिक इनपूट अधिक चांगला झाला पाहिजे. काही मुले टॅलेण्टेड असूनही येथेपर्यंत पोहोचता येत नाही अशा मुलांना या केंद्रात समाविष्ट करुन घेण्यासाठी कोणत्या पध्दतीची आखणी केली जाईल ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या शालेय स्तरापासून ते पदवी शिक्षणापर्यंत जागरुकता वाढविली पाहिजे. ज्यांना या क्षेत्राची आवड असेल तर त्यासाठी शालेय जीवनापासून जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. त्याचा चांगला परिणाम दिसून येऊ शकतो. त्यादृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मराठवाड्याच्या धर्तीवर विदर्भातील अमरावती येथे प्रशिक्षण केंद्र उशिराने का होईना स्थापन होणार आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीला 50 वर्षे झालेली आहेत. 50 वर्षापूर्वी या राज्यात विदर्भ सामील झाला आहे. इतक्या कालावधीनंतर विदर्भाचा शासन आज विचार करीत आहे त्याबद्दल धन्यवाद. मंत्री महोदयांनी अमरावती येथे हे केंद्र सुरु करण्याचे

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ता.प्र.क्र.21906.... श्री.पांडुरंग फुंडकर....

सूतोवाच केले आहे.  पण तेथे हे केंद्र सुरु होण्यासाठी किती दिवस लागतील, हे केंद्र सुरु करण्यासाठी शासनाकडून कोणती तातडीची उपाययोजना केली जाणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, अमरावती येथील केंद्राला शासनाची मान्यता मिळालेली आहे.  ते सेंटर विद्यापीठामार्फत ताबडतोब सुरु करावयाचे म्हटले तर या शैक्षणिक वर्षापासून म्हणजे 2012-13 या वर्षात सुरु करता येईल. या केंद्राला माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिलेली आहे.  त्यामुळे केव्हाही हे सेंटर एक संचालक व आवश्यक तो स्टाफ नेमून सुरु करता येईल.  माननीय विरोधी पक्ष नेत्यांची वेळ घेऊन हे केंद्र सुरु करण्याचा निश्चितच प्रयत्न करु.  जास्तीत जास्त फेब्रुवारी महिन्यात जिल्हा परिषदांच्या निवडणुका संपल्यानंतर हे केंद्र सुरु करता येईल.

-------

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील अशासकीय शाळांमधील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाबाबत**

**(३) * २१९३६ श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे , प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.एम.एम.शेख , डॉ.सुधीर तांबे , श्री.सतीश चव्हाण : तारांकित प्रश्न क्र १७९२० ला दिनांक २८ जुलै, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा दिनांक २५ नोव्हेंबर, २००५ चा सुधारित आकृतिबंध रद्द करण्यासंदर्भात एस.एस. कोड प्रमाणे कार्यवाही करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्थसंकल्पीय अधिवेशनात मा. शिक्षण मंत्र्यांनी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंध शासन मागे घेत असून एस.एस कोड प्रमाणे मान्यता देण्यात येईल अशी घोषणा करुनही अद्याप त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केलेला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) सदर शासन निर्णय तातडीने निर्गमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.राजेंद्र दर्डा : (१) नाही.

(२), (३), (४) व (५) प्रस्ताव उच्च स्तरीय सचिव समितीपुढे सादर करण्यात आला असता याबाबत स्वतंत्र बैठक घेण्याबाबत मा.मुख्य सचिवांनी निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे स्वतंत्र बैठक आयोजित करून प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. या सभागृहात हा प्रश्न 28 वेळा उपस्थित करण्यात आलेला आहे. मागील वेळी हा प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी यापुढे हा प्रश्न येणार नाही असे सांगितले होते.

यानंतर श्री.गिते....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

23-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E-1


ता.प्र.क्र.29936... श्री.वसंतराव खोटरे...

याबाबतीत माननीय शिक्षण मंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, एस.एस.कोड लागू करण्याची मागणी केल्यामुळे यासंबंधीची माहिती मी उच्चस्तरीय समितीकडे पाठवितो. तसेच यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडे एक बैठक आयोजित करुन, माननीय उप मुख्यमंत्र्यांना सुध्दा आमंत्रित केले जाईल. हा प्रश्न शासनाला मार्गी लावावयाचा आहे. सन्माननीय सदस्य आणि शासनाची भावना वेगळी नाही. एस.एस.कोडच्या संदर्भात पुढील एका महिन्यात बैठक घेऊन मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल. सदरहू आश्वासन देऊन आठ महिने झाले आहेत. परंतु या बाबतीत काहीही प्रगती मला दिसून येत नाही. याबाबतीत प्रत्यक्षात काय निर्णय घेतला आहे, जर यासंदर्भात निर्णय घेतला असेल तर त्यासंबंधीचे आदेश शासन लागलीच निर्गमित करील काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : 10 सप्टेंबर, 2001 च्या वित्त विभागाच्या आदेशानंतर सर्व विभागांनी आपल्या विभागातील आणि आपल्या अधिपत्याखाली येणाऱ्या विभागातील कर्मचारी आकृतीबंधाचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंधास संयुक्त सचिव समिती आणि उच्च स्तरीय समितीची मान्यता घेणे बंधनकारक होते. त्या पध्दतीने शालेय शिक्षण विभागाने देखील मान्यता घेतली आहे. आपल्याला सगळयांनाच कल्पना आहे की, शिक्षण संस्था चालक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेकडून या गोष्टीस विरोध झाला. या सभागृहात हा प्रश्न वारंवार विचारला गेला आहे. सन्माननीय सदस्यांनी मागील अधिवेशनात या प्रश्नावर चर्चा झाली, त्यासंदर्भातील इतिवृत्त वाचून दाखविले, ते इतिवृत्त माझ्याकडे देखील उपलब्ध आहे. माननीय मुख्य सचिवांबरोबर चर्चा करण्यात येईल आणि यासंबंधीचा प्रस्ताव 15 दिवसात पाठविण्यात येईल असे त्यावेळी सांगितले होते. त्याप्रमाणे ही सर्व कामे शिक्षण विभागाने सर्व कामे केलेली आहेत.

या विषयाच्या बाबतीत मुख्य सचिवांसमवेत बैठक झाली. शेवटी मुख्य सचिवांनी शालेय शिक्षण विभागास असे सांगितले आहे की, या प्रस्तावाची परत वित्त विभागाकडून पुनर्तपासणी करुन घ्यावी. यासाठी स्वतंत्र अशी बैठक आयोजित करावी. शेवटी मी एवढेच सांगतो की, मुख्य सचिवांबरोबर या विषयी बैठक झाली. त्या बैठकीत मी सांगितले की, यासंदर्भात एखादा निर्णय घेणे आवश्यक आहे. 25 नोव्हेंबर, 2005 रोजी याबाबतीत निर्णय झाला. शैक्षणिक दर्जा वाढावा ही त्यामागची भावना होती. यात टेक्नीशीयन सारखी पदे वाढविण्यात आली आहेत. यासंबंधात सगळे रिप्रेझेंटेशन पाहिल्यानंतर 31 मार्च, 2012 च्या पूर्वी याबद्दल निश्चित निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बुलढाणा जिल्ह्यातील साठवण तलावांच्या कामासाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेबाबत**

**(४) * २१५९७ श्री.पांडुरंग फुंडकर , डॉ.रणजित पाटील , श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक १७८८२ ला दिनांक ११ ऑगस्ट, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील जर्मन अर्थसहाय्यांतर्गत मंजुरी मिळालेल्या साठवण तलावांना निधी देण्याचे सन २०१० च्या पावसाळी अधिवेशनात शासनाने मान्य केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणेशपूर-२, घारोड-१, धानोरी-२ व महोदरी या चारही गावाच्या संबंधीत शेतकऱ्यांनी राजीनामे दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राजीनामे दिले असल्यामुळे भूसंपादन प्रक्रिया पूर्ण न करताही साठवण तलावांची कामे सुरु करता आली असती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ही कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे?

**श्री.गुलाबराव देवकर,डॉ.नितीन राऊत यांच्याकरिता** : (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) नाही.

(४) प्रश्नांकित चार योजनांपैकी तीन योजनांची भूसंपादनाची कार्यवाही अंतिम निवाडा स्तरावर असून एका योजनेच्या भूसंपादनाची कलम ४ ची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. या चार योजनांच्या कामांना सुधारित तांत्रिक मान्यता देण्यात आली असून त्यानुसार निविदा कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न गेल्या दोन अधिवेशनामध्ये मी उपस्थित केलेला आहे. दोन्ही वेळा शासनाकडून लेखी उत्तरे प्राप्त झाली आहेत, परंतु साठवण तलावांच्या कामांना प्रत्यक्षात सुरुवात होत नाही. बुलढाणा जिल्हयातील चार साठवण तलावाच्या प्रकल्पासह अमरावती विभागामध्ये 16 साठवण तलावांच्या कामांची प्रक्रिया योग्य वेळी पूर्ण न केल्यामुळे जर्मन शासनाने अर्थसहाय्य देण्यास नकार दिला. जुलै, 2010 च्या अधिवेशनात हा प्रश्न मी लावून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २१५९७ श्री.पांडुरंग फुंडकर..

धरला. या साठवण तलावांच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन दिला जावा अशी मागणी केली होती. त्यावेळी माननीय श्री.बाळासाहेब थोरात हे कृषी व जलसंधारण मंत्री होते. विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष 11 लाख हेक्टरपर्यंत वाढलेला आहे, असे असताना सन 2010 च्या पावसाळी अधिवेशनात साठवण तलावाला निधी देण्याची घोषणा करुन देखील आजतागायत सदर साठवण बंधाऱ्यांची निविदा प्रक्रियेचे काम पूर्ण झाले नाही. जर्मन अर्थसहाय्य प्रकल्पासाठी शेतकऱ्यांनी राजीनामे दिले असल्यास भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्याची अट शिथिल करण्यात आली होती. ही सर्व प्रोसेस झाली असतानाही अजूनही या साठवण बंधाऱ्यांच्या कामांना प्रत्यक्षात सुरुवात झाली नाही. या साठवण तलावाची कामे वेळेत पूर्ण व्हावीत म्हणून माननीय मंत्री महोदयांनी कालबध्द वेळापत्रक आखले आहे काय, असल्यास, या वेळापत्रकाप्रमाणे सदरची कामे केव्हा पूर्ण होतील, सदरहू कामाचे वेळापत्रक आखले नसल्यास ते वेळापत्रक सत्वर तयार करुन पुढील डिसेंबरपर्यंत ही कामे पूर्ण होतील काय ? अमरावती विभागातील कोणकोणत्या साठवण तलावांची कामे झाली नाहीत त्यांची नावे माननीय मंत्री महोदयांनी सांगावीत.

श्री.गुलाबराव देवकर : हा बुलढाणा जिल्हयातील साठवण बंधाऱ्यांचा प्रश्न आहे. बुलढाणा जिल्हयात चार साठवण तलाव जर्मन अर्थसहाय्य योजनेंतर्गत मंजूर केले होते. त्यावेळी या चार साठवण तलावाच्या कामासाठी 18 कोटी रुपयांच्या एस्टीमेटला मंजुरी दिली होती. दिनांक 13.1.2009 रोजी या चार कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. दिनांक 21.3.2009 रोजी कामे सुरु करण्यासंबंधी आदेश देण्यात आले होते. सदर कामे सुरु होण्यापूर्वीच लोकसभेच्या निवडणुकीची आचारसंहिता लागली. त्यानंतर पावसाळा सुरु झाला. त्यानंतर विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या, त्या निवडणुकीची आचारसंहिता लागली. यामध्ये बराचसा कालावधी गेला. जर्मन अर्थसहाय्य योजनेत अट होती की, या कामांची घळभरणी जून, 2009 पर्यंत झाली पाहिजे. ते काम जून 2009 पर्यंत पूर्ण झाले नाही तर जर्मन अर्थसहाय्य काढून घेण्यात येईल. सदर कामे सुरु करण्यास विलंब झाला म्हणून दिनांक 19.3.2010 रोजी सदर कामांसाठी देण्यात आलेला जर्मन अर्थसहाय्य निधी परत घेतल्यामुळे ही कामे त्या योजनेतून वगळण्यात आली. मागील अधिवेशनात या कामाच्या संदर्भातील प्रश्न सभागृहात उपस्थित करण्यात आला

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २१५९७

श्री.गुलाबराव देवकर...

होता, तेव्हापासून सदर कामासंबंधी विभागाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे. भूसंपादनाच्या प्रक्रियेचे काम मंद गतीने सुरु होते, त्या कामात गती आणण्याचा विभागाने प्रयत्न केला आहे. संयुक्त मोजणीचे काम असेल, कलम 4 ची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा विषय असेल, कलम 5 ची चौकशी असेल, कलम 6 ची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा विषय असेल, तसेच कलम 9, 2 आणि 3 ची नोटीस आणि अंतिम निवाडा जाहीर करण्याचे काम असेल, या भूसंपादनाच्या प्रक्रिया आहेत. यातील तीन कामासंबंधीच्या प्रक्रिया जवळपास पूर्ण होण्याच्या मार्गावर आलेल्या आहेत. कलम 12(2) च्या नोटीस अन्वये जमिनीचा मोबदला वाटप करणे आणि जमीन ताब्यात घेणे हा दुसरा टप्पा आहे. या तीन कामासाठी जमीन ताब्यात घेण्याचा विषय अंतिम टप्प्यात आलेला आहे. या संदर्भात दोन तृतीयांश रक्कम संबंधित विभागाने भूसंपादन विभागाकडे वर्ग केलेली आहे. घारुड-1 च्या पहिल्या टप्प्याच्या कामाची कलम 4 ची अधिसूचना जाहीर झालेली आहे. पुढील काम तातडीने हाती घेतले जाणार आहे. या साठवण तलावांच्या कामांच्या सगळया प्रक्रिया जलद गतीने हाती घेतल्या आहेत. येत्या एक महिन्याच्या आत या चारही कामांचे टेंडर जाहीर करणार आहोत. या कामांना प्रत्यक्ष सुरुवात मार्च महिन्यात करण्यात येईल. मार्च महिन्यापासून पुढील 18 महिन्यांच्या कालावधीत ही चारही कामे पूर्ण करण्यात येतील.

श्री.जयंत प्र.पाटील : जर्मन अर्थसहाय्य योजनेतून एकूण किती निधी उपलब्ध झाला ? जर्मन अर्थसहाय्य योजनेंतर्गत राज्यात किती तलावांची कामे सुरु आहेत ?

श्री. गुलाबराव देवकर : जर्मन अर्थसहाय्य योजनेतून जवळपास 11 कामे 2009 पूर्वी पूर्ण करावीत अशी अट होती. परंतु वेगवेगळया तांत्रिक व प्रशासकीय कारणांमुळे सदरील चार कामे या योजनेतून वगळण्यात आलेली आहेत. उर्वरित कामे या योजनेतून पूर्ण केलेली आहेत. जर्मन अर्थसहाय्य योजनेसाठी किती निधी प्राप्त झाला याबाबतची माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

----------

5...



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री. खंदारे 11:40

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**वाढीव तुकड्यांना गेल्या ६-७ वर्षात शासनाने मान्यता न दिल्याबाबत**

**(५) * २३१६२ श्री.रामनाथ मोते , श्री.वसंतराव खोटरे , प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.विक्रम काळे , डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक १८३४८ ला दिनांक ४ ऑगस्ट, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील गेल्या ६-७ वर्षातील वाढीव तुकडयांचे सुमारे ९२०० प्रस्ताव शासनाकडे आले असून पडताळणी करुन मान्यता देण्यात येईल असे आश्वासन शासनाने दिनांक ४ ऑगस्ट, २०११ रोजी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राजेंद्र दर्डा** : (१) होय.

(२) व (३) राज्य शासनाने ऑक्टोबर, २०११ मध्ये घेतलेल्या विशेष पटपडताळणी मोहिमेतील सांख्यिकी माहिती व वाढीव तुकडयांची मागणी याचा एकत्रित आढावा घेवून पुढील कार्यवाही घेण्यात येत आहे.

श्री. रामनाथ मोते : राज्यातील शाळांमध्ये वाढीव तुकडया देण्यासंदर्भातील हा प्रश्न आहे. हा प्रश्न या सभागृहात दिनांक ४ ऑगस्ट, २०११ रोजी चर्चेला आला होता. त्यावेळेस शासनाकडून उत्तर मिळाले होते की, हे खरे आहे की, वाढीव तुकडयांना शासनाकडून परवानगी दिली गेली नाही. परंतु यासंदर्भातील जो काही प्रस्ताव आहे. तो संचालकांकडून मार्च, २०११ ला शासनाकडे आलेला आहे. शासनाने मान्य केले की, माध्यमिक विभागाच्या २९०० तुकडया आणि आदिवासी क्षेत्रातील ३६१ तुकडयांचे प्रस्ताव शासनाला प्राप्त झालेले आहेत...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.23162........ श्री.रामनाथ मोते...

त्यावेळी मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, शासनाने जाणीवपूर्वक निर्णय घेतला असून 15 दिवसाच्या आत सगळ्या शाळांची एकाच दिवशी पट पडताळणी होईल. त्यातून एकूण विद्यार्थी, उपलब्ध असलेले शिक्षक, अतिरिक्त ठरणारे शिक्षक याची माहिती उपलब्ध झाल्यानंतर अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे समायोजन करुन आवश्यक तेथे अतिरिक्त तुकड्या देण्याचे धोरण निश्चितपणे स्वीकारले जाईल. शासनाने राज्यात पट पडताळणी केली त्या आधारे कोणत्या ठिकाणी किती विद्यार्थी संख्या, कोणत्या ठिकाणी वाढीव तुकड्यांना मान्यता देणे आवश्यक आहे याची माहिती शासनास प्राप्त झालेली आहे. गेली 6-7 वर्षे हा प्रश्न प्रलंबित आहे. शासनाकडे सर्व माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे वाढीव तुकड्या ज्या ठिकाणी देय ठरतात त्या ठिकाणी वाढीव तुकडयांना मान्यता देण्याचा प्रस्ताव 15 दिवसात किंवा एक महिन्याच्या आत सकारात्मक भूमिकेतून मंजूर केला जाईल काय?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, दिनांक 20 फेब्रुवारी, 1996 च्या शासन निर्णयान्वये अतिरिक्त तुकड्या मंजूर करण्याचे निकष ठरविण्यात आले आहेत. दिनांक 24 नोव्हेंबर, 2001 रोजी शाळा आणि वर्ग तुकड्या कायम विनाअनुदानित तत्वावर देण्याचा निर्णय घेण्यात आला. दिनांक 13 ऑगस्ट, 2004 च्या शासन निर्णयानुसार नैसर्गिक वाढीच्या ज्या तुकड्या आहेत त्या विनाअनुदानित तत्वावर आणि अतिरिक्त तुकड्या कायम विनाअनुदान तत्वावर देण्याचा निर्णय घेण्यात आला. एक वर्षापूर्वी मी स्वत: या विभागाचा कारभार स्वीकारल्यानंतर मला असे दिसून आले की, तुकड्या मंजूर करण्याचे प्रस्ताव प्रलंबित आहेत आणि अनेक वर्षापासून त्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, शासनाची भूमिका आहे की, ज्या ठिकाणी विद्यार्थी जास्त आहेत, अतिरिक्त तुकड्यांची आवश्यकता आहे त्या ठिकाणी निश्चितपणे तुकड्या दिल्या पाहिजेत. त्यामुळेच मी दिनांक 4 ऑगस्ट, 2011 रोजी सभागृहात आश्वासन दिले होते की, 15 दिवसात तातडीने पट पडताळणी करु आणि या संदर्भात निर्णय घेऊ. खरे म्हणजे ज्या वेळेला अतिरिक्त तुकड्यांचा प्रश्न माझ्यापुढे आला तेव्हा अतिरिक्त तुकड्या द्याव्यात असे मला वाटत होते त्याच वेळेला माझ्याकडे अशीही माहिती आली की, ज्या ठिकाणी अतिरिक्त तुकड्या घेण्यात आलेल्या आहेत त्या पैकी काही तुकड्या बोगस आहेत. त्यामुळे पट पडताळणीचा निर्णय घेण्यात आला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आता ही पट पडताळणी सप्टेंबर, 2011 मध्ये नांदेड जिल्हयात आणि दिनांक 3 ते 5 ऑक्टोबर, 2011 च्या काळात संपूर्ण राज्यात पूर्ण करण्यात आली. त्याची शाळानिहाय सर्व माहिती शासनाकडे उपलब्ध झालेली आहे.

फक्त शालेय शिक्षण विभागाशी संबंधित हा प्रश्न नसून सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागाचा सुध्दा यामध्ये संबंध आहे. म्हणून मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त सचिव समिती नेमण्यात आली आहे. या समितीला दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. त्यातील 20 दिवस उलटून गेले आहेत. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती प्रत्येक शाळेची पटसंख्या, तेथे आवश्यक असलेले शिक्षक यांची संख्या निश्चित करणार आहे. मी सभागृहाला खात्री देतो की, या पट पडताळणीमुळे शासनाकडे अतिरिक्त शिक्षक उपलब्ध झालेले आहेत, तेव्हा कोणत्याही परिस्थितीत 31 मार्चपूर्वी किंवा नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी ज्या ज्या शाळांना अतिरिक्त तुकड्यांची आवश्यकता आहे, ज्या पटसंख्येमध्ये बसत आहेत त्यांना अतिरिक्त तुकड्या देण्यात येतील.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, धन्यवाद.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी पट पडताळणीबद्दल सभागृहाला माहिती दिली आहे. या पट पडताळणीचा राज्यात मोठा गाजावाजा झाला. बोगस विद्यार्थी, बोगस शाळा यांची वृत्तपत्रात माहिती प्रसिध्द झाली होती. अनेक पुढाऱ्यांच्या शैक्षणिक संस्था यामध्ये सामील असल्याचे आढळून आले. पट पडताळणीमध्ये कोणत्या ठिकाणच्या शैक्षणिक संस्था व कोणत्या पुढाऱ्यांच्या शैक्षणिक संस्था बोगस आहेत याची माहिती उपलब्ध झाली आहे काय?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. या पट पडताळणीमध्ये एक गोष्ट स्पष्ट झाली की, शाळांची संख्या 1,00,887 असून पट नोंदणीप्रमाणे पटसंख्या 2,03,69,638 इतकी आहे. याचा अर्थ असा आहे की, पूर्वी जी पटसंख्या क्लेम केली जायची त्यामध्ये खूप फरक पडला आहे हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट अशी की, पट पडताळणीच्या वेळेला जवळपास 20.70 लाख विद्यार्थी गैरहजर होते. कोणत्या नेत्यांच्या शाळा होत्या अशी विचारणा करण्यात आली आहे.

सभापती महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, पट पडताळणीमध्ये कोणत्याही पध्दतीची शाळा या बोगस विद्यार्थ्यांपासून दूर नाही असे आढळून आले. तेव्हा या प्रश्नाकडे पक्षीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.23162..... श्री.राजेंद्र दर्डा....

भूमिकेतून न पाहता फक्त विद्यार्थी, शिक्षक आणि शाळांचा दर्जा या दृष्टीने पहावे. जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये 6.27 टक्के विद्यार्थी गैरहजर होते. मुंबई महापालिकेच्या शाळांमध्ये 18 टक्क्यापेक्षा जास्त विद्यार्थी गैरहजर असल्याचे आढळून आले. नगरपालिकांच्या शाळांमध्ये 16.59 टक्के विद्यार्थी गैरहजर असल्याचे आढळून आले. अपंगांच्या शाळा, आदिवासी आणि सामाजिक न्याय विभागाच्या शाळा याबद्दल मी आता भाष्य करु इच्छित नाही. परंतु निश्चितपणे या पट पडताळणीमुळे जे निष्कर्ष समोर आले त्यामुळे भविष्यात महाराष्ट्रातील शैक्षणिक वाटचाल कशी झाली पाहिजे, दर्जेदार शिक्षण कसे मिळाले पाहिजे या दृष्टीने चांगली मदत होणार आहे. एका बाजूला बोगस विद्यार्थी संख्या आढळून आली असली तरी दुसऱ्या बाजूला काही ठिकाणी शिक्षकांची आवश्यकता आहे. चांगल्या प्रकारे शिक्षण दिले जाते त्या शाळांना सुध्दा पट पडताळणीच्या माध्यमातून निश्चितपणे मदत होणार आहे.

---------

**उप सभापती** : प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक-6 वरील तारांकित प्रश्न क्रमांक 22924 व अनुक्रमांक-9 वरील तारांकित प्रश्न क्रमांक 22320 एकाच विषयावरील असल्यामुळे ते एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येत आहेत.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील रात्र शाळांना पूर्णवेळ दर्जा देण्याबाबत**

**(६) * २२९२४ डॉ.सुधीर तांबे , श्री.अरुणकाका जगताप , श्री.वसंतराव खोटरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रात्र शाळांना पूर्णवेळ दर्जा देण्याबाबत शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे सप्टेंबर, २०११ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वसाधारण व गरीब कुटुंबातील विद्यार्थी व विद्यार्थिनी शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी रात्र शाळांना पूर्णवेळ दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**##श्री.राजेंद्र दर्डा** : (१) व (२) हे खरे नाही. तथापि, रात्रशाळेच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने निर्णय घेण्याची बाब विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**राज्यातील रात्रशाळांमधील शिक्षण सेवक योजना रद्द करण्याबाबत**

**(९) * २२३२० श्री.कपिल पाटील , श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १८४७४ ला दिनांक ४ ऑगस्ट, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रात्रशाळांमध्ये शिक्षण सेवक योजना रद्द करावी अशी मागणी शिक्षक संघटनांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील रात्रशाळांमध्ये पाच तासाचा अभ्यास करुन तीन तासात शिकविण्यासाठी अनुभव संपन्न शिक्षकांची गरज असून शिक्षण सेवक पदामुळे असे शिक्षक मिळणे अवघड होते, हे ही खरे आहे काय,

(३) याबाबत शासन विचाराधीन आहे काय ?

**##श्री.राजेंद्र दर्डा** : (१) होय.

(२) व (३) सदर बाब धोरणात्मक स्वरुपाची असल्याने त्याचा साकल्याने विचार करून निर्णय घेण्याची बाब विचाराधीन आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, राज्यामध्ये 176 रात्रशाळा कार्यरत आहेत. ज्यांना अन्य शाळांमध्ये शिक्षण घेणे शक्य होत नाही असे विद्यार्थी या रात्रशाळांमध्ये शिक्षण घेत असतात. काही समाजातील मुलांना कौटुंबीक अडचणीमुळे शिक्षण सोडून द्यावे लागते. अशी मुले रात्रशाळेमध्ये शिकण्यासाठी जात असतात. या शाळांचा शैक्षणिक कालावधी फक्त 3 तासांचा असतो. त्यांना अधिक अभ्यासाची गरज आहे. या रात्रशाळांचा कालावधी वाढविण्यासाठी अनेक समित्या नेमण्यात आल्या होत्या. त्या समित्यांच्या सर्व शिफारशी शासनाला प्राप्त झालेल्या आहेत.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22924 व ता.प्र.क्र.22320.......... डॉ.सुधीर तांबे........

मंत्री महोदयांनी या शिफारशींची माहिती घ्यावी. रात्रशाळांतील विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, मोफत आहार इत्यादी सुविधा शासनाने द्याव्यात अशी शिफारस केलेली आहे. या संदर्भात शासनाने धोरण निश्चित केले आहे काय?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, राज्यात एकूण 176 रात्रशाळा असून 1343 शिक्षक आणि 577 शिक्षकेतर कर्मचारी काम करीत आहेत. जो वंचित घटक आहे, ज्यांना शाळेत जाऊन शिकता येत नाही असा वर्ग दिवसा नोकरी करुन रात्री शिक्षण घेण्यासाठी या रात्रशाळांमध्ये प्रवेश घेतो. शासनाने वेळोवेळी या संदर्भात सहानुभूतीने निर्णय घेतले आहेत. रात्रशाळांबाबत शासनाकडे काही मागण्या प्राप्त झालेल्या आहेत. त्यामध्ये पूर्णवेळ शिक्षक असले पाहिजेत, फॉर्म नं.17 भरला जातो त्यामध्ये वय 17 वर्षे करण्यात यावे, शालेय पोषण आहार दररोज दिला जावा, सरासरी उपस्थिती 15 वरुन 10 पर्यंत ठेवावी अशा मागण्या केलेल्या आहेत. त्या संदर्भात शिक्षण संचालक यांची एक समिति नेमली होती. त्या समितीचा अहवाल माझ्याकडे आलेला आहे. त्या समितीमध्ये विधिमंडळाचे काही सन्माननीय सदस्य देखील आहेत. मी तो अहवाल वाचला आहे. अहवालामध्ये एकूण खर्च किती येणार एवढेच सांगितले आहे. या संदर्भात अधिक खोलात जाणे आवश्यक आहे. या शाळांमध्ये विद्यार्थी रात्री शिकायला येतात.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 22924 व 22320.......... श्री. राजेंद्र दर्डा ......

त्यांना कमी वेळात जास्तीत जास्त चांगले शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षण सेवकांच्या माध्यमातून शिकविणे योग्य नाही तर दिवस शाळांमध्ये जे चांगले व अनुभवी शिक्षक असतात त्यांच्या माध्यमातून शिकविले पाहिजे.

श्री. कपिल पाटील : महोदय, माननीय शिक्षण मंत्र्यांना मी धन्यवाद देतो. रात्रशाळांना पूर्ण वेळ शाळेचा दर्जा देण्याची आवश्यकता नाही. ते म्हणाले त्यानुसार अनुभवसंपन्न शिक्षकांची खरी गरज आहे. तसेच या निमित्ताने मी तीन सूचना शासनाला करतो, त्याला मंत्री महोदयांनी मान्यता द्यावी. त्यानुसार शासनाकडे असलेल्या बूक बँकेतून या रात्र शाळेतील मुलांना मोफत पुस्तके देण्याची योजना मागील काळात माननीय श्री. विलासराव देशमुख हे शिक्षण मंत्री असताना सुरु केली होती, ती योजना पुन्हा सुरु करावी. त्यासाठी शासनाकडे ऑलरेडी निधी आहेच फक्त या मुलांसाठी काम सुरु करावयाचे आहे. या मुलांना गणवेशाचे वाटप करावे आणि ही मुले आठवीपासूनची असल्याने त्यांना शासनाच्या योजनेनुसार खिचडी किंवा चहा बिस्कीट्सची व्यवस्था करावी. तसेच शक्य झाल्यास सुट्टीच्या काळात या मुलांना अधिकचे मार्गदर्शन किंवा पुस्तके दता आली तर त्याचाही विचार व्हावा.

श्री. राजेंद्र दर्डा : महोदय, या चर्चेच्या माध्यमातून एका गोष्ट मला सभागृहाला सांगितली पाहिजे की, 1 एप्रिल, 2010 पासून म्हणजेच शिक्षण हक्क कायदा लागू झाल्यापासून 6 ते 14 वयोगटातील जी मुले रात्रशाळांमध्ये जातात त्यांनाहा हा पर्याय अपर्याप्त ठरणार आहे, याचा विचार शासनाला करावा लागणार आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी पाठ्य पुस्तके पुरविण्याची जी सूचना केली त्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : महोदय, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत मात्र माझी सहमती असून रात्रशाळांचे रुपांतर पूर्णवेळ करण्यात येऊ नये या भूमिकेला माझा विरोध आहे. या शाळांमध्ये प्रामुख्याने दोन प्रकारचे शिक्षक काम करतात. दिवसाच्या शाळेत काम करणारे आणि रात्र शाळांमध्ये काम करणारे असे डबल काम करणारे काही शिक्षक असतात. त्याचप्रमाणे फक्त रात्र शाळांमध्येच काम करणारे शिक्षक गेल्या 15 ते 20 वर्षांपासून कार्यरत असून त्यातील काही सेवा निवृत्त सुध्दा झालेले आहेत. त्यांना पेन्शन किंवा जीपीएफची सुविधा नसल्याने रोजगार हमीच्या

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 22924 व 22320.......... श्री. रामनाथ मोते ......

कामावर जाऊन आपला चरितार्थ चालवावा लागत आहे. अशा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे भवितव्य काय आहे याचा विचार शासन करणार आहे काय, तसेच फक्त रात्र शाळांमध्ये काम करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी जी समिती नेमली होती त्या समितीने दिलेल्या अहवालानुसार शासन विचार करणार आहे काय ?

श्री. राजेद्र दर्डा : महोदय, यापूर्वीच मी सांगितले आहे की, समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते हे सुध्दा या समितीमध्ये होते. या अहवालानुसार सध्या रात्रशाळांमध्ये काम करणारे 352 शिक्षक आणि 229 शिक्षकेतर कर्मचारी असून दिवस व रात्र शाळांमध्ये काम करणारे 993 शिक्षक आणि 348 शिक्षकेतर कर्मचारी आहेत. रात्रशाळेत हे कर्मचारी व शिक्षक तीन तास काम करीत आहेत. त्यांचा विचार करावयाचा तर शासनावर 17.67 कोटीचा बोजा दरवर्षी पडणार आहे. हा आर्थिक भार फार मोठा आहे. तरी देखील हा अहवाल तपासून योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

--------

........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विधान भवन परिसरात आक्षेपार्ह वर्तन करुन सभागृहाचा अवमान केल्याबद्दल सदस्यांचे केलेले निलंबन रद्द करणे

**मु.शी.**: विधान भवन परिसरात आक्षेपार्ह वर्तन करुन सभागृहाचा अवमान केल्याबद्दल सदस्यांचे केलेले निलंबन रद्द करण्यासंबंधी माननीय संसदीय कार्य मंत्र्यांचा ठराव

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने असा ठराव मांडतो की, दिनांक 13 डिसेंबर, 2011 रोजी सर्वश्री केशवराव लक्ष्मणराव मानकर, सय्यद पाशा पटेल, वि.प.स. हे विधान भवन, नागपूर येथील मुख्य इमारतीच्या पायऱ्यांसमोरील मोकळ्या जागेत सकाळी 10.55 वाजताच्या सुमारास सुरक्षा नियमांचे उल्लंघन करुन धानाच्या पेंढ्या घेऊन आले व त्यांनी पायऱ्यांवर बसून घोषणा दिल्या. सदर धानाच्या पेंढ्या तेथे जाळण्यात आल्यामुळे लागलेली आग विझविण्यासाठी अग्निशमन विभागाच्या पथकाने तातडीने कार्यवाही केल्यामुळे पुढील गंभीर घटना टळली. सदरहू घटनेमुळे विधान भवनाच्या इमारतीस व परिसरास गंभीर धोका निर्माण होऊ शकला असता तसेच जीवित हानीही होऊ शकली असती.

सर्वश्री केशवराव लक्ष्मणराव मानकर, सय्यद पाशा पटेल, वि.प.स. यांनी अत्यंत बेजबाबदार, अशोभनीय तसेच सभागृहाची प्रतिष्ठा मलीन करणारे व सर्वोच्च सभागृहाचा अवमान करणारे वर्तन केल्यामुळे त्यांचे सदस्यत्व दिनांक 15 डिसेंबर, 2011 रोजीपासून त्यांच्या सदस्यत्वाची मुदत संपेपर्यंत निलंबित करण्यात यावे. तसेच या निलंबनाच्या कालावधीत त्यांना विधिमंडळाच्या नागपूर व मुंबई येथील परिसरात येण्यास मज्जाव करण्यात यावा असा ठराव सभागृहाने दिनांक 15 डिसेंबर, 2011 रोजी संमत केला होता. परंतु आता निलंबित सन्माननीय सदस्यांनी त्यांचे निलंबन मागे घेण्यात यावे अशी विनंती केली आहे व झालेल्या घटनेबाबत त्यांनी दिलगिरी व्यक्त करुन भविष्यात अशा प्रकारे त्यांच्याकडून सभागृहाचा अवमान होणार नाही याबाबत हमी दिली असून चांगल्या वर्तणुकीचीही ग्वाही दिली आहे.

त्या अनुषंगाने सर्वश्री केशवराव लक्ष्मणराव मानकर, सय्यद पाशा पटेल, वि.प.स. या सन्माननीय सदस्यांचे निलंबन तत्काळ रद्द करण्यात यावे तसेच त्यांना विधान मंडळाच्या नागपूर व मुंबई येथील परिसरात येण्यास केलेला प्रतिबंध तत्काळ उठविण्यात यावा असा ठराव ही विधान परिषद करीत आहे.

ठराव प्रस्तुत झाला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी जो ठराव सभागृहात मांडलेला आहे त्या ठरावात मी थोडीसी दुरुस्ती करण्याची विनंती करतो. या ठरावामध्ये 13 डिसेंबर, 2011 रोजी सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर आणि पाशा पटेल यांनी नागपूर येथील मुख्य इमारतीच्या पायऱ्यांसमोरील मोकळ्या जागेत धानाच्या पेंढ्या आणल्या असे म्हटले आहे, ते खरे आहे. विधान भवन परिसरात मुख्य इमारतीच्या पायऱ्यांवर आम्ही बसलेलो असताना मी स्वत: सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांना सभागृहात बोलावून भाषण करायला सांगितले होते. त्या ठिकाणी सन्माननीय सदस्य उभे होते. तसेच सन्माननीय सदस्य सभागृहात भाषण करण्यासाठी आले असता तिकडे पेंढ्यांना आग लावण्यात आली. वास्तविक या घटनेचे मी समर्थन कधीच करणार नाही परंतु सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी केवळ पेंढ्या आणल्या आणि तसे त्यांनी मला सांगितले होते. पण त्या पेंढ्यांना आग लावण्यात आली तेव्हा ते सभागृहात उपस्थित होते. त्यापूर्वीच्या दिवशी सभागृहात कापूस आणण्यात आला होता त्यावर आपण कोणतीच कारवाई केली नाही पण धानाच्या पेंढ्या दाखवायला आणल्याचे त्यांनी मला सांगितले होते. त्यामुळे जाळपोळीच्या घटनेच्या वेळेस सन्माननीय सदस्य तेथे उपस्थित नसल्याने तसा उल्लेख ठरावातून काढून टाकावा जेणेकरुन जाळपोळीचा आरोप त्यांच्यावर लागणार नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, मी या ठरावाची प्रत माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडे पाठवितो. या ठरावामध्ये सन्माननीय सदस्यांनी पेंढ्या जाळल्या असा कोठेही उल्लेख केलेला नाही. कारण धानाच्या पेंढ्या जाळण्याचे काम खालच्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले यांनी केले. सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी केवळ धानाच्या पेंढ्या आणल्या होत्या.

**उप सभापती** : ठीक आहे, मी आता हा ठराव मतास टाकतो.

ठराव मतास टाकून संमत झाला.

------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

श्री. जयंत प्र. पाटील :सभापती महोदय, आठवडयाच्या शेवटच्या दिवशी अशासकीय कामकाज घेतले जाते व या अधिवेशनाच्या कामकाजाचा आजचा हा शेवटचा दिवस आहे. अशासकीय कामकाज करावयाचेच नाही अशी प्रथा आपल्याकडे पडत चालली आहे. मागील आठवडयाच्या शेवटच्या दिवशी अशासकीय कामकाजाच्या दिवशी शासकीय कामकाज करण्यात आले होते. आजची कार्यक्रम पत्रिका बघितली तर रात्री 9-10 वाजून गेले तरी आजचा बिझनेस पूर्ण होऊ शकणार नाही. खरे म्हणजे अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी 3 ते 4 वाजता अधिवेशन संस्थगित होऊन सन्माननीय सदस्य आपापल्या गावाला निघून जात असत अशी प्रथा अगोदर होती. अधिवेशन 3-4 वाजता संपले तर सन्माननीय सदस्यांना आपापल्या गावाला जाता येते. पश्चिम महाराष्ट्रातील आमदारांसाठी शेवटची रेल्वे 3.00 वाजेची असते. शेवटच्या दिवशी उशिरापर्यंत कामकाज केले जाते व त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच काही 3-4 सन्माननीय सदस्यच सभागृहात असतात. नियमानुसार शेवटच्या दिवशी अशासकीय कामकाज घेतले जात असते. सभागृहाचे प्रोसिडींग काढून बघितले तर आपल्याला दिसून येईल की, दर अधिवेशनाचे अशासकीय कामकाज पुढील अधिवेशनात घेतले जाण्याची आता प्रथाच पडत चालली आहे. तसेच अर्धातसाच्या चर्चा देखील होत नाहीत.

सभापती महोदय, या वेळेस आणखी एक विक्रम असा झाला आहे की, सत्ताधारी पक्षाच्या एकाही प्रस्तावावर चर्चा झालेली नाही. काल विरोधी पक्षाच्या एकाच प्रस्तावावर चर्चा झालेली आहे. त्यामुळे बिहार आणि युपी सारखे चार दिवसाचे अधिवेशन आपण सुध्दा भरवत जाऊ आणि सर्व कामकाज संपवून टाकत जाऊ या. खरे म्हणजे सभागृहाच्या कामकाजाला काहीच अर्थ राहिलेला नाही. अधिवेशनात सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावावर एकदाही चर्चा झालेली नाही. विरोधी पक्षाचा अंतिम आठवडा प्रस्ताव सोडून या अधिवेशनात एकाही प्रस्तावावर चर्चा झालेली नाही. कोणत्याही विषयावर चर्चा झाली नाही. आजच्या कार्यक्रम पत्रिकेत बरीच बिले दाखविण्यात आलेली आहेत. अत्यावश्यक सेवेचे बिल सुध्दा कामकाजामध्ये दाखविण्यात आलेले असून या विषयावरील ऑन लेग मेंबर अजून दोन तास बोलणार आहेत. कामकाजाच्या संदर्भात जो अन्याय होतो आहे त्याची नोंद घेतली जावी व या अन्यायाची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घ्यावी अशी अपेक्षा मी या निमित्ताने व्यक्त करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी जे विचार व्यक्त केलेले आहेत ते विचार मी कामकाज सल्लागार समितीमध्ये नेहमी व्यक्त करीत असतो. मी शासनाला विनंती करु इच्छितो की, नियमानुसार आठवडयाच्या शेवटच्या दिवशी अशासकीय कामकाज घेतले जात असते व तो दिवस विरोधी पक्षाच्या सदस्यांचा असतो. शेवटच्या दिवशी ठराव, प्रस्ताव व अशासकीय कामकाज घेतले जात असते. खरे म्हणजे अशासकीय ठराव, अशासकीय विधेयके, प्रस्ताव कधी आणावयाचे हे कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरले जात असते. त्यामुळे सदस्यांच्या अधिकारावर गदा येऊ नये म्हणून ज्या दिवशी जे कामकाज ठरलेले असते ते कामकाज त्याच दिवशी घेतले जावे. आपल्याकडे विधेयकांची रेलचेल असते. विधानसभेने पारित केलेली विधेयके विधान परिषदेत येत असतात व विधान परिषदेने पारित केलेली विधेयके विधानसभेत जात असतात. ब-याच वेळा विधानसभेतून येणा-या विधेयकावर चर्चा करण्यासाठी आम्हाला प्रतिक्षा करावी लागत असते. विधानसभेतून विधेयके मंजूर होऊन विधान परिषदेत येतात परंतु यासंदर्भात अत्यंत अयोग्य पध्दतीने कायदा बनविण्याचे काम सुरु झालेले आहे. काही मर्यादेपर्यंत तुम्हाला सहकार्य करणे हे आम्ही एक वेळ समजू शकतो. काही विधेयके महाराष्ट्राच्या जनजीवनावर परिणाम कराणारी असतात त्यामुळे अशी विधेयके पास करणे अपरिहार्य असते ते आम्ही समजू शकतो.

खरे म्हणजे विधेयकावर चर्चा करण्यासाठी आम्हाला 7 दिवस अगोदर विधेयक मिळाले पाहिजे परंतु आम्हाला किमान 3 दिवस अगोदर तरी विधेयकाचा मसुदा वाचावयास वेळ देण्यात यावा अशी विनंती आहे. विधेयकावर अभ्यास करुन उप सूचना द्यावयाची असेल तर 48 तास अगोदर उप सूचना द्यावी लागत असते. परंतु विधेयके सकाळी येतात व दुपारी मंजूर करण्यासाठी पुकारली जातात. ही विधेयके आम्ही साधी वाचलेली सुध्दा नसतात. विधेयकाच्या संदर्भात कामकाज रेटून नेण्याची जी पध्दत सुरु झालेली आहे ती थांबण्याची गरज आहे. त्यामुळे आपण ख-या अर्थाने अधिवेशनाच्या कामकाजाचे दिवस वाढविण्याची आवश्यकता आहे. 100 दिवस अधिवेशन चालले पाहिजे असे आपण म्हणत असतांना आपण केवळ 40 दिवसांवर अधिवेशनाचा कालावधी आणून ठेवला आहे. कामकाज जास्त असेल तर कामकाजाचे दिवस वाढविण्यात यावे. परंतु चटावरचे श्राध्द उरकायचे तसे अधिवेशन उरकले जाते ही जी काही पध्दत आहे ती चुकीची आहे.

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभागृहाच्या कामाकाजाचा कालावधी वाढविण्याच्या संदर्भात आपल्यावर कोणीही बंधन घातलेले नाही. हे शासन विनियोजन विधेयक पहिल्याच आठवडयात मंजूर करावयाच्या मागे लागलेले असते. एकदा विनियोजन विधेयक मंजूर झाले, सरकार चालविण्यासाठी निधीची उपलब्धता झाली की तुमचा आमचा काही संबंध उरत नाही व कामकाज कशाही प्रकारे रेटून नेले जाते.

सभापती महोदय, संसदीय कार्य मंत्री अनेक वर्षापासून या विभागाचे काम पाहत आहेत. त्यांच्या अनुभवातून आमचा काही फायदा होईल असे आम्हाला वाटले होते परंतु आपण आता या कामकाजाला कंटाळले आहात असे वाटू लागले आहे त्यामुळे हे कामकाज दुसऱ्याकडे दिले तर बरे होईल असे त्यांना वाटू लागले असावे. कामकाजाच्या संदर्भात अधिकारी लक्ष देण्यास तयार नाहीत. विधीमंडळाच्या सदस्यांचा या निमित्ताने जो कोंडमारा सुरु आहे तो असह्य आहे. यावेळेला तर अतिशय चुकीची घटना घडलेली आहे. सत्तारुढ पक्षाच्या सदस्यांना तुमचा प्रस्ताव आण नका असे सांगण्यात आले. मागण्यांवर जेव्हा चर्चा सुरु होती त्यावेळेस सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना मागण्यांवर बोलू दिले गेले नाही. खरे म्हणजे सदस्य सत्ताधारी पक्षाचे असो किंवा विरोधी पक्षाचे असो आम्ही शेवटी या सदनाचे सदस्य आहोत. सदस्य जेव्हा विचार मांडतात त्याचे मार्गदर्शन शासनाला होत असते. शासनाच्या योजना शेवटपर्यंत पोहचत नसल्यामुळे सदस्य उणिवा दाखविण्याचे काम करीत असतात. सत्ताधारी पक्षाचे सदस्य विचार व्यक्त करतात म्हणजे ते शासनावर टीका करतात असा त्याचा अर्थ होत नाही. परंतु योजना तळगाळपर्यंत जात नाही, अधिकारी काम करीत नाहीत त्यामुळे सदस्य आपले विचार व्यक्त करण्यासाठी पोटतीडकीने बोलत असतात.

या ठिकाणी मी जे काही विचार व्यक्त केलेले आहेत ते कामकाज सल्लागार समितीमध्ये मांडत असतो व कामकाज सल्लागार समितीमध्ये मांडत असलेले विचार सदस्यांना कळावेत यासाठी मी या विषयावर विचार व्यक्त केलेले आहेत. माननीय संसदीय मंत्र्यांकडे काहीच काम नाही. खालच्या सभागृहात जे ठरते तेच कामकाज वरच्या सभागृहात रेटा असे त्यांना सांगितले जाते व प्रश्न संपतो. त्यामुळे पुढील कामकाज सल्लागार समितीमध्ये सभागृहाचे कामकाज ठरवत असतांना आता मी विचार व्यक्त केलेले आहेत त्याचे आपण भान ठेवले नाही तर आम्हाला वेगळा विचार करावा लागेल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

...4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री ) : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मौलिक सूचना केलेल्या आहेत. पुढचे कामकाज ठरवित असतांना त्यांच्या मौलिक सूचनांचा जरुर विचार केला जाईल. मौलिक सूचना हा शब्द मी यासाठी वापरला आहे की, अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयातील तीन दिवसाचे कामकाज होऊ शकले नाही. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये शासकीय कामकाज दाखविले असले तरी पुढील अधिवेशन बजेटचे असल्यामुळे त्या अधिवेशनात संपूर्ण एक दिवस अशासकीय कामकाज घेतले जाईल त्यामुळे सदस्यांची काही सुध्दा अडचण येऊ दिली जाणार नाही. आज आपण आता जी चर्चा केलेली आहे त्यासंदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा करु व त्यातून निश्चितपणे मार्ग काढू. त्यामुळे आता पुढचे कामकाज सुरु करावे अशी मी आपणास विनंती करतो नाही तर पुन्हा सभागृहाचा वेळ वाया जाईल.

**उप सभापती** : ठीक आहे.

----

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:लेखी उत्तरे

**मु.शी.**:अतारांकित प्रश्नोत्तराची बत्तीसावी यादी सभागृहासमोर ठेवणे.

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची या बत्तीसावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची बत्तीसावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

---

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. गुलाबराव देवकर (कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मॉयल लिमिटेड, नागपूर यांचा सन 2009-2010 व 2010-2011या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा व एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** :वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन 2008-2009 या वर्षाचा 35 वा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीच्या सन 2010-2011 या वर्षाच्या आठवा अहवालातील परिच्छेद क्रमांक 1.28 मध्ये समितीने केलेल्या शिफारशीनुसार सर्व मंत्रालयीन विभागांनी सन 2010-2011 या वित्तीय वर्षात केलेल्या पुनर्विनियोजना बाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

-----

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

--------

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे

(1) सन 2009-2010 या वर्षाचा स्थानिक संस्था अहवाल क्रमांक -5

(2) राष्टकुल युवा क्रीडा स्पर्धा 2008 करिता पायाभूत सुविधा विकास अहवाल क्रमांक-6

(3) आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्था, मुंबई अहवाल क्रमांक -7

(4) विक्रीकराच्या थकबाकीचे संपादणूक लेखापरीक्षण अहवाल क्रमांक 8 सभागृहाच्या पटलावर ठेवतो

..2..

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आदर्श गृहनिर्माण सोसायटीच्या संदर्भातील चौकशी दोन महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. असे असतानाही त्या समितीला मुदतवाढ दिली जात आहे. या समितीवर करोडो रुपये खर्च होत आहेत. रोजचा 3 लाख रुपये खर्च आहे. आतापर्यंत 3 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. सरकारने पुरवणी मागण्यांमध्ये 2 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. या अहवालामध्ये आहे तरी काय ? आदर्श गृहनिर्माण सोसायटीची जागा कोणाच्या मालकीची आहे एवढाच प्रश्न आहे. ती जागा राज्य शासनाची आहे, लष्कराची आहे की त्या जागेवर रिझर्व्हेशन आहे या तीन गोष्टींची चौकशी करावयाची आहे. असे असताना त्या समितीला सातत्याने मुदत वाढ देण्याचे काम सुरु आहे आणि ते चुकीचे आहे. एखाद्या जमिनीचा सर्च रिपोर्ट घेण्यासाठी राज्य शासनाला इतका वेळ लागतो काय ? समितीवरील तज्ज्ञ कोणत्या कागदपत्रांची तपासणी करीत आहेत हे आम्हाला समजले पाहिजे. या समितीला कोणत्याही परिस्थितीमध्ये मुदतवाढ देऊ नये. राज्यामध्ये तीन दिवसांमध्ये जमिनीची कागदपत्रे मिळविण्याची सोय उपलबध आहे. आम्ही बँकेमार्फत घरासाठी कर्ज देताना त्या जमिनीच्या प्रॉपर्टीची माहिती आम्हाला तीन दिवसांमध्ये उपलब्ध होते. या प्रकरणी आतापर्यंत 200 अधिकाऱ्यांच्या साक्षी घेतल्याचे दाखविण्यात आलेले आहे. या प्रकरणी तीन माजी मुख्यमंत्री गुंतलेले आहेत असा आक्षेप आहे. असे असताना ही जमीन कोणाच्या मालकीची आहे हे जनतेला समजले पाहिजे. या आदर्श घोटाळ्यामुळे राज्यकर्त्यांची मान आणि या ठिकाणी बसलेल्या विधिमंडळ सदस्यांची मान शरमेने खाली गेली आहे. तेव्हा या संदर्भातील माहिती सभागृहाला तातडीने उपलब्ध झाली पाहिजे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, आदर्श गृहनिर्माण सोसायटीच्या संदर्भातील महालेखाकारांचा अहवाल राज्य शासनाकडे दिनांक 21 डिसेंबर 2011 रोजी प्राप्त झाला. सदरहू अहवालास मंत्रिमंडळाने दिनांक 21 डिसेंबर 2011 रोजी मंजुरी दिली. दिनांक 21 डिसेंबर 2011 रोजी माननीय राज्यपालांनी मंजुरी दिली. त्यानंतर आज दिनांक 23 डिसेंबर 2011 रोजी सदरहू अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे. सन्माननीय सदस्यांना या संदर्भात पुढील अधिवेशनात चर्चा करता येईल.

..3..

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या अहवालावर चर्चा करण्याची गरज नाही. या ठिकाणी जो अहवाल मांडलेला आहे त्यामध्ये कोणते आश्वासन दिले काय ? आदर्श गृह निर्माण सोसायटी ज्या जागेवर उभी आहे ती जागा कोणाच्या मालकीची आहे एवढाच माझा प्रश्न आहे. त्या सोसायटीमध्ये कोणाचे किती फ्लॅट्स आहेत, कोणी कोठून पैसे आणले, कोणी पैसे खाल्ले या संदर्भातील चर्चा नंतर होईल. परंतु ती जागा कोणाच्या मालकीची आहे एवढाच माझा प्रश्न आहे. या ठिकाणी कॅटचा अहवाल ठेवण्यात आला असला तरी आम्ही आदर्श सोसायटीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करु शकतो.ही जागा कोणाच्या मालकीची आहे हे आम्हाला समजले पाहिजे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, कॅटने दिलेला अहवाल आणि सन्माननीय सदस्यांनी मांडलेला विषय हे दोन्ही विषय वेगवेगळे असल्यामुळे त्यांनी विचारलेल्या प्रश्नाची माहिती नंतर देण्यात येईल.

**उप सभापती** :अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

----

.4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**.: लेखी उत्तरे

**मु.शी.**: म.वि.प.नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेंद्र मुळक ( संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "गडचिरोली जिल्ह्यात वाढत असलेल्या नक्षलवाद्यांचा प्रभाव" या विषयावरील म.वि.प.नियम 260 अन्वये प्रस्तावावर सन 2010 च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक 6 एप्रिल, 2011 रोजी झालेल्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी )

--------

.4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

(पुढे सुरू....)

श्री.भास्कर जाधव (वने राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेडचा सन 2009-2010 या वर्षाचा 37 वा वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादितचा सन 2006-2007 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग यांचा सन 1998-1999 या वर्षाचा अहवाल/शिफारशी व त्यावरील कार्यवाहीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.गुलाबराव देवकर ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचा सन 2008-2009 या वर्षाचा 37 वा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक

**मु.शी.**: मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयकावरील चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री.राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 च्या पावसाळी अधिवेशनात दिनांक 3 ऑगस्ट 2011 रोजी विधानपरिषदेत "मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2011" या विधेयकावरील चर्चेच्या वेळी देण्यात आलेल्या आश्वासनानुसार निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

-----

..7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

(पुढे सुरू....)

श्री.राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा सन 2009-2010 या वर्षाचा अलग लेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : अलग लेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.संजय देवतळे (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा सन 2008-2009 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विधेयकांना संमती व अधिसंमती

**उपसभापती** : विधान परिषदेने संमत केलेल्या पुढील विधेयकाना विधानसभेकडून संमती मिळाल्याची यादी प्रधान सचिव वाचून दाखवतील.

सह सचिव : विधान परिषदेने संमत केलेले पुढील विधेयक विधानसभेकडून संमत करण्यात आले.

सन 2011 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 10 महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, 2011

----

**पृ.शी./मु.शी.**: अंदाज समितीचा एकोणीसावा, विसावा, एकविसावा व बाविसावा अहवाल सादर करणे

डॉ. नीलम गोऱ्हे (समिती सदस्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाच्या नवीन बाबी संदर्भातील एकोणीसावा अहवाल, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच उद्योग व ऊर्जा विभाग, कामगार विभागाच्या नवीन बाबी संदर्भातील विसावा अहवाल, आदिवासी विकास विभागाच्या नवीन बाबीसंदर्भातील एकविसावा अहवाल आणि गृह विभागाच्या नवीन बाबीसंदर्भातील बाविसावा अहवाल सभागृहाला सादर करते.

**उपसभापती** : अंदाज समितीचा एकोणीसावा, विसावा, एकविसावा व बाविसावा अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

-----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा चौदावा अहवाल सादर करणे

श्री. सुभाष चव्हाण (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा चौदावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उपसभापती** : रोजगार हमी योजना समितीचा चौदावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे. अहवालाच्या चक्रमुद्रित प्रती सभागृहाच्या पटलावर ठेवल्या आहेत. छापील प्रती मुद्रणालयाकडून प्राप्त झाल्यानंतर त्या सदस्यांना वितरित करण्यात येतील.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कै. ग. दि. माडगूळकरांचे स्मारक व उद्यान उभारणे
**मु.शी.**:कै.ग.दि.माडगूळकरांचे स्मारक व उद्यान उभारणे
या विषयावर श्री. मोहन जोशी,वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून माननीय नगर विकास राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

सभापती महोदय, दिनांक 16 डिसेंबर 2011 रोजी माननीय विधान परिषद सदस्य श्री. मोहनराव जोशी यांनी पुणे येथील ग. दि.माडगूळकरांच्या स्मारकाबाबत उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने मी निवेदन करीत आहे.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील वाकडे वाडी येथील सर्व्हे नंबर 13/24 ते 29 यापैकी मुळा नदीकाठच्या सुमारे 2 कि.मी. लांबी व सरासरी 30 मीटर रुंदीच्या जागेमध्ये श्री. ग. दि. माडगूळकर यांचे स्मारक व उद्यान उभारण्याचे प्रस्तावित आहे. या कामासाठी महानगरपालिकेने सन 2008-2009 च्या अंदाजपत्रकामध्ये रु. 2 कोटी 75 लाख व सन 2009-2010 च्या अंदाजपत्रकामध्ये रु. 1 कोटी 6 लाख इतकी व सन 2010-2011 च्या अंदाजपत्रकामध्ये रु. 2 कोटी 71 लाख इतकी अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यात आली होती. सदर तरतुदीमधून स्मारकासाठी नदीलगतच्या जागेत सुमारे 475 मीटर लांबीची संरक्षक भिंत बांधण्यात आली असून त्यावर रु. 2 कोटी 38लाख इतका खर्च करण्यात आला आहे. सन 2011-2012 च्या अंदाजपत्रकात रु. 1 कोटी 20 लाख इतक्या रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे. या स्मारक व उद्यानासाठी आवश्यक असलेल्या जागेपैकी सुमारे 49 हजार 550 चौरस मीटर जागेपैकी सुमारे 15 हजार 250 चौरस मीटर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आली आहे. महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या 15 हजार 250 चौरस मीटर जागेपैकी 3 हजार 750 चौरस मीटर जागेवर मैला पाणी शुध्दीकरण केंद्र आहे, उर्वरीत जागेपैकी तसेच 2800 चौरस मीटर जागा खाजगी मालकीची असून 31 हजार 500 चौरस मीटर जागा विविध शासकीय विभागांच्या मालकीची आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ D/

श्री. भास्कर जाधव....

या स्मारकासाठी आवश्यक खाजगी जागा व विविध शासकीय विभागांच्या जागा अद्याप महानगरपालिकेकडे हस्तांतरीत न झाल्याने सदर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत महानगरपालिकेमार्फत जिल्हाधिकारी, पुणे यांच्याशी पत्र व्यवहार सुरु आहे.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, हे स्मारक लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी जानेवारी महिन्यामध्ये सर्व संबंधितांची बैठक मंत्री महोदय बोलाविणार आहेत काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, बैठक बोलाविण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.मु.शी.**: शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षकांना 1जानेवारी 2006 पासून सहावा वेतन आयोग लागू न करणेबाबत सर्वश्री. रामनाथ मोते, संजय केळकर, भगवान साळुंखे, विनोद तावडे, नागो गाणार वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. पद्माकर वळवी (क्रीडा व युवक कल्याण मंत्री) : सभापती महोदय, श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षकांना 1जानेवारी 2006 पासून सहावा वेतन आयोग लागू न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना दिनांक 1 जानेवारी 2006 पासून सहावा वेतन आयोग लागू झाला. त्याच प्रमाणे विद्यापीठीय शिक्षकांना, महाविद्यालयीन शिक्षकांना दिनांक 1 जानेवारी 2006 पासून सहावा वेतन आयोग लागू झाला. या राज्यामध्ये आठ अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालये आहेत, त्यांना सहाव्या वेतन आयोगाचा लाभ दिनांक 1 जानेवारी 2006 पासून देण्याऐवजी दिनांक 1 एप्रिल 2011 पासून देण्यात आला आहे. म्हणजेच जवळ जवळ चार वर्षाचे त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. निवेदनात म्हटले आहे की, याची पुनर्तपासणी करण्याची बाब विचाराधीन आहे. तेव्हा त्यांना दिनांक 1.1.2006 पासून लाभ देण्याचा निर्णय किती दिवसात होईल? दुसरा प्रश्न असा की, शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना याचा लाभ देण्याबाबतचा आदेश अद्यापि निघालेला नाही. इतर सर्व कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळाला आहे. पाच वर्षे संपली आहेत, अर्धा कालावधी संपलेला आहे. त्यामुळे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतन श्रेणी लागू करण्याचा निर्णय किती दिवसात घेण्यात येईल?

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, या ठिकाणी आठ शासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षकांना दिनांक 1 एप्रिल 2011 पासून सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्या फरकाच्या रकमेचा प्रश्न आहे. या बाबत मंत्री मंडळाने निर्णय घेतला होता. परंतु माननीय सदस्य आणि शिक्षक संघटनेची मागणी आहे की, त्यांना थकबाकीची रक्कम मिळाली पाहिजे. या संदर्भात निश्चितपणे पुनर्तपासणीचे काम सुरु आहे. लवकरच पुनर्प्रस्ताव सादर केला जाईल. त्याचप्रमाणे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीबाबतचा प्रस्ताव क्रीडा विभागाकडून वित्त आणि नियोजन विभागाकडे पाठविण्यात आला होता. त्यावर संबंधित विभागाकडून काही अभिप्राय व्यक्त करण्यात आले असून ते क्लिअर करुन लवकरात लवकर म्हणजे पुढील अधिवेशनापर्यन्त हे कामकाज पूर्ण होईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. मु.शी.** : नक्षलग्रस्त व अतिसंवेदनशील भागात कार्यरत असलेल्या व्यवसाय शिक्षकांना प्रोत्साहन भत्ता न मिळणेबाबत सर्वश्री. ना. गो. गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, भगवान साळुंखे, डॉ. रणजित पाटील, वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. राजेश टोपे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. ना. गो. गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, भगवान साळुंखे, डॉ. रणजित पाटील, वि.प.स. यांनी "नक्षलग्रस्त व अतिसंवेदनशील भागात कार्यरत असलेल्या व्यवसाय शिक्षकांना प्रोत्साहन भत्ता न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, राज्य सरकारच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीत नक्षलग्रस्त व अतिसंवेदनशील आदिवासी भागात कार्यरत व्यवसाय शिक्षकांना सन 2002 सालापासून प्रोत्साहन भत्ता न देता तो सन 2007 पासून लागू करण्यात आला आहे. त्याविरुध्द शिक्षकांनी उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले आहे.त्या पिटीशनवरील निर्णय कर्मचाऱ्यांच्या बाजूने लागला. ज्यांनी ही याचिका दाखल केली त्यांना शासनाने सन 2002 पासून प्रोत्साहन भत्ता दिला आहे. ज्यांनी ही याचिका दाखल केली नाही अशा शिक्षकांना सन 2002 पासून भत्ता देण्यात आला नाही. तो देण्यात येईल काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, एकूण 331 शिक्षक आहेत त्यापैकी 10 लोकांनी याचिका दाखल केली होती त्यांना प्रोत्साहन भत्ता मिळाला आहे. उर्वरित शिक्षक कोर्टामध्ये गेले नव्हते म्हणून त्यांना प्रोत्साहन भत्ता मिळाला नाही. या सर्वांचा एकत्रित प्रस्ताव करुन तो वित्त विभागाकडे पाठविण्यात येईल. उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून या सर्व शिक्षकांचा एक त्रितपणे विचार करण्यासाठी वित्त विभागाकडे जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. मु.शी.**: ईपीआरआय कार्यक्रमासाठी प्रशिक्षित संगणक चालकांच्या नियुक्त्या करणेबाबत श्री. पांडुरंग फुंडकर,वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. जयंत पाटील (ग्राम विकास मंत्री) : सभापती महोदय, श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी "ईपीआरआय कार्यक्रमासाठी प्रशिक्षित संगणक चालकांच्या नियुक्त्या करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, पंचायती राज संस्थांचे बळकटीकरण करुन त्यामध्ये सुसूत्रता व पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या पंचायत राज मंत्रालयाने ई.पी.आर.आय. हा प्रकल्प सर्व राज्यांमध्ये राबविण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय राबवीत असतांना खामगाव पंचायती समितीमार्फत स्थानिक ग्रामपंचायतीला तेराव्या वित्त आयोगाच्या निधीमधून संगणक खरेदीसाठी 42 हजार रुपये वर्ग करण्यात आले आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ ST/ D/ 12:40

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

या अनुषंगाने खामगाव पंचायत समितीने संगणक चालकाच्या जागा भरल्या आहे, त्यावेळी शासनाच्या नियमाप्रमाणे कोणत्याही प्रकारचे निकष पाळण्यात आलेले नाहीत.सदरहू कंपनीने उमेदवारांकडून सर्रास पैसे घेऊन त्या जागा भरण्यात आल्या. याठिकाणी दहावी, बारावी, मॅट्रीक झालेल्यांना भरती करुन येथील जागा भरण्यात आल्या. यासंबंधातील जी.आर.माझ्या जवळ आहे आणि त्यामध्ये उमेदवार कोणत्याही शाखेचा किमान पदवीधर असावा तथापि वाणिज्य शाखेच्या पदवीधर उमेदवारास प्राधान्य् द्यावे अशी पहिलीच अट घालण्यात आलेली आहे.पण ही अट बाजूला ठेवण्यात आली आणि त्याठिकाणी दहावी झालेल्या, बारावी झालेल्या उमेदवारांना नियुक्ती दिली गेली.परंतु दहावी आणि बारावी झालेली मुले कसा संगणक चालविणार आहेत. हा प्रोग्रॅम राबविण्यासाठी प्रत्येक ग्राम पंचायतीकडे 42 हजार रुपये वर्ग करावयाचे असतील तर त्याठिकाणी प्रशिक्षित उमेदवार असले पाहिजेत. मात्र प्रत्यक्षात तेथे प्रशिक्षित लोक भरण्यात आले नाहीत.उलट तेथे पैसे घेऊन लोकांची भरती करण्यात आली. त्यामुळे येथील ग्राम पंचायतीचे नुकसान होणार आहे. म्हणून माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की,त्यांनी या सर्व नियुक्त्यांना ताबडतोब स्थगिती देऊन, याबाबतीत शासनाचे जे निकष आहे त्यानुसार जागा भरल्या गेल्या पाहिजेत अशा प्रकारचे आदेश देण्यात येणार आहेत काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, एकतर ग्राम पंचायतीमध्ये डेटा एन्ट्री करण्यासाठी या लोकांची ऑपरेटर म्हणून नियुक्ती करावी.पण ते उमेदवार ग्राम पंचायत किंवा महाराष्ट्र शासन किंवा जिल्हा परिषद यांचे अंतिमत: नोकर ठरु नयेत आणि डेटा एन्ट्रीचे काम करताना तेथील संगणक 100 टक्के किंवा 99 टक्के कायम सुरु रहावा,तो ऑन लाईन रहावा आणि त्याचा उपयोग व्हावा. कारण बऱ्याच ग्राम पंचायतीमध्ये संगणक असले तरी ते चालत नाहीत असे न होता तो कायम स्वरुपामध्ये चांगला रहावा, त्याचा वापर गावातील विविध योजनांसाठी आणि केंद्र शासनाने जे 12 सॉफ्टवेअर दिलेले आहेत, त्याच्यासाठी करेक्ट व्हावा आणि तो संगणक दुर्लक्षित होऊ नये यासाठी पहिली पाच वर्षे आपण तेथे माणसे नेमण्याची व्यवस्था केलेली आहे.महा ऑनलाईन नावाची संस्था असून राज्य सरकार आणि टाटा कन्सलटन्सी सर्व्हीसेस आहेत,त्यांना हे काम देण्यात आलेले आहे.मात्र डेटा एन्ट्री ऑपरेटरला मराठी टायपिंग आले पाहिजे, तसेच तो ग्रॅज्युएट असला पाहिजे किंवा महाराष्ट्र स्टेट सर्टीफीकेट इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी म्हणजेच एम.एस.सी.आय.टी.परीक्षेचे त्यांच्याकडे सर्टीफीकेट असावयास पाहिजे आणि ती व्यक्ती त्या गावा-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील . . . .

तील किंवा शेजारच्या गावातील असावयास पहिजे. त्याठिकाणी त्याला बाहेरच्या ठिकाणावरुन आणले जाऊ नये.स्थानिक स्तरावरील व्यक्तीकडे तशी कपॅसिटी असेल तर त्याला संधी दिली जाईल अशा प्रकारच्या सर्व कंडीशन घालून कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर नेमणुकीचे अधिकार महा ऑन लाईनला देण्यात आले आहेत.परंतु ही नेमणूक कायम स्वरुपाची नाही.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एक बाब निदर्शनास आणल्याप्रमाणे त्या ठिकाणी दहावी आणि बारावी झालेल्या मुलांकडे एम.एस.सी.आय.टी.चे सर्टीफीकेट नसतानाही त्यांना नेमण्यात आले असेल तर दिलेल्या माहितीनुसार त्या एजन्सीला विचारण्यात येईल. जर अशी मुले नेमण्यात आली असतील तर त्यांना तेथे काम करण्याचा अधिकार रहाणार नाही. कारण याठिकाणी नेमण्यात आलेल्या सर्वांना पंचायत समितीमध्ये बोलावून त्यांची पुन्हा एकदा चाचणी घेण्यात येणार आहे.अशा वेळी त्यांची गुणवत्ता आणि त्यांची कार्यक्षमता जर कमी असेल तर संबंधितांना कमी करुन तेथे नवीन माणसे घ्यावीच लागतील. पहिली गोष्ट म्हणजे ही कायम स्वरुपाची नेमणूक नाही. दुसरे म्हणजे याठिकाणी नेमणूक करताना जर गुणवत्ता कमी असेल तर तेथील उमेदवाराला बदलून नवीन उमेदवार नेमण्याची व्यवस्था आहे. तसेच कोणत्याही परिस्थितीत जो संगणक मिळालेला आहे तो कायम स्वरुपामध्ये चालला पाहिजे अशी यातील एक अट आहे.

सभापती महोदय, आज याठिकाणी विषय निघालेला आहे म्हणून सभागृहाला सांगणे योग्य होईल असे मला वाटते की, यामध्ये महाराष्ट्र राज्याने केलेले काम असे आहे की, साधारणपणे 26 ऑक्टोबरला महाराष्ट्रातील ग्राम पंचायत,पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदेच्या लेव्हलवरील व्हाउचर्स्च्या एन्ट्रीज या 87,114 होत्या. पण मला सभागृहाला सांगण्यास विशेष आनंद होत आहे की, यामध्ये ऑक्टोबरनंतर आज सकाळपर्यंत त्यात वाढ झाली आहे. ऑन लाईनव्दारे ते समजते म्हणून मी मघाशी संगणकावर पाहिले. त्यानुसार ही संख्या आता 14,70,546 रुपये इतकी झालेली आहे. तसेच मघाशी दीड तासापूर्वी देखील पाहिले असता 22,079 कोटी 23 लाख आणि 30 लाख 224 हजार रुपयांच्या रिसीटस् जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्राम पंचायतीच्या वेगवेगळया स्तरावर जमा झालेल्या आहेत. तसेच 17,735 कोटी 26 लाख 37 हजार 752 रुपयांच्या पेमेंटस् या तीनही व्यवस्थेकडून झालेली आहेत.

सभापती महोदय, मला आपल्या निदर्शनास एक बाब आणून द्यावयाची आहे की, महाराष्ट्राच्या प्रिया सॉफ्टवेअरचा वापर करण्यामध्ये पहिला क्रमांक आला असून याबाबत कल्पना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशी आहे की, आता ग्रामपंचातीकडे हळूहळू मोठ्या प्रमाणात निधी येणार असल्याने त्यामध्ये पारदर्शकता यावी.तसेच त्यांच्या पेमेंटस्‌मध्ये, त्यांच्या कामामध्ये, त्यांच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा व्हावी.तसेच ग्राम पंचायतीने आता तेथील सदस्यांना देखील ट्रेनिंग द्यावयास पाहिजे अशा स्वरुपाचा केंद्र शासनाचा दृष्टीकोन आहे आणि त्याचाही कसा अंतर्भाव करता येईल यादृष्टीने आम्ही विचार करीत आहोत.सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एका मुद्याबाबत लक्ष वेधले. बऱ्याच वेळेला स्थानिक मान्यवर नेत्यांचा असा समज झालेला आहे की, ही कायमची नेमणूक असल्यामुळे आपण म्हणू तशी नेमणूक व्हावी. याठिकाणी मला संधी मिळालेली आहे म्हणून मी या सदनाच्या माध्यमातून सगळयांना कळावे म्हणून सांगू इच्छितो की, ही नेमणूक टेम्परररी आहे आणि जर एखाद्याची गुणवत्ता कमी असेल तर त्याला त्या नोकरीतून बाजूला करण्याच्या बाबतीत कॉन्ट्रॅक्टमध्ये दिलेले आहे, आपण त्यांना नेमणूक दिलेली नाही. कारण आपण जर एखाद्या व्यक्तीची नेमणूक केली तर मग तेथे संघटना तयार होते आणि आम्हाला कायम स्वरुपाचे कर्मचारी म्हणून घेण्यात यावे यासाठी जो उपक्रम राबविला जातो,तो होऊ नये अशी यातील कल्पना आहे.मात्र सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्याची तपासणी करुन तेथे जर कमी गुणवत्तेच्या लोकांची नेमणूक केली असेल तर त्यांना दूर करण्यात येईल. तेथील स्थानिक परंतु गुणवत्तेमध्ये बसणाऱ्या मुलांना तेथे काम देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी याबाबत फार सविस्तर उत्तर दिलेले आहे आणि हा कार्यक्रम फार चांगला आहे.जर प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ठिकाणी अशा व्यवस्था करण्यात आल्या तर ते जनतेच्या दृष्टीने फार सोयीचे होणार आहे. फक्त यामध्ये ज्याला तुम्ही कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे, त्या कॉन्ट्रॅक्टरची माणसे ज्या पध्दतीने काम करीत आहेत ते पाहिले दिसून येईल की, ती माणसे पैसे घेऊन त्याठिकाणी मुलांना नोकरीला लावतात. आमचे असे म्हणणे आहे की, त्याठिकाणी कोणाला नोकरी मिळावी याबाबत काही कंडीशन घालण्यात आल्या आहेत. माझे याबाबत अगदी स्पष्ट म्हणणे आहे की त्याठिकाणी नियुक्ती करताना सदरहू व्यक्ती क्वॉलिफाईड असली पाहिजे आणि तेथील ग्राम पंचायतीला त्याचा उपयोग झाला पाहिजे. म्हणून यासाठी जे निकष आहेत, त्याप्रमाणे याठिकाणी उमेदवारांना घेण्यात आलेले नाही.खामगाव तालुक्यामध्ये 36 जणांची यादी अशी आहे की, ज्यामध्ये यासाठी असलेले निकष डावलून, संबंधितांकडून पैसे घेऊन तेथील कॉन्ट्रॅक्टरच्या एजन्सीमधील मुलांना नोकरी दिलेली आहे. त्यामुळे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सदरहू यादीतील उमेदवारांची भरती थांबवून, संबंधितांची फेर चौकशी करुन मग त्यानंतर नेमणूक करण्यात यावी.मग तुम्ही कोणालाही नेमावे परंतु ती व्यक्ती निकषामध्ये बसणारी असावयास पाहिजे एवढाच माझा आग्रह आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, आपल्याच तालुक्याचे उदाहरण घेऊन त्याठिकाणी जर अशा प्रकारे भरती करण्यात आली असेल तर ती ताबडतोब थांबविण्याबाबत व्यवस्था करण्यात येईल आणि आपण किंवा जिल्हा परिषदेचे सी.ई.ओ.यांनी त्यात पार्टी होऊ नये म्हणून आपण त्यात मुद्दाम अंतर ठेवलेले असून, त्यांचे त्यांना काय करावयाचे असेल ते करु देत. नाहीतर पुढे सरकारवर फार मोठा बोजा येऊ शकतो. परंतु आपण त्या एजन्सीला सूचना देऊ की, बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यामध्ये अशा प्रकारच्या नेमणूका करताना ही बाब निदर्शनास आलेली असल्यामुळे प्रत्येक उमेदवाराची भरती करताना, त्या गावामध्ये आपल्याला अपेक्षित असलेली जी मुले आहेत, त्यांची परीक्षा घेऊन गुणवत्तेवर नेमणूक करावी. जर त्यांनी गुणवत्ता डावलून काही केले असेल तर आपण भविष्यामध्ये त्यांची एजन्सी रद्द करण्याची व्यवस्था करु शकतो.

----

. . . .के-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांदा नागरी सहकारी पत संस्था मर्या. या संस्थेतील आर्थिक व्यवहार बंद

असणे

**मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांदा नागरी सहकारी पत संस्था मर्या. या संस्थेतील आर्थिक व्यवहार बंद असणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हर्षवर्धन पाटील (सहकार मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .के-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, याठिकाणी संचालकांकडून 34 लाख 75 हजार इतकी रक्कम येणे बाकी आहे. ही रक्कम वसूल करुन ठेवीदारांची देणी देण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात येणार आहे काय ? तसेच हा व्यवहार 2008 पासून ठप्प असल्याने ठेवीदाराची देणी देण्यासाठी कलम-88 नुसार कारवाई करणार आहात काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले, ती गोष्ट खरी आहे.त्यासंदर्भात निश्चितपणे कलम-88 नुसार कारवाई करण्याच्या दृष्टीने नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

यानंतर कु.थोरात . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेतीवर आधारित नसलेल्या व्यवसायांना मोठ्या प्रमाणात कर्ज दिल्याचे उघडकीस येणे

**मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेतीवर आधारित नसलेल्या व्यवसायांना मोठया प्रमाणात कर्ज दिल्याचे उघडकीस येणे याबाबत श्री. परशुराम उपरकर यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.हर्षवर्धन पाटील ( सहकार मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्य सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 6.सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, दिनांक 31.3.2011 रोजी सी.डी. रेश्यो 73.16 सांगितला आहे. हा सी.डी. रेश्यो सहकार नियमाला धरुन आहे का? शेती विषयक कर्ज देण्याचे बँकेचे उद्दिष्ट असताना डंपरसाठी कर्ज वाटप करण्यात आलेले आहे, ते नियमास धरुन आहे का?

श्री. हर्षवर्धन पाटील : लेखा परीक्षण 'साधारण-ड' आलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे शासन त्या बाबतीत चौकशी करील आणि चौकशीअंती या बँकेच्या बायलॉजमध्ये कोणकोणत्या तरतुदी होत्या आणि त्यांनी डंपरला कशा पध्दतीने कर्ज दिलेले आहे ही सगळी बाब तपासून घेण्यात येईल आणि नियमाच्या बाहेर असेल तर त्या पध्दतीने पुढची कारवाई करण्यात येईल.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे जात आहे. डंपरला कर्ज देण्यासाठी बँकेला बंदी नाही. सिंधुदुर्ग जिल्हा बँकेचा सी.डी. रेश्यो कमी आहे. जर त्या बँकेकडे पैसे उपलब्ध असतील तर डंपरला, क्रशरला कर्ज देणे हे चुकीचे नाही. बँकेचा सी.डी.रेश्यो बघणे हे सहकार खात्याचे काम नाही, नाबार्ड हे काम बघते, त्यासाठी त्यांचा प्रतिनिधी बँकेमध्ये असतो. रेकॉर्डवर चुकीचे आले तर या पध्दतीची तरतूद आहे म्हणून अधिकारी आम्हाला त्रास देतात. म्हणून या बँकेने जे कर्ज दिलेले आहेत ते योग्य प्रकारे दिलेले आहे का, त्या कर्जाची रिकव्हरी बाकी आहे का आणि कर्ज देतांना मॉर्गेज बरोबर घेतलेले आहे का याची चौकशी करण्यात यावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी दिलेले उत्तर नीट तपासून बघितले तर सन्माननीय सदस्यांच्या लक्षात येईल. मी असे सांगितले होते की, जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या बॉयलॉजमध्ये कोणकोणत्या बाबीला कर्ज देण्याची प्रोव्हिजन आहे, त्या प्रोव्हिजनप्रमाणे कर्ज दिले असेल तर त्यामध्ये चुकीचे काही नाही. पण प्रोव्हिजन नसताना कर्ज दिले असेल तर त्या संदर्भात चौकशी करण्यात येईल.रिझर्व बँकेच्या सूचनेप्रमाणे सी.डी. रेश्यो तपासण्याचे काम जरी नाबार्डचे असले तरी सुध्दा शासनाचा ऑडिटरसुध्दा वेळोवेळी इन्स्पेक्शन करीत असतो आणि त्या इन्स्पेक्शनप्रमाणे तो सी.डी. रेश्यो बँकेच्या नॉर्म्सप्रमाणे आहे की नाही हे देखील तपासून बघितले जाईल.

----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात एक लाख बारा हजार मुली रक्तक्षयाने बाधीत असल्याचे आढळून येणे

**मु.शी.**: चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात एक लाख बारा हजार मुली रक्तक्षयाने बाधीत असल्याचे आढळून येणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी ( सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्य सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 5 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, उत्तरामध्ये गडचिरोली आणि चंद्रपूर येथील मुलींमध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी आहे हे मान्य केलेले आहे. तसेच परंतु "ग्राम आरोग्य पोषण दिन"या दिवशी प्रात्यक्षिकाद्वारे आहारविषयक आरोग्य शिक्षण मुलींना व पालकांना देण्यात येते"असे म्हटले आहे. रक्तक्षय हा आजार प्रोटिन्सच्या कमतरतेमुळे होतो. म्हणून पालकांना आणि मुलींना केवळ आहार विषयक शिक्षण देऊन उपयोगाचे नाही तर त्यांना प्रोटिनयुक्त आहार मिळण्याकरिता शासन वेगळी उपाययोजना करणार आहे का? केवळ औषधोपचाराने हे रोग कमी होत नाहीत. चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयामध्ये रक्तक्षय म्हणजे ॲनिमिक कंडिशन असलेल्या मुलींचे प्रमाण खूप जास्त आहे. हिमोग्लोबीन कमी असलेल्या मुलींचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे हिमोग्लोबीन वाढविण्याकरिता ज्या-ज्या गोष्टी आवश्यक असतील मग त्यामध्ये पोषक आहार असेल तो देण्याकरिता शासन वेगळा कार्यक्रम राबविणार आहे काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी या ठिकाणी जो मुद्दा मांडलेला आहे त्याप्रमाणे फक्त गडचिरोली आणि चंद्रपूर या दोन जिल्हयात हिमोग्लोबीनचा प्रॉब्लेम दिसून येतो. या संदर्भात संपूर्ण राज्यात मोहीम सुरु करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यात यासंबंधीचे काम सुरु केलेले आहे. या हिमोग्लोबीनच्या संदर्भात केंद्र सरकार एप्रिलमध्ये एक मोहीम घेत आहे. हिमोग्लोबीन कमी असण्याची जी कारणे आहेत त्यातील मुख्य कारण आहार आणि प्रोटिनची कमतरता हे आहे. तसेच ज्यांना जंताचा त्रास असतो त्यांच्यामध्ये हिमोग्लोबीन कमी असते. आरोग्य विभागामामार्फत रक्त तपासणीचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये तत्काळ जिल्हा रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उप केंद्रे या सर्व ठिकाणी डी-वर्मिंगचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे आणि त्यांना आयर्न फॉलिक ॲसिडच्या गोळयांचे वितरण करण्याची व्यवस्था केलेली आहे. पोषण आहारासंबंधी या ठिकाणी मुद्दा मांडण्यात आला. हा विषय आरोग्य विभागाकडे येत नाही. परंतु मी विधानसभेत आश्वासन दिल्याप्रमाणे माननीय महिला व बालकल्याण मंत्री यांच्या बरोबर बैठक घेऊन या संबंधी एक नवीन धोरण आणि एक नवीन कार्यक्रम या राज्यात घेण्याची घोषणा ऑलरेडी करण्यात आलेली आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 7 बाबत**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेच्या संदर्भातील निवेदन मांडण्यास सभागृहात माननीय मुख्यमंत्री तसेच मंत्री महोदया,प्रा. फौजिया खान देखील उपस्थित नाहीत. संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित झाल्यानंतर सदर निवेदन घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, यामध्ये पैसे डायरेक्ट फिरविलेले आहेत माननीय माजी अर्थमंत्री या ठिकाणी आहेत ते उत्तर देऊ शकतात पण त्यांच्या कारकिर्दीतील हे प्रकरण नाही.

**उप सभापती** : यानंतर निवेदन क्रमांक 9 घेण्यात येईल.

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यात वागदे सावरवाडी येथे साकव संमतीपत्र न घेतलेल्या चुकीच्या जागेत बांधण्यात येणे

**मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्ह्यात वागदे सावरवाडी येथे साकव संमतीपत्र न घेतलेल्या चुकीच्या जागेत बांधण्यात येणे याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. छगन भुजबळ ( सार्वजनिक बांधकाम मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्य सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 9 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, चुकीच्या सर्व्हे नंबरमध्ये संमती पत्र देऊन दुसऱ्या सर्व्हे नंबरमध्ये साकव बांधण्यात आलेला आहे त्याबाबतीत कारवाई करण्यात येणार आहे का?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी यापूर्वी सुध्दा हा प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाचे उत्तर देण्यात आले होते. आता सुध्दा या ठिक्‍ाणी तो प्रश्न विचारण्यात आलेला आहे. सभापती महोदय, हा साकव नऊ लाख रुपये किंमतीचा आहे. मला या ठिकाणी एवढेच सांगावयाचे आहे की, सन्माननीय माजी आमदार श्री. अजित गोगटे यांच्या मागणीनुसार जिल्हा नियोजन समितीने पत्र पाठविले होते, त्यानुसार डी.पी.डी.सी.ने त्याने मान्यता दिली होती. मान्यता दिल्यानंतर ग्रामपंचायतीने सुध्दा ठराव केला आणि 50 ते 60 लोकांना या साकवाचा फायदा होणार आहे त्यामुळे अमुक-तमुक लोकांच्या घरासमोरुन जाणाऱ्या ओहोळावर हा साकव बांधावा असे सांगितले होते. ते सर्व लक्षात घेऊन आणि तांत्रिकदृष्टया लक्ष घालून सार्वजनिक बांधकाम खात्याने हा साकव बांधला. त्या संदर्भात आता पर्यंत कुठलीही तक्रार आली नाही आणि त्यामुळे उप विभागीय अधिकाऱ्याचा कुठलाही अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्राप्त नाही.

----

..8.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 10 बाबत**

**उप सभापती** : निवेदन क्रमांक 10 हे सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी दिलेल्या सूचनेच्या संदर्भात आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, उत्तर देण्यासाठी सभागृहात कुठलेच मंत्री महोदय उपस्थित नाहीत.

**उप सभापती** : नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील उर्वरित सर्व निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावीत. त्यानंतर औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदन क्रमांक 7,8,10,11,12,13 व 14 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली निवेदन क्रमांक 7,8,10,11,12,13 व 14 ही निवेदने कृपया छापावीत.)

------

...10....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ D/ KTG/ D/

**कापूस, धान व सोयाबीनच्या संदर्भाद निवेदन करण्या बाबत**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते. सन्माननीय श्री पांडुरंग फुंडकर हे विदर्भातील आहेत. या अधिवेशनात कापूस, धान व सोयाबीनचा विषय आम्ही या सभागृहात पोटतिडीकेने मांडला होता. आज अधिवेशन संपणार आहे. कोणत्याही क्षणी या ठिकाणी अधिवेशनाची समाप्ती होईल. तेव्हा कापसाच्या, धानाच्या व सोयाबीनच्या संदर्भातील घोषणा गुरुवारी जाहीर करण्यात यावे, अशी मी विनंती केली होती. पण सदर निवेदन अद्यापपर्यंत देण्यात आलेले नाही. यासंदर्भात आज सकाळी मंत्रिमंडळाची बैठक झालेली आहे. विदर्भात दोन आठवडे अधिवेशन होऊन विदर्भाच्या पदरात काही घालण्यात येणार नसेल तर बाकीच्या सर्व कामकाजाला काय महत्व आहे? सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या कारकिर्दीत शासनाने या संबंधीचे निवेदन केले पाहिजे अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. बरवड. . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते......

या दोन आठवड्याच्या अधिवेशनामध्ये विदर्भाच्या पदरामध्ये काही घालणार नसाल तर कशाला कामकाज करावयाचे ? आपण कामकाज थांबवावे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या विरोधी पक्ष नेतेपदाच्या कारकिर्दीमध्ये हे निवेदन झाले पाहिजे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कालही मी हा प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी निश्चितपणे आज घोषित करतो असे सांगितले होते, ती घोषणा झाली पाहिजे, असे मला वाटते. जवळपास आठ दिवस महाराष्ट्रातील शेतकरी वाट पहात आहेत. आपण माननीय मुख्यमंत्र्यांना बोलवावे.

**उप सभापती** : आज निवेदन करण्यात येईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे त्याप्रमाणे अधिवेशन संपण्यापूर्वी ते निवेदन होईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आजपर्यंत विदर्भाच्या प्रश्नाकरिता आपल्या संपूर्ण कारकिर्दीत सातत्याने प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या विरोधी पक्ष नेतेपदाच्या कारकिर्दीत ते निवेदन झाले पाहिजे. आपण माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करावी.

**उप सभापती** : ते पायउतार होण्यापूर्वी निवेदन करण्यास सांगण्यात येईल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांसंबंधी जे पॅकेज जाहीर केले त्याबाबतचे विस्तृत निवेदन माननीय मुख्यमंत्री आज करणार आहेत.

---

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालय, अकोला येथे रोजंदारी कामगार मागील 15-20 वर्षापासून रोजंदारीवर काम करीत आहेत. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठास कामगारांची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी काही जागा रिक्त असून सुध्दा कामगारांना कायम स्वरुपी नोकरी देत नाहीत. 3-4 वेळा आंदोलन व उपोषण झाले. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाव्दारा त्यांना कायम स्वरुपी कामावर घेण्याचे आश्वासन दिले. परंतु आजपर्यंत त्यांना कायमस्वरुपी नोकरीवर घेतलेले नाही. मागील 15 दिवसापासून पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या गेटवर कामगारांचे आमरण उपोषण सुरु आहे. 150 कामगारांनी आत्मदहनाचा इशारा दिलेला आहे. कामगारांना नोकरी मिळत नाही त्यामुळे त्यांना बेकारी आणि भूकमरीला सामोरे जावे लागते. म्हणून त्यांनी आत्मदहनाचा इशारा दिलेला आहे. बाहेरच्या प्रांतवासीयाना नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात येते पण स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकरी मिळत नाही. त्यामुळे या गंभीर विषयावर मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

विमानाचे खाजगीकरण झाल्याने गेल्या 1/2 दिवसात विमानाच्या भाड्यात प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. नागपूर-मुंबई, मुंबई-दिल्ली या विमानाची तिकिटे 2/3 महिने अगोदर आरक्षित केली तर साधारणत: अनुक्रमे 2500 रुपये ते 4500 रुपयेपर्यंत भाडे आकारले जाते. आम्हा लोकप्रतिनिधींना अचानक पक्षाच्या प्रमुखाकडून आदेश आल्याने निरीक्षक नेमल्यानंतर सतत दिल्ली, पंजाब इत्यादी राज्यात अचानक वेळोवेळी आयत्यावेळी पक्षीय व शासकीय कामासाठी जावे लागते. आयत्यावेळी त्याच दिवशी तिकीट काढले तर अनुक्रमे 20 हजार रुपये ते 40 हजार रुपये आकार भरावा लागतो. या विमान कंपन्यांनी अशा संधीचा फायदा घेऊन विमान भाड्यात अचानक वाढ केली असल्याचे निदर्शनास येणे, अशा प्रकारे लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी यांच्यासह इतर नागरिकांचीही लूट करण्यात येत आहे. हे लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी व नागरिक यांना परवडणारे नाही. तरी राज्य शासनाने ही वाढ संबंधित नागरी उड्डाण विभागाकडे निदर्शनास आणून लोकप्रतिनिधींना आयत्यावेळी प्रवास करण्यास सुलभ होण्याकरिता तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मला आणखी एक विषय औचित्याच्या मुद्याव्दारे मांडावयाचा आहे.

**उप सभापती** : ठीक आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, विधिमंडळाच्या गेल्या 12 अधिवेशनामध्ये विधिमंडळाच्या सन्माननीय सदस्यांना विविध क्लबमध्ये प्रामुख्याने सभासदत्व द्यावे असा मुद्दा मी उपस्थित केलेला आहे. लेमिंग्टन क्लब, रेडियो क्लब, एमआयजी क्लब, वानखेडे क्लब, सीसीआय क्लब यांना राज्य शासनाने भूखंड वितरित केलेले आहेत. मी गेल्या 12 अधिवेशनामध्ये याबाबत मुद्दा उपस्थित करीत आहे आणि आपण सुध्दा निर्देश देता पण शासनाकडून कोणत्याही प्रकारचे निवेदन येत नाही. आयएएस अधिकारी, आयपीएस अधिकारी यांची बदली झाल्याबरोबर त्यांना ताबडतोब सदस्यत्व बहाल केले जाते. सभापती महोदय, आपण या मुद्याकडे लक्ष द्यावे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांना या क्लबचे सदस्यत्व देण्यासाठी मुंबईला गेल्यावर आपल्या दालनात ताबडतोब बैठक बोलवावी आणि या संबंधीचा प्रश्न सोडवावा. या ठिकाणी माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत. त्यांनी याबाबत सांगावे.

**उप सभापती** : हे जर कोणी करु शकत असतील तर ते माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ साहेबच करु शकतील. इतर कोणीही करु शकणार नाही.

श्री. छगन भुजबळ : सन्माननीय सदस्य कोणत्या क्लबबाबत विचारत आहेत ?

**उप सभापती** : सीसीआय, बीसीसीआय वगैरे क्लबबाबत ते विचारत आहेत.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित केला जातो आणि याबाबत निवदन करावे असे निदेश दिले जातात. या क्लब्जना शासनाकडून जागा दिली जाते. मुंबईतील क्लबमध्ये इतरांना सदस्यत्व मिळते. ते सदस्यत्व आपल्या सदस्यांना परवडण्यासारखे नाही. त्या सदस्यत्वाची फी 10 लाख रुपये, 15 लाख रुपये, 20 लाख रुपये इतकी आहे. या बाबत शासनाने कृपा करुन निवेदन करावे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ D/ ST/

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, शासनाने या मुद्याची नोंद घेतलेली आहे आणि याबाबत काय करता येईल या संदर्भात निश्चितपणे विचार केला जाईल.

**उप सभापती** : मला माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ यांनी खाजगीत एक चिठ्ठी पाठविलेली आहे की, सन्माननीय सदस्यांची मागणी मी मुख्यमंत्री झाल्यावर पूर्ण करीन.

---

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ D/ ST/

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती शोभाताई फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात मूल तालुक्यामध्ये सन 2009-2010 व 2010-2011 या दोन वर्षात एकूण 60 बैलांचा सर्पदंशाने मृत्यू होणे, त्यांच्या केसेस मूल पंचायत समितीचे पशुसंवर्धन अधिकारी यांनी शासनाकडे पाठविणे, 28 लाभार्थी लोकांना पैसे मिळणे व उर्वरित 31 लाभार्थी लोकांना अद्यापही पैसे न मिळणे, त्यातच काही खोट्या केसेस बनवून मंजुरीसाठी सादर करणे, सदर विभागात सर्पदंशाने जनावरे दगावण्याच्या घटना वारंवार घडत असून बरीच प्रकरणे प्रलंबित असणे, त्यामुळे खऱ्या लाभधारकांना लाभ न मिळता खोट्या लाभधारकांना लाभ मिळणे, त्यात संबंधित पशुसंवर्धन अधिकारी, पंचायत समिती यांनी केलेले गैरव्यवहार, लाभधारकांना त्वरित पैसे देण्याची आवश्यकता, शासनाने यावर चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, नागरिकांच्या हिताचा असल्याने मी हा विषय या औचित्याच्या मुद्याव्दारे मांडत आहे.

----

..7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ D/ ST/

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांना माननीय उच्चाधिकार समितीच्या निर्णयानुसार दरवर्षी प्रोत्साहनपर वेतन देण्याबाबतचा औचित्याचा मुद्दा मी उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, उक्त विषयाच्या संदर्भात माननीय उच्चाधिकार समितीचा निर्णय वित्त मंत्र्यांनी तसेच वित्त सचिवांनी गांभीर्यपूर्व न घेता प्रस्तावावर निर्णय घेण्यास जो विलंब लावला आहे तो निश्चितच सभागृहाने तसेच पीठासीन अधिकाऱ्यांनी गांभीर्याने घेऊन महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने पाठविलेल्या प्रोत्साहनपर वेतनाचा प्रस्ताव केवळ माहितीसाठी व अर्थसंकल्पीय तरतुदीसाठी आवश्यक ती नोंद घेऊन आता कायमस्वरुपी मंजूर करावा अशा प्रकारचा आदेश सभागृहात संबंधिताना द्यावा यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. महाराष्ट्र विधानसभेमध्ये दिनांक 31 जुलै, 2007 रोजी तारांकित प्रश्न क्रमांक 73039 च्या संदर्भात सभागृहात चर्चा झाली. चर्चेअंती माननीय मुख्यमंत्र्यांनी संबंधित विषय उच्चाधिकार समितीपुढे ठेऊन निर्णय घेण्यात यावा, त्याला आमची कोणतीच अडचण नाही असे उत्तर दिले. त्यानंतर जर उच्चाधिकार समितीने निर्णय दिला असेल तर शासनाने आणि माननीय अर्थमंत्र्यांनी तो स्वीकृत केला पाहिजे. या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून आपण तो स्वीकृत करावा अशा प्रकारचा मुद्दा मी या औचित्याच्या मुद्याव्दारे मांडत आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

गेल्या वर्षी विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असताना कामाचा ताण असह्य झाल्यामुळे या सचिवालयातील कर्मचारी श्री.सोपान भांगे, श्री.सुहास साळुंखे व श्री.डी.जी.खंदारे या तीनजणांचा हृदयविकाराने मृत्यू झाला. त्यांच्या वारसदारांना त्वरित मदत करण्याबाबत दिनांक 22.4.2010 रोजी सभागृहात औचित्याचा मुद्दा उपस्थित केला असता माननीय सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी या प्रकरणी स्वत: लक्ष घालून त्यांच्या कुटुंबीयांकडे सहानुभूतीने बघून जे काही करणे जरुरीचे आहे ते करण्यात येईल असे निदेश दिले होते. परंतु दीड वर्षांचा कालावधी जाऊनही वरील मयत कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना आजपर्यंत कायम स्वरुपी नोकरीत सामावून न घेण्यात आल्यामुळे ते मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. हे कर्मचारी सेवेत असताना शासकीय निवासस्थानात रहात होते. परंतु त्यांचे निधन झाल्यामुळे शासकीय सदनिका रिक्त करण्याची वेळ त्यांच्या कुटुंबीयांवर आली असल्यामुळे ते रस्त्यावर आले आहेत. याबाबत त्वरित कार्यवाही करुन त्यांच्या वारसदारांना अनुकंपा तत्वावर कायम स्वरुपी नोकरीत समावून घेण्याची नितांत आवश्यकता आहे. शासकीय निवासस्थान रिक्त करण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत त्याला तात्पुरत्या स्वरुपात स्थगिती द्यावी यासाठी आपण निदेश द्यावेत अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे. अन्यथा त्यांचे कुटुंबीय रस्त्यावर येतील.

**उप सभापती** : श्री.सुहास साळुंखे व श्री.डी.जी.खंदारे यांचा मृत्यू झाल्यामुळे त्यांच्या वारसदारांना नोकरी देण्याच्या संदर्भात प्रशासनाने ताबडतोब जरुर कार्यवाही करावी. तसेच त्यांच्या सदनिका रिकाम्या करण्याचे देण्यात आलेले आदेश तूर्तास स्थगित करण्यात यावेत.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, धन्यवाद.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची संख्या 416 आहे. या संस्थांमध्ये 1,34,920 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामध्ये अनुसूचित जमातीचे 21,739, अनुसूचित जमातीचे 14,729, वि.जा.भ.ज.समाजाचे 12,500 व इतर मागास वर्गाचे 35,526 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. 1982 सालापासून त्यांना 40 ते 60 रुपये विद्या वेतन दिले जात आहे. गेल्या 39 वर्षात विद्या वेतनात वाढ झालेली नाही. उच्च शिक्षण घेण्याची आर्थिक क्षमता नसलेले गरीब विद्यार्थी व्यवसाय शिक्षण घेतात व त्यामध्ये सुमारे 48 हजार मागासवर्गीय विद्यार्थी आहेत. वारंवार विनंती करुनही हा विषय शासनाच्या विचाराधीन असल्याचे उत्तर देण्यात येत आहे.

सभापती महोदय, या औचित्याच्या माध्यमाद्वारे माझी शासनाला विनंती आहे. छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या या पुरोगामी राज्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या विद्या वेतनामध्ये गेल्या 40 वर्षात वाढ न करणे योग्य वाटत नाही. म्हणून शासनाने तातडीने धोरणात्मक निर्णय घेऊन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विद्या वेतनात तातडीने वाढ करावी अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

--------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. त्यांना आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वारसदारांचे पुनर्वसन करण्याबाबत समाजकल्याण विभागाने उदासीनता दाखविल्यामुळे त्यांच्या वारसदारांचे अद्याप पुनर्वसन करण्यात आलेले नाही. माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ हे सभागृहात उपस्थित आहेत. याबाबत जनतेकडूनही मागणी होत असल्यामुळे शासनाने त्वरित कार्यवाही करुन महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वारसदारांचे पुनर्वसन तातडीने करण्यात यावे अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

------

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

हे अधिवेशन सुरु होण्यापूर्वी नागपूर येथील केअर हॉस्पिटलला आग लागली होती हे सर्वांना माहीत आहे. त्यानंतर आठ दिवसांनीच कलकत्ता येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलला आग लागली, त्या आगीत अनेक रुग्ण दगावले. आज मुंबई असो, नाशिक असो, संभाजीनगर असो किंवा अन्य ठिकाणी असो जेथे जेथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आहे तेथे आग प्रतिबंधात्मक यंत्रणा नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, राज्यातील खाजगी, शासकीय व निमशासकीय प्रत्येक सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणेची सोय करावी. तसेच सर्व हॉस्पिटलचे फायर ऑडिट करावे अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे सूचना मांडतो.

------

5.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

कोल्हापूर महानगरपालिका स्थापन झाल्यापासून अनेक वेळा हद्दवाढीचे प्रस्ताव येऊन सुध्दा ही हद्दवाढ होत नाही. परिणामी रात्रीच्या निवासाची लोकसंख्या 3 लाख 92 हजाराच्या वर जात नाही. दिवसभरात आजूबाजूच्या गावातून येणाऱ्या लोकांची संख्या 10 लाखाच्या वर आहे. 10 लाखाची संख्या क्रॉस झाली तर जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान योजनेतून या महानगरपालिकेला निधी मिळेल. आता त्या शहरात 220 कोटी रुपयांचा रस्ता तयार झालेला आहे. त्या रस्त्यावरील टोलचे कंत्राट 30 वर्षांसाठी दिल्यामुळे कोल्हापूरमध्ये प्रचंड आंदोलने सुरु झाली आहेत. कोल्हापूर शहराची हद्दवाढ झाली तर जेएनएनयुआरएम योजनेतून पैसे मिळतील. ही हद्दवाढ शासनाने लवकर मान्य करावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम भरण्यासाठी दिनांक 31.12.2011 ही शेवटची तारीख दिलेली आहे. बीड डीसीसीच्या सर्व शाखा बंद असून जिल्हा बँकेच्या संचालक व कर्मचाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे गुन्हे दाखल करण्यात आल्यामुळे या बँकेवर प्रशासकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांनी डीसीसी बँक बंद असल्यामुळे राष्ट्रीयकृत बँकेत जाण्याची सुरुवात केली. राष्ट्रीयकृत बँकांच्या व्यवस्थापकांनी आम्हाला शासनाच्या लेखी सूचना नाहीत असे उत्तर देण्याची सुरुवात केलेली आहे. जर ताबडतोबीने लिड बँकेच्या व्यवस्थापकांना किंवा मुख्य अधिकाऱ्यांना सांगितले तर शेतकरी विमा भरु शकतील अन्यथा बीड जिल्ह्यातील शेतकरी विमा भरु शकणार नाहीत. माझी शासनाला विनंती आहे की, आजच्या आज लिड बँकेच्या व्यवस्थापकांना व जिल्हा कृषी अधिकाऱ्यांना सूचना देणे गरजेचे आहे.

--------

7......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेल्या शालेय किंवा महाविद्यायीन खेळाडूंना गुणवत्तेसाठी देण्यात येणारे सवलतीचे 25 मार्क्स सरसकट न देता केवळ उत्तीर्ण करण्यासाठीच देण्यात येणार असल्याचा नुकताच शासनाने घेतलेला अन्यायकारक निर्णय, विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन मिळावे यासाठी दहावी आणि बारावीच्या निकालात अतिरिक्त 25 स्पोर्टस मार्क्स दिले जात असल्याने खेळाडू असणाऱ्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यास मदत होऊन खेळासाठी प्रोत्साहन मिळत असणे, मात्र हे मार्क्स आता विद्यार्थी नापास होत असेल तरच दिले जाणार असून या निर्णयामुळे खेळाडूंमध्ये निराशा निर्माण होऊन क्रीडा क्षेत्राचे प्रचंड नुकसान होण्याची आलेली वेळ, एकीकडे क्रीडा विकासाची शासनाकडून धोरणे आणली जात असतानाच शाळेतील क्रीडापटूंचे अशा प्रकारे खच्चीकरण केले तर राज्यात खेळाडू तयार न होण्याची निर्माण झालेली भीती, शासनाच्या या निर्णयामुळे क्रीडा क्षेत्रात निर्माण झालेली प्रचंड नाराजी व असंतोष, सरकारतर्फे शालेय खेळासाठी कोणत्याही सुविधा व शिष्यवृत्ती दिली जात नसल्याने शासनाने केवळ गुणांचा आधार देण्याची क्रीडा क्षेत्रातून होत असलेली मागणी, शालेय व महाविद्यालयीन खेळाडूंना सवलतीचे 25 गूण देण्याबाबत शासनाने फेरनिर्णय घेण्याबाबत कार्यवाही करावी अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे. धन्यवाद.

-------

8.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औाचित्याचा मुद्दा आहे.

शाळकरी मुलांच्या वाहतुकीच्या सुरक्षिततेसाठी सरकारने केलेले नियम जाचक असल्याचे कारण देत स्कूल बस मालक संघटनेने दिनांक 20.12.2011 या दिवशी एक दिवसाचा संप पुकारण्यात येणे, मुंबईत अलीकडच्या काळात झालेल्या अपघातात शालेय विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यास बस मालकांनी सुरक्षाविषयक असलेली नियमावली कशी धाब्यावर बसविली हे दिसून येणे, शासनाने यावर्षी शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी शालेय बस वाहतुकीसाठी नियम लागू करुनही परवडत नसल्याचे कारण देऊन शालेय विद्यार्थ्यांच्या बस वाहतुकीच्या संदर्भातील नियमावलीची अंमलबजावणी करण्यात न येणे, शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या उपाययोजनांकडे काटेकोरपणे कानाडोळा करण्याची निर्माण झालेली प्रवृत्ती, त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतूक सुरक्षाविषयक निर्माण झालेला जटील प्रश्न, याबाबत शासनाने केलेली व करण्यात येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

-----

9...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

**लक्षवेधी सूचना क्रमांक एक बाबत**

**उप सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवरील क्रमांक एक वर दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेशी संबंधित असलेले मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझी माननीय शिक्षण मंत्र्यांबरोबर चर्चा झालेली आहे. मी या लक्षवेधी सूचनेत जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबत शिक्षण संचालक यांच्यामार्फत चौकशी केली जाणार आहे. शिक्षण संचालक यांच्या नेतृत्वाखाली या चौकशीचे कामकाज होणार आहे. ही चौकशी एक महिन्यात पूर्ण व्हावी, मी उपस्थित केलेल्या विषयाचे सर्व कागदपत्रे माझ्‍ याजवळ आहेत. चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी या कागदपत्रांचा आधार घेऊन चौकशीची कार्यवाही एक महिन्यात पूर्ण करावी आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मी विनंती करीत आहे.

----

नंतर श्री.गिते......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :नंदुरबार नगरपालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात होत असलेली अनधिकृत बांधकामे

**मु. शी.** :नंदुरबार नगरपालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात होत असलेली अनधिकृत बांधकामे यासंबंधी सर्वश्री सतीश चव्हाण, हेमंत टकले, प्रकाश बिनसाळे, रमेश शेंडगे, श्रीमती विद्या चव्हाण वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नंदुरबार नगरपरिषदेच्या हद्दीत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे व बेजबाबदारपणामुळे मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर व अनधिकृतपणे सुरु असलेली बांधकामे व नियमबाह्यपणे मंजूर विकास योजनेंतर्गत आरक्षित असलेल्या जमिनीचे आरक्षण बदलण्याचे प्रकार देखील सुरु असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, सदरहू बांधकामे करतांना व नियमबाह्य मंजुरी देताना होत असलेले नियमांचे उल्लंघन व त्या बांधकामात व आरक्षणांना सरंक्षण देण्यासाठी होत असलेला गैरव्यवहार व भ्रष्टाचार, सदरहू अनधिकृत बांधकामामध्ये संत गाडगे महाराज व्यापारी संकुल, सि.स.नं.753 येथील शास्त्री मार्केट मधील बांधकाम, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठामध्ये झालेले अतिक्रमण तसेच नगरपरिषद हद्दीतील आरक्षित असलेल्या शेकडो जमिनींचे आरक्षण बदलून त्याबाबतच्या हरकती व तक्रारींकडे प्रशासनाकडून जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष, वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या (UIDSSMT) च्या मंजुरीसाठी दि.14/12/2007 रोजी झालेला ठराव बेकायदेशीरपणे रद्द करतांना त्यामध्ये देखील मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होणे, नंदुरबार नगरपरिषदेच्या संबंधित अधिकारी व अनधिकृत काम करणाऱ्या व्यक्तिकडून संगनमत करुन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा तेथील लोकप्रतिनिधी व जनतेमध्ये व्यक्त होत असल्याचा संशय, याबाबत लोकप्रतिनिधींनी तसेच जनतेने शासनाकडे तक्रार करुनही त्याची दखल न घेता त्याकडे केलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, परिणामी शासनाने नंदुरबार नगरपालिकेच्या हद्दीत झालेल्या अनधिकृत बांधकामे व जमिनीची बदललेली आरक्षणे याची सखोल चौकशी करुन त्याबाबत दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची भूमिका."



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने निवेदनात पुढील दुरुस्ती करु इच्छितो.

"निवेदनाचे पृष्ठ क्रमांक 2, परिच्छेद क्रमांक 3 मधील "महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 मधील तरतुदीनुसार मंजूर अभिन्यासातील खुल्या जागा या समुचित प्राधिकरण तथा नगरपरिषद यांच्या ताबे उपभोगात/मालकीच्या असतात. अभिन्यासातील रहिवाशांच्या संमतीने नगरपरिषद अथवा नोंदणीकृत संस्था अशा खुल्या जागांपैकी 10 टक्के जागा सार्वजनिक प्रयोजनासाठी विकसित करण्यास नाममात्र भाडयाने देता येतात." ही वाक्ये वगळण्यात यावीत.

**उप सभापती** : सुधारित निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण : हा नंदुरबार नगरपालिकेचा विषय आहे. नगरपालिकेतील अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांनी नंदुरबार शहराची पूर्णपणे वाट लावलेली आहे. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात म्हटले आहे की, दिनांक 14.12.2007 रोजी सर्वसाधारण सभा आयोजित करुन जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत अनिवार्य सभा आयोजित करुन स्वीकृती विषयी ठराव पारित केला आहे. हा जो ठराव पारित केला गेला त्याबाबतची कागदपत्रे माझ्याकडे उपलब्ध आहेत. भूमिगत गटारीचे 40 कोटी रुपयांचे टेंडर काढले, ते काम ड्रीम कन्स्ट्रक्शन कंपनीला देण्यात आले. परंतु या कंपनीचे रजिस्ट्रेशन 30 लाख रुपयांचे आहे. त्याबाबतीत चौकशी होणे गरजेचे आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला दिलेली जागा नंदुरबार नगरपालिकेची नाही, हे कोर्टात सिध्द झालेले आहे असे आपण उत्तरात म्हटले आहे. शास्त्री मार्केट बांधताना एमआरटीपी ॲक्टचे उल्लंघन केले आहे ही गोष्ट खरी आहे काय अशी विचारणा केली असता नंदुरबार नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी उत्पन्नात वाढ केली आहे अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. अनधिकृत बांधकाम करुन नगरपालिकेचे उत्पन्न वाढवावे अशी कोणत्या कायद्यात तरतूद आहे ? या नगरपालिकेमध्ये मोठया प्रमाणात गैरप्रकार झालेले आहेत, त्या गैरप्रकारांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल काय? नंदुरबार नगरपालिकेचे मुख्याधिकारी आणि नगरसेवक यांनी गैरकारभारास साथ दिली म्हणून त्यांचे विरुध्द काय कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : या निवेदनातील उत्तरावरुन असे दिसून येते की, नंदुरबार नगरपरिषदेमध्ये भ्रष्टाचार झाला असे काही म्हणता येणार नाही. परंतु काही बाबतीमध्ये अनियमितता झालेली आहे असे या निवेदनातून दिसून येते...

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याच्या प्रयत्न करतात.)

श्री. सतीश चव्हाण : सन्माननीय मंत्री महोदय हे गैरप्रकार करणाऱ्या व्यक्तींना सर्टिफिकेट देत आहेत.

श्री. प्रकाश बिनसाळे : माननीय मंत्री महोदयांनी भ्रष्टाचार झालेला नाही असा शब्दप्रयोग करुन गैरप्रकार करणाऱ्या व्यक्तींना प्रमाणपत्रच दिले आहे. आमच्याकडे या नगरपालिकेतील गैरप्रकाराबाबतची अनेक कागदपत्रे उपलब्ध आहेत. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे बांधकाम देखील अनधिकृतपणे केलेले आहे. आर्थिक पात्रता नसलेल्या कंत्राटदारांस 50 कोटी रुपयांचे भूमिगत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे .........

गटार योजनेचे काम दिले गेले. ती कागदपत्रे देखील आमच्याकडे उपलब्ध आहेत. नगरपालिकेची निवडणुक झाली, त्यानंतर त्यांनी वाढीव पाणी पुरवठा योजने संदर्भातील धोरणात्मक निर्णय घ्यावयास पाहिजे होता. परंतु पूर्वीच्या नगरपालिकेची मुदत संपण्यापूर्वीच ठराव पास करुन पाणी पुंरवठा योजनेसंबंधीचा निर्णय घेतला. अशा अनेक अनियमितता नंदुरबार नगरपालिकेमध्ये झालेल्या आहेत. प्रथम जमिनीवर आरक्षण टाकावयाचे, त्यानंतर त्या जमिनीवरचे आरक्षण उठवावयाचे. त्यानंतर त्या जागेवर प्लॉट पाडून ते विक्री करावयाचे. हा एक मोठा भ्रष्टाचाराच प्रकार आहे. माझ्याकडे जी कागदपत्रे उपलब्ध आहेत, ती आपणाकडे सादर करतो. नंदुरबार नगरपालिकेत मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे, त्याची चौकशी झाली पाहिजे. सदरहू गैरप्रकारांची शासन चौकशी करणार काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, नंदुरबार नगरपालिकेतील अधिकारी आणि नगरसेवक यांनी अनेक प्रकारची अनियमितता केलेली आहे अशी माहिती सन्माननीय सदस्यांनी सभागृहात दिलेली आहे. त्यामुळे नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना तसेच नगरसेवकांना सर्टिफिकेट देण्याचा प्रश्नच येत नाही. नगरपालिकेने ज्या काही तांत्रिक चुका केल्या आहेत, त्या चुका निवेदनात मान्य केल्या आहेत. त्या ठिकाणी भ्रष्टाचार झालेला नाही, तेथे अनियमितता झालेली आहे असे मी या ठिकाणी नमूद करतो. परंतु सन्माननीय सदस्यांचा एकंदरीत आग्रह पाहता सदर नगरपालिकेत झालेल्या अनियमिततेची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : नंदुरबार नगरपालिकेच्या नगराध्यक्षांनी वाटाघाटी करुन 9.55 टक्क्यांची जास्तीची निविदा मंजूर करुन नंतर सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतली हे खरे आहे काय ? नगराध्यक्ष वाटाघाटी करण्याचे अधिकार अत्यंत आणिबाणीच्या काळातच वापरतात. परंतु त्या ठिकाणी आणिबाणीची परिस्थिती नसताना नगराध्यक्षांनी कोटयावधी रुपयांची निविदा मंजूर केली ही गोष्ट खरी आहे काय, भूमिगत गटार योजने संदर्भात नगरसेवकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे चौकशी करण्याची तक्रार दाखल केली होती ही गोष्ट देखील खरी आहे काय, त्या चौकशी अर्जाच्या संदर्भात जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही केली आहे काय, नसल्यास, या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल काय ?

.....5



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.खंदारे 13:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य सभागृहात जी माहिती देतात, ती माहिती खरी आहे असे ग्राहय धरण्याची प्रथा आहे. सन्माननीय सदस्य जी माहिती देतात, ती खरी धरुन त्या अनुषंगाने चौकशी करण्याची प्रथा आहे. मी सुरुवातीलाच सांगितले की, सदर चौकशी वरिष्ठ पातळीवरुन करण्यात येईल. या प्रश्नाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत, त्या मुद्यांची देखील चौकशी करण्यात येईल आणि त्यानंतर वस्तुस्थिती सभागृहासमोर येईल.

श्री. हेमंत टकले : सन्माननीय राज्यमंत्री महोदय, वरिष्ठ पातळीवरुन चौकशी करण्यात येईल असे सांगत आहेत. चौकशी करणारा वरिष्ठ अधिकारी कोणत्या दर्जाचा असणार आहे याबद्दल माननीय राज्यमंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री. प्रकाश बिनसाळे : या प्रकरणात जिल्हाधिकारी देखील दोषी आहेत. त्यांच्या स्तरावरुन चौकशी होणे बरोबर होणार नाही असे मला वाटते.

श्रीमती विद्या चव्हाण : जिल्हाधिकारी यांचेकडे चौकशी सोपविली तर नि:पक्षपातीपणे चौकशी होणार नाही. त्यासाठी अति वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सदरहू चौकशी डी.एम.ए.यांच्या मार्फत केली जाईल. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय यांच्या मार्फत चौकशी केली जाईल.

श्री. सतीश चव्हाण : जिल्हाधिकारी सदर चौकशी करण्यास सक्षम आहेत काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या संदर्भात आपणाकडे जी कागदपत्रे दिली गेली आहेत, त्या कागदपत्रातील मुद्यांचा तसेच सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा या चौकशीमध्ये अंतर्भाव केला जाईल.

--------

.....6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.खंदारे 13:20

**पृ. शी.** : शासनाने कायदा करुनही त्यापासून खाजगी सुरक्षा रक्षक वंचित राहणे

**मु. शी.** : शासनाने कायदा करुनही त्यापासून खाजगी सुरक्षा रक्षक वंचित राहणे यासंबंधी सर्वश्री सर्वश्री एस क्यू ज़मा, जयप्रकाश छाजेड वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.एस.क्यू.जमा (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरी नियमन व कल्याण) अधिनियम 1981 अस्तित्वात येऊन तीस वर्षाचा कालावधी झाला तरी लक्षावधी खाजगी सुरक्षा रक्षक अद्यापही कायद्यातील तरतुदींच्या लाभापासून वंचित असणे, गेल्या चार वर्षापासून या संदर्भात विविध मार्गांनी शासनाचे लक्ष वेधले असता शासनाने वेळोवेळी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न करणे, परिणामकारक अंमलबजावणीसाठी कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याबाबत दिलेले आश्वासन न पाळता समिती नेमून वेळकाढूपणा करणे, परिणामी लाखो खाजगी सुरक्षा रक्षकांची ठेकेदारांकडून होणारी पिळवणूक, अंमलबजावणीच्या अनुषंगाने त्यांच्या संघटनांना वारंवार धन बलाचा प्रयोग करुन न्यायालयात दाखल कराव्या लागणाऱ्या याचिका, शासन व मंडळाकडून कलम 23 मधून खाजगी सुरक्षा एजन्सीना चुकीच्या मार्गाने कायद्यातून दिलेली सूट, यावर भारतीय सुरक्षा रक्षक युनियन व महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक व जनरल कामगार युनियन या संघटनांकडून शासनाकडे वारंवार तक्रार करुनही शासनाने दखल न घेणे यामुळे लक्षावधी खाजगी सुरक्षा रक्षकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.हसन मुश्रीफ (कामगार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

.....7



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, ट्रेड यूनियन से संबंधित हम सभी आमदार हर अधिवेशन में यह प्रश्न उपस्थित करते हैं और हर बार हमको यही जवाब मिलता है कि इसमें कुछ प्रगति होगी.

मेरा कहना है कि यह निजि सुरक्षा गार्ड से संबंधित कानून तीस साल पहले बना था. आज के उत्तर में माननीय मंत्री महोदय ने लिखा है कि 3428 मालिक रजिस्टर्ड हैं और रजिस्टर्ड सुरक्षा रक्षकों की कुल संख्या 33046 है. यदि आप इसका एवरेज निकालेंगे तो एक कंपनी के पास सिर्फ 9 या 10 रक्षकों का ही एवरेज आता है. महाराष्ट्र के बाकी शहरों को छोड़ दें और सिर्फ थाना, मुंबई, नाशिक, पूना, औरंगाबाद इत्यादि बड़े शहरों को ही हम देखें तो वहां पर कम से कम 5-6 लाख निजी सुरक्षा गार्ड काम कर रहे हैं.

मेरा कहना है कि बहुत ही कम कंपनियों और सुरक्षा रक्षकों का रजिस्ट्रेशन किया गया है. इसलिए मुझे पूछना है कि इतने कम रजिस्ट्रेशन हो पाने के कारणों की जांच करने के लिए क्या आप कोई जांच मशीनरी बनाएंगे, ताकि इस बात का पता लग सके कि इतने कम निजी सुराक्षा गार्ड और इतनी कम कंपनियों का रजिस्ट्रेशन क्यों हुआ है ? यह कानून सुरक्षा रक्षकों की सामाजिक सुरक्षा के लिए बनाया गया था, यह कानून कंपनियों के मालिकों की सुरक्षा के लिए नहीं बनाया गया था. इसलिए मेरा कहना है कि पिछले तीस सालों में इतने कम मालिकों ने ही क्यों रजिस्ट्रेशन कराया है,इस बात की जांच होनी चाहिए.मैं यह भी बताना चाहूंगा कि इन निजि सुरक्षा कंपनियों ने सिक्युरिटी एसोसिएशन ऑफ इंडिया के मार्फत हाई कोर्ट में केस दर्ज किया है.

सभापति महोदय, शासन ने सन् 1981 के एक्ट में सन् 2005 में जो रुल बनाया है, उसके विरोध में वे लोग हाई कोर्ट में गए हैं. सन् 2009 से हाई कोर्ट ने उसको स्टे दिया हुआ है. मुझे पूछना है कि क्या सरकार वहां कोई अच्छा वकील देकर उस स्टे को वॅकेट कराने के लिए तथा उस केस को एक्सपीडाइट कराने का प्रयत्न करेगी ? मेरी एक मांग यह है कि इस एक्ट के सेक्शन 23 के अंतर्गत छूट दी जाती है. सेक्शन 23 में छूट देने का प्रोवीजन इसलिए है क्योंकि यदि कोई मालिक अच्छी फॅसिलिटी तथा तनख्वाह सुरक्षा रक्षकों को देता है तो उसको कुछ छूट दी जाएगी. वे लोग 10 या 20 लोगों के लिए अनुमति लेते हैं जबकि उनके यहां पर हजारों सुरक्षा रक्षक काम करते हैं. हमारा कहना है कि क्या इस एक्ट में से सेक्शन 23 हटाने की कार्यवाही अगले अधिवेशन में हमारा शासन करेगा ?

यानंतर श्री. भोगले.....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3.........

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, 1 ऑक्टोबर, 1981 रोजी हा कायदा तयार करण्यात आला आणि मागील 30 वर्षात 3428 मालक आणि 33046 सुरक्षा रक्षकांची नोंदणी झाली. राज्यात 3 ते 4 लाख सुरक्षा रक्षकांची संख्या असताना नोंदणी कमी का झाली याची कारणे माननीय सदस्यांनी सांगितली आहेत. सिक्युरिटी एजन्सी असोसिएशन ऑफ इंडियाने सर्वोच्च न्यायालयात केंद्र सरकारचा खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सी कायदा अस्तित्वात आल्यामुळे राज्याचा कायदा लागू होत नाही आणि त्यातून आम्हाला सूट घेण्याची आवश्यकता नाही अशी स्पेशल लीव्ह पिटिशन दाखल केली. शासनाने अशा सिक्युरिटी एजन्सीवर ॲक्शन घेऊ नये अशा प्रकारचे आदेश न्यायालयाकडून आल्यामुळे सुरक्षा रक्षक मंडळाला तपासणी करण्यामध्ये आणि नोंदणी करण्यामध्ये अडचण निर्माण झाली. सर्वोच्च न्यायालयातील याचिका प्रलंबित आहे. त्या याचिकेनुसार देण्यात आलेली स्थगिती ताबडतोब उठवावी किंवा निकाल देण्यात यावा यासाठी दिनांक 18.7.2010 व 12.10.2011 रोजी दोन ॲफिडेव्हीट दाखल केली आहेत. या याचिकेवर दिनांक 3.1.2012 रोजी सुनावणी होणार आहे. त्या दिवशी चांगले वकील नेमून ही स्थगिती उठविण्याचा प्रयत्न केला जाईल. कायद्यातील सेक्शन 23 बदलण्यात यावे अशा प्रकारची मागणी केली आहे. त्या बाबत जरुर तपासून विचार केला जाईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सुरक्षा रक्षक कायदा तत्कालीन मुख्यमंत्री बॅ.अ.र.अंतुले यांच्या काळात एका विशिष्ट हेतूने 1981 मध्ये मंजूर करण्यात आला. दुर्दैवाने या कायद्याचा गैरवापर अधिक प्रमाणात करण्यात आला. मंत्री महोदय सांगतात ते उदाहरण अलीकडच्या काळातील आहे. खाजगी सुरक्षा रक्षक संघाने कोर्टात आता याचिका दाखल केली. यापूर्वी सुध्दा सेक्शन 23 अंतर्गत ज्या सुरक्षा रक्षक एजन्सींना सूट दिली ते जाणून घेणे गरजेचे आहे. ज्या उद्देशाने या कायद्याची निर्मिती झाली आणि सुरक्षा रक्षक मंडळ तयार झाले, त्या मंडळाची सुरक्षा रक्षक संख्या 36 हजार असून खाजगी एजन्सीच्या सुरक्षा रक्षकांची संख्या 5 लाख आहे. ही जादू कशी झाली? हा संघ कोर्टात जाण्यापूर्वी सूट कशी दिली गेली? मी या मंडळावर होतो आणि आहे. गेल्या 30 वर्षात सुरुवातीला फक्त 22 आणि नंतर 72 एजन्सीना या कायद्यातून सूट देण्यात आली होती. त्या नंतर ज्या सुरक्षा रक्षक एजन्सीना सूट देण्यात आली त्याची चौकशी केली जाईल काय? ज्या अधिकाऱ्यांनी ही सूट दिली त्यांची सी.आय.डी.मार्फत चौकशी करुन

..2..

श्री.भाई जगताप..........

त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय? हा सुरक्षेशी निगडित प्रश्न असल्यामुळे अनेकदा या सभागृहात या प्रश्नावर चर्चा झाली आणि शासनाकडून उत्तरही देण्यात आले आहे. परंतु आवश्यक ती कारवाई झालेली नाही.

मध्यंतरी मुंब्रा येथे सुरक्षा रक्षक एजन्सीच्या माध्यमातून पोलिसांनी आतंकवादी पकडले होते. त्यावेळी मी या सभागृहात प्रश्न मांडला होता. त्या संदर्भात कारवाई झालेली नाही. या खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीबाबत सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली असली तरी राज्याची सुरक्षा लक्षात घेऊन या प्रकरणाची चौकशी करणार आहात काय, 5 लाख खाजगी सुरक्षा रक्षकांसाठी त्यांनी सूट घेतली होती काय, एजन्सीला सेक्शन 23 प्रमाणे सूट देता येत नाही अशी सुस्पष्ट तरतूद कायद्यात असताना ज्यांनी खाजगी एजन्सीना सूट दिली त्याची चौकशी केली जाईल काय?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले की, सुप्रीम कोर्टाने निर्णय दिल्यामुळे फार मोठी अडचण निर्माण झाली. 22 एजन्सींनी सूट घेतली, त्यांना असोसिएशनने मेंबर केले आणि पत्र देऊन सांगितले की, यांची चौकशी करता येणार नाही. म्हणून मी आयुक्त आणि सचिवांना सांगितले की, ॲडव्होकेट जनरल यांच्याकडे या प्रकरणी काय भूमिका घेता येईल याची विचारणा करावी. तपासणी करण्यामध्ये अडचण आहे काय, ती तपासणी करता येईल का हे तपासून घेण्याची सूचना देण्यात आली आहे. ज्या सुरक्षा रक्षक एजन्सीना सूट दिली त्याची निश्चितपणे उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रकरणी खूप मोठा भ्रष्टाचार झालेला आहे.

श्री.हसन मुश्रीफ : या प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीच्या माध्यमातून आतंकवादी पकडण्यात आले आहेत. त्यामुळे हा विषय लाईटली घेऊ नये.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सूट देताना घातलेल्या अटींचे पालन न केल्याने 2003 ते 2008 मध्ये 41 खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीना काळ्या यादीत टाकण्यात आले. त्या एजन्सींविरुध्द काय कारवाई केली? 2006 मध्ये श्री.जे.पी.डांगे कामगार विभागाचे प्रधान सचिव

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.........

असताना त्यांनी सांगितले होते की, काळ्या यादीत टाकलेल्या एजन्सींविरुध्द फौजदारी कारवाई केली जाईल. ज्या 41 एजन्सींना काळ्या यादीत टाकण्यात आले त्यापैकी किती एजन्सींविरुध्द फौजदारी कारवाई करण्यात आली आहे?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, 2003 ते 2008 या काळातील चौकशी सी.आय.डी.मार्फत केली जाईल आणि जी कारवाई करावयाची ती केली जाईल.

श्री.भाई जगताप : सरकारने ज्या एजन्सीना काळ्या यादीत टाकले त्यांनी अनियमितता केली होती किंवा त्यांची काही चूक होती म्हणून त्यांना काळ्या यादीत टाकण्यात आले. त्यांच्यावर कारवाई करण्यामध्ये सरकारला कोणती अडचण येत आहे?

श्री.हसन मुश्रीफ : लक्षवेधी सूचनेमध्ये हा विषय नव्हता. परंतु तपासून घेऊ.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, गेली दोन वर्षे प्रत्येक अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित होत असतो. मंत्री महोदयांनी जाहीर केल्याप्रमाणे सी.आय.डी.मार्फत चौकशी होईल. तोपर्यंत सुरक्षिततेचा मुद्दा उपस्थित होतो. आम्ही मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, संभाजीनगर आदी महानगरामध्ये राहतो. या मुद्याचा विचार करण्यासाठी विधिमंडळ सदस्य, शासन, मालक, कामगारांचे प्रतिनिधी यांचे मंडळ आहे. परंतु ज्या महानगरामध्ये आम्ही राहतो तेथे सुरक्षा रक्षक एजन्सी काम करीत आहेत. आमच्याकडे दररोज तक्रारी येत असतात. या एजन्सीकडून सुरक्षा रक्षकांची पिळवणूक होते, त्यांना मारहाण केली जाते. ज्याप्रमाणे विधानसभा आणि विधानपरिषदेच्या सदस्यांची समिती असते त्या समितीमार्फत कामगार कल्याण विभागाच्या प्रश्नांचे निराकरण केले जाते अशी समिती या संदर्भातील तक्रारींचे निराकरण करण्यासाठी निर्माण करावी. अशी समिती निर्माण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातलेली नाही. आमच्याकडे आलेल्या तक्रारींचे निराकरण कामगार विभागामार्फत करता येईल. अशी समिती खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीबाबत निर्माण केली जाईल काय, या संदर्भात सकारात्मक भूमिका घेणार आहात काय?

श्री.हसन मुश्रीफ : कामगार आयुक्त हे सगळे कामकाज पाहतात. त्यासाठी समिती करण्याची आवश्यकता नाही. शासनाने या संदर्भात अप्पर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीमध्ये माननीय सदस्य श्री.भाई जगताप, मालकांचे प्रतिनिधी म्हणून श्री.उल्हास देशपांडे व कामगार प्रतिनिधी श्री.हितेंद्र जोशी यांचा समावेश आहे. टॉप

..4..



श्री.हसन मुश्रीफ.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिक्युरिटी आणि मिडिया ट्रस्ट यांचे प्रतिनिधी त्यामध्ये आहेत. ज्यांना प्रतिनिधीत्व मिळाले नाही अशा संघटनांनी न्यायालयात धाव घेतली आणि समितीचे कामकाज अपूर्ण राहिले. या प्रश्नाचा विचार करुन पुन्हा एकदा या समितीला या सुरक्षा रक्षकांच्या संदर्भात काय चांगले करता येईल ते करण्यासाठी सुचविण्यात येईल.

-------

नंतर श्री.खर्चे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

**पृ. शी.** : सिम्प्लेक्स मिल (अकोला) येथील कामगारांनी केलेला संप

**मु. शी.** : सिम्प्लेक्स मिल (अकोला) येथील कामगारांनी केलेला संप यासंबंधी सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, परशुराम उपरकर, किसनचंद तनवाणी वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अकोला एम.आय.डी.सी. क्षेत्रातील सिम्प्लेक्स मिल या उद्योगाला 14 ऑक्टोबर, 2011 रोजी करण्यात आलेली टाळेबंदी, ऐन दिवाळीच्या कालावधीत कामगारांना कोणतीही पूर्व सूचना न देता करण्यात आलेली कामगार विरोधी कारवाई, या कारवाईमुळे या परिसरात कामकरणाऱ्या शेकडो कामगारांवर आलेला उपासमारीचा प्रसंग, परिणामी त्यांच्यात निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाची भूमिका, करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

श्री. हसन मुश्रीफ (कामगार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : महोदय, ही लक्षवेधी सूचना टाकल्यानंतर आयुक्तांनी दि. 13.12.2011 रोजी नोटिसेस बजावलेल्या आहेत असाच त्याचा अर्थ होतो. यासंबंधी अद्यापही कारवाई झालेली नाही. माझा या निमित्ताने असा प्रश्न आहे की, या मिलमधील कामगारांच्या नोकऱ्या कायमस्वरुपी टिकून राहतील या बाबीकडे कामगार विभाग लक्ष देणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, सिम्प्लेक्स मिलमध्ये असणाऱ्या कामगारांनी बोनसच्या प्रश्नावर ऐन दिवाळीच्या सुमारास संप केला होता व उत्पादन सुध्दा कमी करीत होते. त्यामुळे कंपनी आणि कामगारांमध्ये वाद झाले. त्याबाबत आमच्या कामगार विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी कामगार आणि कंपनीबरोबर चार पाच बैठका घेऊन हा वाद सोडविला. ही कंपनी आता चांगल्या प्रकारे सुरु असून संप काळातील दोन दिवसांच्या वेतनाचाच मुद्दा शिल्लक आहे. त्यासंबंधी कामगार आयुक्त कार्यालयानी या लोकांना दोन दिवसांचे वेतन मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले असून तशी नोटीस सुध्दा कंपनीला बजावलेली आहे. त्यामुळे उरलेले दोन दिवसांचे वेतन मिळवून देण्यात सुध्दा यशस्वी होऊ अशी अपेक्षा आहे.

------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पंचवटी (नाशिक) येथील सप्तश्रृंगी सोसायटीत झालेला स्फोट

**मु.शी.**: पंचवटी (नाशिक) येथील सप्तश्रृंगी सोसायटीत झालेला स्फोट यासंबंधी सर्वश्री जयवंतराव जाधव, हेमंत टकले, अनिल भोसले वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. जयवंत जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नाशिकमधील सप्तश्रृंगी सोसायटीमध्ये दि. 8 जून, 2011 रोजी झालेल्या शक्तिशाली स्फोटामुळे ही इमारत पडण्याचा धोका निर्माण होणे, सदर दुर्घटनाग्रस्त इमारतीमधील रहिवाशांचे विकासकामार्फत पुनर्वसन करण्यासाठी हया इमारतीस एक ऐवजी दोन चटई क्षेत्र मंजूर करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेने महासभेत ठराव करुन शासनास प्रस्ताव सादर करणे, तथापि शासनाने हा प्रस्ताव नामंजूर केल्याने तेथील रहिवाशांमध्ये संतापाची लाट तयार होणे, दुर्घटनाग्रस्तांच्या शिष्टमंडळाने स्थानिक लोकप्रतिनिधींसोबत मा.मुख्यमंत्र्यांची भेट घेतली असता शासनाकडून फेरनिर्णय घेण्याबाबत देण्यात आलेले आश्वासन, शासनाने या दुर्घटनाग्रस्त रहिवाशांना वाऱ्यावर सोडल्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेली प्रचंड निराशेची भावना, हया रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी खास बाब म्हणून शासनाने वाढीव चटई क्षेत्राचा पुनर्विचार करुन तातडीने फेरनिर्णय घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, हा विषय नगरविकास विभागाशी संबंधित असला तरी या लक्षवेधी सूचनेचे निवेदन प्राप्त झालेले नाही. तरी देखील ठराविक मर्यादेपर्यंत मी या लक्षवेधी सूचनेच्या उप प्रश्नांना उत्तरे देऊ शकेन. त्यातून सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले तर हा विषय येथेच संपवावा अशी विनंती करतो.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंत जाधव : महोदय, नाशिकमधील पंचवटी परिसरात एक दिवस अचानक मोठा स्फोट झाला आणि त्यात 10 ते 12 अत्यंत सामान्य नागरिकांचा मृत्यू झाला. हा स्फोट कसा व का झाला याविषयी अनेक वेगवेगळ्या चर्चा या परिसरात होत होत्या. त्याच दरम्यान माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय पालकमंत्री, माननीय गृह मंत्री यांनी भेट दिली आणि त्या इमारतीतील लोकांचे पुनर्वसन करण्यात येईल असे तेथील नागरिकांना आणि रहिवाशांना आश्वासित केले. या इमारतीत राहणाऱ्या लोकांनी बँकेचे कर्ज काढलेले होते व आता या इमारतीची पुनर्बांधणी करण्याची वेळ आलेली आहे ही बाब लक्षात घेऊन महापालिकेने ठराव घेऊन या इमारतीची पुनर्बांधणी कशी करता येईल यातून मार्ग काढावा म्हणून हे प्रकरण या ठरावासहित शासनाकडे पाठविलेले आहे. तसेच यामध्ये पुनर्वसन करताना शासनावर कोणताही भार पडणार नाही असा हा प्रस्ताव आहे. माझी शासनाला विनंती आहे की, या इमारतीतील रहिवासी अत्यंत गरीब असल्याने त्यांच्या इमारतीचे बांधकाम ते स्वत: करु शकत नाहीत. अशा परिस्थितीत त्यांना एफएसआय वाढवून मिळावा असा महापालिकेचा ठराव होता. पण त्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की यासंबंधी पुनर्विचार करावा लागेल. मी या निमित्ताने एकच प्रश्न विचारु इच्छितो की, एमआरटीपी ॲक्टमध्ये नमूद करण्यात आले आहे की, "Government can issue a special relaxation for granting additional FSI under directives of section 154 of MRTP Act." या अनुषंगाने त्या ठिकाणच्या नागरिकांना वाढीव एफएसआय देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचा विचार शासन करणार काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, सन्माननीय सदस्यांनी पंचवटी परिसरात घडलेली घटना सभागृहासमोर आणून ठेवली आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे अत्यंत सामान्य कुटुंबे त्या इमारतीत राहत होती. त्या लोकांची कोणत्याही प्रकारची चूक नसताना एक कोणीतरी फटाक्याचा व्यवसाय करणारी व्यक्ती तेथे आली आणि ही घटना घडली त्यामुळे हा मोठा स्फोट झाला. त्यात बऱ्याच लोकांना आपले प्राण गमवावे लागले. ही इमारत पूर्णपणे निकामी झाली ही वस्तुस्थिती अगदी खरी आहे. तसेच ही गोष्ट सुध्दा खरी आहे की, येथील रहिवाशांनी बँकेकडून कर्ज काढून ही इमारत बांधलेली होती. पुन्हा आता ही इमारत उभी करण्यासाठी कर्ज काढण्याची क्षमता या लोकांमध्ये नाही. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत जो एफएसआय आपण देतो त्यापेक्षा जास्त

......5



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ........

एफएसआय वाढवून दिला तर निश्चितपणे तो वाढीव एफएसआय विकासकाला देऊन विकासकाच्या माध्यमातून इमारत बांधण्याचा त्यांचा विचार आहे. कारण कोणताही विकासक मोफत इमारत बांधून देणार नाही म्हणून वाढीव एफएसआयची मागणी त्यांनी केली आहे. तसेच त्यांनी आपल्या निवेदनात असे म्हटले आहे की, नाशिक महापालिकेने तसा ठराव पास केला पण शासनाने तो प्रस्ताव का नाकारला हे मला सांगता येणे कठीण आहे. पण एक गोष्ट खरी आहे की, एमआरटीपी कायद्यातील कलम 154 अतर्गत शासनाला अशा प्रकारच्या दुर्घटना अथवा पब्लिक पर्पजकरिता काही बाबतीत निदेश देण्याचे अधिकार आहेत. हा इमर्जन्सी क्लॉज आहे. यासंदर्भात मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, अचानकपणे घडलेली घटना लक्षात घेऊन एक खास बाब म्हणून या प्रसंगाच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल.

श्री. प्रकाश बिनसाळे : महोदय, मी शासनाला फक्त एवढीच विनंती करणार आहे की, मुंबईत ज्याप्रमाणे शासन 50 टक्के एफएसआय वाढवून देते आणि पुनर्वसन करते, तशाच प्रकारचा हा सुध्दा प्रश्न आहे. कारण या लोकांची क्षमता नाही तसेच जुनी इमारत असल्याने तिची पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे. शासनाचे तसे धोरणही असल्यामुळे यामध्ये कोणतीच अडचण नसावी. म्हणून मंत्री महोदयांनी हे करण्यात येईल असे उत्तर द्यावे अशी विनंती करतो.

श्री. भास्कर जाधव : महोदय, मुंबईत जरी शासनाचे धोरण असले तरी ते प्रत्येक शहरासाठी लागू होत नाही. कारण प्रत्येक शहराचे डी.सी. रुल्स वेगवेगळे असतात. म्हणूनच मी एक खास बाब म्हणून सहानुभूतीने विचार करण्यात येईल असे सांगितले. हे बाहेर बोलले तर त्याबाबत शंका घेता आली असती पण या सभागृहात, या फ्लोअरवर बोलल्यानंतर ते एक प्रकारे शासनाचे आश्वासन होते आणि त्यापासून शासन दूर जाणार नाही. तसेच ते पाळण्याचे बंधन सुध्दा सरकारवर असते तसेच ही अत्यंत अपवादात्मक केस म्हणून याचा विचार केला जाईल.

--------



अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ KTG/ पूर्वी श्री. भोगले...... 13:40

**पृ. शी.** : भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील राईस मिलर्सना धान भरडाईचे दर वाढवून मिळणे

**मु. शी.** : भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील राईस मिलर्सना धान भरडाईचे दर वाढवून मिळणे यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. रणजित पाटील, श्री. जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील राईसमिलर्सला धानभरडाईचे अपेक्षित दर मिळाले नसल्यामुळे मागील वर्षी शेतकऱ्यांकडून घेतलेले धान शासकीय गोदामात तर काही जागेअभावी रस्त्यावर अस्ताव्यस्त पडून राहणे, राईसमिलर्सला या धानभरडाईची किंमत प्रतिक्विंटल 10 रुपये दराने म्हणजे अत्यल्प दराने देण्यात येत असणे, राईसमिलर्सकडून शासनाकडे वारंवार धानभरडाईचे दर वाढविण्याची मागणी करण्यात येणे, त्यामुळे शासनाने यावर्षी धानभरडाईच्या दरात 10 रुपयाने वाढ करुन 20 रुपये करणे, या उलट परप्रांतात हे दर 45 रुपये प्रतिक्विंटल असणे, त्यामुळे महाराष्ट्रात धानभरडाईच्या अत्यंत अल्प दरामुळे राईसमिलर्सने धानभरडाईची प्रक्रिया थांबविणे, राज्यात विजेचे व मजुरीचे दर वाढल्यामुळे राईसमिलर्सला अत्यल्प दराने धानभरडाई करणे परवडत नसणे, परिणामी धानाची साठवण करण्याची समस्या पुन्हा निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता शासनाने धानभरडाईची रक्कम 20 रुपयांवरुन 45 रुपये करण्याची राईसमिलर्सकडून होत असलेली मागणी लक्षात घेता शासनाने तत्काळ धानभरडाईचे दर वाढविण्याची कारवाई करण्याची आवश्यकता, शासनाची प्रतिक्रिया.

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन
( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, राज्यातील राईस मिल्सच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना असून भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांचा विचार केला तर जवळपास 12.25 लाख क्विंटल व आदिवासी विकास महामंडळाचा 8 लाख क्विंटल अशा एकूण 20.25 क्विंटल धानाचा प्रश्न आहे. या दोन जिल्ह्यातील राईस मिल धानाची भरडाई करीत नाहीत, कारण त्यांना दर वाढवून मिळत नाही. शासनाने आता 10 रुपये एवढा दर वाढवून दिलेला आहे. पण छत्तीसगड आणि मध्य प्रदेश या दोन राज्यांमध्ये धानाच्या भरडाईचा दर 45 रुपये एवढा आहे. आपल्या राज्यात मात्र हा दर अत्यंत कमी आहे. तसेच राईस मिलकडून धानाची भरडाई न केल्यामुळे वर सांगितल्यानुसार वेगवेगळ्या ठिकाणी हे धान पडून आहे, परिणामी शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. या निमित्ताने मी शासनाला विचारु इच्छितो की, शेजारच्या दोन राज्यांमध्ये जरी 45 रुपये धान भरडाईचा दर असला तरी किमान 40 रुपये दर तरी आपल्या राज्यातील राईस मिल ओनरला शासनाने दिला पाहिजे, जेणेकरुन शेतकऱ्यांची नुकसान भरपाई त्यातून होऊ शकेल. या अनुषंगाने शासन विचार करणार आहे काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

त्यामुळे इतर राज्यात धान भरडाईचे जे दर आहेत त्या दरा प्रमाणे आपल्या राज्यातील राईस मिलला धान भरडाईचे दर देण्याच्या संदर्भात शासनाची काय भूमिका राहणार आहे ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, धान भरडाईचे रेट वाढवून मिळावे अशी राज्य शासनाची भूमिका असून त्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केलेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, इतर राज्यात धान भरडाईचे दर 40 ते 45 रुपये प्रति क्विंटल आहे त्यामुळे इतर राज्यातील धान भरडाईचे जे दर आहेत ते दर महाराष्ट्रातील मिलला दिले जाण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे केवळ 10 रुपये क्विंटल धान भरडाईचे दर आहेत. त्यामुळे या दरात वाढ करावी अशी विनंती आहे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, धान भरडाईचे रेट केंद्रशासन ठरवित असते. आपल्याकडील धान भरडाईचा रेट केंद्रशासनाने 10 रुपये ठेवला असून त्यामध्ये वाढ करावी यासाठी राज्य शासन केंद्र शासनाकडे पाठपुरावा करीत आहे. 10 रुपये भरडाईच्या दरामध्ये राज्य शासनाने स्वत:चे 10 रुपय टाकले आहेत. त्यामुळे आता आपल्याकडे धान भरडाईचा दर 20 रुपये झालेला आहे. आपल्याकडील गोंदिया सोडून इतर सर्व ठिकाणी धानाची भरडाई झालेली आहे. भंडारा येथे 90 टक्के धान भरडाई झालेली असून चंद्रपूर येथे 100 टक्के धान भरडाई झालेली आहे. गोंदिया येथे 25 टक्के धान भरडाई झालेली आहे. आपल्याकडे फक्त गोंदियातच धान भरडाईचा प्रश्न निर्माण झालेला असून इतर मिलने भरडाई करुन देण्याची भूमिका स्वीकारली आहे. गोंदिया सोडून इतर जिल्हयात धान भरडाई झालेली आहे एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, गोंदिया सोडून इतर जिल्हयात 100 टक्के धान भरडाई झालेली आहे अशी माहिती माननीय मंत्री महोदयांनी दिलेली आहे. विदर्भातील अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, आपल्याकडे सन 2011-12 मध्ये शून्य टक्के धान भरडाई झालेली आहे, सन 2009-2010 मध्ये 42 टक्के धान भरडाई झाली होती अशी परिस्थिती आहे. इतर राज्यात धान भरडाईचे दर 40-45 रुपये असतांना आपल्याकडे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

धान भरडाईसाठी केवळ 10 रुपये प्रति क्विंटल दर दिलेला आहे. इतर राज्याच्या तुलनेमध्ये आपल्याकडे मजूरीचा दर वाढलेला आहे, विजेचा दर वाढलेला आहे, ट्रान्स्पोर्टचा खर्च वाढलेला आहे, टॅक्स वाढलेले आहेत, डिझेलचे दर वाढलेले आहेत. त्यामुळे या सर्वांचा विचार केला तर शासनाने धान भरडाईचे दर इतर राज्याच्या तुलने एवढे करण्याची आवश्यकता आहे. भरडाईचा दर वाढवून न दिल्यामुळे राज्यात 3 वर्षापासून धानाची भरडाई झालेली नाही. त्यामुळे 3 वर्षानंतर धानाचा उतारा किती येईल याचा आपण विचार केला आहे काय ? आपण केवळ केंद्र सरकारकडे भरडाईचे दर वाढवून मिळावे अशी विनंती करीत आहात परंतु केंद्र सरकार आपल्या विनंतीकडे डोळे उघडून सुध्दा बघत नाही. मार्केटींग फेडरेशन जे धान खरेदी करते त्यामध्ये क्विंटल मागे 5 रुपयाची कटौती करुन शेतक-यांची लूट करीत आहे. बाकीच्या राज्यात जर 40-45 रुपये प्रति क्विंटल धानाच्या भरडाईला दिले जातात तर ते दर आपल्या महाराष्ट्राला का दिले जात नाहीत ? इतर राज्याच्या तुलनेने महाराष्ट्रात धान भरडाईचे दर किमान 40 रुपये प्रति क्विंटल द्यावे अशी विनंती आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड येथील धान भरडाईचा दर 45 रुपये असतांना आपण आपल्या राज्यात किमान धान भरडाईचा दर 10 रुपयांवरुन 40 रुपये करुन दिला जाणार आहे काय ? आपण धान भरडाईचा दर वाढवून द्यावा म्हणून केंद्र शासनाकडे 3-3 वर्षे विनंती करीत आहात व केंद्र सरकार आपल्या विनंतीचा विचार करीत नसेल तर ते योग्य राहणार नाही त्यामुळे आपल्या येथे धान भरडाईचा दर 40 रुपये करुन देण्यामध्ये माननीय मंत्री महोदय, स्वत: पुढाकार घेणार आहे काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, आपल्याकडे धान भरडाईचा दर अगोदर 10 रुपये होता परंतु त्यामध्ये राज्य शासनाने स्वतं:च्या पदरचे 10 रुपये घातले असून आता आपल्याकडे धान भरडाईचा दर 20 रुपये झालेला आहे. गोंदिया सोडून इतर जिल्हयात धान भरडाईचा प्रश्न निर्माण झालेला नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, गोंदिया सोडून इतर जिल्हयात धान भरडाईचा प्रश्न निर्माण झालेला नाही, तर आपल्याकडील 60 लक्ष क्विंटल धानाची भरडाई का झाली नाही ? आपल्या राज्यातील धानाची भरडाई 100 टक्के होण्यासाठी आपल्या राज्यातील मिलला 40 रुपये प्रति क्विंटल धान भरडाईचा दर दिला जाईल काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, धान भरडाईच्या संदर्भात केंद्रशासनाचे टेरीफ कमिशन असून त्यामध्ये सहा सदस्य आहेत व तेच यासंदर्भात निर्णय घेतात. गोंदिया जिल्हयामध्ये धान भरडाई कमी प्रमाणात झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे त्यामुळे त्या ठिकाणची धान भरडाई करण्यास भंडारा मिल सहकार्य करण्यास तयार असल्यामुळे आता धान भरडाईचा प्रश्न राहणार नाही. इतर राज्याच्या तुलनेत आपल्या राज्यात धानाचे उत्पन्न कमी होते हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, आपल्याकडील धानाची 100 टक्के भरडाई झालेली आहे. निवेदनामध्ये म्हटले आहे की, सन 2009-10 मध्ये 55 टक्के, सन 2010-2011 मध्ये 33 टक्के व सन 2011-2012 मध्ये एकंदर 11 टक्के धानाचीच भरडाई झालेली आहे. खरे म्हणजे भरडाईचा दर इतर राज्याच्या तुलनेने कमी असल्यामुळे धान भरडाई 100 टक्के झालेली नाही. मध्यप्रदेश व छत्तीसगड येथे धान भरडाईचा दर 40-45 रुपये प्रति क्विंटल असतांना आपल्याकडे धान भरडाईचा दर 10 रुपये असल्यामुळे आपल्याकडे पूर्ण क्षमतेने धान भरडाई झालेली नाही. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, आता आपण 10 रुपये प्रति क्विंटल धान भरडाईचा दर वाढवून दिल्यामुळे आपल्याकडे आता 20 रुपये प्रति किक्वंटल धान भरडाईचा दर झालेला आहे परंतु आपल्याकडील वाढती महागाई विचारात घेऊन त्यामध्ये अजून 10 रुपये वाढ करुन धान भरडाईचा एकंदर दर 30 रुपये प्रती क्विंटल दिला जाणार आहे काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, धानाच्या भरडाईच्या संदर्भात माझ्याकडे डिटेल आकडेवारी आहे. शासनाने धान भरडाईसाठी प्रती प्रति किवंटल 10 रुपये दिले असून आता धानाच्या भरडाईचा दर 20 रुपये प्रती क्विंटल करण्यात आला असून सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी 30 रुपये प्रती क्विंटल धान भरडाईचा दर मिळावा अशी जी मागणी केलेली आहे त्या मागणीचा जरुर विचार केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, विदर्भातील कोणत्याही प्रश्नांना न्याय द्यायचा नाही असे सरकारने ठरविले आहे काय ? राईसमिलर्सना धान भरडाईची रक्कम वाढविण्यासाठी शासन केंद्र सरकारकडे मागणी करीत आहे याचा अर्थ राईसमिलर्सना धान भरडाईची रक्कम वाढाविली पाहिजे असे शासनाला वाटते. राज्य शासन केंद्र शासनाकडे तीन-तीन वर्षे मागणी करीत असेल आणि केंद्र सरकार आपली मागणी मान्य करीत नसेल तर राईसमिलर्सना न्याय देण्याची भूमिका सरकारची आहे. तेव्हा शासन धानभरडाईची रक्कम 30 रुपये करणार काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, विदर्भच नव्हे तर महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी हे शासन नेहमीच तत्पर आहे म्हणून राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी 2 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केलेले आहे...

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. राज्यात जवळपास पाच हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. अजूनही शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शासन शेतकऱ्यांना न्याय देणार आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय,शेतकऱ्यांना न्याय देण्याची सरकारची भूमिका आहे.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनां संबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

सहसचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक 7 (ब) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 188 या लक्षवेधी सूचनांसंबधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी): निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 188 ही निवेदने कृपया छापावीत.)

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:औचित्याचे मुद्दे

(पुढे सुरु...)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. मघाशी त्यांचा औचित्याचे मुद्दा मांडावयाचा राहून गेला होता. मी त्यांना औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी देत आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपली आभारी आहे. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. पुणे जिल्ह्यातील वडगाव मावळ कामशेत जवळ विद्यावती चॅरिटेबल ट्रस्ट मधील अनाथ आश्रमातील 14 वर्षीय अल्पवयीन मुलगी गरोदर असल्याचे वृत्तपत्रात प्रसिध्द झाले आहे. श्री.राजेश गुप्ता नावाचे गृहस्थ हा ट्रस्ट चालवित आहे. खरे म्हणजे नियमाने मुला मुलींना एकत्र ठेवले जात नाहीत. असे असतानाही त्या ठिकाणी मुला-मुलींना एकत्र ठेवले जात आहे. त्या शिवाय तेथून अनेक मुले मुली गायब होत असल्याच्या तक्रारी पोलीस स्टेशनमध्ये झालेल्या आहेत. तेव्हा या सर्व प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करुन श्री.राजेश गुप्ता यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मी मागणी करीत आहे.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांचा दुसरा औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आज सकाळी महालेखाकारांचा राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा 2008 चा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेकरिता 400 कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी पायाभूत सुविधांवर खर्च केलेला आहे. परंतु हा निधी चुकीच्या पध्दतीने खर्च करण्यात आलेला आहे. कॅटरींगच्या कामाचा अनुभव असलेल्या कंत्राटदाराला मंडपाचे कंत्राट दिलेले आहे तर वैद्यकीय सुविधा पुरविण्याबाबत ज्यांना अनुभव होता त्यांना अन्य कंत्राट दिलेले आहे. तेव्हा अशाप्रकारे शासनाचा निधी गैरपध्दतीने खर्च करण्यात आलेला आहे. या प्रकरणी केंद्र शासनाची चौकशी पुरेशी नाही तर या प्रकरणी राज्य सरकारने गुन्हेगारी स्वरुपाची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई केली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

---------

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशनबाबत**

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मी या अधिवेशनामध्ये आदिवासी विभागातील भ्रष्टाचारा संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी या अधिवेशनापूर्वी संबधितांची चौकशी करुन कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे अजूनपर्यंत आम्हाला कोणत्याही प्रकारची माहिती मिळालेली नाही. हा प्रश्न मी मागील तीन अधिवेशनांपासून उपस्थित करीत आहे. परंतु अजून पर्यंत मला त्याचे उत्तर मिळालेले नाही. तेव्हा हा प्रश्न कोणत्या मार्गाने उपस्थित करावा याचे मला आपणा कडून मार्गदर्शन झाल्यास बरे होईल.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा मी तपासून घेतो. सरकारने देखील याची नोंद घ्यावी.

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, होय.

-----

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी** : महाविद्यालयीन तरुणींना मॉडेलिंग आणि सिनेमात काम करण्याचे आमिष दाखवून त्यांचे लैंगिक शोषण करण्यात येत असणे

**मु.शी** : महाविद्यालयीन तरुणींना मॉडेलिंग आणि सिनेमात काम करण्याचे आमिष दाखवून त्यांचे लैंगिक शोषण करण्यात येत असणे याबाबत श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी विशेष उल्लेखा संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखा संबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, अल्पवयीन मुली दलालांच्या जाळ्यात अडकण्याचे अनेक प्रकार उघडकीस आले आहेत. शरीर विक्रीच्या धंद्यासाठी प्रलोभने दाखविण्याचा प्रकार मुंबईतील महाविद्यालयांच्या परिसरात सुरु आहे. त्या ठिकाणी दलालांचा वावर वाढला आहे. महाविद्यालयीन तरुणींना मॉडेलिंग आणि सिनेमात काम करण्याचे आमिष देऊन त्यांचे लैंगिक शोषण केले जाते. गेल्या वर्षभरात पोलिसांच्या समाजसेवा शाखेने 36 अल्पवयीन मुलींची सुटका केली आहे. परंतु ह्या अवैध आणि अनैतिक प्रकाराची व्याप्ती खूप मोठी आहे. शासनाच्या गृहखात्याने व सर्व शिक्षण संस्थांनी व्यापक मोहीम हाती घेण्याची नितांत आवश्यकता आहे, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

-----

..7..

**पृ.शी** : पुणे शहरात शेत जमिनीचे हस्तांतरण शेतकरी नसलेल्या व्यक्तीस करण्याचे होत असलेले प्रकार

**मु.शी** : पुणे शहरात शेत जमिनीचे हस्तांतरण शेतकरी नसलेल्या व्यक्तीस करण्यात होत असलेले प्रकार या बाबत श्री.चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : : माननीय सदस्य श्री चंद्रकांत पाटील यांनी विशेष उल्लेखा संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखा संबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, पुणे शहराला प्रादेशिक रचना योजना असणे. सदर योजनेमुळे पुणे जिल्ह्यात वेगवेगळे झोन पाडणे. त्यापैकी काही भाग शेती व ना विकास, हिलटॉप व बिगर रहिवाशी असताना देखील शेती विभागात गुंठेवारी प्रमाणे एक, दोन व तीन गुंठे विक्री सुरु केलेली आहे. ही विक्री नगर रचना कायदा 1996 च्या कलम 18 विरुध्द असणे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1968 च्या कलम 47 अन्वये शेतजमीन बिगरशेती वापराकरिता बंधन असणे. तसेच मुंबई कूळ व शेतजमीन 1948 चा कायदा, कलम 63 नुसार शेत जमिनीचे हस्तांतरण शेतकरी नसलेल्या व्यक्ती करणे अवैध आहे. असे असताना शेतकरी नसलेल्या व्यक्तीस शेतजमिनीचे हस्तांतरण करण्यात येत आहे. शेतजमिनीचे प्लॉट एन.ए.प्लॉट दाखवून त्याची विक्री करण्यात येत आहे. त्याची 7/12 वर नोंद देखील झालेली आहे. तेव्हा याप्रकरणाची तातडीने चौकशी झाली पाहिजे. सेवेतून निवृत्त झाल्यानंतर त्याठिकाणी घर बांधण्याचे मनसुबे करीत असलेल्या लोकांची फसवणूक होण्याची शक्यता आहे. तेव्हा पुणे शहरात जे गैरव्यवहार सुरु आहेत ते तातडीने बंद करण्याची आवश्यकता आहे अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

------



AJIT/ D/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 14:00

**पृ.शी** : भटक्या विमुक्त जमातीच्या कल्याणासाठी नेमलेल्या रेणके आयोगाच्या अहवालावर कार्यवाही न होणे

**मु.शी** : भटक्या विमुक्त जमातीच्या कल्याणासाठी नेमलेल्या रेणके आयोगाच्या अहवालावर कार्यवाही न होणे या बाबत श्री.सुभाष चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : : माननीय सदस्य श्री सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखा संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखा संबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्य सरकारने भटक्या विमुक्त जमातीच्या कल्याणासाठी रेणके आयोग नेमला होता. या आयोगाने आपला अहवाल चार वर्षापूर्वीच शासनाला सादर केलेला आहे. या अहवालावर शासनाने काहीच विचार केलेला नाही. तसेच तो जाहीरही केलेला नाही. भटक्या विमुक्त जमातीच्या समाजबांधवांना तसेच आम जनतेला हा रेणके आयोगाचा अहवाल कळण्यासाठी लोकधारा-भटके विमुक्त समन्वय समितीने हा अहवाल जाहीर करण्याची मागणी केली आहे. तरी रेणके आयोगाचा अहवाल जाहीर करुन त्यावर विचार करावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी** : राज्यात मोठ्या प्रमाणावर बनावट नोटा सापडणे

**मु.शी** : राज्यात मोठ्या प्रमाणावर बनावट नोटा सापडणे या बाबत श्री.मनीष जैन,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.मनीष जैन यांनी विशेष उल्लेखा संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मनीष जैन (भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखा संबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, या वर्षी जानेवारी ते ऑक्टोबर या कालावधीत जवळपास 96 कोटी रुपयांच्या बनावट नोटा सापडल्या. त्यापैकी जवळपास 81 कोटी रुपयांच्या बनावट नोटा महाराष्ट्रात सापडल्या. यावरुन महाराष्ट्रात बनावट नोटा छापल्या जात आहेत असा अर्थ निघतो. तेव्हा राज्यासमोर हा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. तेव्हा शासनाने बनावट नोटा प्रकरणी तातडीने उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

---------

..10..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी** : स्थानिक गरजेनुसार अभ्यासक्रमाची रचना करणे

**मु.शी** : स्थानिक गरजेनुसार अभ्यासक्रमाची रचना करणे या बाबत श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : : माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी विशेष उल्लेखा संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखा संबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यात व्यावसायिक शिक्षण देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. त्यानुसार राज्य शासनाने सुरुवात केली आहे. गेल्या अनेक वर्षापासून आठवी ते दहावी स्तरावर व्यावसायिक शिक्षण दिले जाते. तथापि, या शिक्षण व्यवस्थेची प्रशासकीय तसेच आर्थिक जबाबदारी उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाची आहे तर परीक्षा घेण्याची जबाबदारी शालेय शिक्षण विभागाची आहे. परंतु कुशल मनुष्य बळाअभावी व्यावसायिक शिक्षणाची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यास अडचणी येत आहेत. तेव्हा या बाबत स्थानिक गरजेनुसार या अभ्यासक्रमाची रचना करण्यात यावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी** : घरेलू कामगारांना कल्याणकारी योजनांचा लाभ न मिळणे

**मु.शी** : घरेलू कामगारांना कल्याणकारी योजनांचा लाभ न मिळणे याबाबत श्री.रमेश शेंडगे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी विशेष उल्लेखा संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखा संबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील जवळपास 15 लाख संख्येने असणाऱ्या मोलकरणी व घरेलू कामगारांसाठी कल्याण मंडळाची स्थापना अडीच वर्षापूर्वी झाली. पण अजूनही या घरेलू कामगार मंडळात राज्यातील सर्व घरेलू कामगारांची नोंद झालेली नाही. किमान वेतन अधिनियम 1948 च्या तरतुदी अद्याप घरेलू कामगारांना लागू झालेल्या नसल्यामुळे त्यांना अजूनही किमान वेतन न मिळत नाही. या मंडळा मार्फत घरेलू कामगार व मोलकरणींसाठी विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देणे आवश्यक आहे. तेव्हा याबाबत शासनाने कार्यवाही करावी अशी या विशेष उल्लेखाद्वारा विनंती करीत आहे.

-------

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील शाळांमध्ये विलंबाने होणारा धान्य पुरवठा

**मु.शी.**: सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील शाळांमध्ये विलंबाने होणारा धान्य पुरवठा याबाबत श्री. रमेश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहाराचे वाटप होत असते. सदर शालेय पोषण आहार वाटपामध्ये अनियमितता आढळून येणे. आटपाडी तालुक्यातील 70 शाळांमध्ये व इतर तालुक्यांमध्ये तांदूळ व इतर धान्याचा पुरवठा विलंबाने होणे, त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांची उपासमार होणे, या गंभीर प्रकारामुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये तीव्र संताप व असंतोष निर्माण होणे, या बाबत शासनाने केलेली उपाय योजना व शासनाची प्रतिक्रिया"

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नाशिक महानगरविकास प्राधिकरण किंवा नाशिक महानगर नियोजन समिती कार्यान्वित करणे

**मु.शी.**: नाशिक महानगरविकास प्राधिकरण किंवा नाशिक महानगर नियोजन समिती कार्यान्वित करणे याबाबत श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"नाशिक शहराचे झपाटयाने होत असलेले शहरीकरण, शहरीकरणाच्या मानाने शहरलगतच्या क्षेत्रातील रस्ते व जलद वाहतुकीसाठी सोयी-सुविधांचा अभाव तसेच वाहतूक कोंडी व सांडपाणी इत्यादी मूलभूत सोयी उपलब्ध करुन देण्याबाबत महानगरपालिकेवर पडत असलेला प्रचंड ताण, नव्याने शहरीकरण होत असलेल्या भागात रस्ते, सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा इत्यादी मूलभूत सोयी पुरविण्यासाठी महानगरपालिका असमर्थ ठरत असणे, मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर इत्यादी ठिकाणी विकास कामांसाठी स्थापन करण्यात आलेले प्राधिकरण, या प्राधिकरणाव्दारे त्या शहरांमध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याचा शासनाने घेतलेला धोरणात्मक निर्णय, त्या धर्तीवर राज्याच्या सुवर्ण चतुष्कोणातील एक असलेल्या नाशिक शहर व लगतच्या ग्रामीण भागाच्या विकासासाठी नाशिक महानगरविकास प्राधिकरण किंवा नाशिक महानगर नियोजन समिती कार्यान्वित करुन या प्राधिकरणाला शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, येथील पायाभूत सुविधांचा मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर कालबध्द कार्यक्रमाव्दारे विकास करण्यासाठी शासनाने या बाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी या विशेष उल्लेखाव्दारे मी करीत आहे."

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी.**: जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत 15 जानेवारी 2012 पर्यन्त करणे

**मु.शी.**: जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत 15 जानेवारी 2012 पर्यन्त करणे याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्यासाठी आरक्षित जागेवरील उमेदवारास जात पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र आवश्यक असणे, नुकत्याच झालेल्या नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुकांसाठी जात पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी उमेदवारास समितीकडे प्रस्ताव सादर करण्याकरिता दि. 15 ऑक्टोबर, 2011 ही अंतिम तारीख देण्यात आली होती. प्रस्ताव मुदतीत सादर केलेल्या अनेक उमेदवारांना जात पडताळणी प्रमाणपत्र मिळाले नाही. त्यामुळे न्यायालयात याचिका दाखल झाल्या व त्यामुळे ठरल्याप्रमाणे निवडणुका न होता कार्यक्रमात बदल करावा लागला तसेच राज्य शासनाचे मुख्य सचिव यांनी यासंबंधी दि. 19 नोव्हेंबर 2011 रोजी एक परिपत्रक काढून गोंधळ निर्माण केला.

सन 2011 च्या फेब्रुवारी महिन्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहेत, या निवडणुकांसाठी जात पडताळणी प्रकरणे समितीकडे पाठविण्याची अंतिम तारीख दिनांक 21नोव्हेंबर 2011 ही मुक्रर करण्यात आली होती. परंतु या तारखेला प्रस्ताव देऊन देखील जात पडताळणी समितीच्या कार्यक्षमतेचा व त्या ठिकाणी असलेल्या अनागोंदी कारभाराचा विचार करता अनेक उमेदवारांना जात पडताळणी वैधता प्रमाणपत्रे मिळण्यापासून वंचित राहावे लागणार आहे, त्यामुळे पुढे अनेक कायदेशीर प्रश्न निर्माण होऊन निवडणुका न्यायालयाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता आहे.

श्री. जयंत प्र. पाटील...

तरी शासनाने जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याची अंतिम मुदत दि. 15 जानेवारी 2012 ही मुक्रर करुन प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा निपटारा जलद गतीने व खास मोहीमेव्दारे करावा, समितीच्या कार्यक्षेत्रात पारदर्शकता आणावी जेणेकरुन उमेदवारास विनासायास प्रमाणपत्र उपलब्ध केले जाईल.

सबब, या महत्वाच्या बाबीकडे शासनाने लक्ष वेधून त्वरित निर्णय घ्यावा यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे".

गेल्या महिन्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका झाल्या. या बाबतीत जात पडताळणी प्रमाणपत्राच्या बाबतीत या सभागृहामधील प्रत्येक माननीय सदस्यांना अनुभव आलेला आहे. या सभागृहामध्ये अनेक वेळा माननीय सदस्य बोलले आहेत. मागील वेळी या सभागृहामध्ये शासनाने लक्षवेधी सूचनेला उत्तर देतांना जात पडताळणीच्या बाबतीत जिल्हा पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार दिल्याचे सांगितले त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद दिले. तरीसुध्दा आम्हाला जात पडताळणीमध्ये वाईट अनुभव येत आहे. जात पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्याकरिता आठ जणांची समिती नियुक्त करण्यात आली आहे. त्यामधील एक अधिकारी हे मुंबईला असतात. त्यांना भेटण्यासाठी आम्हाला भरपूर खर्च करावा लागतो. मागील वेळी निवडणुकीमध्ये जात पडताळणी प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे निवडणूक रद्द करावी लागली. अशी परिस्थिती असल्यामुळे शासनाने या प्रश्नामध्ये गंभीरपणे लक्ष घातले पाहिजे.

दुसरी गोष्ट अशी की, लोकप्रतिनिधींनी विशेषत: आमदारांनी फोन केल्यानंतर त्यांना अपमानास्पद वागणूक मिळते. म्हणून याबाबत शासनाने गंभीर दखल घेतली पाहिजे. त्यांना वाटते की, हे आम्हाला किती वेळा फोन करतात. या बाबतीत आमच्या उमेदवारांसमोर त्यांच्याकडून कॉमेंट्स केले जातात याकडे शासनाच्या महसूल विभागाने लक्ष केंद्रित केले पाहिजे असे मला वाटते. उद्या होणाऱ्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये आम्हाला हे अनुभव येऊ नयेत याकरिता मी हा विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत निवडणुकीचा अर्ज सादर करण्याच्या तारखेपर्यन्त दिली पाहिजे. याचे कारण नागपूरच्या खंडपीठापुढे निवडणुका सन 2001 च्या जनगणनेच्या आधारावर घ्यायच्या की, सन 2011 च्या जनगणनेच्या आधारावर घ्यायचा याचा निर्णय प्रलंबित आहे. जर सन 2011

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. जयंत प्र.पाटील....

च्या जनगणनेच्या आधारावर निवडणुका घेण्याचा निर्णय झाला तर पुन्हा मतदारसंघनिहाय रिझ र्व्हेशन ठेवण्याचा प्रश्न पुन्हा निर्माण होईल. म्हणून आपण ही बाब किरकोळ समजू नका. ही बाब गंभीर असल्यामुळे यामधून मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. याबाबत शासनाने धोरण ठरविले पाहिजे व त्यासाठी मुदतवाढ दिली पाहिजे. दहा दिवसात जात पडताळणी होऊ शकत नसल्यामुळे जिल्हा परिषदेचे उमेदवार ठरविणे सर्व पक्षांना अडचणीचे असते. काही जिल्हा परिषदेचे उमेदवार विदर्भात राहणारे असतात, येथील एखादी महिला उमेदवार कोकणामध्ये पाठविली जाते. तिला जात पडताळणीचे प्रमाणपत्र घेण्यासाठी या ठिकाणी यावे लागते. त्यामधून वेगळे प्रश्न निर्माण होतात. म्हणून ही मुदतवाढ निवडणुकीचे फॉर्म भरण्याच्या कालावधीपर्यन्त ठेवावी अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाला विनंती करीत आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी.**: ठाणे जिल्ह्यातील वेहळे-पिंपळास बंधाऱ्याच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार

**मु.शी.**: ठाणे जिल्ह्यातील वेहळे-पिंपळास बंधाऱ्याच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार याबाबत श्री. संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"ठाणे जिल्ह्यातील कल्याण शहरानजिक भिवंडी तालुक्यात भाटला, भरोडी, सांगरपाडा, सुरई, वेहळे, पिंपळास, गावे, पिंपळघर आणिकोन गावातील गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी खाऱ्या पाण्यापासून वाचविण्यासाठी वेहळे-पिंपळास बंधाऱ्याचे अंदाजे रु. 280.00 लक्ष खर्चाचे अंदाजपत्रकास सन 2001 साली शासनाने मंजुरी दिली त्यात 01.50 ते 04.50 किलोमीटरवर उघाडया बांधण्यात येणार होत्या. ही सर्व कामे एका वर्षात पूर्ण व्हावीत म्हणून 15 तुकडे करुन आजपर्यन्त अंदाजे रु.90.00 लक्ष खर्च केलेला आहे. त्यामध्ये ठेकेदाराने उघाडया न बांधताच सिमेंट, स्टील व फायबरच्या दरवाजाचे आगाऊ पेमेंट घेतलेले आहे. सदर बंधारा बांधताना बऱ्याचशा गोष्टींची अपूर्णता राहिल्याने बंधारा पूर्णत्वास गेलेला नाही. जर बंधारा शासनाने ठरविलेल्या निकषानुसार बांधण्यात आला असता तर भिवंडी-नाशिक या राष्ट्रीय महामार्गास माणकोली फाटयापासून बायपास योजनेंतर्गत समांतर रस्ता काढता आला असता. तसेच भिवंडी व कल्याण शहरापासून तालुक्यातील कुठल्याही गावातील व शहरातील कोणालाही कल्याण पत्री पूल मार्गे पुणे महामार्गावर जाता आले असते. तसेच, दिवा, वसई, डोंबिवली व कोपर रेल्वे स्थानक केवळ 20ते 25 मिनिटात गाठता आले असते. या खार बंधाऱ्यामध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करावी म्हणून मी जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता, प्रधान सचिव तसेच खात्याच्या मंत्री महोदयांनी चौकशी करण्याची पत्राव्दारे विनंती केली होती, परंतु शासनाच्या उदासीनतेमुळे अद्याप चौकशी कागदावर आहे. सदरची बाब शासनाच्या निदर्शनास आणावी म्हणून मी विशेष उल्लेखाव्दारे ही बाब सभागृहात मांडीत आहे, तरी कार्यवाही व्हावी ही विनंती."

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी.**: राज्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलांना शैक्षणिक शुल्कमाफी व स्कॉलरशीप देणे

**मु.शी.**: राज्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलांना शैक्षणिक शुल्कमाफी व स्कॉलरशीप देणे याबाबत अॅड. उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य अॅड. उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

अॅड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"राज्यातील मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शालेय, महाविद्यालयीन शिक्षणादरम्यान स्कॉलरशीप व शुल्क माफी दिली जाते. त्याच धर्तीवर राज्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षण (शालेय, महाविद्यालयीन, तंत्र शिक्षण, वैद्यकीय, इंजिनिअरींग, आय.टी. इत्यादी सर्व) घेत असताना स्कॉलरशीप व शुल्क माफी देण्यात यावी यासाठी शासनाने करावयाची तातडीची उपाय योजना."

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: परभणी कृषी विद्यापीठास कै. वसंतराव नाईक यांचे नाव देणे

**मु.शी.**: परभणी कृषी विद्यापीठास कै. वसंतराव नाईक यांचे नाव देणे याबाबत ॲड. उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य ॲड. उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"कै. वसंतराव नाईक माजी मुख्यमंत्री हे महाराष्ट्राचे हरित क्रांतीचे जनक, त्यांच्यामुळे राज्यात हरित क्रांती झाली. परभणी येथील कृषी विद्यापीठास कै. वसंतराव नाईक यांचे नाव द्यावे ही बहुजनांची अनेक वर्षाची मागणी आहे. सभागृहात ही मागणी मी पूर्वी देखील केली होती. अद्यापि हा प्रश्न मार्गी लागला नाही. कै. वसंतराव नाईक यांचे परभणी कृषी विद्यापीठास नाव दिले तर कृषी विद्यापीठाची प्रतिष्ठा वाढेल त्यामुळे त्वरित नामांतर करण्यासाठी राज्य शासनाने करावयाची तातडीची उपाय योजना".

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पुणे विद्यापीठास क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देणे

**मु.शी.**: पुणे विद्यापीठास क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देणे याबाबत ॲड. उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य ॲड. उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांनी राज्यात शिक्षणाची ज्योत पेटवली. त्या आद्य शिक्षिका आहेत. पुणे विद्यापीठास सावित्रीबाई फुले यांचे नाव द्यावे ही जुनी मागणी आहे. नामांतर कृती समितीने 3 जानेवारी 2011 रोजी राज्यात जिल्हाधिकारी कार्यालय व तहसील कार्यालयासमोर नामांतरासाठी धरणे धरण्याचा निर्णय घेतला असून सदर नामांतरामुळे पुणे विद्यापीठाची प्रतिष्ठा वाढेल. यासाठी शासनाने करावयाची उपाय योजना".

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वर्धा पॉवर कंपनीने वर्धा नदीवर कच्चा बंधारा बांधून पाणी अडविण्याचा केलेला प्रयत्न

**मु.शी.**: वर्धा पॉवर कंपनीने वर्धा नदीवर कच्चा बंधारा बांधून पाणी अडविण्याचा केलेला प्रयत्न याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील औद्योगिक वसाहतीमधील वर्धा पॉवर कंपनीला परवानगी दिली असून त्या कंपनीने सन 2009 मध्ये चिनोरा येथील 11,338 चौरस मीटर जमीन तसेच मोहबळा येथील 35,440 चौरस मीटर जमीन अकृषक न करता व ग्रामपंचायतीची परवानगी न घेता 4 कि.मी. रेल्वे रुळाचे काम करुन त्यावर कोळशाची बोगी आणायला सुरुवात करुन त्याच बरोबर वर्धा नदीवर कच्चा बंधारा बांधून पाणी अडविण्याचा केलेला प्रयत्न, त्यातच आवश्यक असलेले पाणी त्यांना बॅरेज बांधून घेण्याची परवानगी असतांना गैरकायदेशीर पाण्याचा वापर करणे, व कायद्याचा विचार न करता रेल्वे लाईन टाकून गैररित्या केलेले काम, त्यामुळे जनतेत पसरलेला असंतोष, शासनाने कंपनीवर कोणतीही कारवाई केली नाही याकरिता विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाने करावयाची कारवाई."

------------

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:20

**पृ.शी.**: राज्यातील 70 टक्के शाळेमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृहे नसणे.

**मु.शी.**: राज्यातील 70 टक्के शाळेमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृहे नसणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, हा शाळेत जाणाऱ्या मुलींच्या संबंधातील प्रश्न असल्याने मी याठिकाणी सार्वजनिक हिताच्या व एका महत्वाच्या विषयाबाबत विशेष उल्लेखाव्दारे मुद्दा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, राज्यातील 70 टक्के शाळेमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृहे नसल्यामुळे एकंदर 16 हजार मुलींच्या स्वच्छता गृहाचा प्रश्न कायम असणे.त्याकरता सदर शाळांमध्ये शासनाने स्वच्छता गृहे बांधण्याच्या बाबतीत घेतलेला निर्णय आणि प्रत्येक स्वच्छता गृहासाठी प्रत्येकी 50 हजार रुपये इतका खर्च अपेक्षित असणे. परंतु प्रत्यक्षात शासनाने फक्त 35 हजार रुपयांची तरतूद करणे.परंतु अपुऱ्या निधीमुळे स्वच्छतागृहाचे बांधकाम होईल की नाही असा प्रश्न निर्माण होणे. कारण यासाठी जे मटेरिअल लागणार आहे त्याच्या किंमती वाढत असून मजुरीचे दरही वाढत आहेत. त्यामुळे सदरहू स्वच्छतागृहे बांधण्यासाठी निधीची कमतरता भासत असून, त्यासाठी शासनाने निधी वाढवून देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मुलींच्या सुरक्षिततेबाबत जो प्रश्न निर्माण झालेला आहे, त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने मी वरील विषयाबाबत विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

------

. . . .यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्य शासनाने पोर्टेबल सोनोग्राफी मशिनवर घातलेली बंदी

**मु.शी.**: राज्य शासनाने पोर्टेबल सोनोग्राफी मशिनवर घातलेली बंदी याबाबत डॉ.दीपक सावंत वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य डॉ.दीपक सावंत यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी दोन विशेष उल्लेख दिलेले आहेत. परंतु त्यातील 16 क्रमांकाचा विशेष उल्लेख प्रथम मांडतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये स्त्री-भ्रूण हत्या होऊ नये म्हणून राज्य शासनाने पोर्टेबल सोनोग्राफी मशिनवर बंदी घातलेली आहे. परंतु ही बंदी कोणासाठी जाचक आहे तर खरोखर जे पेशंट बेड-रिडन आहेत, जे घरामध्ये उपचार घेतात अशा पेशंटसाठी पोर्टेबल सोनोग्राफीवर बंदी घालणे हा सर्व दृष्टीने घातक निर्णय आहे असे मला वाटते. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे ज्यावेळी एखाद्या पेशंटची घरी शुश्रूषा केली जाते, त्यावेळी तो आधीच अनेक व्याधींमुळे ग्रस्त असतो आणि त्याला सोनोग्राफी करण्याची वारंवार गरज असते. याबाबतीत कोल्हापूर कलेक्टरने दिलेला निर्णय कोर्टाने अपहेल्ड केला ही बाब महत्वाची आहे. त्यामुळे राज्य शासनाने यामध्ये हस्तक्षेप करुन ताबडतोब ही बंदी उठवावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महादय, यामधील दुसरा मुद्दा असा आहे की, पी.सी.एन.डी.टी.कायदा म्हणजे प्रसूतीपूर्व गर्भचिकित्सा यावर बरीच चर्चा होते. या बाबतीत आपल्याकडे 1988 सालातील कायदा आहे. या कायद्यामध्ये अशी शिक्षा नमूद केली आहे की, जी व्यक्ती प्रयोगशाळेत चिकित्सालय केंद्र चालवित आहे किंवा तेथे नोकरीला आहे अशा लोकांना तीन वर्षे शिक्षा आणि पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुचविण्यात आलेली आहे. तसेच जे चिकित्सालय केंद्र कोणाकडून मदत घेईल अशा व्यक्तींना तीन वर्षाचा कारावास आणि तीन हजार रुपये दंडाची शिक्षा देण्यात येईल आणि जी व्यक्ती तेथे स्वत:हून येईल अशा व्यक्त्तीला फक्त 50 रुपये दंड केला जाईल. मात्र या ठिकाणी जी व्यक्ती स्वत: डॉक्टरकडे जाऊन गर्भचिकित्सा करुन घेते, त्या व्यक्तींना या शिक्षेतून वगळले आहे. त्यामुळे केंद्र शासनाचा 2003 मधील जो प्रचलित कायदा आहे, तो यावर रिपील होतो आणि .....

. . . .यु-3

त्यामुळे राज्य शासनाने 1988 चा कायदा ताबडतोब खारीज करुन केंद्र शासनाचा 2003 चा कायदा अस्तित्वात आणावा अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

----

. . . .यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : राज्यामध्ये विविध भागामध्ये सैनिकी शाळा सुरु करणे

**मु.शी.** : राज्यामध्ये विविध भागामध्ये सैनिकी शाळा सुरु करणे याबाबत श्री.भगवान साळुंखे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष एका गंभीर विषयाकडे वेधू इच्छितो. आपल्या राज्यामध्ये केंद्र शासनाच्या वतीने व राज्य शासनाच्या अल्प आर्थिक सहभागाने देशातील पहिली सैनिक शाळा चालविली जाते. या शाळेतून प्रशिक्षित झालेले विद्यार्थी देशाच्या संरक्षणासाठी सैन्यामध्ये दाखल होतात. विशेष म्हणजे या शाळेमध्ये उत्तमरितीने प्रशिक्षित झालेले सरासरी दहा ते पंधरा विद्यार्थी देशातील प्रथम दर्जाचे सैन्य अधिकारी तयार करणाऱ्या पुण्यातील नॅशनल डिफेन्स् ॲकॅडमीमध्ये सहजासहजी प्रवेश मिळवितात. देशाच्या संरक्षणामध्ये मोलाचे कार्य केलेल्या आणि आजमितीस करीत असलेल्या शेकडो अधिकाऱ्यांची संख्या ही लक्षणीय स्वरुपाची आहे.

सभापती महोदय, या सैनिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी राज्य शासनाकडून सन 1989-90 च्या दराने दरडोई, दर दिवशी फक्त 15 रुपये खर्च दिला जातो.त्यामुळे पालकांकडून खर्चाची रक्कम मिळविण्यासाठी वसुली करणे प्राचार्यांना त्रासदायक होते.त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बलांसाठी पालकांच्या उत्पन्नाच्या प्रमाणानुसार जास्तीत जास्त दरवर्षी सरासरी 16 हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. महागाई भत्ता व सहाव्या वेतन आयोगानुसार पालकांच्या उत्पन्नामध्ये वाढ झाली असल्यामुळे चतुर्थ श्रेणीतील पालकांच्या पाल्यांनाही या शिष्यवृत्तीचा लाभ मिळत नाही. आपल्या शेजारील गुजराथ, आंध्र प्रदेश इ.राज्यातील विद्यार्थ्यांसाठी पालकांच्या उत्पन्नाच्या संदर्भातील अटी शिथिल करुन सरासरी 32 हजार रुपये इतकी शिष्यवृत्ती दिली जात आहे. मी या विशेष उल्लेखा व्दारे शासनास अशी विनंती करीत आहे की, विद्यार्थ्यांच्या भोजन खर्चामध्ये आणि शिष्यवृत्तीच्या दरामध्ये आजच्या दराने वाढ करण्यात यावी व या सैनिक शाळेचे संरक्षण करावे.....

. . . .यु-5



श्री.भगवान साळुंखे . . ..

तसेच राज्यात विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण येथे स्वतंत्रपणे सैनिक शाळा सुरु करण्यासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाने प्रयत्न करावेत. धन्यवाद.

----

. . . .यु-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : कोकणातील दशावतारी कलेला प्रोत्साहन मिळावे या साठी करावयाची उपाययोजना

**मु.शी.** : कोकणातील दशावतारी कलेला प्रोत्साहन मिळावे या

यासाठी करावयाची उपाययोजना याबाबत श्री.किरण पावसकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.किरण पावसकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, कोकणातील मनोरंजनाच्या प्रकारामध्ये दशावतार हा एक प्रमुख कलेचा प्रकार मानला जातो. एखाद्या प्रसिध्द नाटक कंपन्यांना लाजवेल अशा प्रकारे हे कलावंत आपली दशावतारी कला पेश करतात.त्याठिकाणी कोणताही पडदा, लाईटस् वगैरे इफेक्ट नसताना ते आपला कार्यक्रम करतात. महाराष्ट्रातील ठिकठिकाणी असलेल्या कलेचे विविध कार्यक्रम टी.व्ही.च्या चॅनेल वरुन दाखविले जातात. परंतु कोकणातील दशावतारी कलेला मात्र त्या प्रमाणात तेवढा न्याय मिळत नाही. प्रसार माध्यमेही त्याची दखल घेत नाहीत. तमाशा, नाटक आणि सिने कलावंतांची प्रसार माध्यमाकडून कदर केली जाते आणि तशी ती केली जावी. मात्र त्याच पध्दतीने दशावतारी कलावंतांची देखील कदर केली जावी.पण त्यांना प्रसिध्दीपासून दूर ठेवले जाते.त्याचप्रमाणे सरकार कडून 50 वर्षे वयावरील कलाकारांना जे मानधन मिळते, ते देखील अत्यंत तुटपूंजे असते. त्यामुळे त्यात देखील वाढ करण्यात यावी अशी माझी सूचना आहे. कारण या कलाकारांच्या बाबतीत आमच्या कोकणी भाषेमध्ये म्हणावयाचे तर रात्री दहिकाल्यामध्ये राजा आणि सकाळी डोक्यावर बोजा अशी त्याची परिस्थिती आहे. महाराष्ट्रातील सर्व कलाकारांना प्रसिध्दी माध्यमांकडून जो न्याय मिळत आहे, जे मानधन मिळत आहे त्याबाबतीत या उपेक्षित कलावंतांची शासनाने दखल घेऊन त्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा यासाठी मी विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

----

. . . यु-7



**पृ. शी.** : राज्यातील देवस्थानच्या इनामी जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरण झाल्यास पूर्व देवस्थानच्या नावे करण्याबाबत

**मु. शी.** : राज्यातील देवस्थानच्या इनामी जमिनींचे बेकायदेशीर हस्तांतरण झाल्यास पूर्व देवस्थानच्या नावे करण्याबाबत

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.राजन तेली वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.राजन तेली (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील देवस्थानच्या इनामी जमिनींच्या संदर्भात बेकायदेशीर हस्तांतरण झाले असल्यास ते पूर्व देवस्थानच्या नावे करण्याबाबत शासनाने दिनांक 30 जुलै 2011 रोजी परिपत्रक काढले असणे,सर्रासपणे सदर इनामी जमिनीचे हस्तांतरण करण्यासंबंधीचे व्यवहार हे शासनाच्या पूर्व परवानगीनुसार महसुली प्रभागातील जमिनीचे हस्तांतरणाचे व्यवहार असण्याचा प्रघात असूनही प्रत्यक्षात इनामी जमिनी घेतल्याने शासनाच्या विविध योजना राबविता येत नसल्याने इंदिरा आवास योजनेचा लाभार्थ्यांना लाभ होऊ शकत नसणे, तसेच बँकेकडे जमीन तारण ठेवता येत नसल्याने बेकायदेशीर जमिनीच्या नोंदीमध्ये विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड, मालवण तालुक्यातील आचरा येथे 250 वर्षाच्या देवस्थानच्या जमिनी असून त्या अंतर्गत अंदाजे 13 गावे येत असून त्यापैकी वेरल, इर्लेवाडी, डोंगरवाडी, पिरावाडी, आचरा, वर्चेवाडी, किंजवडे, तोरसोडे, पोंम्बुर्डे, पोटकामते, खोडी इ.13 गावात बेकायदा जमिनी हस्तांतरीत केल्याच्या संबंधातील परिपत्रके सापडणे. शासनाने देवस्थानच्या इनामी जमिनीबाबत माहे 30 जुलै 2002 रोजी परिपत्रक जारी केले असून, त्या भागातील इनामी जमिनी खरेदी केलेल्या लाभार्थ्यांच्या नावे नियमाकुल मालकी हक्काने करण्याबाबत दि.24-05-2011 रोजी माननीय महसूल राज्यमंत्र्यांच्या दालनामध्ये झालेल्या बैठकीमध्ये देवस्थानच्या संदर्भात गुजराथच्या धर्तीवर एक सर्वंकष कायदा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन असून देवस्थानच्या जमिनीचे वाटप 50-50 या प्रमाणे करावे अशा प्रकारचा मी विशेष उल्लेख देत आहे.

----

23-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) U-8

APR/ 14:20

**पृ.शी.** : कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहर वाहतुकीसाठी लिंक रोडची असलेली तातडीची गरज

**मु.शी.** : कुंभमेळयाच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहर वाहतुकीसाठी लिंक रोडची असलेली तातडीची गरज याबाबत श्री.जयवंतराव जाधव वि.प.स.यांनी दिलेली विशेष

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सार्वजनिक व महत्वाच्या निकडीच्या विषयाबाबत विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, नाशिक महानगरपालिका शहर विकास आराखड्यामधील ना-विकास क्षेत्रातील डी.पी.रोडचे वाहतुकीच्या दृष्टीने आवश्यक असलेले भूसंपादन हे आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहर वाहतुकीसाठी तेथे लिंक रोडची असलेली तातडीची गरज, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या धर्तीवर अडीच एफ.एस.आय. किंवा 100 टक्के टी.डी.आर. देऊन तेथील जागा मालकाचे जेवढे क्षेत्र रस्त्यामध्ये जात आहे, त्या प्रमाणात ते क्षेत्र ना-विकास झोन मधून रहिवाशी झोनमध्ये करण्याची होत असलेली मागणी. त्यामुळे विकास आराखड्यातील रस्ते महानगरपालिकेला विना मोबदला उपलब्ध होऊन त्याचा लाभ स्थानिक जमीन मालकांबरोबरच महापालिकेला सुध्दा होणार असणे.त्यामुळे शहराच्या वाढत्या विस्तारामुळे आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर लिंक रोड पूर्ण करण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांना 100 टक्के टीडीआर किंवा अडीच एफ.एस.आय.देण्याबाबत शासन स्तरावर 37 (1) प्रमाणे कार्यवाही करावी अशी मी मागणी करतो.

-----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुणे शहरात मोठया प्रमाणावर होणारे अपघात टाळण्यासाठी सर्वंकष वाहतूक आराखडया संबंधी तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता

**मु. शी.** : पुणे शहरात मोठया प्रमाणावर होणारे अपघात टाळण्यासाठी सर्वंकष वाहतूक आराखडया संबंधी तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□□य सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"पुणे शहरातील विविध भागात दररोज चारपेक्षा अधिक अपघात होत असून त्यामध्ये किमान एकाचा मृत्यू होत असणे, 1 जानेवारी, 2011 ते 30 नोव्हेंबर, 2011 दरम्यान शहरात 1 हजार 519 प्राणांतिक अपघात झाले आहेत. यात 392 जणांना जीव गमवावा लागला आहे, तर 434 जण गंभीररीत्या जखमी झाले आहेत. शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी वाहतूक शाखेकडून वेळोवेळी प्रयत्न केले जातात. मात्र वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष केल्याने अपघात होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. शहरात दुचाकी आणि चारचाकी वाहनांची संख्या झपाटयाने वाढत आहे. दररोज हजारो वाहने बाहेरगावाहून येत असतात, त्यांचा देखील ताण वाहतूक व्यवस्थेवर पडतो. पुणे शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारावी म्हणून महापालिकेने आयएलएफएसकडून ( सर्वंकष वाहतूक आराखडा) सीएमपी तयार करणे, हा आराखडा तयार करुन तीन वर्षे झाली तरी यावर कोणताच निर्णय अद्यापपर्यंत न घेणे, त्याचप्रमाणे वाहतुकीची कोंडी दूर करण्याच्या नावाखाली रिंगरोड तयार करुन त्यांच्या भोवतीच सॅटलाईट टाऊनशिप उभी करण्याचा घेण्यात आलेला निर्णय, या रिंगरोडपासून 1 कि.मी. हद्दीत नो डेव्हलपमेंट झोन जाहीर करण्याची आवश्यकता, तसेच हा रस्ता





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

डॉ. नीलम गोऱ्हे. . .

रिंगरोड की बाहयवळण रस्ता असा दोन्हीचा उल्लेख नसणे, वाहतुकीची कोंडी व पुणे शहरात होणारे अपघात या पार्श्वभूमीवर नगरविकास विभागाने लक्ष घालून वाहतूक कोंडी दूर करण्यासाठीच्या आराखडयाकडे तातडीने लक्ष द्यावे, याकडे मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे.

---



अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : डॉ. कुलदीपराज कोहली, आयुर्वेदिक संचालक यांच्याकडे आवश्यक प्रमाणपत्रे नसल्यामुळे त्यांना पदमुक्त करण्याची मागणी.

**मु. शी.** : डॉ. कुलदीपराज कोहली, आयुर्वेदिक संचालक यांच्याकडे आवश्यक प्रमाणपत्रे नसल्यामुळे त्यांना पदमुक्त करण्याची मागणी याबाबत डॉ.दीपक सावंत वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, डॉ. कुलदीपराज कोहली, आयुर्वेदिक संचालक, यांच्या विषयी या सभागृहामध्ये अनेक वेळा प्रश्न उपस्थित झाले आहेत. या आयुर्वेदिक संचालकाकडे कोणत्याही प्रकारचे साधे बी.ए.एम.एस. झाल्याचे प्रमाणपत्र नसताना देखील किंवा ते एम.पी.एस.सी. झालेले नसताना देखील आज ते संचालक या पदावर रुजू आहेत. या विषयावर अनेक वेळा चर्चा झाली. या विषयावर विधानसभेत आणि विधानपरिषदेत देखील प्रश्न उपस्थित झाला. पण दुर्दैवाने आज पर्यंत यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यांची फक्त चौकशी सुरु आहे. सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना या विशेष उल्लेखाद्वारे विनंती आहे की, डॉ. कुलदीपराज कोहली, आयुर्वेदिक संचालक, यांना ताबडतोब त्यांच्या संचालक पदावरुन मुक्त करावे आणि त्यांची चौकशी करावी.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राष्ट्रीय फळबाग सहकारी विकास निगममार्फत अर्थसहाय्य न मिळाल्यामुळे आंबा, काजूच्या सहकारी विकास संस्थांपुढे कर्जफेडीचा निर्माण झालेला प्रश्न

**मु. शी.** : राष्ट्रीय फळबाग सहकारी विकास निगममार्फत अर्थसहाय्य न मिळाल्यामुळे आंबा, काजूच्या सहकारी विकास संस्थांपुढे कर्जफेडीचा निर्माण झालेला प्रश्न याबाबत श्री.राजन तेली वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. राजन तेली ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यातील कोकण प्रांतातील काजू व आंबा या नगदी फळ पिंकांना प्रक्रियोत्तर दर्जेदार भाव मिळण्यासाठी राज्य सरकारने सहकारी संस्थांना भरीव अर्थ सहाय्य देण्याचा घेतलेला निर्णय, परंतु राष्ट्रीय फळबाग सहकारी विकास निगम मार्फत राज्याला मिळणारे संभाव्य अर्थसहाय्य अद्यापि माहे नोव्हेंबर, 2011 अखेर पर्यंत प्रतिक्षाधीन राहिल्याने सदर आंबा काजूच्या सहकारी विकास संस्थाना मुदत वाढी पूर्वी परतफेड करण्याविषयी निर्माण झालेला यक्षप्रश्न, राज्याने काजूवरील मूल्यवर्धित कराचा परतावा तातडीने करण्याची गरज, सदर बाबतीत महत्वाच्या व गंभीर विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

--



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : डीएड अभ्यासक्रमाचे नाव डीटीएड असे बदलल्यामुळे अधिसूचना काढून कायद्यात तशा प्रकारचा बदल करण्याची आवश्यकता.

**मु. शी.** : डीएड अभ्यासक्रमाचे नाव डीटीएड असे बदलल्यामुळे अधिसूचना काढून कायद्यात तशा प्रकारचा बदल करण्याची आवश्यकता याबाबत श्री. रामनाथ मोते वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, शासनाने मध्यंतरी एक निर्णय घेतला आणि डीएड अभ्यासक्रमाचे नाव बदलून आता डीटीएड अभ्यासक्रम असे त्याचे नामांतर करण्यात आले आहे. राज्यातील ज्या खाजगी शाळा आहेत, या खाजगी शाळांना 1981 ची नियमावली आणि 1977 चा कायदा लागू आहे. या कायद्यामध्ये प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक पदासाठी डीएड अर्हताधारक असावेत असा एक उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामध्ये डीटीएट अशी अद्यापही सुधारणा झालेली नाही. काल न्यायालयाचा निर्णय झाला की, हे डीटीएड धारक फक्त स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये म्हणजे जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका या शाळांमध्ये नियुक्तीसाठी पात्र ठरतील. खाजगी शाळांमध्ये ते पात्र ठरणार नाहीत म्हणून शासनाने तातडीने डीएड ऐवजी डीटीएड अशा प्रकारचा या कायद्यात अधिसूचना काढून बदल करावा, अशा प्रकारची मी या ठिकाणी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

---

.....6..

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. कपील पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

" सभापती महोदय, भारत सरकारने हिंदीच्या संपर्क भाषेमध्ये एक सुधारणा केलेली आहे . रुळलेले इंग्रजी भाषेतील शब्द सुध्दा स्वीकारावेत आणि भाषा अधिक सोपी आणि प्रवाही करावी, जेणेकरुन संपर्क भाषा ही अधिकाधिकांना कळेल. त्या धर्तीवरच महाराष्ट्र राज्य सरकारने सुध्दा मराठी भाषा अधिक प्रवाही, अधिक अर्थवाही आणि मराठीतील संपन्न अशा ज्या विविध बोली भाषा आहेत, त्यांना सामावून घेऊन, इंग्रजीतील रुळलेले शब्द सुध्दा स्वीकारावेत, जेणेकरुन शासकीय कामकाज सामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी सुलभ होऊ शकेल, अशी माझी सूचना आहे आणि मी ती या औचित्याच्या मुद्याद्वारे मांडत आहे. धन्यवाद.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या औचित्याच्या मुद्याला माझा विरोध आहे. आज सकाळी मराठीत रुळलेले इंग्रजी शब्द मराठी भाषेत, लोकांना समजणाऱ्या भाषेत मी सांगितलेले आहेत. मराठीत चांगले शब्द असताना देखील इंग्रजी शब्द वापरण्याची सवय असते. तेव्हा या सवयी लागलेल्या माणसांकरिता ही सोय करण्यात येणार असेल तर माझा त्याला विरोध आहे. मराठी भाषेमध्ये अशा प्रकारच्या शब्दांची भेसळ करुन मराठी भाषा अशुध्द करु नये, म्हणून मी या औचित्यांच्या मुद्याला विरोध करतो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी.** : नागपूर विभागाचे शिक्षण उपसंचालक व इतर भ्रष्ट अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता.

**मु. शी.** : नागपूर विभागाचे शिक्षण उपसंचालक व इतर भ्रष्ट अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत श्री.नागो पुंडलिक गाणार वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. नागो पुंडलिक गाणार यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. नागो पुंडलिक गाणार ( नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, विशेष उल्लेखाच्या अनुषंगाने शिक्षण क्षेत्रातील एक विषय मी या ठिकाणी मांडू इच्छितो.

नागपूर विभागाचे शिक्षण उप संचालक श्री. महेश करजगावकर, नागपूर जिल्हयाचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी, श्री. सोमेश्वर मेतांम, भंडारा जिल्हयाचे शिक्षणाधिकारी श्री. नरायण जोशी, आणि वर्ध्याचे शिक्षणाधिकारी श्री. सोनवणे यांच्या विरुध्द अनेक गैरप्रकार व भ्रष्टाचाराच्या संदर्भात तक्रारी आहेत. मी स्वत: कार्यकर्ता म्हणून आणि आता प्रतिनिधी म्हणून अनेक तक्रारी शासन दरबारी केलेल्या आहेत. शासन वारंवार चौकशी करण्याचे नाटक करते परंतु प्रत्यक्षात कारवाई करीत नाही म्हणून सभापती महोदय, या विशेष उल्लेखाच्या अनुषंगाने मी आपल्याला विनंती करतो की, शासनाला या भ्रष्ट अधिकाऱ्याच्या विरुध्द कारवाई करण्याकरिता बाध्य करावे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..8..

**पृ. शी./मु. शी.** : औचित्याचे मुद्दे
( पुढे चालू....

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.जमा यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. एस.क्यू.जम : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापति महोदय, कल मैंने अंतिम अठवडा प्रस्ताव पर चर्चा करते समय माननीय गृह मंत्री महोदय का ध्यान नागपुर के दो गंभीर मामलों की ओर आकर्षित किया था. एक मामला नागपुर के श्री समीर मनोहर मेश्राम के बारे में था, जो कि एक ड्राइवर हैं और वे दिनांक 25 सितम्बर 2009 से लापता हैं. दूसरा मामला श्री शेख हमीद का है जो कि एक गार्ड का काम करते हैं. वे भी दिनांक 30-8-2011 से लापता हैं. पहले केस की शिकायत सीताबर्डी थाने में दर्ज है और दूसरे केस की शिकायत हसन बाग थाने में दर्ज है. मेरा कहना है कि इस बारे में गृह मंत्रालय या माननीय मंत्री महोदय की ओर से कोई निवेदन आना चाहिए, नहीं तो कल की गई चर्चा के दौरान हमारे द्वारा उठाए गए इन दो गंभीर मामलों का कोई फायदा नहीं होगा.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये गेल्या दोन वर्षामध्ये समाज घुसळून काढणारे असे एक समीकरण निर्माण झालेले आहे. मराठा समाजाला ओबीसीमध्ये आरक्षण देण्यात यावे अशा प्रकारच्या संतप्त चळवळी निर्माण झाल्या. इतकेच नव्हे तर संपूर्ण राज्य सरकारमध्ये मंत्री महोदय, मराठा समाजाचे असतांना सुध्दा ते आमच्याकडे लक्ष देत नाहीत, अशा प्रकारची एक वेगळी उणीव समाजाला वाटायला लागली. या मराठा समाजाला आरक्षण द्यावयाचे की, नाही यावर आदरणीय श्री. भुजबळ साहेब आणि सन्माननीय श्री. गोपीनाथ मुंडे साहेब यांची व्याख्याने व्हायला लागली आहेत. आमच्या समाजाचे आरक्षण कमी न करता मराठा समाजाला जे आरक्षण द्यावयाचे ते देण्यात यावे, आमचा त्याल विरोध नाही. म्हणजे आमचे कमी करायचे नाही पण त्यांना द्या अशा प्रकारे जे देता येत नाही ते द्या, अशा प्रकारचे मांडत सुटले. हरकत नाही लोकशाहीतील तो त्यांचा विचार आहे. घटनेने त्यांना तो अधिकार दिलेला आहे. परंतु काल केंद्रीय मंत्री मंडळाने मुस्लिम समाजाला साडे चार टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. त्या निर्णयाबद्दल योग्य वेळी आम्हाला काय बोलावयाचे आहे ते आम्ही बोलू पण महाराष्ट्रामध्ये मराठा समाजाला आरक्षण मागण्याची प्रचंड चळवळ होत असताना सुध्दा त्यांना अर्धा ते पाव टक्कासुध्दा आरक्षण देता येणार नाही यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे आदरणीय श्री. भुजबळ साहेब मात्र या बाबतीत अद्याप एक शब्दही बोलले नाहीत. तेव्हा या औचित्याच्या मुद्याद्वारे मला या बद्दल आदरणीय भुजबळ यांचे मत जाणून घेण्याची इच्छा आहे. ओबीसीमधील साडे-चार टक्के आरक्षण कापलेले आहे त्या बद्दल त्यांचे काय मत आहे, आता ते बोलणार आहेत की नाही, का महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या आरक्षणाच्या बाबतीत बोलावयाचे आणि बाकीच्यांच्या बाबतीत बोलावयाचे नाही, अशा प्रकारची त्यांची भूमिका आहे? सभापती महोदय, मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून आदरणीय भुजबळ साहेबांचे मत अपेक्षित करतो.

----

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, केंद्र सरकारने नुकताच जो निर्णय घेतलेला आहे त्या विषयाचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी केला. अल्पसंख्यांकांकरिता आरक्षण असा तो विषय आहे. ते आरक्षण धर्माच्या आधारावर नाही. ते आरक्षण अल्पसंख्यांकांकरिता आहे. ओबीसीमध्ये अल्पसंख्यांकामधील जो मागासलेला वर्ग असेल, त्यामधील रिझर्वेशनमध्ये असणारा जो वर्ग आहे, त्या वर्गाकरिता हे आरक्षण आहे. त्यामुळे ओबीसीमधून काही काढून घेण्याचा विषयच येत नाही. धर्माच्या नावावर असे करता येत नाही, घटनेमध्ये अशी तरतूद नाही, असा सारखा उल्लेख केला जातो. परंतु यामध्ये अल्पसंख्यांक हा विषय आहे. त्यामुळे धर्माच्या नावाने अशा प्रकारचा प्रचार करणे अत्यंत चुकीचे आहे.

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होऊन दुपारी 3.15 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 2.40 ते 3.15 वाजेपर्यंत मध्यंतर )

----

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: विरोधी पक्ष नेत्यांच्या नियुक्तीसंबंधी घोषणा व अभिनंदनपर भाषणे

**सभापती** : दिनांक 22 डिसेंबर, 2011 रोजी श्री.एकनाथराव खडसे-पाटील, भारतीय जनता पक्ष विधिमंडळ पक्ष नेते (विधानसभा) व माननीय विरोधी पक्ष नेते, विधानसभा यांनी मला विधानपरिषदेतील विरोधी पक्ष नेते पदाच्या मान्यते संदर्भात खालील पत्र दिलेले आहे.

"महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये भारतीय जनता पक्ष सर्वात मोठा विरोधी पक्ष आहे. विद्यमान विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग पुंडलिक फुंडकर यांनी विधानपरिषदेच्या विरोधी पक्ष नेते पदाचा आज दिनांक 22.12.2011 रोजी राजीनामा दिल्याने भारतीय जनता पक्षाने विधानपरिषदेच्या विरोधी पक्ष नेतेपदी श्री.विनोद श्रीधर तावडे यांची दिनांक 23 डिसेंबर, 2011 रोजीपासून निवड केलेली आहे.

महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, 1978 च्या कलम 2 मधील तरतुदीनुसार राज्य शासनाच्या विरोधी असलेल्या सर्वात जास्त सदस्य संख्या असणाऱ्या पक्षाच्या नेत्याला विरोधी पक्ष नेते म्हणून मान्यता देण्यात येते. तरी कृपया श्री.विनोद श्रीधर तावडे,वि.प.स. यांना विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते म्हणून मान्यता देण्यात यावी व सभागृहात हिवाळी अधिवेशन, 2011 च्या शेवटच्या दिवशी म्हणजेच दिनांक 23.12.2011 रोजी तशी घोषणा करावी ही नम्र विनंती." या संदर्भात भारतीय जनता विधानमंडळ (विधानपरिषद) पक्षाने पारित केलेल्या ठरावाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे."

महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये दिनांक 5 डिसेंबर, 2011 रोजीच्या पक्षीय बलाबलनुसार भारतीय जनता पक्षाची एकत्रित सदस्य संख्या 11 इतकी असून भारतीय जनता पक्ष सर्वात मोठा विरोधी पक्ष म्हणून विधानपरिषदेत कार्यरत आहे. इतर विरोधी पक्षाची सदस्य संख्या खालील प्रमाणे आहे.

शिवसेना-7
पिझंटस् ॲण्ड वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया-1
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) -2

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

लोक भारती-1,

अपक्ष-9 आणि रिक्त 1

यापैकी सर्वश्री रामनाथ मोते, भगवानराव साळुंखे, नागो पुंडलिक गाणार या अपक्ष सदस्यांनी विधानपरिषदेच्या विरोधी पक्ष नेते पदासाठी श्री.विनोद तावडे यांना पाठिंबा दिल्याचे पत्र दिलेले आहे.

" सन 1978 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 8 - महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, 1978 च्या कलम 2 मध्ये विरोधी पक्ष नेत्यांबाबत खालीलप्रमाणे तरतुदी आहेत.

"... या अधिनियमात राज्य विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या संबंधात विरोधी पक्ष नेता म्हणजे त्यावेळी राज्य शासनाचे विरोधी असलेल्या सर्वात जास्त सदस्य संख्या असणाऱ्या पक्षाचा नेता असलेला आणि विधानसभेचे अध्यक्ष किंवा यथास्थिती विधानपरिषदेचे सभापती यांनी तशी मान्यता दिलेला यथास्थिती राज्य विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा सदस्य."

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय अधिसूचना क्रमांक 24182/ग-1 अन्वये श्री.पांडुरंग पुंडलिक फुंडकर, विधानपरिषद सदस्य यांना माननीय सभापती, विधानपरिषद यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेतील विरोधी पक्ष नेता म्हणून दिनांक 25 एप्रिल, 2008 रोजी (मध्यान्होत्तर) पासून मान्यता दिलेली होती. आज गुरुवार, दिनांक 22 डिसेंबर, 2011 रोजी श्री.पांडुरंग पुंडलिक फुंडकर, विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी माननीय सभापती यांना पत्र लिहून विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद या पदाचा राजीनामा दिलेला आहे व तो राजीनामा माननीय सभापतींनी स्वीकारावा अशी विनंती केलेली आहे. मी सदर राजीनामा स्वीकारलेला आहे.

भारतीय जनता पक्ष विधिमंडळ (विधानपरिषद) पक्षाने दिनांक 22 डिसेंबर, 2011 रोजीच्या ठरावाप्रमाणे विधानपरिषद सदस्य श्री.विनोद श्रीधर तावडे यांची विधानपरिषद गट नेते पदी सर्वानुमते निवड केलेली आहे. विधानपरिषदेत भारतीय जनता पक्षाची संख्या विरोधी पक्षात सर्वाधिक असल्यामुळे श्री.विनोद तावडे यांची विरोधी पक्ष नेते पदी नियुक्ती घोषित करावी अशी विनंती श्री.संजय केळकर, पक्ष प्रतोद, भारतीय जनता पक्ष, विधानपरिषद यांनी सुध्दा मला दिनांक 22.12.2011 रोजी केलेली आहे.

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.....

वरील वस्तुस्थिती, संविधानातील व कायदेशीर तरतुदी तसेच संसदीय प्रथा, परंपरा विचारात घेता श्री.विनोद श्रीधर तावडे, विधानपरिषद सदस्य यांची शुक्रवार, दिनांक 23 डिसेंबर, 2011 पासून महाराष्ट्र विधानपरिषदेतील विरोधी पक्ष नेते पदी नियुक्ती करण्यात येत आहे.

अत: श्री.विनोद श्रीधर तावडे हे दिनांक 23 डिसेंबर, 2011 पासून (मध्यान्होत्तर) विरोधी पक्ष नेते म्हणून राहतील असे मी घोषित करीत आहे.

विरोधी पक्ष नेता म्हणून अधिनियम व नियमाप्रमाणे उपलब्ध असणाऱ्या सोयी सवलती त्यांना मिळतील. श्री.विनोद श्रीधर तावडे यांनी आता विरोधी पक्ष नेत्यांचे स्थान ग्रहण करावे.

( यानंतर माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांनी श्री.विनोद तावडे यांना विरोधी पक्ष नेत्यांच्या स्थानी नेऊन बसविले. )

-----

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, आताच आपण या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य, भारतीय जनता पक्षाचे नेते श्री.विनोद श्रीधर तावडे यांची सभागृहाचे विरोधी पक्ष नेते म्हणून नियुक्ती केलेली आहे. या नियुक्तीबद्दल श्री.विनोद तावडे यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. श्री.विनोद तावडे यांनी त्यांच्या प्रभावी, प्रखर अशा राजकीय कारकिर्दीमुळे, त्यांच्या सभागृहातील परफार्मन्समुळे सर्व सन्माननीय सदस्यांचे मन जिंकलेले आहे. ते सभागृहात प्रभावीपणे काम करतातच.

नंतर श्री.गिते......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.खंदारे 15:25

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

पहिल्यापासून म्हणजे विद्यार्थी चळवळीपासून ते अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेपर्यंत त्यांनी आपल्या राजकीय जीवनाला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे सरचिटणीस म्हणून तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते म्हणून त्यांनी अतिशय प्रभावीपणे काम केले आहे. त्याचप्रमाणे भारतीय जनता पक्षाचे अत्यंत प्रभावी कार्यकर्ते म्हणून देखील त्यांनी या राज्यात काम केले आहे. त्यानंतर ते मुंबईचे भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष झाले. 2002 या वर्षी विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित होऊन ते विधान परिषद सदस्य झाले. त्या सहा वर्षाच्या कारकिर्दीत त्यांनी विधान परिषद सदस्य म्हणून चांगले काम केले. त्यानंतर 2008 या वर्षी पुन्हा विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित होऊन विधान परिषद सदस्य म्हणून निवडून आले. विधान परिषद सदस्य म्हणून सभागृहात आल्यानंतर त्यांनी सर्वसामान्य जनतेचे, राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न, शहरी व ग्रामीण भागातील जनतेचे प्रश्न, औद्योगिकरणाचे प्रश्न, अर्थ विषयक प्रश्न सभागृहात अतिशय प्रभावीपणे मांडले. कधी कधी ते अतिशय आक्रमकपणे सभागृहात प्रश्न उपस्थित करीत असतात. प्रश्न उपस्थित करताना सभागृहाच्या प्रथा आणि परंपरा त्यांनी उचलून धरल्या. आज त्यांच्यावर विरोधी पक्षनेता म्हणून मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. ही जबाबदारी ते यथार्थपणे पार पाडतील अशी मला खात्री आहे. ते या जबाबदारीत यशस्वी होवोत अशी मी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने, तसेच मुख्यमंत्री या नात्याने त्यांना शुभेच्छा देतो.

महोदय, यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी साडेसहा वर्षे या सभागृहात विरोधी पक्ष नेता म्हणून जबाबदारी पार पाडली. शेतकऱ्यांचे प्रश्न, सर्वसामान्य जनतेचे प्रश्न त्यांनी या सभागृहात अतिशय हिरिरीने मांडले. सत्ताधारी पक्षात असो अथवा विरोधी पक्षात असो, राज्याचा जलद गतीने विकास व्हावा, उपेक्षित वर्गास न्याय मिळावा अशा एकाच उद्देशाने आपण सभागृहात काम करीत असतो. सन्माननीय श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी गेल्या साडेसहा वर्षाच्या कालावधीमध्ये भारतीय जनता पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडली. त्याप्रमाणे त्यांनी राज्यातील जनतेचे प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न देखील या सभागृहात आग्रहीपणाने मांडले. या सभागृहाची प्रथा आणि परंपरा कायम ठेवण्याकरिता तसेच सभागृहाचे कामकाज व्यवस्थितपणे चालावे यासाठी एक वेगळाच आदर्श त्यांनी निर्माण केला आहे. त्यांनी सभागृहात घालून दिलेला आदर्शाचा ठसा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

निश्चितपणे या सभागृहावर आणि सभागृहातील सर्व सदस्यांवर राहील. मी सन्माननीय श्री.भाऊसाहेब फुंडकर यांच्याबरोबर लोकसभेत एकत्रितपणे काम केलेले आहे. तेव्हापासून ते माझे सहकारी झालेले आहेत. माझ्या समवेत असलेले मित्रत्वाचे संबंध त्यांनी कधीच सोडलेले नाहीत. ते आपल्या पक्षाची बाजू सभागृहात प्रभावीपणे मांडत असत. तरी देखील त्यांनी आपले संबंध कधी बिघडू दिले नाही. सभागृहात खेळीमेळीचे वातावरण ठेवून राज्यातील जनतेचे प्रश्न सोडविण्याचे एकच उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून आपण यापुढे कामकाज करु या. पुन्हा एकदा मी सन्माननीय श्री. विनोद तावडे यांना शुभेच्छा देतो. सन्माननीय श्री. भाऊसाहेब फुंडकर यांना शुभेच्छा देतो. वेगवेगळया स्तरावर राज्यातील जनतेची ते सेवा करीत राहतील याची मला खात्री आहे. सभापती महोदय, आपण मला या ठिकाणी मनोगत व्यक्त करण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल आभार मानतो. धन्यवाद.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या विरोधी पक्ष नेतेपदी सन्माननीय श्री.विनोद तावडे यांची निवड झाल्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. माननीय श्री. भाऊसाहेब फुंडकर यांच्या जागी त्यांची निवड झाल्यामुळे साहाजिकच सन्माननीय श्री.विनोद तावडे यांच्यावरील जबाबदारी वाढलेली आहे. सार्वजनिक क्षेत्राचा आणि विधिमंडळाच्या कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव असल्याने श्री.विनोद तावडे ही जबाबदारी चांगल्याप्रकारे पार पाडतील असा विश्वास मला स्वत:ला वाटतो.

सभापती महोदय, मी अनेक वर्षे विधिमंडळात सदस्य म्हणून काम करीत आहे. माझ्या माहितीप्रमाणे सन्माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांना विरोधी पक्षनेता म्हणून बरीच वर्षे संधी मिळाली. दिनांक 11एप्रिल, 2005 रोजी त्यांनी विरोधी पक्ष नेते पद सन्माननीय श्री.नितीन गडकरी यांच्याकडून स्वीकारले. त्यानंतर त्यांना दिनांक 25 एप्रिल, 2008 मध्ये विरोधी पक्षनेता म्हणून संधी मिळाली. या राज्याचे माननीय मुख्यमंत्री इंजिनिअर आहेत. सन्माननीय श्री. विनोद तावडे हे देखील इंजिनिअर आहेत. विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते इंजिनिअर आहेत आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देखील इंजिनिअर आहेत. त्यामुळे यापुढे या राज्यात पूर्णपणे टेक्नीकल पध्दतीने कामकाज सुरु होणार आहे.

श्री. संजय केळकर (बसून) : इंजिन व्यवस्थित चालेल...

श्री. अजित पवार : इंजिन व्यवस्थित चालेल. आमच्याकडून सोशल इंजिनिअरींग फार चांगले चालेल. तुमच्याकडून कसले इंजिनिअरींग चालेल त्याची मला काही माहिती नाही. परंतु साधारणत: कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेसची लाईन आहे, ती आपल्याला सर्वांना माहिती आहे. त्या खोलात मी जास्त जात नाही. सन्माननीय श्री. भाऊसाहेब फुंडकर यांचे विरोधी पक्ष नेते म्हणून सर्वांनी काम बघितले आहे.

सभापती महोदय, एक योग कसा आला ते बघा. स्वातंत्र्यपूर्व काळात जहाल मतवादी आणि मवाळ मतवादी असे दोन ग्रुप असावयाचे. त्या दोघांचे उद्दिष्ट एकच असायचे. जे जे काम असेल ते हाती घ्यायचे व ते पूर्ण करायचे. माननीय श्री.नितीन गडकरी, या सभागृहाचे विरोधी पक्ष नेते होते. ते जहाल मतवादी होते. सन्माननीय श्री.भाऊसाहेब फुंडकर हे मवाळ मतवादी अशा प्रकारचे विरोधी पक्ष नेते होते. आता मवाळ मतवादी बाजूला गेले आणि पुन्हा त्या पदी जहाल मतवादी

4..



श्री.अजित पवार.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आले आहेत. सन्माननीय श्री. विनोद तावडे यांचे सभागृहातील कामकाज गेली अनेक वर्षे सभापती म्हणून आपण पहात आला आहात. ते सभागृहात आक्रमकपणे प्रश्न मांडतात. आक्रमकता दाखवून न्याय मिळवून घेतात. माननीय मुख्यमंत्र्यांनी मघाशीच उल्लेख केला की, श्री. विनोद तावडे यांना विद्यार्थी दशेतच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेकडून कामाची संधी मिळाली. अनेक ठिकाणी पक्षाची मोठमोठी शिबिरे होतात, त्या शिबिरांना ते उपस्थित राहतात. त्या शिबिरात त्यांच्या पक्षातील विचारवंत विचार मांडतात, ते त्यांना ऐकावयास मिळतात.

सभापती महोदय, मी सन्माननीय श्री. भाऊसाहेब फुंडकर यांचे प्रथमत: अभिनंदन करतो की, एक अतिशय चांगले व्यक्तिमत्व या नात्याने त्यांनी खासदार म्हणून काम केले. दुर्देवाने भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना पक्ष यांचे सरकार असताना मंत्री पदावर काम करण्याची त्यांना संधी मिळू शकली नाही. परंतु काही लोकांच्या बाबतीत असे घडते. त्यांनी अनेक वर्षे विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते म्हणून अतिशय चांगल्या पध्दतीने जबाबदारी पार पाडली. शेतकरी हा केंद्रबिंदू मानून कापूस, सोयाबीन आणि धानाच्या बाबतीत या सभागृहात नेहमी आग्रही भूमिका घेतली ती आपण सगळयांनी बघितली आहे. आज ते बाजूला बसलेले आहेत. माननीय श्री.नितीन गडकरी साहेबांना नंतरच्या काळामध्ये देश पातळीवर नेतृत्व करण्याची संधी मिळाली, तशी आपणाला देखील राष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी मिळावी अशी आमची मनापासून अपेक्षा आहे. आपण एकत्रितपणे काही सहकारी संस्थांमध्ये काम केलेले आहे. तुमचे देखील सहकारी संस्थांशी अतिशय जवळकीचे नाते आहे. महाराष्ट्रामध्ये काम करताना किंवा राज्य सरकारमध्ये काम करताना मी सत्ताधारी पक्षात असलो, ते विरोधी पक्षात असले तरी आमच्या मनात एकमेकांबाबत आकस नसतो. शत्रुत्व मनामध्ये ठेवून आम्ही कधीही कामे केली नाहीत. खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा करुन महत्वांच्या प्रश्नांना न्याय देण्याची भूमिका दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी स्वीकारली. सन्माननीय श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी साडेसहा वर्षे विरोधी पक्ष नेता म्हणून काम केल्याबद्दल त्यांचे मनापासून कौतुक करतो. त्यांच्या पुढच्या वाटचालीकरिता त्यांना शुभेच्छा देतो व त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो अशी परमेश्वरचरणी प्रार्थना करतो.

सन्माननीय श्री. विनोद तावडे यांच्या रुपाने एका तरुण व्यक्तीला विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते पद लाभले आहे. मला परवा ते भेटले, त्यावेळी त्यांनी जीन्सची पॅन्ट घातली होती.

5...



श्री.अजित पवार.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपली विरोधी पक्ष नेता म्हणून ज्या दिवशी घोषणा होईल, त्या दिवशी जीन्सची पॅन्ट घालू नका असा मी त्यांना सल्ला दिला होता. म्हणून ते आज जीन्सची पॅन्ट न घालता अतिशय चांगला पेहराव करुन सभागृहात आलेले आहेत. त्यांचा चेहरा देखील प्रफुल्लित झालेला दिसत आहे. हिवाळी अधिवेशन सुरु झाल्यापासून आम्ही वृत्तपत्रात श्री.विनोद तावडे हे विरोधी पक्ष नेते होणार की नाही होणार यासंबंधी बातम्या वाचत होतो. ज्यावेळी सत्ताधारी पक्षाचे सरकार स्थापन केले
जाते, त्यावेळी अनेकांकडून बऱ्याच वेळा टीका केली जाते. मुख्यमंत्री कोण होणार, उप मुख्यमंत्री कोण होणार, कोणाकोणाचा मंत्री मंडळात समावेश होणार. विरोधी पक्षामध्ये देखील विरोधी पक्ष नेता नक्की कोण होणार याची अलीकडच्या काळात जोरदार चर्चा होऊ लागली होती. श्री.विनोदजी तावडे, तुम्ही आम्हाला सांगितले की, मी त्याच टीममध्ये आहे. मी फक्त ओपनिंगला आलो आहे. तुम्ही ओपनिंगला येत आहात, त्यामुळे तुम्हाला भारतीय क्रिकेट संघातील सेहवागसारखे खेळावे लागेल. आपण ओपनिंगला आल्यानंतर एक नवीन रेकॉर्ड करुन दाखवावे. तुम्ही फटके मारत बसा. आम्ही गुगली टाकण्याचा प्रयत्न करु. तुम्ही आऊट होता की फटके मारता, ते लोकांना समजेलच.

सभापती महोदय, कोकणातून आलेले श्री.विनोद तावडे यांच्याकडे मी आतापर्यंत सहजतेने बघत होतो. वास्तविक कोकणवासियांना कधी सहकारी संस्था चालविता आल्या नाहीत. त्यामुळे कोकणात सहकार चळवळ वाढली नाही. कोकणातील श्री.विनोद तावडे हे पुणे जिल्हयात आले आणि त्यांनी पुणे जिल्हयातील दौंड तालुक्यातील नाथ म्हस्कोबा सहकारी साखर कारखान्याना चालवावयास घेतला. त्या साखर कारखान्याचे त्यांनी चेअरमन पद स्वीकारले....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 15:35

श्री.अजित पवार.........

आमच्या पश्चिम महाराष्ट्रात येऊन एका कारखान्याचा चेअरमन होणे हे येड्या गबाळ्याचे काम नाही. तेथील कारखाना उत्तम चालला आहे, मी त्या भागाचे प्रतिनिधीत्व करतो. मी श्री.विनोदजी तावडे यांचे कौतुक करतो. त्यांनी तो कारखाना टेक ओव्हर करण्यापूर्वी कधीच व्यवस्थित चालला नव्हता. सन्माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील या ठिकाणी उपस्थित आहेत. ते त्याच जिल्हयातून निवडून येतात. शेतकऱ्यांना अधिक भाव ही तुमची आणि आमची अपेक्षा आहे. माझी त्यांना हात जोडून विनंती राहील की, याच पध्दतीचा कारखाना तुम्ही कोकणात आणण्याचा प्रयत्न करावा. कोकणामध्ये म्हणावी अशी कारखानदारी रुजली नाही. मी आज राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या साक्षीने सांगतो की, कोकणात एखादा चांगल्या प्रकल्प आणला तर त्यात राजकारण न आणता प्रक्रिया करणारा कारखाना असो, त्यासाठी 1:9 प्रमाणात भाग भांडवल देण्याची राज्य सरकारची तयारी आहे. संपूर्ण कोकणामध्ये जे काही उत्पादन होते किंवा जे फलोत्पादन आहे त्याच्यावर प्रक्रिया करणारा कारखाना तेथे स्थापन झाला पाहिजे.

सभापती महोदय, श्री.विनोदजी तावडे यांचा रत्नागिरीच्या शिक्षण संस्थेशी संबंध आहे. सहकारी कारखाना असेल, शिक्षण संस्था असेल, वेगवेगळया माध्यमातून त्यांचा कोकणातील संस्थांशी संबंध आलेला आहे. त्यांनी त्या त्या क्षेत्रात चांगले काम करुन दाखविले आहे. मला त्यांची मागील विधानपरिषदेची निवडणूक आठवते. काही जणांनी शंका व्यक्ती केली होती. त्यांना किती मते मिळणार? ते निवडून येणार की नाही? त्यांना कोण मत देणार? त्यांनी निवडणुकीचे सगळे बारकावे ओळखले होते. त्यांनी अशी निवडणूक लढविली की, त्यांचे अतिशय जवळचे काही लोक देखील आश्चर्यचकीत झाले. त्यांच्या पक्षाचे राष्ट्रीय नेते आश्चर्यचकीत झाले. श्री.विनोदजी तावडे यांना एवढी मते कशी मिळाली? एवढे त्यांचे सर्वांशी सलोख्याचे संबंध आहेत. आज त्यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड झाल्यामुळे आम्हाला जसा आनंद झाला तसाच आनंद तुमच्या पक्षातील सर्व राजकीय नेत्यांना व्हावा आणि त्यांनी तुमचे कौतुक करावे. तुमच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.नितीनजी गडकरी यांना 100 टक्के आनंद झाला असेल याबद्दल कोणाचेच दुमत असणार नाही. तुमच्या पक्षाच्या इतरही सर्व नेत्यांना तेवढाच आनंद व्हावा एवढीच आमची अपेक्षा आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार..........

सभापती महोदय, या सभागृहात माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते बसलेले आहेत, श्री.रामदासजी कदम बसले आहेत. आज श्री.विनोदजी तावडे हे ज्या पदावर आरुढ झाले आहेत त्या पदाच्या माध्यमातून ते एक गोष्ट करु शकतात. कर्नाटक राज्यातील सरकारने बेळगाव महानगरपालिका बरखास्त करण्याचे काम केले. सुदैवाने त्या कर्नाटक राज्यात भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष किती जबरदस्त असतात हे सगळ्यांनाच माहिती आहे. काँग्रेस पक्षाच्या माननीय अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी ठरविले की, महाराष्ट्रामध्ये अमुक काम करायचे आहे आणि तो मेसेज माननीय मुख्यमंत्र्यांना पाठविला तर ते नाही म्हणू शकतात? म्हणणार नाही. आमच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय श्री.शरद पवार यांनी माननीय श्री.छगन भुजबळ आणि मला आदेश दिला तर ते काम आम्हाला करावे लागेल. त्याचप्रमाणे आपण लोकशाही व्यवस्थेमध्ये कर्नाटकातील सरकारने जी थट्टा केली आहे त्या संदर्भात विरोधी पक्षनेते या नात्याने भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.नितीन गडकरी यांना सांगून बेळगाव महानगरपालिका पुन्हा अस्तित्वात आणण्याचे काम करावे. सरसेनापती श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितलेली एखादी गोष्ट जशी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते किंवा माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना ऐकावी लागते त्या प्रमाणेच भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय श्री.नितीन गडकरी यांचे ऐकावे लागणार आहे. आपण हे काम केले तर महाराष्ट्र तुमची विरोधी पक्षनेतेपदी झालेली निवड कायमची स्मरणात ठेवेल, कर्नाटक राज्य पण ठेवेल. आम्ही परमेश्वराजवळ प्रार्थना करु, श्री.विनोदजी तावडे हे कायम विरोधी पक्षनेतेपदी राहोत. त्या पध्दतीने चांगले काम करा. शेजारील गुजराथ राज्यामध्ये, कर्नाटक राज्यामध्ये, मध्यप्रदेश राज्यामध्ये प्रश्न निर्माण झाले तर ते प्रश्न सोडविण्याकरिता तुम्ही जहाल मतवादी असल्यामुळे उपयोग होईल.

सभापती महोदय, श्री.भाऊसाहेब फुंडकर यांच्याकडून ती अपेक्षा करणे योग्य नाही. त्यांचा साधा आणि सरळ स्वभाव आहे. हरकत नाही. तुम्ही विचार करा. तुम्ही टिपण घेत आहात याचा अर्थ आमच्याकडून काही उत्तर अपेक्षित आहे, मी तयारी केली आहे. खरोखरच एका चांगल्या सहकाऱ्याला, श्री.विनोदजी तावडे यांना भारतीय जनता पक्षाने आज विरोधी पक्षनेतेपदी बसण्याची संधी दिलेली आहे. त्या संधीचे ते निश्चितपणे सोने करतील अशा प्रकारची खात्री आणि विश्वास

..3..





श्री.अजित पवार..........

मी आपल्या सर्वांच्या साक्षीने व्यक्त करतो. विरोधी पक्षनेत्याची जबाबदारी फार मोठी आहे याची त्यांना जाणीव आहे. विधानपरिषद सभागृह हे जनतेचे प्रश्न सोडविण्याचे व्यासपीठ आहे, याची आपल्या सगळ्यांना माहिती आहे. सभागृहात विशिष्ट पध्दतीने, विधिमंडळाच्या नियमानुसार काम करण्याचा आपण सतत प्रयत्न केला पाहिजे. सत्तारुढ पक्षाच्या बाजूने आम्ही आहोत. आपण विरोधी पक्षनेते आहात. सगळ्यांनी मिळून या सभागृहाची प्रतिष्ठा वाढविण्याकरिता आणि जनतेला न्याय मिळवून देण्याकरिता काम करावयाचे आहे. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, कोकण या सगळ्याच भागाला न्याय द्यायचा आहे आणि त्यातून सभागृहाची प्रतिष्ठा वाढविण्याकरिता आणि जनतेचे प्रश्न सोडविण्याकरिता मी आपल्याला आवाहन करतो. मला खात्री आहे, सभागृहाचे कामकाज योग्य पध्दतीने चालण्यासाठी आपले सहकार्य आम्हाला सगळ्यांनाच लाभेल. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, श्री.भाऊसाहेब फुंडकर, श्री.रामदासजी कदम या सगळ्यांचे खूप सहकार्य मिळेल अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो आणि पुन्हा एकदा माननीय श्री.विनोद तावडे यांची विरोधी पक्षनेता या पदावर निवड झाल्याबद्दल अभिनंदन करतो. श्री.भाऊसाहेब फुंडकर यांना देखील पुढील वाटचालीकरिता मनापासून शुभेच्छा देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

--------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, श्री.भाऊसाहेब फुंडकर हे आज विरोधी पक्षनेता या पदावरुन पायउतार होत आहेत आणि श्री.विनोदजी तावडे यांनी ते पद ग्रहण केलेले आहे. श्री.भाऊसाहेब फुंडकर यांचे गेली पाच सहा वर्षे आपण सभागृहातील काम पहात आहोत. अतिशय उत्तम पध्दतीने विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी आतापर्यंत काम केले. सभागृह बंद पाडण्यापेक्षा जास्तीत जास्त सभागृहाचे कामकाज चालले पाहिजे आणि चर्चेच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न सुटले पाहिजेत यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. मला कल्पना आहे, अनेकदा विरोधी पक्षाच्या सदस्यांचा दबाव असतो. असे असताना सुध्दा प्रश्न सोडविण्यासाठी आपण चर्चेत भाग घेतला पाहिजे, त्यासाठी सभागृहाचे कामकाज चालले पाहिजे आणि सरकारकडून जनतेला दिलासा देणारे जे निर्णय अपेक्षित आहेत ते निर्णय पदरात पाडून घेतले पाहिजेत यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. अतिशय संयमीपणे, शांतपणे आपले म्हणणे पटवून देण्याचा त्यांचा नेहमी कल राहिलेला आहे. पक्ष शिस्त आणि संसदीय शिस्त अधिकाधिक सांभाळण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला आहे. उत्तम संसदपटू, फर्डा वक्ता, तळमळीचा कार्यकर्ता अशी त्यांची ओळख आहे. आपल्यापैकी सर्वांनाच त्यांची अशी ओळख आहे असे मला वाटते.

आपण नेहमी पाहतो, या सभागृहात जनतेचे वेगवेगळे प्रश्न उपस्थित होत असतात. श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी बिल्डर आणि इतर लोकांपेक्षा जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या प्रश्नामध्ये लक्ष घातले. कापूस उत्पादक, धान उत्पादक, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याकडे त्यांचे अधिक लक्ष होते. त्यासाठीच त्यांनी आपली वाणी आणि पदाचा पुरेपूर उपयोग करण्याचा प्रयत्न केला. विदर्भातील सिंचनाचा अनुशेष या संदर्भात अनेकदा या सभागृहात चर्चा उपस्थित केली. विदर्भात होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि त्याला कारणीभूत असणारी सावकारी या संदर्भात त्यांनी अतिशय स्पष्ट शब्दात शाब्दिक कोरडे ओढल्याचे आपल्याला पहावयास मिळाले. मुंबई शहरावर दहशतवादी हल्ला झाला, त्या वेळेला इतर कोणताही विचार न करता त्यांनी पहिल्यांदा सर्वसामान्य जनतेला शांत राहण्याचे आवाहन केले. त्या काळात शांततेच्या भूमिकेत असलेल्या श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी नंतर मात्र त्या दहशतवादी हल्ल्याबद्दल शासनाच्या विरोधात सटासट कोरडे ओढण्याचे काम केले.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ ....

योग्य वेळी जनतेमध्ये शांतता राहिली पाहिजे, पोलीस आणि सरकारला आपले काम करु दिले पाहिजे अशा मताचे माननीय श्री. भाऊसाहेब फुंडकर आहेत. ती वेळ गेल्यानंतर मात्र कोणाचे कोठे चुकले त्याचे माप त्याच्या पदरात टाकण्याचे काम भाऊसाहेब यांनी योग्य प्रकारे केले. अशा प्रकारे भाऊसाहेब एक प्रकारचे "मास बेस लिडर" आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यांच्या मागे जनता नेहमी उभी आहे.

मघाशी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे कदाचित विरोधी पक्षनेते पदावरुन जरी ते गेले तरी त्यांच्या कर्तृत्वात जरा सुध्दा कमतरता येणार नाही असा आम्हाला विश्वास आहे. राजकारणात अशा प्रकारे उलटसुलट होतच असते. माझेच उदाहरण घ्या. मी पहिल्यांदा तिकडे म्हणजे विरोधी पक्षात होतो. त्यानंतर इकडे आलो, म्हणजे काँग्रेस पखात आलो. त्यानंतर पुन्हा तिकडे म्हणजे युतीच्या काळात विरोधी पक्षनेते पदावर गेलो. त्यानंतर पुन्हा इकडे उप मुख्यमंत्री म्हणून आलो. त्यानंतर पुन्हा बाजूच्या खुर्चीत आलो, नंतर पुन्हा उप मुख्यमंत्री आणि पुन्हा आता या जागेवर आलो, पुढे काय होईल हे मात्र सांगता येणार नाही, म्हणून असे चढ-उतार सुरुच असतात. त्यात काळजी करण्याचे कारण नसते. आपण आपले राजकीय काम, जनतेसाठी आपल्या वाणीचा उपयोग सतत करायचा आहे तसेच आपल्या अंगी असलेल्या कर्तृत्वाचा उपयोग निश्चितपणे होईलच आणि जनता मात्र आपल्याला कधीही पायउतार होऊ देणार नाही. एखाद्या पदावरुन जरी पायउतार होताना दिसत असला तरी जनता मात्र आपल्याला तिच्या ह्दयातून कधीही पायउतार होऊ देणार नाही. आपले स्थान जनतेच्या मनात अढळ आहे.

महोदय, आता या पदावर माननीय श्री. विनोदजी तावडे हे विराजमान झालेले आहेत. त्यांचा मुंबईचा अभ्यास चांगल्या प्रकारे आहे. तसेच अनेक विषयांचा त्यांचा गाढा अभ्यास आहे. वयाने ते अत्यंत तरुण आहेत. त्यांची कामाची व वागण्याची पध्दत, त्यांचा सोफिस्टिकेटेडनेस व अभ्यास सुध्दा कमी नाही. कारण लहानपणापासूनच श्री. तावडेजी यांनी विविध कार्यक्रमांमध्ये भाग घेतलेला आहे. ते पक्षात बॉडीचे सरचिटणीस, कार्यकारिणीमध्ये सदस्य, पार्लमेंटरी बोर्डाचे सदस्य, मुंबई शहराचे अध्यक्ष, एवढेच नव्हे तर तरुणपणात अमेरिका व इंग्लंड येथे तीन तीन महिन्याचा शैक्षणिक सत्रासाठी शासनाच्या वतीने जाऊन आले आहेत. त्यात

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ ........

अमेरिका या देशाच्या निमंत्रणावरुन सन 1996 मध्ये "लोकशाही समाजव्यवस्था आणि परदेशातील राजकीय समाजरचना" या विषयाचा अभ्यास करण्यासाठी ते जाऊन आलेले आहे. अर्थात अमेरिकेतील लोकशाही आणि आपल्या लोकशाहीत किती फरक आहे याचा अभ्यास त्यांनी चांगलाच केला असेल. येथील लोकशाही प्रमाणेच आपल्याला काम करावयाचे आहे व त्यात आम्ही सुध्दा आपल्या बरोबर आहोत. राज्यात यापूर्वी सुध्दा श्री. विनोद तावडे यांनी राज्यातील ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा 60 वर्षे करण्यासाठी प्रयत्न केला. मुंबईत एमयुटीपीची योजना राबविण्यासाठी देखील त्यांनी आग्रही भूमिका मांडली आहे. मुंबईतील भाडेकरुंचे प्रश्न, झोपडयांत राहणाऱ्यांचे विविध प्रश्न, त्यांचे फोटो पास यासाठी सुध्दा त्यांनी लढा दिला आहे. इतकेच नव्हे तर त्यांच्यात व्यवस्थापन कौशल्य सुध्दा चांगल्या प्रकारचे आहे. म्हणून भारतीय जनता पक्षाची "परिवर्तन यात्रा" आणि "राष्ट्रीय महाविवेचन" अशा विविध कामाचे संयोजन त्यांनी केले आहे. अशा प्रकारचे संयोजन करणे लहान गोष्टी नाहीत तर अत्यंत शिस्तबध्द पध्दतीने असे कार्यक्रम करणे हे सुध्दा मोठे कौशल्य असते, ते माननीय श्री. विनोद तावडे यांनी उत्तम प्रकारे केले आहे.

महोदय, एक गोष्ट मात्र खरी आहे की, माननीय श्री. विनोदजी यांचे शारिरीक वजन कमी झालेले असले तरी राजकीय वजन मात्र वाढलेले दिसते. आमचे मात्र शारिरीक आणि राजकीय असे दोन्ही प्रकारचे वजन कमी झालेले आहे. गॅलरीत बसून खालच्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य डोक्याला हात लावत असले तरी ते जेव्हा त्या सभागृहात या जागेवर जातील तेव्हा त्यांच्या बाबतीत मी नक्कीच बोलणार आहे. अशा प्रकारे अतिशय प्रामाणिकपणे विविध क्षेत्रात, मुंबईतच नव्हे तर संपूर्ण राज्यात देखील श्री. विनोदजी यांचा संचार आहे. त्याचबरोबर कला, नाट्य क्षेत्र, साहित्य सम्मेलन अशा वेगवेगळ्या क्षेत्रात देखील ते आपल्याला दिसतील. शेतकऱ्यांचे विविध कार्यक्रम, कोकणातील काग्रक्रम, शिक्षणावरील कार्यक्रम, कोकणच्या आंबा महोत्सवात सुध्दा ते प्रमुख भूमिकेत दिसून येतील. लोकसभा सदस्या माननीय श्रीमती सुप्रिया सुळे यांच्या कार्यक्रमात देखील ते हजर असतात. अशा प्रकारे जे चांगले काम आहे त्याला विनोदजींचा नेहमीच पाठिंबा असतो.

आपण आज ज्या पदावर गेला त्या पदाचा मला चांगला अनुभव आहे. मला तेथे चार वर्षे

.....4



PFK/ पूर्वी श्री. भोगले..... 15:45

श्री. छगन भुजबळ .........

मिळाली. भाऊसाहेबांना सव्वा सहा वर्षे मिळाली, माजी विरोधी पक्ष नेते श्री. रामदास कदम यांनी सुध्दा त्या पदावर काम केलेले आहे. तसेच आताच माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यानुसार या पदावर आपल्याला आणखी दहा वर्षाचा काळ मिळू दे, आमची काहीच हरकत नाही. ती जागा अतिशय महत्वाची आहे. आपण जेव्हा सत्तेत होता तेव्हा आम्ही त्या बाजूला होतो. अशा प्रकारे सरकार कोणतेही असले तरी काम करण्याची तयारी ठेवली पाहिजे. सरकारवर तुटून पडण्याची हिंमत असेल, जनतेचे खरे प्रश्न हातात असतील तर आपण त्या खुर्चीला योग्य प्रकारे न्याय देऊ शकता हे अनेकांनी पटवून दिलेले आहे. त्याच खुर्चीवर माननीय विष्णू अण्णा पाटील होते, नरेंद्र बोरगांवकर, मोरे, सुभाष शंकर हे सुध्दा होते, त्यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे कारकीर्द गाजविलेली आहे. दोन्ही सभागृहे सारखीच असतात पण त्यासाठी आपली काम करण्याची तयारी पाहिजे व जनतेचे प्रश्न उचलून धरण्याची मानसिकता पाहिजे. अशीच व्यक्ती जनतेचे प्रश्न चांगल्या प्रकारे मांडू शकते, अत्यंत हिरीरिने व पोटतिडिकीने मांडू शकते आणि यावरच त्या खुर्चीचे व खुर्चीत बसणाऱ्या नेत्याचे यश अवलंबून असते.

आज आपल्याला ती संधी मिळाली आहे. आम्ही चूका केल्या म्हणून ती संधी आपल्याला मिळाली असे नाही. कारण आम्ही चुका केल्या नाही तर ती संधी तुम्हाला कधीच मिळणार नाही, ती तुम्हाला शोधावी लागेल. आपण सत्तेत होता तेव्हा मात्र आम्हाला अशी संधी शोधावी लागत नव्हती कारण तुम्ही सगळे इकडे होता. तेव्हा दररोज काही तरी मिळतच होते, आता तर कमीच मिळते. तरी देखील हरकत नाही, आपण काळजी न करता काम करीत रहावे आणि लक्षात ठेवावे की हे सभागृह राज्याच्या 11-12 कोटी जनतेचे एक आशास्थान आहे. राज्यातील कार्यकर्त्यांचे, शेतकरी, कष्टकरी, झोपडपट्टी वासियांचे असे सगळ्यांचे प्रश्न येथेच धसाला लागतात. राज्याचे संरक्षण त्याचबरोबर या सभागृहात गोरगरिबांच्या पोटाला अन्न मिळण्याचे काम सुध्दा होते. या सभागृहाच्या माध्यमातून नोकऱ्या देण्याचे काम सुध्दा आपण करु शकतो. राज्यातील जनतेचे पाणी, घरे असे प्रश्न देखील सभागृहाच्याच माध्यमातून सोडवू शकतो. अशा प्रकारे अतिशय महत्वाच्या ठिकाणी बसण्याची व काम करण्याची संधी आपल्याला मिळाली. जेथून आपण काय बोलता, कोणाची बाजू घेता, कशा पध्दतीने बाजू मांडता याकडे संपूर्ण राज्याचे, राज्यातील जनतेचे लक्ष असते. यासाठी आपण आतापर्यंत केलेले काम, आपला अनुभव निश्चितपणे उपयोगी

....4

श्री. छगन भुजबळ .........

पडल्याशिवाय राहणार नाही आणि अशा वेळेस सर्व सत्ताधारी सुध्दा आपल्या बरोबर असतील तसेच आपल्याकडील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ सन्माननीय सदस्य मग त्यात माननीय श्री. दिवाकर रावतेजी, डॉ. नीलम गोऱ्हेजी, माजी विरोधी पक्षनेते श्री. रामदास कदम साहेब अशी थोर मंडळी सुध्दा आपल्यासोबत आहेतच. अशा प्रकारे आपल्याला पुढील कारकीर्द अत्यंत चांगली जावो तसेच माननीय श्री. भाऊसाहेब फुंडकर यांना आताच म्हटल्याप्रमाणे यापेक्षाही चांगल्या जागेवर काम करण्याची संधी मिळो अशा शुभेच्छा व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

-------

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम (वने मंत्री) : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांच्या जागी भाजपाचे तरुण, तडफदार नेते श्री. विनोद तावडे यांची आज विरोधी पक्ष नेते म्हणून त्यांच्या पक्षाने निवड केलेली आहे. त्यामुळे मी मनापासून त्यांचे अभिनंदन करतो. मघा पासून जे जे वक्ते बोलले ते माननीय भाऊसाहेब फुंडकर हे मवाळ आहेत, असे आहेत, तसे आहेत असे बोलले. परंतु आक्रमक, अक्राळविक्राळपणा केला तरच या सदनात मुद्दा मांडता येतो असे नाही तर भाऊसाहेबांनी आपला मुद्दा कधीही सोडला नाही. आपला मुद्दा शांतपणे,संयमाने ते मांडत होते. त्यांनी आपला मुद्दा मांडतांना कधी कॉम्प्रमाईज केले नव्हते. माननीय भुजबळ साहेबांनी सांगितल्या प्रमाणे एखाद्या माणसाला जागेने महत्व प्राप्त होते. परंतु भाऊसाहेब हे मास लिडर आहेत. भाऊसाहेब माणसांचा नेता आहे. पद हे जात येत असते त्यामुळे पदाला मी जास्त महत्व देत नाही. माननीय भाऊसाहेब हे विदर्भातील असून त्यानी सर्वांशी चांगले संबंध ठेवलेले आहेत. माननीय भाऊसाहेबांची कारकीर्द उत्तम झालेली आहे, त्यांना यापुढे अधिक चांगली संधी मिळेल असा मला विश्वास आहे. संधी कधी चालून येईल ते सांगता येत नाही. आजचा माणूस तेथे जातो तर तेथील माणूस येथे येत असतो. त्यामुळे मी माननीय भाऊसाहेबांच्या पुढील कारकिर्दीला शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांच्याशी माझे फार पूर्वीपासूनचे संबंध आहेत. त्यांची तोडा-फोडा विद्यार्थी संघटना होती तेव्हापासून माझी त्यांची मैत्री आहे. परंतु तशा परिस्थितीत सुध्दा त्यांना एकदा शहाणपण सुचले व त्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रातील माणसाची म्हणजे माझी भेट घेतली. लोकमान्य टिळकांनी डी.ई. सोसायटी काढली तर भाऊराव पाटलांनी ग्रामीण भागात संस्था काढल्या. आपले सर्व स्ट्रक्चर्स वेगळे आहे. खरे म्हणजे त्या दिवसापासून आमची मैत्री पक्की झाली. आमचा पक्ष काय किंवा त्यांचा पक्ष काय आम्हाला वरती जमवावेच लागते तसे माननीय तावडे साहेबांनी जमवल्यामुळे ते आज विरोधी पक्ष नेते बनू शकले.

सभापती महोदय, मी माननीय तावडे साहेबांना जुना मित्र म्हणून सल्ला देऊ इच्छितो की, अक्राळ विक्राळपणा न करता आपल्याला आपला मुद्दा व्यवस्थित मांडता येत असतो. खरे म्हणजे शांत राहून आपले प्रश्न सोडवून घेता येतात. शांतपणाची भूमिका त्यांनी सुरुवातीपासून ठेवली तर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम .....

ते मॅच्युअर्ड लिडर म्हणून पुढे येऊ शकतील. माननीय विनोद तावडे सभागृहात बोलावयास उभे राहिले म्हणजे त्यांचे भाषण ऐकावयास जावे असे इतर सदस्यांना वाटले पाहिजे. जसे विधान परिषदेत माननीय गडकरी साहेब व विधान सभेत माननीय मुंडे साहेब बोलावयास उभे राहिले की, आम्ही त्यांचे भाषण ऐकावयास जात होतो. तसेच काम विरोधी पक्ष नेते श्री.खडसे साहेबांनी सुरु केले आहे. त्यांनी आज चांगले विचार मांडलेले आहेत. त्यामुळे आपले भाषण दुसरे ऐकावयास येतील हे समजून माननीय तावडे साहेब पुढील काळात काम करतील याबाबत माझ्या मनात शंका नाही. त्यांनी देशाच्या तसेच महाराष्ट्राच्या युवा शक्तीचे नेतृत्व केलेले असून त्यांनी निरनिराळ्या विषयांचा देखील अभ्यास केलेला आहे. त्यामुळे माननीय तावडेसाहेबांनी पुढील काळात फार मोठे भवितव्य आहे.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात आमच्या पक्षाची एक साधी गोष्ट सांगतो. कै.पंडित नेहरु आणि कै. वल्लभभाई पटेल यांच्या संदर्भात विषय निघाला होता. त्यावेळेस पटेल साहेबांच्या ताब्यात काँग्रेस पक्ष होता. त्यावेळेस लोक म्हणाले आता सर्व पक्ष आपल्याच हातात आहे तेव्हा वल्लभभाई पटेल म्हणाले, तसे नाही, नेहरु जातात तेथे लोक उभे राहतात, आपल्या हातात नुसते दप्तर आहे. या पध्दतीची स्थिती माननीय भाऊसाहेब फुंडकराची आहे. विदर्भातीलच नाही तर सर्व भागातील लोक आपल्याला मनापासून मानतात. आपले नेतृत्व मास लिडरचे असल्यामुळे आपला पुढील काळ राजकीय दृष्टया उत्तम जावो अशी शुभेच्छा देतो, तसेच माननीय तावडे साहेबांचीही कारकीर्द चांगली, उत्तम होवो आणि तशी ती होईल अशी अपेक्षा व्यक्त करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) : आदरणीय सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते पदी माननीय श्री. विनोद तावडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. विरोधी पक्षाचे नेतृत्व माननीय तावडे साहेबांकडे आल्याबद्दल मी त्यांचे स्वागत व अभिनंदन करतो.

गेल्या अनेक वर्षापासून माननीय फुंडकर साहेबांचे तसेच आमचे नाते घरोब्याचे होते. सन्मान, मानसन्मान, मीपणा असे त्यांनी कधी केले नाही. कधीही या, कुठेही जा, हक्काने बसा, कधीही फोन करा त्यांनी कधीही याबाबतीत मीपणा ठेवला नाही. माननीय भाऊसाहेबांनी व्रतस्थ म्हणून विरोधी पक्ष नेते पद सांभाळले. शहरी जीवनाच्या संदर्भात त्यांनी खास असा भर दिला नाही. परंतु ग्रामीण जीवनाच्या कोणत्याही प्रश्नाला या सभागृहात सन्मानित केले नाही असे कधी घडले नाही. विरोधी पक्ष नेते पदाच्या संदर्भात ब-याच सन्माननीय मंत्री महोदयांनी, भाऊसाहेबांच्या संदर्भात विचार व्यक्त केलेले आहेत.

मी सहकार आणि पणन मंत्री होतो तेव्हा माननीय भाऊसाहेब फुंडकर हे कापूस एकाधिकार खरेदी योजनेच्या अध्यक्ष पदी होते. तेव्हा त्यांचा आणि माझा खास परिचय नव्हता. माननीय भाऊसाहेब जेव्हा या सभागृहात आले तेव्हा त्यांच्याशी माझा ख-या अर्थाने परिचय झाला. माननीय भाऊसाहेब हे सुरुवातीला आमदार झाले, त्यानंतर ते अकोल्याचे खासदार झाले. परंतु मला त्यांचे एक आठवते की, माननीय फुंडकर साहेबांना जेव्हा भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष पद मिळाले त्यावेळेस त्यांनी शतप्रतिशत भाजप अशी भाजपाला हिंमत देणारी घोषणा केली तेव्हापासून मी त्यांना चांगले ओळखतो. भारतीय जनता पक्ष प्रत्येक गावामध्ये, प्रत्येक खेडयामध्ये पोहचलाच पाहिजे असा ठाम निर्धार त्यांनी केला होता. भाऊसाहेब जसे संघटक आहेत तसाच मी सुध्दा संघटक आहे. राजकारणात मी कमी पडत असेन परंतु मी संघटनात्मक काम करीत असतो. विरोधी पक्ष नेते म्हणून आम्ही माननीय गडकरी साहेबांना पाहिले होते. त्यावेळी विरोधी पक्ष नेता वेलमध्ये उतरणारा होता. आता माननीय तावडे साहेब विरोधी पक्ष नेते झाल्यामुळे आम्हाला पुन्हा वेलमध्ये उतरण्याची नवीन उमेद मिळाली आहे. माननीय गडकरी साहेबांनंतर माननीय तावडे साहेब वेलमध्ये उतरतील अशी आम्हाला आशा आहे.

माननीय तावडे साहेब वेलमध्ये येऊन सरकारला शङ्खू ठोकतील अशी अपेक्षा आहे. माननीय भुजबळ साहेब भारत, इंडियाच्या संदर्भात सांगत होते. भारताकडे दोन दृष्टीने बघणारे नेतृत्व तुमच्याकडे आहे हे मला ..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

आज समजून आले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या सन्मानाला साजेसे कौतुकाचे भाषण केले. माननीय मुख्यमंत्री हे दिल्लीतील आहेत परंतु माननीय उपमुख्यमंत्री हे महाराष्ट्रातील कसलेले नेते आहेत. माननीय मुख्यमंत्री सबुरीने झोडतात तर माननीय उपमुख्यमंत्री ताबडतोब फटकावयाचे काम करीत असतात. दादांनी सांगितले की, हे दोन्ही इंजिनिअर आहेत. खरे म्हणजे इंजिनिअरचे काम नट बोल्ट ढिल्ल् करावयाचे असते. त्यामुळे सत्ताधारी पक्षाचे नट बोल्ट टाईट करावयाचे की, ढिल्ले करावयाचे हे काम आता तावडे साहेब करतील अशी अपेक्षा आहे. माननीय फुंडकर साहेबांनी त्यांच्या पूर्ण कारकिर्दीत शेतक-यांच्या संदर्भात समर्पितता निर्माण केलेली असल्यामुळे माझी त्यांच्याशी जवळीक आहे. त्यांचे आणि माझे सभागृहाच्या कामकाजात नेहमी एकमत असे. आम्ही दोघे वेगवेगळे मुद्दे सभागृहात उपस्थित करीत होतो.

गर्दी जमवणारा लिडर म्हणजे मासबेस असतो काय ? लोकांमध्ये जाऊन, लोकांशी हितगुज करुन, लोकांच्या समस्या व्यासपीठावर मांडणे त्याला मी मासबेस नेता समजतो.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

गर्दी कमी जमत असेल, मासबेस सांगण्या मागचा उद्देश मला समजला असला तरी सभेला प्रचंड गर्दी जमते याचा अर्थ मासबेस असा होत नाही. सर्वसामान्य जनतेशी संवाद साधण्याचे ज्याला जमते, तो मासबेस. गावामध्ये गेल्यानंतर तेथील लोकांना आनंद वाटतो तो मासबेस. सभेला गर्दी होते. परंतु त्या गर्दीमध्ये हौशे नौशे गवशे येतात. त्या गर्दीमध्ये सगळेच आपलेच असतात असेही नाही आणि सर्वच आपले नसतात असेही नाही.

सभापती महोदय, माननीय श्री.नितीन गडकरीसाहेब देशपातळीवर गेले. माननीय श्री.पांडुरंग फुंडकर साहेब देखील देशपातळीवर जातील. त्यांच्याकडे जे सामर्थ्य आहे त्या बळावर त्यांनी तेथे प्रचंड ताकदीने काम करावे. देशपातळीवर गेलेले सर्वश्री नितीन गडकरी आणि गोपीनाथ मुंडे राज्यामध्ये रमताना दिसतात. ते देशपातळीवर रमताना दिसत नाहीत. माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांचा एक पिंड आहे. त्यांना तो ताकदीने मिळाला तर ते त्यांच्या पक्षाला जरुर पुढे नेतील. त्यांचे नेतृत्त्व ग्रामीण भागाने स्वीकारलेले असल्यामुळे ग्रामीण भागात भारतीय जनता पक्षाच्या कोणत्याही पदावर ते असो किंवा नसो, परंतु फुंडकर हे विदर्भातील नेतृत्वाच्या बाबतीत अपरिहार्यता आहे हे स्वीकारावे लागेल. हे सिध्द करण्यासाठी श्रम लागतात. लोकांमध्ये जाण्यासाठी श्रम लागतात आणि त्यांनी ते केलेले आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी काहींनी स्वत:च्या ठेवणीतील खास अस्त्रे वापरली त्याबद्दल मला फार आनंद झाला. विरोधी पक्ष नेतेपदी श्री.विनोद तावडे यांची निवड झाली म्हणून मी त्यांचे मनापासून स्वागत करतो. आमच्या दोघांमध्ये चांगले ममत्व आहे. ते विद्यार्थी संघटनेतून आलेले आहेत. संघर्षातून आलेले आहेत. श्री.विनोद तावडे आपणास कधी अंगावर येताना दिसणार नाहीत. परंतु त्यांच्यामध्ये वेगळ्या पध्दतीचा असलेला चिवटपणा आपणास यापुढे दिसेल.

सभापती महोदय, याठिकाणी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी जे मार्गदर्शन केले त्याबद्दल मला चांगले वाटले. बहुरुपी कुठेही गेला तरी तो आपले रुप बदलत नाही. तो आपले कौतुक करीत असतो. श्री.छगन भुजबळ यांनी जे सांगितले त्याचे मला कौतुक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

वाटते. आपण त्यांना काय सल्ला दिला ते मी सांगत आहे. आम्ही चुका केल्या तर तुम्ही मोठे व्हाल असे त्यांनी सांगितले. त्यांनी आतापर्यंत ज्या काही चुका केल्या आणि आम्ही त्या उजेडात आणल्या. परंतु ते हिमनगाचे टोक आहे. त्याचे मूळ अजून सापडत नाही. शोधा म्हणजे सापडले असेच तुम्ही म्हणाला होता. खालच्या सभागृहात टोलच्या संदर्भात 10 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार निघाला तरी ते म्हणत होते की, तो एवढुसा होता. आपण तो शोधा. चुकांचे गणित मांडताना त्यांच्यामध्ये किती चाणाक्षपणा आहे तो दिसला. आणखी 10 हजार कोटींचा गैरव्यवहार शोधण्याचे आव्हान त्यांनी दिले. हे सर्व शोधण्यासाठी त्यांनी श्री.विनोद तावडे यांना आव्हान केले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या कारकिर्दीमध्ये एक खंत आहे. ती खंत कधी पूर्ण होणार हे मी माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना विचारतो. या ठिकाणी मी आणि श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सावकारी संबंधीचा विषय लावून धरला. विदर्भामध्ये आत्महत्या आणि सावकारी यांचे दुर्दैवी नाते आहे. विदर्भामध्ये शेतकऱ्यांसाठी सावकार हा यमदूत झालेला आहे हे उघड सत्य आहे. तेव्हा या ठिकाणी सावकारी कायदा आणला त्यावेळी आम्ही सरकारचे स्वागत केले. त्यांनी आपल्या भाषणात सातत्याने सावकारी कायदा केव्हा आणणार या बाबत सरकारकडे विचारणा केली. कारण त्यांच्या जिल्ह्यामध्ये सावकारी जाच जास्त होता. त्यातून काय निर्माण झाले हे महाराष्ट्राने पाहिले आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांना मान खाली घालण्याची पाळी आली हे या माणसाने पाहिले आणि त्या कायद्यासाठी आम्ही सर्व आग्रही राहिलो. सरकारने कायदा आणल्या नंतर आम्ही त्यातील तरतुदी बदलल्या नाहीत किंवा अन्य काही सुधारणा सुचविल्या नाहीत. कारण आमच्या दृष्टीने सावकारी कायदा येणे आवश्यक होते. आपण या ठिकाणी मंजूर केलेला कायदा श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या विरोधी पक्षाच्या कारकिर्दीमध्ये अमलात आला असता त्यांच्या विरोधी पक्षाच्या कारकिर्दीचे मोल ठरले असते. परंतु दुर्दैवाने त्या विधेयकावर अजून माननीय राष्ट्रपतींची सही न झाल्यामुळे तो कायदा अंमलात आलेला नाही. ही खंत मला वाटत आहे. त्या कामाकरिता

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्यांनी आपला पूर्ण सहा वर्षाचा कालावधी पणाला लावला होता. परंतु ते काम झाले नाही ही खंत मला येथे नोंदवावीशी वाटते. तो कायदा त्यांच्या विरोधी पक्ष नेते पदाच्या कारकिर्दीमध्ये झाला असता तर तो मैलाचा दगड झाला असता. श्री.पांडुरंग फुंडकर यांचा सन्मान करावयाचा असेल तर सरकारने शेतकऱ्यांसाठी चांगले पॅकेज त्यांच्या कारकिर्दीत जाहीर करावे. परंतु आपल्याला माहीत आहे की ते पॅकेज चांगले नाही. तेव्हा आता आमच्या श्री. विनोद तावडे यांची लढाई सरकारच्या पॅकेज बरोबर होईल.

सभापती महोदय, या ठिकाणी विचारण्यात आले की, आपण कोणाचे स्वागत करीत आहात ?अभिनंदन करताना कोकणी माणसाला हिणवण्याचे काम केले तर बरे वाटते. आपल्यामध्ये देखील मिश्कीलता आहे. दादांनी सांगितले की, श्री.विनोद तावडे यांनी कारखाना घेतला. मला थोडी भीती वाटली. ते आमच्या भागात आले. त्यांनी बंद असलेला कारखाना घेतला आणि तो सुरु करुन दाखविला. त्यांना आव्हान देण्यात आले की, आपण तो कारखाना नीट चालविणार आहात की तो पूर्वी सारखाच बंद पाडणार आहात. त्यांच्या बाबतीत सांगण्यात आले की, कोकणामध्ये काही करता येत नाही म्हणून तुम्ही सर्व इकडे येऊन काम करीत आहात. कोकणामध्ये कारखाना कधी काढणार ? श्री.रामदास कदम यांना हे काम जमले नाही असे दादांनी सांगितले. मी त्यांना आपल्यामार्फत सांगू इच्छितो की, कोकणामध्ये कोकणी माणूस उद्ध्वस्त करणारे जैतापूर सारखे प्रकल्प सरकार आणत आहे त्याचे सरकारने आत्मचिंतन केले तर ते जास्त बरे होईल. श्री.विनोद तावडे यांना भांडवल देतो असे आमिष देखील दिलेले आहे. आपण पश्चिम महाराष्ट्रात येऊ नका. आम्ही तुम्हाला भांडवल देतो. आपणास कोकणात काय करायचे ते करा पण पश्चिम महाराष्ट्रात येऊ नका. आपण घाटावर येऊ नका असे दादा सांगत होते.

श्री.विनोद तावडे यांना पाहिल्यानंतर आम्हाला पुन्हा श्री.नितीन गडकरी आल्यासारखे वाटते. कारण आता आमच्या बरोबर वेलमध्ये उतरण्यास एक समर्थ नेता आला आहे. विरोधी पक्ष नेत्याला सरकार सावरुन बसते की तो सरकारला सावरायला आला आहे असे वाटते, यामध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

विरोधी पक्ष नेत्याचे कर्तृत्व आहे. मी आपणास एकच सांगतो श्री.विनोद तावडे तुम्हाला कळणार नाहीत. ते आमच्या मदतीने सरकारला सावरुन बसायला लावतील अशी मला त्यांच्या नेतृत्वाबाबत खात्री आहे. ते विद्यार्थीदशेपासून तावून सुलाखून बाहेर आलेले आहेत. ते तरुण आणि तडफदार नेते आहेत. आता त्यांच्यावर मोठी जबाबदारी आलेली आहे आणि त्यांना ती कडवटपणे पार पाडायची आहे. त्यांची विरोधी पक्ष नेते पदी घोषणा झाली त्यावेळी त्यांनी आदरणीय शिवसेना प्रमुखांना अभिप्रेत असलेले स्वप्न साकारुन या महाराष्ट्रामध्ये पुन्हा शिवशाही स्थापन करण्याकरिता माझ्या पदाचा वापर करेन अशी घोषणा केली. त्या घोषणेचे मी स्वागत करतो.

श्री.छगन भुजबळ साहेब, तुम्ही या बाजूला आल्यानंतर आपणास हे पद मिळेल की नाही मला माहीत नाही. मी परमेश्वराकडे प्रार्थना करतो की, श्री.विनोद तावडे यांच्या नेतृत्वातून आम्ही विरोधी पक्षाचे असे काही कर्तृत्व उभारण्याचा प्रयत्न करु की, तुम्हाला या बाजूला बसविल्या शिवाय स्वस्थ बसणार नाही. तेव्हा तुम्ही या पदावर बसण्यासाठी तजवीज करावी. मी पुन्हा एकदा श्री.विनोद तावडे यांना शुभेच्छा देतो. श्री.भाऊसाहेब फुंडकर आपण येथे बरोबरीने काम करणार आहोत. पक्षाकडून जे आदेश होतील त्या प्रमाणे मिळेल त्या पदावर काम करुन आपला पक्ष पुढे नेऊ एवढी आपणास शुभेच्छा देतो.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

जय हिंद, जय महाराष्ट्र बोलता बोलता मी मुद्दाम थांबत आहे. याचे कारण जय हिंद म्हणतांना त्यांनी भारत, हिंदुस्थान सांगितला. दादांनी मात्र माननीय श्री. विनोद तावडे आपण सावध व्हा असे सांगितले. एका जाहिरातीमध्ये माकडाच्या हातामध्ये काही तरी चांगली वस्तू दिल्यामुळे तो खूष असतो, परंतु त्या ठिकाणी मारलेल्या पाचरीमध्ये त्याचे शेपूट अडकते त्यावेळी त्याला आपल्याला काहीतरी गोड देऊन आपले शेपूट अडकले हे त्याला समजते. या कौतुकाचा अर्थ आपण समजून घ्यावा, कर्नाटकाची पाचर जरी तुम्हाला मारली असली तरी या महाराष्ट्रातील भारतीय जनता पक्ष हा मराठी माणसांबरोबर आहे. आपण त्या दिवशी सांगितले की, दादा तुम्ही चिंता करु नका. अशा पाचरीमध्ये आम्ही अडकणार नाही. त्या पाचरीमध्ये तुम्हाला अडकविल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. अशाप्रकारे यापुढील कामकाज करीत असतांना महाराष्ट-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या वेळी माननीय श्री. छगन भुजबळ साहेब हे आमच्याबरोबर असतील याची मला खात्री आहे ती गोष्ट आम्ही केल्याशिवाय राहणार नाही. पुन्हा एकदा जय महाराष्ट्र, धन्यवाद.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, आज या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड झाली आहे म्हणून त्यांचे अभिनंदन करण्यासाठी आणि माननीय श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी साडे सहा वर्षे उत्तम प्रकारे या सभागृहामध्ये विरोधी पक्षनेते म्हणून काम केले आहे त्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, गेली साडे सहा वर्षे माननीय श्री. भाऊसाहेब फुंडकर हे विरोधी पक्षनेते असल्यापासून आणि जवळ जवळ आठ ते साडे आठ वर्षे संसदीय कार्य मंत्री म्हणून मी काम करीत असल्यापासून त्यांच्याबरोबर माझा संबंध आला आहे. अतिशय सालस आणि विचारी व्यक्तिमत्व असून प्रत्येकाला बरोबर घेऊन जाण्याची भूमिका त्यांनी सातत्याने आपल्या कार्यकाळात पार पाडली आहे. या सभागृहामध्ये अनेक कटू प्रसंग निर्माण होत असतात. सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये सुध्दा अनेक वेळा त्यामधून मार्ग काढण्यासाठी एकत्र बसावे लागते. परंतु आपण नेहमी सामंजस्याची भूमिका घेतली आहे. माननीय श्री. भाऊसाहेब, आपला आणि माझा 1995 सालापासूनचा परिचय आहे. आपण या सभागृहामध्ये नेहमी नि:स्वार्थीपणे कोणताही विषय मांडीत असतांना, कोणतीही भूमिका मांडीत असतांना राज्यातील शेतकऱ्याचे किंवा राज्यातील समाजाचे हित डोळयासमोर ठेवून विषय मांडीत आला आहात. आपण आपल्या वक्तृत्वातून त्या विषयाला न्याय देण्याची भूमिका पार पाडीत होता. विरोधी पक्षाचा नेता म्हणून आपण या सभागृहात अतिशय प्रभावीपणे काम केले आहे. सभापती महोदय, एखादे पद मिळाले किंवा एखादे पद गेल्यामुळे त्या माणसाची उंची मोजली जात नाही. परंतु आपण ज्या प्रामाणिकपणे काम करतो तो प्रामाणिकपणा आपल्या पुढील वाटचालीसाठी निश्चितपणे उपयोगी पडतो, तो पडावा यासाठी माझी आपणास सदिच्छा आहे. आपल्या पुढील कार्यासाठी माझ्या मनापासून शुभेच्छा आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय श्री. विनोदजी तावडे यांना देखील विरोधी पक्षचा नेता या माध्यमातून एक चांगली संधी प्राप्त झाली आहे. विद्यार्थी दशकापासून अतिशय तळमळीने आणि संघर्षाच्या माध्यमातून उभा राहणारा हा एक कार्यकर्ता आहे. फार कमी वय असताना तरुणपणामध्ये विरोधी पक्षनेतेपदावर काम करण्याची त्यांना संधी प्राप्त झाली आहे. मागील विधान परिषदेची झ ालेली निवडणूक अवघड असतांनाही आपण यश प्राप्त केले कदाचित आपण विरोधी पक्षनेतेपदी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. हर्षवर्धन पाटील....

यावे असे नियतीला वाटत असेल, कालच्या निवडणुकीमध्ये आपल्याला चांगल्या प्रकारचे यश मिळाले आहे. विरोधी पक्ष नेतेपदाच्या कारकिर्दीसाठी मी आपणास मनापासून शुभेच्छा व्यक्त करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी एक गोष्ट सांगून मी माझे भाषण संपविणार आहे. विरोध पक्षनेत्याचे आसन आणि साखर कारखानदारी यांचा फार जवळचा संबंध दिसतो. यापूर्वीच्या काळात माननीय श्री. छगन भुजबळ साहेब हे या सभागृहाचे विरोधी पक्षनेते होते. ते देखील साखर कारखानदारीमध्ये मोठया प्रमाणामध्ये उतरले आहेत. त्या नंतरच्या काळात माननीय श्री. नितीन गडकरी साहेब हे विरोधी पक्षनेते झाले. त्यांनी सुध्दा दोन-तीन कारखान्यांच्या माध्यमातून विदर्भामध्ये चांगली कारखानदारी उभी केली आहे. माझ्या जिल्ह्यामध्ये नाथ म्हसकोबा नावाचा साखर कारखाना असून त्या कारखान्याचे चेअरमन माननीय श्री. विनोदजी तावडे आहेत. याला अपवाद फक्त माननीय श्री. भाऊसाहेब फुंडकर आहेत.कदाचित ते विदर्भातील असल्यामुळे कापसामध्ये, जिनिंगमध्ये, सूत गिरण्यांमध्ये त्यांचा इंटरेस्ट जास्त आहे. माननीय श्री. तावडेजी निश्चितपणे आपल्याला साखर कारखानदारीचा अनुभव असल्यामुळे सहकार मंत्री म्हणून माझे देखील या पुढील बरेचसे काम सोपे होईल. बऱ्याच वेळी या सभागृहात शेतमाल भावाचे, कारखानदारीचे प्रश्न उपस्थित केले जातात. ज्या व्यक्तीला त्या क्षेत्रातील अनुभव असतो त्याच्या अनुभवाचा या पुढील काळात आपल्याला निश्चितपणे उपयोग करुन घेता येईल.

सभापती महोदय, माननीय श्री. छगन भुजबळ साहेब आपल्या भाषणामध्ये म्हणाले की, विरोधी पक्षनेत्यामध्ये मोठी ताकद असल्यामुळे आपण अतिशय प्रभावीपणे काम करावे. मी माननीय श्री. भुजबळ साहेबांना विनंती करणार आहे की, आपण माननीय श्री. तावडे साहेबांना सर्व काही शिकवू नका. पुढे त्याचा त्यांना त्रास होईल. माननीय श्री. विनोदजी तावडे साहेब मला आपल्याला विनंती करावयाची आहे की, माननीय श्री. दिवाकर रावते साहेब आपल्याला आक्रमक म्हणाले. ठीक आहे, प्रत्येक वेळी आक्रमक राहून सुध्दा चालत नाही. आक्रमक केव्हा रहावयाचे आणि मवाळ केव्हा रहावयाचे, सामंजस्याची भूमिका केव्हा घ्यावयाची आणि कडक भूमिका केव्हा घ्यावयाची हे आपण ठरविले पाहिजे. माननीय सदस्य श्री. मनिष जैन हे प्रश्न विचारण्यासाठी उभे राहिल्यानंतर माझ्या अंगावर धावून येतात की काय असे मला वाटते. आम्ही दोघे बरीच वर्षे बरोबर काम केले असल्यामुळे त्यांचा स्वभाव मला माहीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.हर्षवर्धन पाटील....

विरोधी पक्ष नेता म्हणून आपणावर आता एक फार मोठी जबाबदारी आलेली आहे. या पुढील काळात विधिमंडळाचे कामकाज, सभागृहाचे कामकाज करतांना वेळोवेळी काही प्रसंग निर्माण होतील त्यावेळी आपण माननीय श्री. रावते साहेबांचा सल्ला ऐकू नका. ते "वेल" मध्ये या असे आपणास म्हणाले, विरोधी पक्षनेत्याने कधीही "वेल"मध्ये यायचे नसते. कदाचित हा एक त्यांचा अंतर्गत डाव असू शकेल. शिवसेनेला वाटते की, भाजपचा विरोधी पक्षनेता कधी एकदा "वेल" मध्ये जातो आणि कधी एकदा त्यांचे नाव कमी होते. म्हणजेच आपल्याला "वेल"मध्ये टाकण्याचा हा त्यांचा डाव आहे. याकरिता माझी आपणास विनंती आहे की, विरोधी पक्षनेत्यांनी आपल्या जागेवरच उभे रहावे. सभागृहामध्ये तुमचा वचक असा असला पाहिजे की, तुम्ही जागेवर उभे राहिल्यानंतर सर्वजण खाली बसले पाहिजेत. ही अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करतो. तुमचे टीम वर्क चांगले आहे, तुम्ही संघटक आहात. तुम्ही सर्वांना बरोबर घेऊन जाता याचा आम्हालाही चांगला अनुभव आहे. म्हणून मी आपल्याला पुन्हा एकदा शुभेच्छा व्यक्त करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपलेही आभार मानतो. धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सर्वात तरुण विरोधी पक्षनेते पदाचा मान माननीय श्री. विनोद तावडे यांनी मिळविला आहे. सर्वश्री रा.सू.गवई, एन.डी.पाटील, दे.मा.कराळे, विठ्ठलराव हांडे इत्यादी नेत्यांना या सभागृहाचे विरोधी पक्षनेते म्हणून मी गेल्या 1972 सालापासून पहात आलो आहे. या सभागृहामध्ये विरोधी पक्षनेत्याला कॅबिनेटचा दर्जा मिळाल्यानंतर 1972 ते 1974 च्या दरम्यान कॅबिनेट मंत्र्यांचे अधिकार प्राप्त झाले. त्यानंतर झालेले विरोधी पक्षनेते सुध्दा मी पाहिले आहेत. मला वेळ मिळाला नाही म्हणून मला ग्रंथालयामध्ये जाता आले नाही. त्यामुळे पूर्वीचे विरोधी पक्षनेते कोण होते याची माहिती मी घेऊ शकलो नाही. माननीय श्री. विनोदजी तावडे हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे. दादांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. ते क्रीडा क्षेत्रात कार्यरत आहेत, माननीय खासदार श्रीमती सुप्रियाताई सुळे यांच्याबरोबर क्रिकेटची मॅच पहातांना मी त्यांना पहातो. कितीही काम असले तरी सभागृहाचे कामकाज संपेपर्यन्त ते उपस्थित असतात. त्यांनी अलीकडे सहकार क्षेत्रात नव्याने पदार्पण केले आहे. परंतु त्यांनी ज्या ज्या संस्था काढल्या आहेत त्यामध्ये देखील ते यशस्वी झाले आहेत. त्यांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू असले तरी संघटनेमध्ये काम करुन त्यांना खऱ्या अर्थाने हे पद मिळाले आहे याचा मला जास्त आनंद होत आहे.

सभापती महोदय, परवा संसदीय राष्ट्रकुल परिषदेच्या चर्चासत्राच्या समारोपाच्या वेळी भाषण करतांना विधानसभेचे अध्यक्ष माननीय श्री. दिलीप वळसे पाटील साहेबांनी एक खंत व्यक्त केली. विधिमंडळामध्ये आता राजकीय चळवळीतील आणि अभ्यास वर्गातील सदस्य कमी होऊ लागले आहेत. संघटनेसाठी त्याग करुन काम करणारे कार्यकर्ते, संघटनेच्या माध्यमातून जन चळवळ राबविणारे कार्यकर्ते आता कमी होत चालले आहेत ही त्यांनी परवाच्या दिवशी व्यक्त केलेली खंत वर्तमानपत्रामध्ये छापून आल्यानंतर मी वाचली आहे. माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील आणि माननीय श्री. विनोदजी तावडे हे स्वत:चे घरदार सोडून संघटनेसाठी देशाच्या ग्रामीण भागामध्ये फिरणारे कार्यकर्ते आहेत. म्हणून मला त्यांच्याबद्दल आकर्षण आहे. पक्षासाठी, चळवळीसाठी, आपल्या विचारासाठी घरा-दाराचा त्याग करणारी ही जोडी आज विधिमंडळामध्ये दिसते आहे. त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मला मिळत आहे याचा मला आनंद वाटत आहे.

सभापती महोदय, माननीय श्री. विनोदजी तावडे हे स्वभावाने आक्रमक आहेत, त्यांच्या भाषणामध्ये मिश्किलपणा आहे वेळ प्रसंगी स्वत: शांत राहून ते मला सुध्दा शांत करतात.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

परंतु याठिकाणी मी निश्चितपणे सांगेन की, त्यांची कारकीर्द ही यशस्वी होईल. या महाराष्ट्राच्या जनतेला तरुण वयाचा एक चांगला विरोधी पक्षनेता मिळाला असून ते एक वेगळे काम करण्याचा प्रयत्न करतील अशी मी या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या बाबतीत सांगावयाचे तर 1980 साली विदर्भातून एक जोडी आली. त्यावेळी मी माझ्या काकांबरोबर विधीमंडळामध्ये येऊन प्रेक्षक गॅलरीमध्ये बसत असे. त्यावेळी माजी सन्माननीय सदस्य श्री.महादेवराव शिवणकर आणि सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर ही जोडी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर फार आक्रमकपणे बोलत असत. त्यावेळी आमच्या पक्षाकडे विरोधी पक्षनेते पद सातत्याने असावयाचे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सतत चर्चा होत असे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत लहानपणापासून काम करणारा हा कार्यकर्ता असून, त्यांना कोणतेही मोठे पद मिळाले तरी आपले पाय जमिनीवर ठेऊन वावरणारा हा खरा कार्यकर्ता आहे, मी त्यांना नेता म्हणत नाही. मी माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांना नेता म्हणून पाहिले नाही तर एक कार्यकर्ता म्हणूनच त्यांना काम करताना पाहिले आहे. मघाशी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार म्हणाले ती गोष्ट खरी आहे. कारण दादांच्या अगोदरही मी आणि त्यांनी राज्य बँकेमध्ये एकत्र काम केले आहे आणि मला असे वाटते की, त्यांना दोन वेळा राज्य बँकेमध्ये काम करण्याची संधी मिळाली. परंतु त्याठिकाणी सुध्दा त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न अगदी प्रखरपणे मांडून त्यांच्या बाजूने सातत्याने राहणारा असा कार्यकर्ता आहे. कोणी कितीही बोलले तरी कमी बोलणारा आणि शांत असणारा माणूस जास्त काम करतो असे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब मला वाटते. मात्र हे काम सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी करुन दाखविले. साडेसहा वर्षे सर्वांना बरोबर घेऊन कटूता न आणता काम करणारा एक विरोधी पक्षनेता म्हणून त्यांचा लौकिक होईल असे मला वाटते. मी जास्त बोलणार नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ साहेब बोलले, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते देखील बोलले. मी याठिकाणी एकच गोष्ट सांगेन की, मी राजकीय पक्षामध्ये किंवा जन चळवळी मध्ये काम करताना संपूर्ण मराठा समाजाचा कार्यकर्ता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. तसेच आम्हाला बेळगावबद्दल सुध्दा आत्मीयता आहे आणि आपल्यामध्ये बेळगावकर कधी येतील या आशेने मी देखील वाट पहात आहे.मघाशी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा म्हणाले आणि मला असे वाटते की, माननीय श्री.विनोदजी तावडे विरोधी पक्षनेता....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . .

झाले असले तरी ते अजून काही एवढे मोठे झाले नाहीत की, ते देश पातळीवर काम करु शकतील आणि एवढा मोठा निर्णय घेऊ शकतील. बेळगावकरांची याबाबत अपेक्षा आहे. याठिकाणी माननीय मुख्यमंत्री देखील उपस्थित आहेत. त्यांचे केंद्र शासनाबरोबर जास्त चांगले संबंध आहेत. मी माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांना एक विनंती करीन की, लोकसभेमध्ये देखील तुमच्या पक्षाचे सन्माननीय सदस्य विरोधी पक्षनेता म्हणून काम करीत आहेत. बेळगावकरांची पहिली अपेक्षा आहे की, हा प्रदेश केंद्रशासित करण्यात यावा आणि असे झाले तर बाकीचे प्रश्न सुटतील. मी माननीय श्री.विनोद तावडे यांच्या कडून अपेक्षा व्यक्त करतो की, त्यांनी त्यांच्या राजकीय पक्षातील वजन वापरुन लोकसभेमध्ये बेळगाव केंद्रशासित करण्याच्या बाबतीत ठराव आणून तो एकमताने मंजूर करण्यासाठी प्रयत्न करावा मग कोण कुठे आहे ते कळेल.मग बेळगावचा प्रश्न कसा लवकर सुटतो ते पहाता येईल.

सभापती महोदय,तसेच मी याठिकाणी सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोदजी तावडे यांचे मला अतिशय कौतुक आणि अभिमान वाटतो.कारण ते माझे चांगले मित्र आहेत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, पश्चिम महाराष्ट्रातील म्हणजे पुण्यातील एक कारखाना बंद पडला जेथे सगळी समृध्दी आहे म्हणजे जेथे सिंचनाच्या बाबतीत, दळणवळणाची समृध्दी आहे आणि तेथे विजेच्या बाबतीत कुठेही तुटवडा नाही. तेथे बंद पडलेला कारखाना सुरु करुन यशस्वी पणे चालविण्याचे काम खऱ्या अर्थाने त्यांनी केले. मला असे वाटते की, तुम्ही कोकणामध्ये आलात तर आपल्याकडे तीनही बँकांमध्ये भरपूर पैसे आहेत, तो प्रश्न नाही. फक्त तेथे चांगले प्रशासन येऊ दे म्हणजे आपण त्याठिकाणी निश्चितपणे त्याचा विस्तार करु. पण कोकणापेक्षा आज विदर्भा मध्ये कारखान्यांची गरज आहे. तुमच्या कारकिर्दीमध्ये विदर्भामध्ये एक चांगला यशस्वी कारखाना करण्यात यावा. विदर्भामध्ये एक चांगली सूत गिरणी काढावी आणि त्यामध्ये माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांच्याकडून 1:10 असे शेअर कॅपिटल घ्यावे आणि मग विदर्भातील जनता तुम्हाला खऱ्या अर्थाने दुवा देईल. अशा प्रकारे आपण आपल्या कारकिर्दीमध्ये हे काम करावे अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि सन्माननीय श्री.विनोदजी तावडे यांना त्यांच्या पक्षाने व सहकाऱ्यांनी या पदावर काम करण्याची संधी दिली, त्याबद्दल सर्वांना मनापासून धन्यवाद देऊन मी माझे विचार संपवितो.

-----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, नुकतेच विरोधी पक्षनेता या पदावर विराजमान झालेले सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांना शुभेच्छा देत असताना मला एक गोष्ट आवर्जून सांगितली पाहिजे की, मी विधान परिषद सभागृहामध्ये निवडून आलो, त्यावेळी सन्माननीय माजी विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांशी माझी भेट झाली. त्यावेळी मी त्यांच्या कामाची पध्दत पाहिली आणि अगदी कमी अवधीमध्ये आमच्या दोघांमध्ये मोठया प्रमाणात जिव्हाळा निर्माण झाला आणि तो वाढला.याठिकाणी मला दोन गोष्टी आवर्जून सांगावयाच्या आहेत. मघाशी हेतुपुरस्सर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकरजी रावते साहेब सांगतात की, वेलमध्ये जा असे सांगून आपसामध्ये मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. गेल्या 23 वर्षापासून शिवसेना-भाजप अशी अभेद्य युती संपूर्ण देशामध्येच नव्हेतर देशाच्या बाहेर देखील सर्वांना पहावयास मिळालेली आहे. मला एक गोष्ट सांगावयास पाहिजे की, तीन-चार वेळा असे झाले की, विरोधी पक्षनेत्यांनी जे प्रस्ताव मांडावयाचे असतात, ते प्रस्ताव त्यांनी मला मांडावयास सांगितले. हा मनाचा मोठेपणा सगळया ठिकाणी पहावयास मिळत नाही.माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांच्या कामाची पध्दत कदाचित वेगळी असेल किंवा नसेल पण तो भाग वेगळा आहे.

सभापती महोदय, माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या बाबतीत सांगावयाचे तर सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची पध्दत मी पाहिली.त्याबद्दल निश्चितपणे त्यांना धन्यावद दिले पाहिजेत आणि त्यांचे निश्चितपणे अभिनंदन केले पाहिजे.त्यांनी एक मास लिडर म्हणून मागच्या साडेसहा वर्षाच्या काळामध्ये ज्यापध्दतीने विरोधी पक्षनेते म्हणून काम केले. त्याचा आदर्श माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांच्या समोर निश्चित असेल याची मला खात्री आहे आणि मला विश्वासही आहे.या राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री यांनी माननीय श्री.विनोदजी तावडे यांना सांगितले की, आता आपण माननीय श्री.नितीन गडकरी यांना सांगावे की, कर्नाटक मधील प्रश्न सोडवावा. वास्तविक अशा वेळेला याठिकाणी राजकीय आखाडा व्हावयास नको होता. तसे झाले नसते तर अधिक चांगले झाले असते असे माझे म्हणणे आहे.आम्ही असे कधीही म्हटले नाही की, माननीय मुख्यमंत्री हे देखील दिल्ली मधून आलेले आहेत.त्यामुळे त्यांचे त्याठिकाणी सर्वांशी चांगले संबंध आहेत.मग त्यांनी शेतकऱ्यांसाठी दहा हजार कोटी का देऊ नयेत? पण या क्षणाला तो विषय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपस्थित होऊ शकत नाही. कारण ही ते सांगण्याची वेळ नाही. जसे तुम्ही माननीय श्री.नितीन गडकरी यांच्या बाबतीत माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांना सांगत आहात, मग त्याचप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांचेही दिल्लीमध्ये चांगले संबंध आहेतच. त्याचे माननीय श्रीमती सोनिया गांधी यांच्याशी घरचे संबंध आहेत, त्यामुळे ते त्यांना सांगू शकतात. पण आता वेळ कोणती आहे आणि आपण कोणत्या वेळी काय बोलतो याचे प्रत्येकाने भान ठेवले असते तर अधिक चांगले झाले असते असे मला वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय श्री.विनोदजी तावडे हे आमच्या कोकणातील आहेत. तसेच मुंबईतील भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष आहेत. शिवसेनेचा नेता म्हणून माझे आणि त्यांचे चांगले निकटचे संबंध आहेत.अनेक वेळा दोन्ही पक्ष एकत्र आणण्याच्या दृष्टीकोनातून आमच्या बऱ्याच बैठका होत असतात. म्हणून त्यांची कामाची पध्दत देखील मला माहिती आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी चांगले काम केले आहे. मला एक गोष्ट प्रामुख्याने सांगावयास पाहिजे की, आपल्याला विरोधी पक्ष नेता म्हणून घटनेने, लोकशाहीने अधिकार दिलेले आहेत. विशेषत: जेव्हा एखादा मदमस्त हत्ती बेकाबू होतो आणि सोंडेने जो समोर येईल त्याला आपटत जातो अशा वेळी त्या हत्तीवर अंकुश ठेवण्याचे काम माहूत करीत असतो आणि विरोधी पक्षनेत्यांना त्या माहुताचे काम करावयाचे असते. जे काम माननीय श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी केले, म्हणजे बिघडलेल्या, मदमस्त झालेल्या हत्तीला त्यांनी काबूत ठेवले. याचा अर्थ असा की,जर सरकार चुकीचा निर्णय घेत असेल तर त्या सरकारला वठणीवर आणण्याचे काम विरोधी पक्षाच्या माध्यमातून झाले पाहिजे आणि ते माननीय श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी निश्चितपणे केलेले आहे. भविष्यामध्ये देखील माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांच्याकडून अशाच प्रकारच्या कामाची अपेक्षा करतो आणि तसे काम निश्चितपणे होईल अशी आशा बाळगतो, त्यांच्या भविष्यातील कार्यपध्दतीला शुभेच्छा देतो. तसेच माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांना पुढील राजकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छा देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-----

. . . .2 ई-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, ज्या सभागृहाचा मी सदस्य आहे, त्या सभागृहाच्या विरोधी पक्षनेते पदावर विद्यार्थी चळवळीपासूनचा माझा एक जुना मित्र आज विराजमान होत आहे. याबद्दल मनस्वी आनंद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांचे मनापासून अभिनंदन यासाठी करावयाचे आहे की, विद्यार्थी चळवळीचा विचार एका टोकाला असतानाही, तेथे वैचारिक संघर्ष असतानाही त्यांनी कधीही मैत्रीला दूर केले नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म.वि.म.स./क्ष.

दि.24-11-2011

प्रति,

माननीय प्रधान सचिव

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

विधान भवन, नागपूर.

महोदय,

मी दिनांक 25 डिसेंबर 2011 रोजी रात्री 8.00 वा.सुटणाऱ्या नागपूर-मुंबई सेवाग्राम एक्सप्रेसने मुंबईला जाऊ इच्छिते. तरी मला दिनांक 25 डिसेंबर 2011 रोजी नागपूरहून मुंबई येथे जाण्यास परवानगी देण्यात यावी ही विनंती.

मी दिनांक 27 डिसेंबर 2011 रोजी कार्यालयात रुजू होईन.

आपली विश्वासू,

(सो.अनिता प्र.रणदिवे)
प्रतिवेदक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील. .

ती मैत्री ते जपत राहिले. मैत्री जपणारा आणि सर्वांना बरोबर घेऊन जाणारा असा हा कार्यकर्ता आज आपल्या स्वत:च्या हिंमतीवर त्या पदापर्यंत पोहचलेला आहे. त्यांना कोणाच्या आशीर्वादाची गरज नाही. त्यानी हे पद स्वत:च्या हिमतीने मिळविलेले आहे. म्हणून श्री. विनोद तावडे यांचे मी मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रात एक वेगळी परंपरा आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांची विरोधी पक्ष नेतेपदी निवड झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री हे दोघेही त्यांच्या आसनाजवळ गेले आणि त्यांना विरोधी पक्षनेतेपदी नेऊन बसविले. त्यावेळी मला परवाच्या एका कार्यक्रमाची आठवण झाली. परवा सन्माननीय श्री. मनोहर जोशी यांचा सत्कार करण्यासाठी आदरणीय श्री. शरद पवार आले होते. त्यावेळी त्यांना उत्तर प्रदेशातील एका खासदाराने असे विचारले की, तुम्ही विरोधी पक्षातील नेत्यांच्या सत्काराला कसे काय जाता? तेव्हा ते असे म्हणाले की, ही महाराष्ट्राची पंरपंरा आहे. आम्ही जाऊ शकतो. तेव्हा ते असे म्हणाले की, अशा पध्दतीने आम्ही विरोधी पक्षातील नेत्यांच्या सत्काराला गेलो तर आमचे मंत्री पद जाईल. महाराष्ट्रामध्ये आज पुन्हा एकदा त्याचे अनुपम दर्शन घडले आहे. हे घडत असताना मला पुन्हा एका प्रसंगाची आठवण होत आहे. ज्यावेळी सन्माननीय श्री. तावडे आणि मी विद्यार्थी चळवळीत होतो. त्यावेळी मुंबई विद्यापीठावर झेंडा कोणाचा लावावयाचा असा आमच्या समोर प्रश्न असावयाचा. मी छात्रभारतीत होतो ते एबीपीमध्ये होते. थोडया वेळापूर्वी दादा म्हणाले तसे सोशल इंजिनियरिंग सत्ताधारी पक्षाचे अधिक होते. त्यामुळे ते बरोबर मला पकडायचे. मला पकडल्यामुळे त्यांना मुंबई विद्यापीठाची सत्ता कधीच मिळाली नाही. पण आज विरोधी पक्ष नेत्याचे पद मिळाल्यानंतर त्यांनी आनंद व्यक्त केला. हे विरोधी पक्ष नेतेपद कायम त्यांच्याकडे रहावे असे काही मी म्हणणार नाही पण त्यांना हिंमतीने जे काही मिळवावयाचे आहे ते पुढच्या काळात मिळवत राहतील अशी सदिच्छा व्यक्त करतो.

सभापती महोदय, श्री. तावडे हे अत्यंत आग्रही आहेत, जहाल आहेत, याचा उल्लेख झाला पण त्याचबरोबर ते संसदीय पंरपराही जपतील याचाही मला विश्वास आहे. कारण ते त्याच स्कुलमधून आलेले आहेत. ते भागवतांच्या स्कुलमधून आलेले आहेत, सन्माननीय श्री. गडकरी

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील. .

यांच्या स्कुलमधून आलेले आहेत. त्यामुळे ते तीच पंरपरा आणि त्या मर्यादा नक्की पाळतील या बद्दल माझ्या मनामध्ये शंका नाही. ते कोकणातील आहेत. विद्यार्थी चळवळीतील आहेत याचा जसा आनंद आहे त्याचबरोबर एक अत्यंत अभ्यासू आणि शिक्षण क्षेत्राबद्दल अतिशय आस्था असलेला नेता आज विरोधी पक्ष नेता होत आहे, याचाही मला अधिक आनंद होत आहे. त्यांचे शिक्षणाच्या संदर्भातील एक विधेयक सभागृहासमोर अपूर्ण राहिलेले आहे. संपूर्ण शैक्षणिक कायदा बदलण्याचा आग्रह त्यांनी त्यामध्ये धरलेला आहे. त्या विधेयकाची त्यांनी सर्वांगीण पध्दतीने जी मांडणी केलेली आहे ती विस्मयचकीत करणारी आहे. त्याचे श्रेय त्यांना दिलेच पाहिजे.

सभापती महोदय, श्री. तावडे यांचे अभिनंदन करीत असतानांच ज्यांची जागा त्यांनी घेतली आहे त्या भाऊसाहेबांबद्दल बोलणे अत्यंत आवश्यक आहे. कारण विरोधी पक्ष नेत्यांचा आब, आदर आणि परंपरा जर कोणी पाळली असेल तर ती भाऊसाहेबांनी पाळली आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी त्यांच्या बद्दल उल्लेख केला. सावकारी कायद्याच्या संदर्भात त्यांच्या कारकिर्दीत जरी सही झाली नाही तरी आपण जो सावकारी कायदा मंजूर केला त्याचे संपूर्ण श्रेय हे भाऊसाहेबांना द्यावे लागेल आणि या बाबतीत संपूर्ण सभागृह सहमत होईल. त्यासाठी ते सातत्याने या सभागृहात आग्रही राहिले तसेच सभागृहाच्या बाहेर सुध्दा भांडत राहिले, त्या बाबतीत युक्तिवाद करीत राहिले आणि त्याचेच प्रतिबिंब हे या कायद्यात पडलेले आहे. शासनाच्या बाजूने कायदे होत असतात पण याचा अर्थ त्यामध्ये विरोधी पक्षाचे श्रेय नसते असे नाही. उलट विरोधी पक्ष मागणी करतो आणि मग काही कायदे तयार होतात. रोजगार हमी योजना कायद्याच्या बाबतीत सूध्दा असेच झालेले आहे. विरोधी पक्षाच्या त्यावेळच्या शेकाप आणि समाजवादी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी आग्रह धरला त्याचे प्रतिबिंब श्री. वि.स.पागे आणि श्री. भारदे यांच्या रोजगार हमी विधेयकात पडले. त्याच पध्दतीने सावकारी कायद्याचे श्रेय हे भाऊसाहेबांना द्यावे लागेल.

सभापती महोदय, भाऊसाहेब हे मवाळ आहेत म्हटले जाते. पण ते त्या अर्थाने मवाळ नाहीत ते येथील मर्यादा पाळतात, संसदीय आयुधे पाळतात म्हणजे मवाळ असणे नाही. उलट ते योध्दया शेतकऱ्यासारखे या सभागृहात उभे राहतात मग धानाचा मुद्दा असो, कापसाचा असो, ऊसाचा असो किंवा अगदी लहान जिराईत शेतकऱ्याचा मुद्दा असो त्यावर भाऊसाहेब त्याच तडफेने

..3..

श्री. कपिल पाटील. . .

आणि तळमळीने बोलतात. हीच तळमळ, हीच तडफ श्री. विनोद तावडे या पुढच्या काळात सांभाळतील. जरी ते शहरी भागातून आले असले तरी ते गिरणी कामगाराच्या घराशी, कष्टकरी वर्गाशी नाते सांगणारे आहेत. यामुळे ते शेतकऱ्याच्या प्रश्नाबद्दलही तेवढेच आग्रही राहतील  आणि या विरोधी पक्षाला सुध्दा एका उंचीवर नेऊन ठेवतील. ज्या ज्या वेळी लोकांच्या बाजूने निर्णय करावयाचा असेल त्या त्या वेळा ते शासनाला तसे करण्यास भाग पाडतील, अशी शुभेच्छा मी त्यांना देतो आणि पुन्हा एकदा त्यांचे अभिनंदन करुन माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आज या सभागृहातील एका अतिशय महत्वाच्या प्रसंगाचे आम्ही साक्षीदार आहोत याचे आम्हाला समाधान वाटते.

सभापती महोदय, या सभागृहात माझा फार थोडा काळ केवळ अडीच ते तीन वर्षाचा झालेला आहे. परंतु भाऊसाहेबांकडे विरोधी पक्ष नेते म्हणून नेतृत्व असताना समोरच्या बाजूने या व्यक्तिमत्वाकडे बघत असताना त्यांची बोलण्याची पध्दत, त्यांचे वागणे, त्यांचे सौजन्य आणि या सगळयामागील कारणाचा जेव्हा मी शोध घेतला तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, श्री गजानन महाराजांचा आशीर्वाद त्यांच्या पाठीशी असल्यामुळे त्या पवित्र भूमीचे आपण काही तरी देणे लागतो, या भावनेतूनच सगळे प्रश्न मांडताना भाऊसाहेब आपली भूमिका बजावत होते. या सभागृहात शेतकऱ्यांचे प्रश्न अत्यंत पोटतिडिकेने, अधिक प्रखरतेने समजावून घेत असताना सगळयात जास्त मदत कोणाची झाली असेल तर ती निर्विवादपणे भाऊसाहेब तुमची झालेली आहे हे आम्ही या ठिकाणी आवर्जून सांगू इच्छितो. आपण अतिशय शांतपणे, आपला मुद्दा कधीही न सोडता, जेथे विरोधाची भूमिकाच आवश्यक आहे आणि जेथे अंकुशही ठेवण्याची आवश्यकता आहे तेथे आग्रह न सोडता आपण अतिशय प्रामाणिकपणे विरोधी पक्ष नेते पदाला न्याय दिलेला आहे. आपल्या राजकीय वाटचालीमध्ये आपल्याला पदावरुन केव्हा तरी बाजूला व्हावे लागते. आपण सर्वजण लोकशाहीची पालखी घेऊन जाणारे खांदेकरी आहोत. भक्तीचा भाव असे सांगतो की, आपल्या सहकाऱ्याला त्या पालखीला खांदा देण्याची संधी आपल्यालाच द्यावी लागते आणि आपण त्याच्या बरोबर चालावे देखील लागते. मला वाटते हीच भूमिका आपल्या राजकीय वाटचालीमध्ये पुढच्या आयुष्यात सुध्दा राहील. तुमच्या पुढच्या राजकीय वाटचालीने सामाजिक संदर्भातून उभ्या राहणाऱ्या वास्तवतेला न्याय देणारे असे एक नेतृत्व आपल्या पक्षाच्या मार्फत का होईन परंतु महाराष्ट्राला निश्चितपणे मार्गदर्शक ठरेल असा विश्वास या निमित्ताने मला व्यक्त करावासा वाटतो. तुमच्या या कारकिर्दीची आठवण या सभागृहाच्या कामकाजाच्या रेकॉर्डमध्ये किती आहे हे मला माहीत नाही पण आमच्या मनामध्ये मात्र ती कायम ठेवली जाईल आणि तिचा वापर करण्याचाही आम्ही प्रयत्न करु. वेळप्रसंगी सत्ताधाऱ्यांना सांगावयाला लागले तरी तुमची कोटेशन्स देऊन तिचा वापर करु इतकी खात्री मी या निमित्ताने देऊ इच्छितो.

..5..

श्री. हेमंत टकले. . .

श्री. विनोद तावडे यांना अतिशय योग्य वयात ही संधी मिळाली आहे असे मला वाटते. हा बहुरंगी माणूस आहे. त्यांच्याबद्दल एक गोष्ट मी येथे सांगू इच्छितो. राजकीय जीवनामध्ये मी नाशिक सोडून मुंबईत रहायला आलो. मला पंढरपूरच्या एकादशीचे नेहमी एक कौतुक वाटते. श्री. विनोद तावडे यांची एक स्पेशल ट्रेन मुंबईहून पंढरपूरला दर्शनासाठी जात असते. हा हिंदुत्ववादाचा भाग आहे, भक्तीचा भाग आहे यापेक्षा सुध्दा वयोवृध्द लोकांना पांडुरंगाचे दर्शन घडवून आणावे ही जी आत्मिक ऊर्मी त्यांच्यामध्ये आहे ती केवळ या एका वर्गापुरती आहे असे मला कधीच जाणवले नाही. मी जेव्हा नाटयपरिषदेचा कारभार माझ्या हाती घेतला तेव्हा सगळयात प्रथम पत्रानेच नव्हे तर प्रत्यक्ष भेटल्यावर सुध्दा त्यांनी मला सांगितले की, नाटय परिषदेचे काम तुम्ही करीत आहात याचा मला खूप आनंद झाला आहे. तुम्हाला काहीही मदत लागली तर मला सांगा, मी तुमच्या बरोबर काम करायला तयार आहे. क्रीडा असो, कला असो, साहित्य असो, संस्कृति असो पण राजकारण तर आहेच आहे. खालच्या सभागृहापेक्षा वरच्या सभागृहात आपण राजकारणाच्या परिघा पलीकडे जाऊन काही गोष्टींचा विचार करण्याची आवश्यकता असते, हा विचार सत्ताधारी आणि विरोधी पक्ष अशा दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांकडून झाला तर त्याचे महत्व वेगळे असते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते मराठी भाषेचा विषय नेहमी आग्रहाने लावून धरतात त्यावेळी मी या बाजूला असून सुध्दा मला खूप बरे वाटते. मातृभाषेसाठी सन्माननीय सदस्य दिवाकर रावते, श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. विनोद तावडे आपण सर्वजण जो आग्रह धरता तो मला कधीच अनाठाई वाटला नाही. ही मराठी भाषेची, मराठी मनाची आणि मराठी संस्कृतीची जपणूक करण्याचे काम विरोधी पक्ष नेते पदावरुन आपल्याला अधिक प्रभावीपणे करता येईल, याच्याबद्दल मला निश्चित खात्री आहे. आपल्याला विरोधी पक्षाचे नेतेपद मिळाल्यानंतर आमच्या सन्माननीय नेत्यांनी आपल्याकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. आपण 'वेल'मध्ये येऊ नये असेही काही सन्माननीय सदस्यांनी सुचविलेले आहे. 'वेल' ला मराठीत विहीर असे म्हणतात. एखाद्याला विहीर का दाखवितात या प्रश्नाचे उत्तर आपण निश्चितपणे आपल्या मनामध्ये योजून ठेवावे.

...6...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले. . .

आपण या सभागृहामध्ये जेव्हा विषय मांडता ते शिक्षणाचे, सामाजिक संदर्भाचे व आरोग्याचे असतात आणि आपण त्याचा अतिशय अभ्यास केलेला असतो हे ही आपल्या वक्तव्यातून आम्ही वारंवार अनुभवलेले आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ...

परंतु जेव्हा देवाणघेवाण करुन किंवा सत्ताधारी आणि विरोधी पक्ष एकत्र येऊन राज्याच्या हिताच्या काही गोष्टी मांडतात त्यावेळी एकत्र येऊन काम करण्याची सुध्दा खूप वेळेला आवश्यकता असते. यामध्ये सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षामधील एक पूल बनणे ही सुध्दा विरोधी पक्ष नेत्याची जबाबदारी आहे. ती जबाबदारी आपण निश्चितपणे चांगल्या पध्दतीने पार पाडाल. आपण आजपर्यंत अतिशय मोकळे आयुष्य जगलेला आहात. परंतु एखाद्या पदावर गेल्यानंतर त्या पदावर काही बंधने जरुर येतात. आपण सिनेमाला वगैरे गेला होता की नाही, हा विषय यामध्ये नाही परंतु आपल्याला सार्वजनिक ठिकाणी जी काही बंधने येणार आहेत त्याची जाणीव सुध्दा आपल्याला चांगल्या प्रकारे आहे. परंतु आपल्या एकूणच कार्यशैलीमध्ये आपण जे करता त्या गोष्टीवर आपली मनापासून श्रध्दा असते आणि ती तडीला नेण्याची ताकद आपल्याजवळ आहे. त्याबद्दल तुमचा विश्वासही असतो आणि तोच विश्वास त्या पदाला न्याय देण्यासाठी अतिशय महत्वाचा असतो.

आज भाऊसाहेब, आपण दुसऱ्या जागेवर आलेला आहात. परंतु सभागृहात आपली उपस्थिती आम्हाला कायमच प्रेरणादायी ठरेल आणि आपलीही कारकीर्द या पुढील काळात अशीच भरभराटीची जावो अशी सदिच्छा व्यक्त करतो. श्री. विनोदजी तावडे यांना एक मित्र म्हणून मनापासून सदिच्छा देतो. आपल्या कारकिर्दीची आम्ही आतुरतेने वाट पाहात आहोत. आपल्या या नव्या संकल्पाला मनापासून सदिच्छा देऊन माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, श्री. विनोद तावडे कोकणातील आहेत आणि विशेषकरुन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आहेत. श्री. एन. डी. पाटील यांच्यानंतर 32 वर्षाने पहिल्यांदा कोकणाला हा मान आपल्या माध्यमातून मिळालेला आहे. मी आपले मनापासून अभिनंदन करतो आणि आपल्या पुढच्या सगळ्या वाटचालीला शुभेच्छा देतो. मी आपला जास्त वेळ घेणार नाही.

श्री. भाऊसाहेब फुंडकर यांच्या बाबतीत मी एवढेच सांगेन की, या सभागृहामध्ये ज्या ज्या वेळी विषय आले, मला निश्चितपणे आठवण करुन द्यावी लागेल की, सभागृहामध्ये कोकणातील फळफळावळीसंबंधी एक लक्षवेधी सूचना आली होती आणि ती लक्षवेधी सूचना खूप गाजली. त्यावेळी भाऊसाहेब स्वत: उभे राहिले आणि ती लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यास भाग पाडले आणि आमच्या कोकणातील फळफळावळीच्या संदर्भात जी मागणी होती त्याला न्याय देण्याचे काम सन्माननीय श्री. जयंत प्र. पाटील साहेब आणि भाऊसाहेब फुंडकर यांनी केले. त्याचप्रमाणे कोकणातील ठाकर समाजाच्या संदर्भात एक लक्षवेधी सूचना सभागृहात आली होती. कोकणातील ठाकर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करावा अशी मागणी होती. त्या संबधीची लक्षवेधी सूचना ज्यावेळी सभागृहात आली त्यावेळी भाऊसाहेब फुंडकर यानी खासकरुन आग्रह धरुन ती लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यास भाग पाडले होते. म्हणून मी मनापासून भाऊसाहेबांना धन्यवाद देतो. परमेश्वर त्यांना दीर्घायुष्य देवो. मी त्यांना पुढच्या कामकाजासाठी शुभेच्छा देतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, आज पूर्वाश्रमीचे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंगजी फुंडकर यांना आपण विरोधी पक्ष नेते म्हणून जरी निरोप देत असलो तरी त्यांचे सहकार्य आणि त्यांचे मार्गदर्शन यापूर्वी सुध्दा सातत्याने आम्हा विरोधी पक्षातील सदस्यांना लाभत होते आणि पुढच्या काळातही निश्चितपणे लाभणार आहे.

सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांची विरोधी पक्ष नेते म्हणून नियुक्ती झालेली आहे. राजकारणामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे नेते असतात. प्रत्येक नेता, प्रत्येक कार्यकर्ता, प्रत्येक आमदार यांचे विश्लेषण त्या त्या टप्प्यावर होत असते. परंतु संवेदनशील असणारे, राजकारणाबरोबरच साहित्य, संस्कृती, सामाजिक विकास यांचे भान असणारे, अशा पध्दतीचे जे काही थोडे नेते मला जाणवतात त्यामध्ये श्री. विनोदजी तावडे आहेत. सन्माननीय श्री. विनोद तावडे यांना सगळे विनोदजी म्हणत आहेत, नेते म्हणत आहेत पण ते आमचे सहकारी, साथी आणि आमच्या बरोबरचे कार्यकर्ते आहेत आणि अशी व्यक्ती विरोधी पक्ष नेते पदावर जाते त्यावेळी एक खूप मोठा विश्वास आणि खूप मोठा सन्मान व जबाबदारी आपण सर्वांनी त्यांच्यावर टाकलेली आहे. त्याबद्दल भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांचे तर मी अभिनंदन करीनच परंतु त्याचबरोबर महाराष्ट्रामध्ये 1980 नंतर विद्यार्थी चळवळीमध्ये एक नवीन पिढी नवनेतृत्व करण्यासाठी म्हणून सर्व क्षेत्रामध्ये आली आणि ही जी नवीन पिढी होती त्यांनी आणीबाणीच्या अगोदरपासून ते आतापर्यंतच्या अनेक जबाबदाऱ्या निभावल्या त्यांच्यामध्ये श्री. विनोद तावडे यांचा महत्वाचा सहभाग आहे आणि म्हणून त्यांचे अभिनंदन करणे हे मी माझे कर्तव्य समजते. भ्रूण हत्येपासून तर लहान मुलांची विक्री होऊ नये, बाल कामगार, अशा प्रश्नांवर ज्या व्यक्तींना समजावून सांगावे लागत नाही अशी माणसे सुध्दा कमी असतात आणि त्यामध्ये श्री. विनोद तावडे आहेत की, ज्यांना स्वत:ला त्या प्रश्नांची जाणीव आहे.

भाऊसाहेबांनी कायम आम्हाला सहकार्य दिले. संपूर्ण शेतकरी आंदोलनात भाऊसाहेबांचे खूप मोठे योगदान आहे आणि त्याबाबत सर्वांनी उल्लेख केलेला आहे. पण आमच्यासारख्या सभासदांना सांभाळून घेत असताना एवढ्या वर्षात भाऊसाहेबांशी आमचा कधीही वादविवाद झाला नाही. म्हणजे भाऊसाहेबांची केवढी मोठी सहनशीलता आणि किती मोठी परिपक्वता आहे हे मला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

मुद्दाम सांगावेसे वाटते. बुलढाण्यामध्ये जा किंवा अगदी विरगावसारख्या ठिकाणी जा, भाऊसाहेब कायम समजूतदार नेत्याच्या भूमिकेमध्ये असतात. श्री. विनोद तावडे यांच्याबरोबर आमचा वेगळ्या पध्दतीचा संवाद कायम असतो. या ठिकाणी एक उल्लेख करणे मी क्रमप्राप्त समजते की, गेल्या काही वर्षामध्ये महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये विरोधी पक्ष नेते पदावर असणारी व्यक्तीच विरोधी पक्षाचा त्याग करुन जाते अशी उदाहरणे घडल्यावर विरोधी पक्ष नेता किती सांभाळून आणि किती जोखमीने निवडला पाहिजे याची भाजप-सेनेला चांगलीच जाणीव आहे अशा वेळेला श्री. विनोद तावडे यांच्यावर विरोधी पक्ष नेता म्हणून जबाबदारी आहे म्हटल्यावर ते ती जबाबदारी एक वेगळ्या पध्दतीने आणि चांगल्या प्रकारे पार पाडतील आणि शिवसेना-भाजपला उज्ज्वल भविष्य देण्याच्या सोबतच महाराष्ट्रामधील जे जे उपेक्षित आहेत त्यांना न्याय देण्यासाठी आणि शिवसेनाप्रमुख श्रीयुत बाळासाहेब ठाकरे, भारतीय जनता पक्षाचे नेते श्री. अटलबिहारी वाजपेयी, श्री. लालकृष्ण अडवाणी, श्री. नितीनजी गडकरी या सगळ्यांनी त्यांच्याकडून ज्या अपेक्षा ठेवलेल्या आहेत त्या पूर्ण करण्यासाठी आज गांभीर्याबरोबरच विनोदाचा सुध्दा वेगळ्या प्रकारे विधान परिषदेत प्रवेश झालेला आहे असे म्हणावयास हरकत नाही. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

----

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. पांडुरंग फुंडकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आज मी त्या जागेवरुन या जागेवर आलो आणि त्या जागेवर आमचे मित्र भारतीय जनता पक्षामध्ये काम करणारे माझे सहकारी माननीय श्री.विनोदजी तावडे त्या ठिकाणी जाऊन बसले, मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, हा निर्णय पक्षाचा आहे. मी गेली 32 वर्षे राजकीय पक्षात काम करीत असताना एक सैनिक म्हणून काम केले. पक्षाने जी जी जबाबदारी दिली त्या त्या जबाबदारीला मी न्याय देण्याचा प्रयत्न केला. खरे म्हणजे मी या सभागृहापर्यंत पोहोचेन, पार्लमेंटमध्ये पोहोचेन किंवा एखाद्या राजकीय पक्षाचा महाराष्ट्राचा अध्यक्ष होईन असा विचार स्वप्नातही मी केला नाही. सन्माननीय श्री. विनोदजी तावडे यांच्याप्रमाणे मी सुध्दा विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता होतो. एका कोरडवाहू शेतकऱ्याच्या घरात मी जन्माला आलो. मी कधी राजकारणात येण्याचे स्वप्नही पाहिले नव्हते. पण आयुष्याने असे वळण घेतले की, मला राजकारणात यावे लागले आणि राजकारणात आल्यानंतर जो विचार लहानपणापासून मी जोपासला होता त्या विचाराशी बांधिलकी ठेऊन विद्यार्थी परिषदेत काम करीत असताना ज्यावेळी देशात आणीबाणी संपल्यानंतर जनता पक्ष जन्माला आला त्यावेळी माझ्यावर एका तालुका सेक्रेटरीची जबाबदारी सोपविण्यात आली आणि तेथून माझ्या आयुष्याला वेगळे वळण मिळाले. तेव्हा मी असे ठरविले की, आता राजकारणात काम करीत असताना पक्ष जे निर्देश देईल ते आपण ऐकावयाचे, पक्षात काम करीत राहावयाचे. मी कॉलेजमध्ये असताना आमच्या पक्षात एक अत्यंत चिंतनशील नेतृत्व होते. त्यांचे "चरे वैती, चरे वैती" हे एक वाक्य मी लक्षात ठेवले. म्हणजे चालत राहा. मी शेतकऱ्याच्या पोटी जन्माला आलो म्हणून मी राजकारणामध्ये शेतकरी हा विषय निवडला.

1978 मध्ये मी पहिल्यांदा आमदार झालो. मी विद्यार्थी होतो. सभापती महोदय, आपणही त्या सभागृहामध्ये होता. आता आपण आम्हाला आठवण करुन देता की, मागच्या बाकावर बसलेल्यांना बोलण्यासाठी किती वेळ मिळू शकतो ? 1978 साली मी मागच्या बाकावर बसत होतो. तीन मिनिटे बोलावयाचे म्हटले तरी आम्हाला वेळ दिला जात नव्हता.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

आता या सभागृहात आल्यानंतर वेळच वेळ मिळतो. अशा राजकीय वाटचालीमध्ये मी दोन वेळा विधानसभेचा सदस्य झालो. त्या सभागृहाचे कामकाज मी पाहिलेले आहे. त्यानंतर 1985 साली विधानसभेच्या निवडणुकीत माझा पराभव झाला. परंतु त्या पराभवामुळे मी खचून गेलो नाही. पक्षाने दिलेले काम, संघटनेचे काम मी करीत राहिलो. संघटना हेच माझे अंग मानून संघटनेत चालत असताना 1989 साली पक्षाने मला सांगितले की, तुम्हाला लोकसभेची निवडणूक लढवावी लागेल. मी पक्षाला सांगितले की, मी लोकसभेची निवडणूक लढविणार नाही, मला महाराष्ट्राच्या बाहेर जायचे नाही. पण पक्षाचा आदेश असतो. समोरचे बंधू आमच्यावर टीका करतात की, आम्ही पक्षाचा आदेश मानणारे लोक आहोत. हे खरे आहे पक्षाने दिलेल्या आदेशामुळे मी पार्लमेण्टच्या निवडणुकीसाठी उभा राहिलो. पहिल्या निवडणुकीत मी 1 लाख 51 हजार मताधिक्याने निवडून आलो.

मी बुलढाणा जिल्ह्यात राहणारा आहे. पण अकोला मतदार संघासाठी मला तिकिट मिळाले. त्याच वेळी मुख्यमंत्री महोदयांशी माझी भेट झाली. मला आठवत आहे. मुंबई विमानतळावर माननीय मुख्यमंत्री सकाळीच धावपळ करीत पोहोचले होते. तेथे आम्ही दोघेच होतो. त्यावेळी प्रथमच एकमेकाची ओळख झाली. त्यापूर्वी मी माननीय मुख्यमंत्र्यांना ओळखत नव्हतो. पण त्यावेळी झालेली भेट कायम मी स्मरणात ठेवली. मला हे सुध्दा भाग्य लाभले आहे की, पहिल्यांदा मी लोकसभेत गेलो त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांच्या मातोश्री लोकसभेच्या सदस्या होत्या. मागे वळून पाहिले तर मला इतके भाग्य लाभेल याचा मी स्वप्नातही विचार केला नव्हता. मी तीनवेळा लोकसभेवर गेलो. तेथून परत आल्यावर मला पक्षाने सांगितले की, तुम्हाला महाराष्ट्रातील पक्षाची जबाबदारी पार पाडावयाची आहे. त्यावेळी मी नकार दिला होता. मी त्या जबाबदारीला न्याय देऊ शकणार नाही. पण पक्षाने आदेश दिल्यानंतर तीही जबाबदारी मी पार पाडली.

मी पार्लमेंण्टमध्ये असतानाच राज्यात युतीचे सरकारला आले होते. पक्षाने माझ्यावर पणन महासंघाची जबाबदारी टाकली होती. त्यावेळी श्री.मनोहरपंत जोशी व श्री.गोपीनाथराव मुंडे यांना सांगितले की, मी लोकसभेचा सदस्य आहे, महाराष्ट्राची जबाबदारी माझ्यावर कशासाठी टाकता ? पण 50 लाख कापूस शेतकऱ्यांचा प्रश्न होता. कापूस एकाधिकार खरेदी योजना होती.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

मला त्यांनी सांगितले की, कापसाला भाव मिळण्यासाठी तुम्ही 350 कि.मी.चालत गेलात. मला आठवते की, त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री श्री.बाबासाहेब भोसले हे होते. त्यावेळी कापसाला 700 रुपये प्रति क्विंटल भाव मिळत होता. कापसाला किमान 1200 रुपये भाव द्यावा यासाठी मी पायी चाललो होतो. मी कापूस उत्पादक शेतकरी आहे, शासनाने 1200 रुपये भाव द्यावा अशी आम्ही मागणी केली होती. त्यावेळची 1200 रुपयांची मागणी आणि आता आम्ही 6500 रुपयांची मागणी करीत आहोत. आता इतकी तफावत आहे. त्यावेळी त्या दोघांनी मला सांगितले की, पणन महासंघाची जबाबदारी तुम्हालाच घ्यावी लागेल. शासनाला तुमच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या कापसाला भाव द्यावयाचा आहे. त्यामुळे मी 5 वर्षे पणन महासंघात राहिलो. शेतकऱ्यांना योग्य भाव मिळण्यासाठी मी प्रयत्न केलाच. सरकारने सुध्दा मला पाठिंबा दिला. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे त्यावेळी सहकार मंत्री होते. हे खरे आहे की, त्यांची आणि माझी भेट पहिल्यांदाच झाली होती. ते सहकार मंत्री असताना शेतकऱ्यांना न्याय देण्याचा पिंड मी त्यांच्यात पाहिला आहे. त्यावेळी आम्ही शेतकऱ्यांना योग्य भाव दिला होता. पण 4 ग्रेड, 5 ग्रेड मध्ये कापूस खरेदी केला जात होता. शेतकऱ्यांना न्याय द्यावयाचा असेल तर एक 1 ग्रेडमध्ये कापूस खरेदी करण्याचे मी ठरविले. इंटर्नल ग्रेडिंग आपण करावे, पण शेतकऱ्यांच्या गाडीवर ग्रेडिंग असता कामा नये असा निर्णय मी घेतला. त्यावेळी शेतकऱ्यांसाठी तो निर्णय घेतला होता याचे मला खूप बरे वाटते. ते एका पदामुळे मला बरे वाटले होते.

सभापती महोदय, या सभागृहात मी येईन असेही मला वाटले नव्हते. परंतु मी कै.प्रमोद महाजन यांना त्याचे श्रेय देईन. मी प्रदेशाध्यक्ष झालो. प्रदेशाचा अध्यक्ष हा कोणत्या तरी पदावर असावयास पाहिजे असा त्यावेळी प्रघात होता. त्यांनी लोकसभेत तरी असावयास पाहिजे किंवा विधानसभेत तरी असावयास पाहिजे किंवा विधानपरिषदेत तरी असावयास पाहिजे. मी प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर कै.प्रमोद महाजन यांनी मला सांगितले की, तू विधानपरिषदेत गेले पाहिजे. मी त्यांना सांगितले की, मी विधानपरिषदेत जाणार नाही. मी त्यांचे दोन वर्षे ऐकले नाही. दोन वर्षानंतर मला त्यांनी पुन्हा सांगितले की, आता तुला विधानपरिषदेवर जावेच लागेल. म्हणून मी या सभागृहात आलो. या सभागृहात आलो तेव्हा माननीय श्री.नितीन गडकरी हे विरोधी पक्ष नेता होते.

3....

त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची मला संधी मिळाली. हे सभागृह मी त्यावेळी पाहिले. या सभागृहाला वरिष्ठांचे सभागृह म्हटले जाते. खऱ्या अर्थाने हे वरिष्ठांचे सभागृह आहे. या सभागृहामध्ये ज्या उंचीने चर्चा होतात किंवा रंजल्या गांजलेल्यांसाठी, आदिवासींसाठी, मागासवर्गीयांसाठी उपेक्षितांसाठी गांभीर्याने चर्चा करुन त्यांना न्याय देण्याचे काम केले जाते. हे मी प्रत्यक्षात डोळ्यांनी पाहिले आहे.

सभापती महोदय, राजकारण कोणत्या वळणावर कसे बदलते हे मला माहीत नव्हते. माननीय श्री.नितीनजी गडकरी यांचे विरोधी पक्ष नेते पद जाऊन मला त्या पदावर काम करावे लागेल याचा विचारही मी कधी केला नव्हता. परंतु पक्षाने माननीय श्री.नितीनजी गडकरी यांना प्रदेशाध्यक्ष केले. ते प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर एक व्यक्ती एक पद हे आमच्या पक्षाचे ब्रीद असल्यामुळे त्यांना ते पद त्यांना सोडावे लागले आणि माझ्या गळ्यात हे पद पडले असेच मी म्हणेन. मला याचा आनंद आहे की, एवढया मोठ्या सभागृहातील विरोधी पक्ष नेते पदाचा मान मला मिळाला. या पदावर मोठमोठ्या व्यक्तींनी काम केलेले आहे. आपण कल्पनाही करु शकणार नाही इतक्या उत्तुंग व्यक्तिमत्वाची माणसे या पदावर काम करुन गेली आहेत. मी माननीय श्री.शरदराव पवार यांचा जाणीवपूर्वक उल्लेख करीन. ज्या पध्दतीने त्यांनी कृषी क्षेत्राला पुढे नेण्याचा प्रयत्न केला, ज्या पध्दतीने महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांना दिशा देण्याचा प्रयत्न केला. तो वाखाणण्याजोगा आहे. अशी माणसे या जागेवर बसलेली आहेत. त्या जागेवर बसण्याची सर्वसामान्य शेतकऱ्याच्या मुलाला आज संधी मिळत आहे, याचा मला त्या दिवशी खूप अभिमान वाटला. मला तो दिवस आठवतो. मी ज्या दिवशी त्या खुर्चीवर बसलो त्यावेळी माननीय श्री.विलासराव देशमुख हे राज्याचे मुख्यमंत्री होते.

माझ्या कारकिर्दीत मी तीन मुख्यमंत्री पाहिले. त्या तिघांचेही वर्णन मी करीत बसणार नाही, कारण आता खूप वेळ झालेला आहे. माझी निवड झाल्यानंतर माननीय श्री.विलासराव देशमुख यांनी भाषणात असा उल्लेख केला होता की, भाऊसाहेबांचा स्वभाव मवाळ आहे. मी ज्या संस्कारात वाढलो आहे त्या संस्कारातच मी जगलो आहे. मी मवाळ जरुर आहे. मी माझ्या स्वभावात आक्रस्ताळेपणा कधी येऊ दिला नाही. साधारण जीवन जगताना मी कोणावर

4....





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

रागावलो असल्याचे मला अजूनही आठवत नाही.  मी या पदावरुन जाताना मला तीन गोष्टींचा जरुर उल्लेख करावासा वाटतो.  त्या गोष्टी जर घडल्या नसत्या तर बरे झाले असते असे मला वाटते.  त्यातील एक विषय असा आहे की, सभागृहात शेतकऱ्यांविषयी चर्चा चालू होती.  मी विरोधी पक्ष नेता झाल्यावर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांचा मला आधार मिळाला होता. शेतकऱ्यांसाठी संघर्ष करण्यासाठी एक व्यक्ती माझ्यासोबत आहे.  आम्ही दोघे मिळून शेतकऱ्यांसाठी काही तरी करु असे वाटत होते.  शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी मी काही तरी बोलत होतो.  मी माझ्या पध्दतीने तो विषय मांडत होतो.  मी ज्यांच्याबद्दल बोलत आहे त्यांचे अस्तित्व परमेश्वराने ठेवले नाही.  माझे कै.गुरुनाथ कुलकर्णी यांच्याशी व्यक्तिगत संबंध फारच चांगले होते.  मी बोलत असताना ते मध्येच उभे राहिले.  त्यांनी शेतकऱ्यांबाबत काही तरी कॉमेण्टस् पास केल्या होत्या. त्यावेळी माझा बॅलन्स गेला होता, त्या घटनेचे आपण साक्षीदार आहात.  अन्नदाता शेतकऱ्यांचे आम्ही प्रश्न मांडत असताना त्याबाबत कोणी कॉमेंण्टस् करीत असेल तर ते माझ्या मनाला पटले नाही.  त्यावेळी माझा थोडासा बॅलन्स गेल्यामुळे मी कै.गुरुनाथजींना थोडेसे बोललो.  पण दुसऱ्याच क्षणाला माझ्या मनाला अत्यंत वेदना झाल्या.  त्यावेळी आपणही मला खाली बसविले.  मला वेदना झाल्या होत्या. पण आपण बोलल्यानंतर मी खाली बसलो.  परंतु मी लगेच लॉबीमध्ये गेलो आणि त्यांच्याकडे झालेल्या चुकीबद्दल दिलगिरी व्यक्त केली होती.  माझा बॅलन्स जावयास नको होता, पण त्यावेळी तो गेला होता.

दुसरे उदाहरण सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना आठवत असेल.  शेतकऱ्यांचा विषय सभागृहात सुरु होता.  त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप मध्येच उभे राहून काही तरी बोलले.  त्या दिवशीही माझा तोल गेल्यामुळे मी त्यांना काही तरी बोललो होतो.  पण त्याबाबत मी भाईंना चिठ्ठी लिहून दिलगिरी कळविली होती.

तिसरा प्रसंग म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांच्या विषयी माझ्या तोंडून सरदार असा शब्द निघून गेला.  त्यामुळे तेही माझ्यावर चिडले होते.  त्या दिवशी सुध्दा मी दिलगिरी व्यक्त केली होती.

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

चौथा प्रसंग म्हणजे आपल्या बाबतीत घडला होता, तो जर माझ्या कारकिर्दीत घडला नसता तर मला असे वाटते की, कोणत्याही पध्दतीने काहीही न होता आपली कारकीर्द यशस्वीपणे पार पडली असती.

नंतर श्री.गिते.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

शेतकऱ्यांचा प्रश्न होता की आणखी दुसरा प्रश्न होता, ते मला आता आठवत नाही. परंतु त्या दिवशी सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, विनोद तावडे आणि दोन सन्माननीय सदस्य असे चार सदस्य सभागृहात निलंबित झाले. ते निलंबित का झाले मी त्या गोष्टीचा प्रत्यक्ष साक्षीदार आहे. त्या दिवशी सभागृहात जी गोष्ट घडावयास नको होती, ती गोष्ट घडली. मी विरोधी पक्ष नेता असताना ती गोष्ट घडावयास नको होती. सभापती महोदय, या गोष्टीबद्दल आपल्याला देखील खूप संताप आला होता. तो संताप देखील मी माझ्या डोळयांनी पाहिला. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्यावर त्या दिवशी अन्याय झाला. ते आपल्याच जागेवर बसलेले असतानाही त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात आले होते. सभापती महोदय, आपल्याला त्या दिवशी खूप मानसिक त्रास झाला. आपल्या विरुध्द विरोधी पक्ष सदस्यांकडून काही कॉमेंटस् पास होत होत्या. त्यामुळे तुम्हाला जेवढया वेदना झाल्या, त्यापेक्षा जास्त वेदना मला झाल्या. मी विरोधी पक्ष नेता आहे आणि माझ्या सभागृहाच्या माननीय सभापती विरुध्द अशा पध्दतीने कॉमेटस् पास होत आहेत. ते पाहून आणि ऐकून मला संपूर्ण दिवस खूप वाईट वाटले. अशा दोन, चार गोष्टी सोडल्या तर मी विरोधी पक्ष नेता या पदाला माझ्या पध्दतीने अत्यंत चांगल्या प्रकारे न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

महोदय, मी आक्रमक नाही त्यामुळे माझ्यावर टीका होत होती. श्री.भाऊसाहेब फुंडकर हे आक्रमक विरोधी पक्ष नेते नाहीत अशीही माझ्यावर टीका झाली. श्री.भाऊसाहेब फुंडकर हे कधी प्रेसमध्ये जात नाहीत असेही बोलले गेले. प्रेसकडे जाण्याचा माझा लहानपणापासून स्वभाव नाही. मी सभागृहात जे काही बोलत होतो, ते त्यांना योग्य वाटले तर प्रेसमध्ये छापतील. माझे बोलणे त्यांना योग्य वाटले नाही तर ते प्रेसमध्ये छापणार नाहीत. मी सभागृहातून प्रेसवाल्यांकडे चिठ्ठया पाठविल्या नाहीत. सभागृहात बोलत असताना मी कधीही प्रेस गॅलरीकडे बघत नव्हतो. मी इलेक्ट्रॉनिक मिडियाकडे कधी गेलो नाही. कोणी बोलवायला आले तरच जात होतो. प्रेस हा माझा विषय नव्हता. फक्त एकच शल्य आहे, ते सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणात बोलून दाखविले. माझ्या मनात एकच शल्य आहे. महाराष्ट्रातील लाखो शेतकरी सावकारांच्या विळख्यात सापडले होते. विदर्भात जवळपास 6 हजार शेतकऱ्यांनी सावकाराच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्या. सावकारी पध्दतीचा कोठे तरी बंदोबस्त झाला पाहिजे आणि

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

म्हणून माझी आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांची कायम मागणी असावयाची की, महाराष्ट्रात सावकारी पध्दत सुरु आहे ती बंद करावी. याबाबतीत मी माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना अनेक वेळा भेटलो. त्यांना वारंवार सांगत होतो की, या सावकारांचा कायमचा बंदोबस्त करा. या संदर्भात मी सहकार मंत्र्यांना अनेक वेळा भेटलो. त्यातून सावकारी कायद्याची कल्पना पुढे आली. महाराष्ट्रात सावकारी कायदा आणणार अशी घोषणा सरकारने केली, त्यावेळी मला खूप आनंद वाटला. परंतु सरकारकडून तो कायदा आणण्यामध्ये थोडा उशीर झाला. तो कायदा या सभागृहात मंजूर होऊन तीन वर्षे झाली. तो कायदा दिल्लीमध्ये अडकलेला आहे. तो कायदा दिल्ली येथून मंजूर होऊन आला असता तर मला अत्यंत समाधान वाटले असते. किमान शेतकऱ्याला एक न्याय देण्याचे काम या ठिकाणी बसून देऊ शकलो. परंतु दुर्देवाने तसे घडले नाही. ते शल्य माझ्या मनात कायम रहाणार आहे. एका गोष्टीचा उल्लेख मला करावयाचा नव्हता. परंतु ती गोष्ट कायम स्वरुपी माझ्या मनात राहिली असती. म्हणून मला त्याचा उल्लेख करणे गरजेचे वाटते.

महोदय,सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आज माझ्या मनातल्या आणखी एका गोष्टीचा उल्लेख केला. ते अचानक बोलून गेले. मला वाटले होते की, त्या गोष्टीचा ते उल्लेख करणार नाहीत. सरकारने शेतकऱ्यांसाठी पहिल्या आठवडयात पॅकेज जाहीर केले आणि त्यावेळी आम्हाला आश्वस्त केले होते की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी पॅकेज संबंधीची माहिती निश्चितपणे जाहीर केली जाईल. कापूस, सोयाबीन आणि धान ही पिके उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना हेक्टरी, एकरी किती आर्थिक मदत दिली जाणार आहे यासंबंधीची माहिती अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहास दिली जाईल अशी माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती. मी ही खुर्ची सोडण्यापूर्वी हा निर्णय शासनाने जाहीर केला असता तर मला आणखी समाधान वाटले असते. ज्या विदर्भाच्या भूमीमध्ये हिवाळी अधिवेशन झाले, त्या अधिवेशनामध्ये शेतकऱ्यासाठी सरकारसोबत थोडासा संघर्ष करुन, थोडे भांडून न्याय देऊ शकलो असतो तर मला खूप बरे वाटले असते. ठीक आहे.

सभापती महोदय, मी सर्वांचे आभार मानणार आहे. माननीय श्री.विलासराव देशमुख आणि श्री.अशोकराव चव्हाण, माजी मुख्यमंत्री या सभागृहात नाहीत. ज्यावेळी माननीय श्री.विलासराव देशमुख हे या राज्याचे मुख्यमंत्री होते, त्यावेळी मी त्यांना अनेकदा बोललो होतो की, मी

3...



ABG/ प्रथम श्री.खंदारे 17:05

राजकारण करणारा कार्यकर्ता नाही. कोणाला तरी फसवावे असा प्रकार मी माझ्या आयुष्यात कधीही केलेला नाही. मी माननीय श्री.विलासरावजी देशमुख यांना अनेक वेळा म्हणालो की, सावकारांच्या जाळयामध्ये तुम्ही अडकू नका. ते सुरुवातीला म्हणाले की, श्री.पांडुरंग फुंडकर हे मवाळ आहेत. या सावकारांच्या जाळयात अडकू नका अशी अनेकदा त्यांना विनंती केली. परंतु माननीय श्री. विलासराव देशमुख यांनी माझे म्हणणे ऐकले नाही. माननीय श्री.विलासराव देशमुख यांनी सावकारासाठी पोलीस स्टेशनमध्ये दूरध्वनी केला. त्यावेळी मला खूप दु:ख वाटले. या प्रकरणी या राज्याच्या मुख्यमंत्र्यांवर सर्वोच्च न्यायालयाने स्ट्रिक्चर्स पास केले. त्या गोष्टीचे देखील मला खूप वाईट वाटले. त्यावेळी तत्कालिन मुख्यमंत्र्यांनी माझे म्हणणे ऐकले असते तर सर्वोच्च न्यायालयाकडून स्ट्रिक्चर्स पास झाले नसते. मला त्या विषयावर राजकारण करावयाचे नव्हते. मला माननीय श्री.विलासराव देशमुख यांनी मवाळ म्हटले होते. परंतु माझ्यामुळेच श्री.विलासराव देशमुख यांच्या माध्यमातून राज्य शासनाला दंड भरावा लागला. मी कधी रागावलो नाही. कधी आक्रस्ताळेपणा दाखविला नाही. या ठिकाणी न्याय मिळत नव्हता म्हणून मी न्यायालयाच्या माध्यमातून सावकारग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. सरकारने सावकाराला वाचविण्याचा प्रयत्न केला. सावकाराला वाचवित असताना राज्याचे मुख्यमंत्री त्यात अडकले. शेवटी सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारला दंड भरावा लागला.

सभापती महोदय, तीन मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीमध्ये काम करण्याची मला संधी मिळाली. या राज्याचे मुख्यमंत्री म्हणून श्री.पृथ्वीराज चव्हाण यांचे नाव घोषित झाले त्यावेळी मला खूप आनंद झाला. त्यांचे मुंबईत आगमन झाले, त्यावेळी मी त्यांना दूरध्वनी करुन सांगितले की, आपले नाव मुख्यमंत्री म्हणून घोषित झाल्यामुळे मला खूप आनंद होतो आहे. आपल्या पक्षाने मुख्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध करुन दिली. आपला स्वभाव, आपल्या कामात असलेला पारदर्शीपणा याचा महाराष्ट्राला निश्चितपणे उपयोग होईल याची मला खात्री आहे. महाराष्ट्र हा भ्रष्टाचाराचा अड्डा बनलेला आहे, महाराष्ट्राचा बिहार होत आहे, अशा प्रकारची महाराष्ट्राची बदनामी सातत्याने होत आहे. आपल्या कारकिर्दीत महाराष्ट्राला निश्चितपणे चांगले दिवस येतील व आपल्या समवेत काम करण्याची आम्हाला देखील संधी मिळेल अशा भावना दूरध्वनीव्दारे मी माननीय मुख्यमंत्र्यांकडे

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्यक्त केल्या होत्या.

सभापती महोदय, या सभागृहात आमच्या समोर बसलेले कॉग्रेस पक्षाचे सदस्य, राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे सदस्य यांच्या बरोबर मी कधीही वाद केलेला नाही. विरोधी पक्ष नेते पद सांभाळताना मला त्यांनी चांगल्या प्रकारचे सहकार्य केलेले आहे. सभागृहात काही प्रश्न उपस्थित होतात, त्यावेळी वैचारिक वाद निर्माण होत असतात. माननीय श्री. मेटे साहेब, आपले व्यक्तिगत कधीच भांडण नसते. या सभागृहात विचारांची लढाई होत असते. या सभागृहात एखाद्या प्रश्नावरुन लढाई होत असते. पण व्यक्तिगत वाद कोणाचाही नसतो. माझ्यात आणि सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे, श्री.दिवाकर रावते यांच्यात फार मोठे भांडण निर्माण होणार आहे, असे प्रसंग सभागृहात अनेक वेळा आले. परंतु आमचे हे विचाराचे भांडण असायचे. परवा या सभागृहात जी घटना घडली ती घडावयास नको होती. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सहन झाले नाही म्हणून वेलमध्ये गेले आणि त्याचवेळी सत्ताधारी पक्षातील काही सदस्यही वेलमध्ये आले व वेलमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. सर्व सदस्य वेलमध्ये आले या गोष्टीचे मला खूप वाईट वाटले. रंजलेले, गांजलेले, गोरगरीब, सर्वसामान्य, यांना न्याय देणारे हे सभागृह आहे. या सभागृहाच्या माध्यमातून वैचारिक संघर्ष होतात आणि ते यापुढे देखील होत राहतील. एखाद्या प्रश्नाच्या बाबतीत आमची मते वेगळी असतील, समोरच्या सदस्यांची मते वेगळी असतील. वैचारिक संघर्ष होत असताना एकमेकात मतभेद असू शकतात पण मनभेद असू नये अशी माझी भावना आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील व इतर सन्माननीय सदस्य यांची मते वेगवेगळी असू शकतात. परंतु या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांशी माझे व्यक्तिगत संबंध अतिशय चांगले राहिले यातच मी स्वत:ला धन्य समजतो.

सभापती महोदय,आमच्या पक्षाची मंडळी माझ्या सोबतच आहे. मी ज्या दिवशी विरोधी पक्ष नेता झालो त्या दिवशी मी थोडासा घाबरलो होतो. मला शिवसेना पक्षाला सोबत घेऊन एकत्रितपणे काम करावयाचे आहे. शिवसेना पक्ष व आपण एकत्रितपणे कसे काम करावयाचे, विरोधी पक्ष नेतेपद कसे टिकवू शकू याचा मी सातत्याने विचार करीत होतो. परंतु या सभागृहात सर्व सदस्यांनी मला अतिशय चांगले सहकार्य केले तसेच आमच्या पक्षाने देखील मला चांगले सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देतो. सर्वांचे आभार मानतो.....

यानंतर श्री.भोगले..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 17:15

श्री.भाऊसाहेब फुंडकर.......

श्री.वसंतराव डावखरे साहेब आमचे मित्र आहेत. त्यांनी माझ्या विनंतीवरुन माझ्या गावाला भेट दिली आणि संपूर्ण महाराष्ट्रात एक मेसेज गेला. श्री.वसंतराव डावखरे हे भाऊसाहेब फुंडकरांचे मित्र आहेत. आज त्याचा मला इतका त्रास होत आहे की, खूप डिमांड वाढीला लागली. श्री.वसंतराव डावखरे यांच्याकडे एखादे काम असेल तर मला फोन येतात, डावखरे तुमचे मित्र आहेत, त्यांना तुम्ही आमचे काम करण्यास सांगा. मी स्पष्ट सांगतो की, डावखरे माझे मित्र जरुर आहेत, ते दिलदार आहेत, रंगेल आहेत याचा अर्थ मी प्रत्येक गोष्ट डावखरे यांना हुकुमाने सांगून करुन घेतो असे समजू नका. ते माझे व्यक्तिगत मित्र आहेत. असे कौटुंबीक अनुभव हे पद भूषवित असताना मला आले.

सभापती महोदय, विधिमंडळाचे आपले सर्व अधिकारी यांनी देखील मला चांगले सहकार्य केले. विधिमंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने मला कोणत्याही बाबतीत कधी नकार दिला नाही. मी जे सांगितले त्यात कमी जास्त झाले असेल, पण निश्चितपणे मला पूर्ण सहकार्य देण्याचे काम या विधिमंडळातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केले. मी त्यांनाही धन्यवाद देतो आणि त्यांचे आभार मानतो. श्री.विनोदजी तावडे माझे मित्र आहेत. गेली 10-15 वर्षापेक्षा जास्त काळ आम्ही सोबत काम करीत आहोत. ते विद्यार्थी परिषदेमध्ये काम करीत होते. मी देखील विद्यार्थी परिषदेमध्ये 7-8 वर्षे काम करीत होतो. किंबहुना 10 वर्षे त्यांच्या आधी मी राजकारणात प्रवेश केला. पण विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेता म्हणून एका महान नेत्याची निवड माझ्या पक्षाने केली. राजकारणात पदे येतात आणि पदे जातात. मागील 32 वर्षाच्या काळात मी फक्त तीन वर्षे मोकळा होतो. मला पक्षाने कधी रिकामे ठेवले नाही. महाराष्ट्राच्या पातळीवर विविध पदे भूषविली. महाराष्ट्रातील पक्ष प्रदेश अध्यक्ष, उपाध्यक्ष, महामंत्री, सचिव, युवा सेलचा महाराष्ट्र अध्यक्ष अशा पदांवर मी काम केलेले आहे. या पदांवर काम करीत असताना कोणतेही पद असेल किंवा नसेल ज्या पक्षाचा वसा घेतला तो वसा चालविला. ज्या पदावर गेलो ते पद डोक्यात जाऊ न देता, उतणार नाही, मातणार नाही आणि घेतला वसा सोडणार नाही या उक्तीने त्या पदाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आणि जमिनीवरच राहिलो, शेतकऱ्यांमध्ये राहिलो, शेतकऱ्यांच्या चळवळीमध्ये राहिलो, लोकांमध्ये राहिलो. त्याचा मनस्वी आनंद मला निश्चितपणे आहे. आपणा सर्वांना धन्यवाद देतो, सर्वांचे आभार मानतो आणि माननीय श्री.विनोदजी तावडे यांच्या रुपाने एक नवीन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाऊसाहेब फुंडकर........

नेतृत्व पक्षाने दिले आहे. ते निश्चितपणे या पदाला न्याय देतील याची खात्री आहे. एकंदरीत परिषदेतील त्यांचे काम, त्यांनी पक्षासाठी आतापर्यंत केलेले काम, त्यांची सभागृहात काम करण्याची हातोटी पाहता निश्चितपणे या पदाला न्याय मिळेल. आम्ही सर्वजण त्यांच्या सोबत आहोत. ते उत्तम पध्दतीने या सभागृहात काम करतील याची मला खात्री आहे. या सभागृहात अनेक मोठमोठे नेते विरोधी पक्षनेते पदावर बसले. त्यांचाच आदर्श समोर ठेवून श्री.विनोदजी तावडे काम करतील. त्यांना परमेश्वर या कार्यामध्ये यशस्वी करो. महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसाला, गोरगरीब माणसाला, रंजलेल्या गांजलेल्या माणसाला, आदिवासी व उपेक्षित समाजातील माणसाला न्याय देण्याची भूमिका त्यांच्या हातून घडो एवढी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो आणि माझे वक्तव्य संपवितो.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आज या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेता म्हणून आपल्या सर्वांचेच परममित्र श्री.विनोदजी तावडे यांची निवड झाली. गेली सहा वर्षे ज्यांनी या विरोधी पक्षनेता पदाची ख-या अर्थाने ऊंची वाढविली आणि आपल्या अत्यंत चांगल्या शैलीने उत्कृष्ट काम केले ते आदरणीय श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी आज त्या पदाचा कार्यभार श्री.विनोदजी तावडे यांच्याकडे दिला आहे. माननीय श्री.भाऊसाहेब फुंडकर यांच्याबद्दल बोलायचे झाले तर मी जे काही त्यांच्यात पाहिले, अभ्यासले त्यातून महाराष्ट्राचा एक खराखुरा शेतकऱ्यांचा, गोरगरिबांचा, पिडितांचा आधार आणि त्यांचे नेतृत्व करणारा समर्थ नेता अशा समर्पक शब्दामध्ये मी त्यांचा उल्लेख करतो. मी श्री.भाऊसाहेब फुंडकर यांच्या विनंतीवरुन त्यांच्या मतदारसंघात गेलो होतो. श्री.भाऊसाहेब फुंडकर हे माझे चांगलेच मित्र आहेत. परंतु त्यांनी बोलताना डावखरे असा एकेरी उल्लेख करुन मी रंगेल असल्याचे सांगितले. त्यामुळे मी त्यांच्या मतदारसंघात कोणाकोणाला भेटलो याबद्दल सभागृहाला प्रश्न पडण्याची शक्यता आहे. असा प्रश्न पडू नये म्हणून सांगू इच्छितो की, हिंदी चित्रपट अभिनेता धर्मेंद्र यांना घेऊन मी त्यांच्या मतदारसंघात गेलो होतो. तेथे कबड्डीचे सामने आयोजित केले होते. त्या सामन्यात कोणी खेळले नाही. कारण इतकी गर्दी झाली की, मैदानात माणसेच माणसे होती. शेवटी कबड्डी आम्हालाच खेळावी लागली हे त्यांना आठवत असेल. सगळ्यांनीच त्यांच्याबद्दल आपल्या भाषणात चांगली मांडणी केली. त्यामुळे पुन्हा पुनरुक्ती होऊ नये म्हणून मी अधिक भाष्य करणार नाही. आपली या ठिकाणी मैत्री झाली ही मैत्री चिरकाल टिको अशी प्रार्थना करतो. श्री.विनोदजी तावडे यांनी विरोधी पक्षनेता पदाची सूत्रे स्वीकारली. त्यांची नेमणूक होणार म्हणून मागील आठवड्यात वृत्तपत्रात सातत्याने बातम्या प्रसिध्द होत होत्या. श्री.भाऊसाहेब फुंडकर अभ्यासू आहेत. मी आता ज्या जागेवर उभा आहे त्या ठिकाणी मी आलो नाही. श्री.विनोदजी तावडे हे श्री.भाऊसाहेब फुंडकर यांच्या शेजारी बसायचे आणि ते सतत या खुर्चीकडे बघायचे. माझ्या या नंतर लक्षात आले. श्री.विनोदजी तावडे या खुर्चीकडे बघून मनात म्हणायचे,

तूझे क्या सुनाऊं मैं दिलरुबा
तेरे सामने मेरा हाल है
तेरी एक निगाह की बात है
मेरी जिंदगी का सवाल है.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4..

**उप सभापती**.........

आज श्री.विनोदजी तावडे विरोधी पक्षनेत्याच्या खुर्चीवर विराजमान झाले आहेत. त्यांच्या चेहेऱ्यावरचे हास्य आपल्याला सर्व काही सांगून जाते. मी श्री.विनोदजी तावडे यांना शुभेच्छा देत असताना पुढील राजकीय जीवनामध्ये श्री.भाऊसाहेब फुंडकर यांचे आदर्श व्यक्तिमत्व सदैव सक्रिय राहो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो आणि श्री.विनोदजी तावडे यांच्या भावी काळात त्यांच्या कार्याला माझ्या शुभेच्छा देतो. धन्यवाद.

-------

....5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्षनेते) : आदरणीय सभापती महोदय, या सार्वभौम सभागृहाने माझ्यासारख्या अनुभवाने कमी असणाऱ्या किंवा या सभागृहात उपस्थित असणाऱ्या अनेक दिग्गजांच्या तुलनेत ज्ञान, कर्तृत्व या अर्थाने सुध्दा मी कमी असताना माझ्यावर आपण सर्वांनी ही जबाबदारी सोपविली याबद्दल सभागृहातील सर्व सदस्यांचे, विशेषत: विरोधी पक्षाच्या बाजूच्या सर्व मान्यवरांचे मी मनापासून आभार मानतो. भारतीय जनता पक्ष असेल, पक्षाचे नेतृत्व असेल, माननीय श्री.नितीन गडकरी, श्री.गोपीनाथ मुंडे, श्री.एकनाथरावजी खडसे किंवा आजची जी टीम आहे, त्यातील श्री.भाऊसाहेब फुडकर, श्री.सुधीर मुनगंटीवार, श्री.देवेंद्र फडणवीस, श्री.गिरीष महाजन या सगळ्यांना मी मनापासून धन्यवाद देतो. शिवसेना या आमच्या मित्र पक्षाचे सर्व आदरणीय नेते, शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे, श्री.उध्दवजी ठाकरे या सर्वांना मी या निमित्ताने मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, विरोधी पक्षनेता झाल्यानंतर सहज माहिती घेण्याचा प्रयत्न केला. या पदाच्या जबाबदाऱ्या काय आहेत आणि काय करायचे असते याची मी माहिती घेतली, तेव्हा कळले की, या पदाचा प्रोटोकॉल आदरणीय सभापती, माननीय विधानसभा अध्यक्ष, माननीय मुख्यमंत्री आणि मग विरोधी पक्षनेता विधानपरिषद असा आहे. हे मला पहिल्यांदा कळले आणि हे कळल्यानंतर दडपण म्हणता येणार नाही, परंतु बेअरिंग मात्र नक्की आले. आपल्यावर जी जबाबदारी सोपविण्यात येत आहे आणि आपण ती स्वीकारीत आहोत, ती जबाबदारी स्वीकारताना स्वाभाविकपणे शेजारी बसलेले श्री.भाऊसाहेब फुंडकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.जयंत प्र.पाटील, श्री.कपिल पाटील, उप सभापती श्री.डावखरे साहेब यांच्याकडे पाहिल्यानंतर किंचित बेअरिंग कमी झाले.

पत्रकारांनी मला विचारले की, इतकी ज्येष्ठ मंडळी सभागृहात असताना सर्वात तरुण विरोधी पक्षनेता हे तुम्हाला कसे झेपायचे?

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .........

मला सहज म्हणून आठवले की, जसे धोनीच्या टीममध्ये सचिन तेंडुलकर आणि सेहवाग आहेत असे म्हटल्यानंतर धोनी जरी वयाने लहान असला तरी त्या टीमला वर्ल्ड कप जिंकणे सोपे गेले तशाच प्रकारे मलाही वाटते की, या टीममध्ये काम करणे मला येथे असलेल्या अनेक ज्येष्ठ सहकाऱ्यांच्या मदतीने सोपेच जाणार आहे.

या पदावर माननीय श्री. भाऊसाहेब यांनी 6.5 वर्षे काम केले. तत्पूर्वी नानासाहेब पाटील यांनी काम केले आहे. आताच कोणीतरी सभागृहात म्हणाले की, भाऊसाहेब मवाळ आहेत. पण कदाचित एखाद्या प्रश्नावर कणखर भूमिका सौम्य शब्दात मांडणे असे असेल तरच भाऊसाहेबांना मवाळ म्हणता येईल. पण ज्या मुख्यमंत्र्यांनी सावकाराला वाचविण्यासाठी पोलिसांना फोन लावला त्यांच्याविरुध्द हेच मवाळ भाऊसाहेब सुप्रिम कोर्टापर्यंत जातात व योग्य तो निर्णय पदरात पाडून घेतात. त्या अनुषंगाने सुप्रिम कोर्टाने जो निर्णय दिला त्यात सुप्रिम कोर्टाने मारलेल्या स्टिक्चर्समुळे इंग्रजांच्या काळातील राजवट आहे की काय असेच वाटत होते, येथपर्यंत भाऊसाहेबांनी त्या प्रकरणाचा पाठपुरावा केला. ज्यावेळेस विदर्भातील शेतकऱ्यांच्या शेतातील कृषी पंपांचे कनेक्शन्स तोडले जात होते ते सभागृहात सांगताना भाऊसाहेब जेवढे व्याकूळ व्हायचे त्यावरुन शेतकऱ्यांच्या वेदना त्यांच्या शब्दातच जवळून मी अनुभवल्या आहेत. ज्या वेदना शेतकऱ्यांना होत होत्याच त्याच भाऊसाहेबांनाही होत होत्या. अशा वेळी कणखर विरोधी पक्षनेता म्हणून सुध्दा त्यांचे रुप वेगळे असल्याचे मी चर्चेत पाहिले आहे. त्यांचा स्वभाव सौम्य आहे, विशेषत: अनुभवी लोक असल्यानंतर सर्वांना एकत्र घेऊन जाणे याबाबत काहीच काळजी करायची नसते. ज्याप्रमाणे सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, भाऊसाहेब असल्यामुळेच कदाचित सर्व टीमला काम करताना जमले. मला देखील या पदावर काम करताना त्यांचा आदर्श आणि मार्गदर्शन मोलाचे ठरेल यात शंका नाही.

महोदय, या सर्व कारकिर्दीचा आदर्श घेऊन काम करीत असताना मागे वळून पाहतो तर माझ्यासारखा, मुंबईत गिरणगावात दहा बाय दहाच्या खोलीत जन्मलेला एक सामान्य कार्यकर्ता चळवळीत येतो आणि प्रवास करीत करीत या पदावर पोहचतो हीच खरी लोकशाही आहे. कोणत्याही प्रकारचा राजकीय वारसा किंवा परंपरा नाही. विद्यार्थी चळवळीत काम करीत असताना मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी आंदोलन झाले आणि विधान भवनाच्या बाहेर, मंत्रालयाच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ........

समोर पोलिसांनी लाठ्या मारल्या. यासंदर्भात विधानसभेत काय निर्णय होतो हे ऐकण्यासाठी पास काढून गॅलरीत जाऊन बसणारा कार्यकर्ता आज या खुर्चीत येतो हे या लोकशाही व्यवस्थेतील यश आहे. ही प्रगल्भ लोकशाही असून त्यात अशा प्रकारे काम करणाऱ्या, विद्यार्थी चळवळीतील कार्यकर्त्याला हे स्थान मिळालेले आहे.

साठे कॉलेजात अकरावी-बारावीत शिकत असताना आमचा एक ग्रुप होता. लेक्चरच्या मधल्या कालावधीत आम्ही एका ठिकाणी उभे राहत होतो. तेथे विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते येत आणि त्यांची काही कामे मुलांना सांगत असत. त्यात 25 पैशांच्या पावत्या फाडणे वगैरे काम ते करीत होते. ही मुले दिवसभर काम करीत होते. दूपार झाल्यानंतर मात्र स्वत:च्या पिशवीतून आणलेला डबा खात होती. नॉर्मली कॉलेजची मुले म्हटले तर कॅंटीनमध्ये जाऊन वडापाव वगैरे खात असतात. पण ही विद्यार्थी परिषदेची मुले स्वत:च्या झोळीतील पोळी भाजी खात होती. अचानक तेथे दुसरा ग्रुप आला आणि त्यांना त्यांचे काम बंद करायला लावले. आम्ही सर्व मित्र त्या ठिकाणी गेलो आणि त्या दुसऱ्या ग्रुपला सांगितले की, त्यांचे काम त्यांना करु द्या, आपण कशाला हाकलून लावत आहात. अशा प्रकारे कोणावर अन्याय होताना पाहिले तर मला बघवत नाही. अशा प्रकारे मी त्या चळवळीत ओढलो गेलो. त्यानंतर त्यातील एकाने आमच्या ग्रुपला हेरले व मी चळवळीत आलो. विद्यार्थी परिषदेत काम करीत असताना माझ्यासमोर मुख्य करियर बी.ई. इलेक्ट्रॉनिक्स हे होते. दुसऱ्या बाजूला वेगवेगळे अनुभव येतच होते.

मला आठवते की, सांगली जिल्ह्यातील म्हैसाळ या गावाला आम्ही गेलो असता तेथील एक घटना कानावर आली होती. या गावात एक शेतमजूर सावकाराकडे कर्ज मागण्यासाठी गेला. तो सावकाराला 15 हजार रुपये कर्ज मागत होता आणि चार वर्षात ते पूर्ण करीन अशी विनवणी करीत होता. सावकार त्याला सांगत होता की, तुला मिळणाऱ्या मजुरीत तू 15 हजाराचे कर्ज कसे फेडणार ?. त्यावर शेतमजूर म्हणाला की मी आपले पैसे फेडल्याशिवाय माझा प्राण सोडणार नाही. काहीही करुन आपले पैसे चुकते करीन. तरी देखील सावकार म्हणाला की तुला हे कर्ज फेडणे कसे शक्य होणार आहे. सावकाराने विचारले की तुला कर्ज कशासाठी पाहिजे, तेव्हा शेतमजूर म्हणाला की माझ्या बायकोची प्रकृती ठीक नाही, तिच्यावर दवाखान्यात उपचार करावयाचे असल्याने मला कर्ज पाहिजे आहे. सावकार म्हणाला की तुला अगोदरच चार मुले

.......3

श्री. विनोद तावडे .........

आहेत. त्यांचा खर्च करुन तुला कर्जफेड करणे कसे शक्य होणार आहे ? त्यावर त्या शेत मजुराने जे उत्तर दिले ते खरोखरच हृदय हेलावून टाकणारे आहे. तो शेतमजूर म्हणाला की, माझ ी मोठी मुलगी 16 वर्षांची आहे, दोन तीन वर्षानंतर ती 18 वर्षांची पूर्ण होईल. ती 18 वर्षांची झ ाल्यानंतर मी तिला मुंबईत वेश्या बाजारात 25 हजारात विकणार आणि आपले कर्ज फेडून टाकणार. हे ऐकल्यानंतर मात्र मला अत्यंत वाईट वाटले. सांगलीसारख्या जिल्ह्यात, ज्या जिल्ह्यातून आपल्या राज्याचे मुख्यमंत्री होऊन गेले तसेच इतर दोन मंत्री आहेत. त्या जिल्ह्यातील शेत मजुराला आपल्या कुटुंबासाठी अशा प्रकारे पाऊल उचलावे लागते. त्याच क्षणी माझ्यासारख्या संवेदनशील कार्यकर्त्याला अत्यंत वेदना झाल्या आणि माझे इलेक्ट्रॉनिक्स मधील करियर बाजूला ठेवून मी नंतर सामाजिक कार्याकडे ओढलो गेलो. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून सामाजिक जाणीवेने वेगळेच करियर समोर आले. अशा प्रकारे माझा या चळवळीतील प्रवास सुरु झ ालेला आहे.

विद्यार्थी परिषदेत असताना मला नेहमीच वाटत होते की, केवळ राजकीय व्यवस्था बदलून चालणार नाही तर राजकारण रहित समाजव्यवस्था तयार झाली पाहिजे. सन 1980 पासून विद्यार्थी परिषदेत काम करीत असताना वेगवेगळ्या क्षेत्राचा अभ्यास करायला मिळाला आणि असे लक्षात आले की, राजकारण हे सामाजिक व आर्थिक बदलाचे इन्स्ट्रुमेंट मानले गेले. If politics is considered as an instrument of socio-economic development तर हे राजकारण अधिक सक्रीयपणे काम करण्यासारखे आहे. समाज कारणासाठी राजकारण केले तर मला वाटते या राजकारणातून नक्कीच आपण काही गोष्टी साध्य करु शकू. अशा प्रकारे मला 1980 पासूनच्या राजकीय प्रवासात प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली, मुंबईचा अध्यक्ष म्हणून काम केले तेव्हा सुध्दा वेगवेगळे अनुभव आले, अनेक गोष्टी सहजपणे शिकायला मिळाल्या. मला वाटते या सर्व प्रवासात आदरणीय नेते प्रमोद महाजन, सूर्यभान वहाडणे आमच्या पक्षाचे संघटन मंत्री श्री. शरद कुलकर्णी यांचेही मोलाचे मार्गदर्शन मला मिळाले आहे. अशा प्रकारे कोकणातून आलेला कार्यकर्ता मुंबईतील व कोकणातील विषय मांडत असताना संपूर्ण राज्याचे विषय मांडण्याची संधी त्याला मिळाली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

सभापती महोदय, आदरणीय दादांच्या शेजारील साखर कारखाना तोटयात होता. त्या कारखान्याचा मी चेअरमन झालो व तोटयात चालणारा कारखाना नफ्यात आणून त्यामधून को-जनरेशनच्या माध्यमातून वीज सुरु केली. आज अशा प्रकारचे कारखाने कोकणामध्ये सुरु होण्याची आवश्यकता आहे. मागच्या अधिवेशनात 1:9 या प्रमाणात फुड प्रोसेसिंगचा निर्णय घेतला. हा निर्णय कोकणातील फुड प्रोसिंगच्या दृष्टीने पहिलाच निर्णय ठरला. 6-7 महिन्याच्या सततच्या पाठपुराव्यानंतर आम्ही देवगड तालुका आंबा उत्पादक संघाचे पहिले फुड प्रोसेसिंग युनीट सुरु करीत आहोत. कोकणातील माणसाला संधी मिळाल्यानंतर तो ती संधी कधीच सोडत नाही. त्यामुळे साखर कारखान्याच्या सोबतीनेच फुड प्रोसेसिंग युनीटची योजना आम्ही कोकणात नक्की सुरु करु.

सभापती महोदय, मी आता विधान परिषदेचा 19 वा विरोधी पक्ष नेता झालेलो आहे. माझ्या अगोदर सन्माननीय सर्वश्री बी.एम.गायकवाड, उत्तमराव नाना, अर्जुनराव कस्तुरे, राम मेघे, दत्ता मेघे, कराळे, ग.प्र.प्रधान सर, आदरणीय शरद पवार, सर्वश्री हांडे, प्रमोद नवलकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर या सर्वांनी विधान परिषदेच्या विरोधी पक्ष नेते या पदाचे काम केलेले आहे. माननीय श्री.छगन भुजबळ तसेच माननीय श्री.नितीन गडकरी यांची आक्रमकता मी पाहिलेली आहे. माननीय भाऊसाहेब यांची अतिशय मृदू शब्दात परंतु कणखरपणे विषय मांडण्याची पध्दत आहे. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांची विषय मांडण्याची पध्दत वेगळी होती. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रधान सरांची एक नैतिक ताकद होती. एका बाजूला आक्रमकता तर दुस-या बाजूला मृदू स्वभावात कणखरता होती. विषय मांडत असताना त्यामध्ये नैतिकता असली पाहिजे. आज संपूर्ण देशात राजकीय व्यवस्थेविषयीचे वातावरण अतिशय गढूळ झालेले आहे.

सभापती महोदय, अधिवेशन झाल्यानंतर मी नेहमी माझ्या मित्रांना भेटत असतो. सभागृहात रात्री आम्ही 10-10 वाजेपर्यंत बिलावर चर्चा केलेली असते ती लोकांना माहिती नसते. या विषयाच्या संदर्भात मी एका संपादकांना भेटलो. ते आता खासदार झालेले आहेत. मी त्यांना सांगितले आम्ही बिलावर विचार मांडतो, ते तुम्हाला दिसत नाही परंतु सभागृह बंद पाडले की, तेच तुम्हाला दिसते. परवाच्या अत्यावश्यक सेवेच्या विधेयकाच्या संदर्भात सत्ताधारी पक्षाच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

कामगार नेत्यांनी विचार मांडले. या सभागृहात विधेयकावर सखोल चर्चा होऊन विधेयके पास होत असतात. पॉलिटिक्स इज ए गेम ऑफ पर्सेप्शन  असे म्हटले जाते. राजकीय व्यवस्थेविषयी बाहेर लोक चांगले बोलत नाहीत. सभागृहातील ज्येष्ठ सहकाऱ्यांकडे मी आदराने पाहत असतो. माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण, माननीय श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम किंवा माननीय उप सभापती श्री.डावखरे यांचा वसंत ऋतू लक्षवेधी सूचनेमध्ये कधी बरसून जातो,ते कळतच नाही. या सभागृहात काम करण्याची हातोटी ही एक वेगळया प्रकारची असते. सन्माननीय सदस्य ही हातोटी जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी वापरत असतात. जेव्हा सदस्य पहिल्यांदा या सभागृहात येतात  तेव्हा पहिल्या अधिवेशनात ते थोडेसे चाचपडतात परंतु त्या नंतर त्यांना चांगली लाईन अँड लेन्थ मिळते.

सभापती महोदय, माननीय गडकरी साहेब म्हणत असत की, "विरोधी पक्षाने वार कठोर केला पाहिजे परंतु त्या वाराने समोरचा रक्तबंबाळ होता कामा नये". त्यामुळे मला असे म्हणावयाचे आहे की, "बेरुखी जमकर करो, लेकीन यह गुंजाइश  रहे कि, फिर कभी मिलने का मौका मिले तो शरमिंदा ना हों". जनतेसाठी आक्रमक टीका करावयाची परंतु ही टीका करीत असतांना विरोधी पक्षाची चार दायित्वे असतात ती लक्षात ठेवली पाहिजेत. ही चार दायित्वे अशी आहेत की, संधी आली तर पर्यायी सरकार बनवता आले पाहिजे, राज्यातील जनतेच्या हिताचे प्राधान्य जर सरकारच्या नजरेआड झाले तर सामान्य माणसाचा आवाज बुलंद करण्याची क्षमता विरोधी पक्षात असली पाहिजे, दिलेल्या वचनापासून सरकार दूर जात असेल तर त्या वचनावर सरकारला पुन्हा आणण्याचे काम विरोधी पक्षाने केले पाहिजे.

सभापती महोदय, माननीय श्री. छगन भुजबळ साहेबांनी सांगितले की, जेव्हा मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला त्या दिवशी माननीय श्री. पांडुरंग फुंडकर यांनी राजकीय टीका न करता नागपूरच्या अधिवेशनात राजकीय टीका केली होती. जबाबदार विरोधी पक्षाची जी चार कामे आहेत ती आम्ही नक्की करु.

सभापती महोदय, आता झालेल्या जनगणनेमध्ये 18 ते 35 वयोगटातील 40 टक्के मतदार होते. 40 टक्के मतदारांपैकी 80 टक्के मतदारांनी मतदान केले तर या देशाचे राजकारण एक

..3...



SGJ/ 17:35

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

वेगळया दिशेकडे जाईल. स्वत:चा कोणताही स्वार्थ नसणारा मतदार देशहिताच्या दृष्टीने मतदान करतो त्यावेळी तो विकासाच्या राजकारणावरच मतदान करु शकतो. माजी राष्ट्रपती माननीय श्री.अब्दुल कलाम यांनी "अग्नीपंख" या पुस्तकात असे म्हटले आहे की, "2020 साली भारत हा महासत्तेच्या दिशेने जाईल". जगामध्ये सर्वात जास्त युवा शक्ती आपली आहे. ही युवाशक्ती राजकारण्यांना विकासाचे राजकारण करण्याला बाध्य करेल असे मला वाटते. प्रदेश, जात-पात याच्या पलीकडे जाऊन देशाला विकासाच्या राजकारणाकडे नेण्याचे काम ही युवाशक्ती करेल. त्यामुळे "युवा वर्ग के कंधों पर जब आझादी पडती है, इतिहास वहीं मुड़ जाता है, जहां जवानी चलती है." असे आम्हाला या युवकांकडे बघून वाटत असते.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील कापूस, सोयाबीन,कांदा, ऊस व आंबा उत्पादक शेतक-याला आपण न्याय देऊ शकतो काय ? आदिवासीला राहत्या घराच्या जमिनीचा पट्टा मिळण्याच्या संदर्भात केंद्र सरकारने नियम केलेला आहे,तशा प्रकारचा नियम राज्य सरकार कधी करणार आहे ? राज्यातील युवक, महिला, आदिवासी, शेतमजूर यांच्या सर्व प्रश्नांना आपण न्याय देऊ शकलो तर आपल्या जबाबदारीमध्ये आपण 4 पावले पुढे टाकली आहेत, असे म्हणता येईल.

सभापती महोदय, वर्तमानपत्रात वाचनात आले की, सांगली एमआयडीसीच्या लोकांना कर्नाटकातील लोकांनी असे सांगितले की, तुम्ही आमच्या राज्यात आलात तर आम्ही तुम्हाला 24 तास वीज देऊ. मंत्रीमंडळाच्या बैठकीत गुजरातच्या श्री.मोदी यांच्या प्रकल्पाच्या संदर्भात चर्चा होत नाही, असे कधीही होत नाही. असे ऐकल्यानंतर भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता म्हणून मी दोन टक्के सुखावतो परंतु आपण हे सर्व महाराष्ट्रात 98 टक्के का करु शकत नाही, याची खंत माझ्या मनामध्ये निर्माण होते. ज्यावेळेस सांगलीच्या एमआयडीसी मधील लोक कर्नाटकात जाण्यास तयार होतात तेव्हा आम्हाला दु:ख होते. संयुक्त महाराष्ट्रासाठी आपल्याला 105 हुतात्म्यांचे बलिदान द्यावे लागले. त्यामुळे विरोधी पक्षात असलो तरी गुजरात सारखे महाराष्ट्रात कसे करता येईल, याचा विचार आम्ही सातत्याने करीत असतो. राज्यातील 11 कोटी जनतेच्या हितासाठी जेव्हा आपल्याला काही गोष्टी करता येतील, त्यावेळी आम्ही विरोधी पक्षात राहून देखील नक्कीच आनंद व्यक्त करु.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले यांचा वारसा लाभला असे आपण नेहमीच म्हणतो. या सर्व मान्यवरांचा आपण येथे अभिमानाने उल्लेख करीत असतो. आपण असा महाराष्ट्र उभा करु शकलो पाहिजे असे मला वाटते. विरोधी पक्ष नेते पदी माझी निवड झाल्याबद्दल वर्तमानपत्रात आणि टी.व्ही.वर बातमी आली. तेव्हा काही जणांनी मला विचारले की, तुम्ही मुहूर्त पाहत आहात काय ? त्याबाबत सांगू इच्छितो की, मी जास्त आस्तिकही नाही आणि जास्त नास्तिकही नाही. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले म्हणाले की, भाऊसाहेब शेगावचे असल्यामुळे त्यांच्यामध्ये श्रध्दा आहे आणि श्रध्देमुळे ताकद मिळते. मी त्यांना सांगू इच्छितो की, शेवटी अशा सरकार विरुध्द लढायला अधिष्ठानाची ताकद लागतेच.

सभापती महोदय, या ठिकाणी मावळच्या गोळीबार प्रकरणी चर्चा झाली त्यावेळी दादा आवर्जून म्हणाले होते की, "भाऊसाहेब कसे समजूतदार आहेत. विनोदजी तुमची आक्रमकता अशीच पुढे राहिली तर तुम्ही लवकर विरोधी पक्ष नेते व्हाल." मी या पदावर फार काळ राहीन असे त्यांना वाटत नाही. मला त्यांना सांगावयाचे आहे की, आपले हे जे स्वप्न आहे ते आम्ही 100 टक्के पूर्ण करु. एखाद दुसरा सदस्य तिकडे येण्यापेक्षा आम्ही सर्वजण येथून तिकडच्या बाकावर येतो आणि तुम्ही सर्वजण इकडच्या बाकावर येऊन बसा. आपले स्वप्न आहे की, मी विरोधी पक्ष नेता पदावर जास्त काळ राहू नये. तेव्हा आम्ही सर्वजण समोरच्या बाकावर येऊ आणि त्यावेळी आबा अगदी प्रेमाने म्हणतील की, माझा पक्ष सत्तेवर आला नाही तर चालेल पण राज्याच्या हितासाठी हे झाले हे चांगले झाले. तेव्हा त्या अर्थाने राज्यातील 11 कोटी जनतेने आमच्यावर जी जबाबदारी सोपविलेली आहे त्या 11 कोटी जनतेच्या गौरवासाठी आम्ही विरोधी पक्षाची जबाबदारी पूर्णपणे पार पाडू.

आबा, आपण नेहमी उशिरा येता आणि मागील अधिवेशनातील तीच तीच वाक्य बोलता. मी त्यांना सांगू इच्छितो की, मी सुरुवातीलाच आदरणीय नितीन गडकरी साहेब, आदरणीय गोपीनाथ मुंडे साहेब यांचा उल्लेख केलेला आहे. मघाशी दादा म्हणाले की, कर्नाटकच्या प्रश्ना संबंधी आपण राष्ट्रीय अध्यक्षांशी बोलावे कारण राष्ट्रीय अध्यक्षांचे ऐकले जाते. दादा आपण आपल्या राष्ट्रीय अध्यक्षांचे परळी विषयी ऐकत नाही हे मला माहीत आहे. यामध्ये राजकारण आहे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

त्यामध्ये मी जात नाही. कोणते ऐकायचे, कोणते ऐकायचे नाही हे तुम्ही आम्ही चांगलेच जाणतो. आणि येत्या पुढच्या काळात जाणणारही आहोत. तेव्हा मला वाटते आपण आपली भूमिका घ्यावी आणि आम्ही आमची भूमिका घेतो. राज्यातील 11 कोटी जनतेसाठी आणि त्यांच्या हितासाठी आपण काम करु हा विश्वास मी देतो आणि भाऊसाहेबांचे तसेच आपणा सर्वांचे मनापासून आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आज या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना आपण सर्वांनी विरोधी पक्ष नेता म्हणून निवडलेले आहे. तत्कालीन विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी 1978 पासून विधानसभेचे आमदार म्हणून, लोकसभेचे खासदार म्हणून, त्यानंतर विधानपरिषदेचे सदस्य म्हणून वा विरोधी पक्ष नेता म्हणून सर्व सामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने काम केलेले आहे. त्यांचे आणि माझे व्यक्तीगत प्रेम 1978 पासून आहे. ते प्रेम आजपर्यंत टिकलेले आहे. मी त्यांना सख्ख्या भावासारखे प्रेम दिलेले आहे. आपुलकी दिलेली आहे. गेल्या सहा वर्षात या सदनात काम करीत असताना ज्या ज्या वेळी शेतकरी, कष्टकरी यांच्या संबंधीचे प्रश्न चर्चेला आले त्या त्या वेळी त्यांनी अतिशय पोटतिडिकीने आणि हिरिरीने या सभागृहात मांडलेले आहेत. मी त्यांना अनेकवेळा परखडपणे विचार मांडताना देखील पाहिलेले आहे. त्याच बरोबर एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास करणारे, ध्येयवादाने प्रेरित असलेले, पण अकारण शब्दाचा फटकारा न देणारे, अशा पध्दतीचे कुशल नेतृत्व मी त्यांच्यामध्ये पाहिलेले आहे.

सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर हे अतिशय शांत विचाराचे आहेत. सभ्यतेच्या सर्व मर्यादा पाळणारे आहेत. सामान्य जनतेच्या प्रश्नांचा ते नेहमीच पाठपुरावा करीत असतात. मघाशी श्री.पांडुरंग फुंडकर यांनी एक उदाहरण दिले. ते अत्यंत कटू असले तरी त्यांनी ते सदनात स्पष्टपणे सांगितलेले आहे. एका कुशल परिस्थितीमध्ये एक प्रश्न त्यांना वेगवेगळ्या पध्दतीने मांडावा लागला. सुप्रीम कोर्टामध्ये देखील त्यांना जावे लागले. ते सुप्रीम कोर्टात जात असताना त्यांचे एक मन सांगत होते की, ते राज्याचे मुख्यमंत्री आहेत आणि त्यांच्यावर हा अन्याय होऊ पाहत आहे. दुर्दैवाने सर्वोच्च न्यायालयामध्ये एक निर्णय झाला आणि त्यानंतरची परिस्थिती आपणा सर्वांना माहीत आहे.

सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर हे मागील सहा वर्षे विरोधी पक्ष नेते म्हणून काम करुन सर्वांच्या शुभेच्छा घेऊन आज निवृत्त होत आहेत. त्यांच्या पक्षाने दिलेला आदेश शिरसावंद्य मानून पक्ष सांगेल ते काम करणे ही त्यांची भूमिका आहे. शेवटी कार्यकर्त्याचे जीवन अशाच पध्दतीचे असते. "एक व्यक्ती एक पद" असा निर्णय त्यांच्या पक्षाने घेतला. त्यानुसार हा बदल झ ालेला आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही.

**सभापती**.......

मला स्वत:ला असे वाटते की, श्री.पांडुरंग फुंडकर हे त्यांच्या पुढील काळात पक्षाच्या माध्यमातून अनेक यशस्वी कळसांवर पोहोचतील. ते सातत्याने गोरगरिबांकरिता काम करीत आले आहेत. या पुढेही ते चालू ठेवतील अशी मला आशा आहे.

माझे तरुण मित्र श्री.विनोद तावडे यांची आज विरोधी पक्ष नेते पदी निवड झाल्याबद्दल मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो. श्री.विनोद तावडे यांना मी पहिल्या पासून सतत संघर्ष करताना पाहिले आहे. अलीकडच्या काळात त्यांचा संघर्ष थोडा कमी झालेला आहे. म्हणून मी त्यांना विचारले की, आपले वय पन्नाशीच्या आसपास गेले आहे काय ?

कोकणातील एक विद्यार्थी अनेक कष्ट करुन मुंबईत येतो आणि इंजिनिअर होतो. विद्यार्थी चळवळीमध्ये सहभागी होतो. सातत्याने विद्यार्थ्यांना मदत करणे हे ध्येय ठेऊन राजकारणाची सुरुवात करतो. राजकारणाची सुरुवात केल्यानंतर पक्षातील ज्येष्ठ नेत्यांच्या हाताखाली उत्कृष्टपणे काम करताना एक चांगला वक्ता कसा व्हावा याचेही त्यांच्याकडून मार्गदर्शन घेतो याचे ते उदारहण आहे. ज्या ठिक्‍ाणी आक्रमक व्हावे त्या ठिकाणी ते आक्रमक होतात. ज्या ठिकाणी अत्यंत सभ्यतेने बोलावे त्याठिकाणी ते अत्यंत सभ्यतेने बोलतात. अशा पध्दतीने भारतीय जनता पार्टीच्या मुशीतून तयार झालेले हे तरुण नेतृत्व आहे या पध्दतीने मी त्यांच्याकडे पाहतो. दुर्दैवाने एकदा त्यांच्यावर आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्यावर अन्याय झाला. संसदीय लोकशाहीमध्ये किती प्रभावीपणे अभ्यास करता येतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्री.दिवाकर रावते हे आहेत.

श्री.विनोद तावडे यांच्या बद्दल बोलावयाचे झाले तर ते परखड बोलतील, सभागृहाच्या कामकाजात आग्रहाने भाग घेण्याचा प्रयत्न करतील,

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय सभापती.....**

मी त्यांना बोलण्याकरिता संधी दिली नाही तर नकळत ते माझ्यावर रागावल्यासारखा चेहरा करतील. आणि दुसऱ्या मिनिटाला ते माझ्याकडे पाहून हसतील. याचा अर्थ झाले गेले संपून गेले, अशी त्यांची खिलाडूवृत्ती आहे. आज या सभागृहाचे विरोधी पक्ष नेते म्हणून त्यांना काम करण्याची संधी मिळाली आहे. सन्माननीय श्री. विनोदजी तावडे यांना मी एवढेच सांगेन की, त्यांना संधी मिळत असतांना विरोधी पक्ष नेता म्हणून विरोधी पक्षाच्या आमदारांचे सर्व प्रश्न समजून घेणे व त्यांना जास्तीत जास्त मदत करणे हे देखील आपले काम आहे. परंतु त्याचबरोबर सत्ताधारी पक्षाच्या आमदारांच्या विधायक सूचनाकडे देखील आपण लक्ष देणे गरजेचे आहे. मला खात्री वाटते की, या पध्दतीने संसदीय लोकशाहीमध्ये समन्वय ठेवण्यामध्ये जर आपण यशस्वी झालो तर या सभागृहाचे कामकाज अत्यंत चांगल्या प्रकारे होऊ शकते. सत्ताधारी बाजूकडील सन्माननीय सदस्य देखील आपल्याला चांगल्या प्रकारे मदत करु शकतात. आपण जर त्यांना मदत करण्याचा प्रयत्न केला तर राज्याचा देखील चांगल्या प्रकारे विकास होऊ शकेल. सन्माननीय श्री. विनोदजी तावडे यांना एवढेच सांगू इच्छितो की, अत्यंत समतोल विचार डोळयासमोर ठेवण्याकरिता या सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये काय हेतू आहे, कोणते विचार आहेत हे आपण समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्या दृष्टीने आपण प्रयत्न केला तर या सभागृहामध्ये विरोधी पक्ष नेता म्हणून अत्यंत चांगल्या प्रकारे काम करता येईल असे मला वाटते.

विरोधी पक्षनेता म्हणून आपण काम करीत असताना या सदनाचे सभापती म्हणून मी आपणास जास्तीत जास्त वेळा सहकार्य करण्याचा जरुर प्रयत्न करीन. अशाप्रकारे प्रयत्न करणे हे संसदीय लोकशाहीमध्ये आवश्यक आहे. एवढेच बोलून माझे तरुण मित्र सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोदजी तावडे यांना मी शुभेच्छा देतो. त्यांच्या या सभागृहापुढील कामकाजाच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी यशस्वी व्हावे अशी माझी त्यांना शुभेच्छा आहे. त्याचप्रमाणे माझे परममित्र सन्माननीय श्री. पांडुरंगजी फुंडकर आपणास देखील या पुढील काळात आपल्या पक्षाच्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी मिळो अशा प्रकारची आपणास शुभेच्छा देऊन मी माझे मनोगत पूर्ण करतो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शो□ प्रस्ताव

**मु. शी.**: श्री.हरिभाऊ यशवंतराव शिंदे, माजी वि.प.स.यांच्या
ि□ध□ाबद्दल शो□प्रस्ताव

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : महोदय, श्री.हरिभाऊ यशवंतराव शिंदे, माजी विधा□परिषद सदस्य, यांच्या ि□ध□ाबद्दल मी □ालील शो□प्रस्ताव मांडतो :--

"श्री. हरिभाऊ यशवंतराव शिंदे, माजी विधान परिषद सदस्य यांच्या दु:□द ि□ध□ाबददल हे सभा□ृह अतीव दु:□ व्यक्त □रते."

कै. हरिभाऊ यशवंतराव शिंदे यांचा जन्म 15 जुलै 1940 रोजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यात मनेगाव येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए.बी.एड. पर्यन्त झाले होते.

कै. शिंदे यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सक्रीय सहभाग घेतला होता.तसेच, त्यांनी मनेगाव युवक मंडळाचे अध्यक्ष, नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाचे संचालक, तसेच, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक संघटनेचे सचिव म्हणूनही कार्य केले होते.

कै. शिंदे यांनी शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले होते. त्यांचा अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी निकटचा संबंध होता.

कै. शिंदे सन 1982 मध्ये मुंबई विभाग शिक्षक मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषेदवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे गुरुवार, दिनांक 22 डिसेंबर 2011 रोजी दु:खद निधन झ ााले. सभागृहाच्या वतीने आणि वैयक्तिकरित्या मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय,या सभागृहाचे नेते व उप मुख्यमंत्री माननीय श्री. अजितदादा पवार साहेबांनी श्री. हरिभाऊ यशवंतराव शिंदे, माजी विधान परिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

श्री. हरिभाऊ शिंदे हे शिक्षकांचे आमदार होते. आज आपण शिक्षकांचे मतदारसंघ पाहिले तर ते चार ते पाच जिल्ह्यांचे झाले आहेत. ज्यावेळी श्री. हरिभाऊ शिंदे हे आमदार होते त्यावेळी त्यांना मुंबई आणि नाशिकसह 11 जिल्ह्यांचे प्रतिनिधित्व करावे लागत होते. अकरा जिल्ह्यांचे प्रतिनिधित्व करीत असतांना सर्व शिक्षकांच्या समस्या ध्यानात घेऊन त्या सरकार दरबारी सोडविणे थोडे कठीण असते परंतु मूळ चळवळीतील कार्यकर्ता असणारे श्री. शिंदे साहेब हे संयुक्त महाराष्ट्रच्या चळवळीमध्ये सुध्दा सहभागी होते. त्यामुळे अशाप्रकारे चळवळीमध्ये काम करणाऱ्या एका कार्यकर्त्याला अकरा जिल्हे यशस्वीपणे संभाळणे शक्य झाले होते. अशाप्रकारे श्री. हरिभाऊ शिंदे यांचे कालच दु:खद निधन झाले आहे. त्यांना मी सर्व विरोधी पक्षांच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि हा प्रस्ताव संमत करावा अशी विनंती करतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते व उप मुख्यमंत्री माननीय श्री. अजित पवार साहेबांनी कै. श्री. हरिभाऊ यशवंतराव शिंदे, माजी विधान परिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडलेला आहे. वैयक्तिकरित्या मी व माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना मन:पूर्वक आदरांजली अर्पण करतो आणि शोक प्रस्तावाला पाठिंबा देतो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते व उप मुख्यमंत्री माननीय श्री. अजितदादा पवार साहेबांनी श्री. हरिभाऊ यशवंतराव शिंदे, माजी विधान परिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

श्री. हरिभाऊ शिंदे यांनी मुंबई आणि नाशिक या मतदारसंघातील शिक्षकांचे ज्या पध्दतीने नेतृत्व केले त्याची आठवण आज सुध्दा कार्यकर्त्यांना होत आहे. मुंबईतील सर्व शिक्षकांच्या वतीने मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते व उप मुख्यमंत्री माननीय श्री. अजितदादा पवार साहेबांनी श्री. हरिभाऊ यशवंतराव शिंदे, माजी विधान परिषद सदस्य यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी मूळचा नाशिक जिल्ह्यातील आहे, आणि आमचे मित्र श्री. हरिभाऊ शिंदे हे सुध्दा नाशिक जिल्ह्यातीलच होते. मी त्यांच्याबरोबर एक कार्यकर्ता म्हणून काम केले होते. इतकेच नव्हेतर त्यांच्या निवडणुकीमध्ये निवडणुकीच्या प्रचाराचे काम सुध्दा मी केले होते. एक अभ्यासू कार्यकर्ता, शिक्षकांच्या प्रश्नांची जाण असलेला, सर्व सामान्यांशी नाते जोडणारा असा एक कार्यकर्ता आमच्यामधून काल निघून गेला आहे. मी त्यांना महाराष्ट्रातील तमाम शिक्षक आणि शिक्षकेतरांच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

प्रा. दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते व उप मुख्यमंत्री आदरणीय श्री. अजितदादा पवार साहेबांनी श्री. हरिभाऊ यशवंतराव शिंदे, माजी विधान परिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, श्री. हरिभाऊ शिंदे हे मुंबई व नाशिक शिक्षक मतदारसंघामधून 1982 साली विधान परिषदेवर निवडून आले होते. या थोर समाजसेवकाने, गाव पातळीपासून राज्य पातळीपर्यन्त खूप काम केले होते. शैक्षणिक व सामाजिक संस्थांबरोबर त्यांचा अत्यंत जवळचा संबंध होता. नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाचे ते संचालक होते. शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचा सतत प्रयत्न असावयाचा. माध्यमिक शिक्षक संघटनेचे सचिव म्हणून त्यांनी त्या काळात खूप काम केले होते. त्यांनी संघटनेच्या माध्यमातून केलेल्या कामाचा आदर्श आमच्यापुढे आहे. मी त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : कै. हरिभाऊ यशवंतराव शिंदे यांचा जन्म 15 जुलै 1940 रोजी सिन्नर तालुक्यातील मनेगाव येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए., बी.एड. पर्यंत झाले होते. श्री. शिंदे यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सक्रीय सहभाग घेतला होता. तसेच, त्यांनी मनेगाव युवक मंडळाचे अध्यक्ष, नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाचे संचालक, तसेच, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक संघटनेचे सचिव म्हणूनही काम केले होते. श्री. शिंदे यांनी शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले होते. त्यांचा अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी निकटचा संबंध होता.
श्री. शिंदे सन 1982 मध्ये मुंबई विभाग शिक्षक मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषेदवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे गुरुवार, दिनांक 22 डिसेंबर 2011 रोजी दु:खद निधन झ ाले आहे. त्यांना आदरांजली वाहण्यासाठी स□मा□□□य सदस्यांनी दो□ मि□□टे उभे राहू□ शो□ प्रस्ताव संमत □रावा अशी माझी त्यां□ वि□ंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यां□ □ाली बसावे.

शो□ प्रस्ताव संमत □र□ात आला आहे. प्रस्तावाची ए□ प्रत शोकाकुल □टुंबीयां□डे पाठवि□ात येईल.

--------------

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत**

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, एका महत्वाच्या मुद्यावर . . . .

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, दोन छोटीसी बिले आहेत . . . .

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझी एक विनंती आहे की, . . . .

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांना एक निवेदन करावयाचे आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, त्यापूर्वी मी माझे म्हणणे एका मिनिटामध्ये मांडणार आहे. आपण ते ऐकून घ्यावे अशी विनंती आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना बोलण्यासाठी संधी देतो.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी माझे म्हणणे एक मिनिटामध्ये मांडतो. मघाशी सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यानंतरच मी याबाबत बोलणार होतो. पण सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांची निवड करावयाची होती आणि त्यानंतर शोक प्रस्तावाचा विषय होता म्हणून मी बोललो नाही. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, आपण मला एक मिनिट बोलण्याची संधी द्यावी.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांनी एक महत्वाचा विषय उपस्थित केला होता की,केंद्र शासनाने अल्पसंख्यांकांना ओबीसी च्या कोट्यामध्ये रिझर्वेशन दिलेले आहे.त्या अनुषंगाने या राज्यात गेल्या अनेक वर्षापासून मराठा समाजाच्या आरक्षणाची मागणी आहे. परंतु ते आरक्षण ओबीसी च्या 27 टक्क्यामधून न करता, वेगळे 25 टक्के आरक्षण द्यावे अशी मागणी आहे. यासंबंधात अनेक आंदोलने झाली, मोर्चे काढण्यात आले, धरणे धरण्यात आली सगळे काही झाले.सभापती महोदय, आपणही सभागृहामध्ये या विषयाच्या संबंधात मुद्दा मांडण्यासाठी मला अनेक वेळा परवानगी दिली आहे.मी माननीय मुख्यमंत्र्यांना अशी विनंती करतो की, आपण एक मिनिट थांबावे. कारण मागच्या अधिवेशनामध्ये शेवटच्या वेळेस हा प्रश्न उपस्थित झालेला असताना त्यांनी सांगितले होते की,मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या संदर्भात आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासंबंधात लवकरात लवकर बैठक घेऊन निर्णय घेऊ.पण त्याबाबत आजतागायत काही झालेले नाही.माझी आपल्याला विनंती आहे की,ज्याप्रमाणे केंद्र शासनाने अल्पसंख्यांकांना एक विश्वास दिलेला आहे,आधार दिलेला आहे,त्याच पध्दतीने मराठा समाजाला लोकशाही आघाडीचे शासन, जे सर्वांना न्याय मिळवून देते,ते शासन या समाजाला न्याय मिळवून देणार आहे की नाही याकडे संपूर्ण महाराष्ट्रातील मराठा समाज डोळे लावून बसलेला आहे आणि



असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विनायक मेटे . . . .

तो आपल्याकडे मोठ्या आशेने,अपेक्षेने पहात आहे.त्यामुळे मराठा समाजाची ही अपेक्षा माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री पूर्ण करणार आहेत की नाही हा आमचा सवाल आहे. सभापती महोदय, माझी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी याबाबत काहीतरी बोलावे. कारण हा अत्यंत महत्वाचा विषय आहे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी जो मुद्दा मांडलेला आहे, त्याबाबत मी त्यांना एवढेच सांगू इच्छितो की, हा अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न असून याबाबत सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या तीव्र भावना आहेत. याबाबतीत मुंबई येथे गेल्यानंतर एक बैठक घेऊन यातून मार्ग काढण्याचा मी प्रयत्न करीन.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, धन्यवाद.

-----

2 ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**L. A. BILL NO. XLVII OF 2011**

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY SHOPS AND ESTABLISHMENTS ACT, 1948.)

श्री.हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेले सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक - 47 मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक, 2011 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेले सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक - 47 मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक, 2011 विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

. . . .2 ओ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी जे विधेयक मांडण्यात आलेले आहे, त्यामध्ये सध्या दुकानांची वेळ रात्री 8.30 वाजेपर्यंत आहे, ती रात्री 10.30 वाजेपर्यंत वाढविण्याच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे. यासंदर्भात मी आपल्या निदर्शनास आणून देतो की,कोल्हापूरमध्ये एल.बी.टी. ला म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था कराला स्थगिती देण्यात आलेली आहे आणि प्रचंड आंदोलन झाल्यानंतर ही स्थगिती दिल्याचे आम्ही ऐकून आहोत. याबाबतीत दुकानदारांनी चार-पाच दिवस आंदोलन केले होते.मात्र महाराष्ट्रामध्ये फक्त दुकानदारांना वेळ वाढवून दिली आहे.पण ही बाब तेवढ्यापुरती मर्यादित नाही.परंतु त्यांना करा पासून जो जाच होतो, तो देखील एक महत्वाचा प्रश्न आहे. याबाबतीत आम्ही त्यांना शिवसेनेच्या वतीने मोठा पाठिंबा दिला होता. आमचे स्थानिक शिवसेनेचे आमदार श्री.जयदत्त क्षीरसागर यांनी त्यांचे नेतृत्व केले होते. म्हणून एल.बी.टी.च्या बाबतीत जी भूमिका घेतलेली आहे ती स्थगिती पुरती मर्यादित आहे की, भविष्यामध्ये यासंदर्भात निर्णय घेतला जाणार आहे ही बाब देखील आम्हाला समजली पाहिजे. कारण याला स्थगिती देण्यात आलेली आहे ही गोष्ट खरी आहे.पण ही बाब खरी नसेल तर त्याबाबतीत दुकानदारांच्या संघटनेने बनवाबनवी केली आहे असा त्याचा अर्थ होतो. आम्ही दूरदर्शनच्या माध्यमातून जे पाहिले, त्यानुसार त्यांना एल.बी.टी.बाबत स्थगिती देण्यात आलेली असल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. व्यापाऱ्यांवर अशा प्रकारचा जो जाचक कर लावण्यात आलेला आहे, त्याबाबत शासनाने पुनर्विचार करावा अशी बाब मी आपल्यासमोर आग्रहाने मांडत आहे. धन्यवाद.

----

. . . .2 ओ-5

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांनी लोकल बॉडी टॅक्स जो आता ऑक्ट्रॉयच्या बदल्यात घेतलेला आहे, त्याबाबत विधान केले आहे. परंतु वास्तविक पाहता हा प्रश्न नगरविकास विभागाच्या संबंधातील असून, त्याचा कामगार विभागाच्या दुकाने आणि आस्थापना याच्याशी काही संबंध नाही. काल एल.बी.टी.बाबत बैठक झाली असून याबाबत सांगावयाचे तर राज्य शासनाने एक कमिटी नेमलेली असून, या कमिटीला मार्च महिन्याच्या आत एल.बी.टी.ला पर्याय शोधण्याबाबत सांगण्यात आले आहे आणि 1 एप्रिलनंतर नवीन धोरण ठरविण्यात यावे असे ठरलेले आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक - 47 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 47 संमत झाले आहे.

----

2 ओ-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

23-12-2011 (असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही) 2 ओ-6

सौ.रणदिवे 6.05

**<u>सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढविण्याबाबत</u>**

**सभापती** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ संध्याकाळी 6.00 वाजेपर्यंत आहे. मात्र आजचे सभागृहासमोरील कामकाज संपेपर्यंत मी सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढविण्याचे ठरविलेले आहे.

. . . .2 ओ-7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी. : शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. LXIII OF 2011.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL LANDS (CEILING ON HOLDINGS) ACT, 1961.)

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल व खार जमीन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 63 - महाराष्ट्र शेत जमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, 1961 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक, 2011 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.बाळासाहेब थाोरात : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक- 63 महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, 1961 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक, 2011 विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**L. A. BILL NO. XLVII OF 2011**

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY SHOPS AND ESTABLISHMENTS ACT, 1948.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**L. A. BILL NO. LXIII OF 2011**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL LANDS (CEILING ON HOLDINGS) ACT, 1961.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 63 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 63 संमत झाले आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आदिवासी विकास विभागाच्या माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनाच्या संदर्भात.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये मंगळवारी आदिवासींच्या संदर्भातील एक प्रश्न चर्चेला आला होता. सन्माननीय मंत्री महोदय, श्री. बबनराव पाचपुते हे त्या चर्चेला उत्तर देत होते. या सभागृहात ती चर्चा अर्धा ते पाऊण तास सुरु होती. अमरावतीचे अतिरिक्त आदिवासी आयुक्त श्री. वरवणकर यांच्या संदर्भात मी प्रश्न उपस्थित केला होता. त्यांच्यावर 68 लाख रुपयांची जबाबदारी फिक्स करण्यात आलेली आहे. त्यांच्या संदर्भात कारवाई करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी सांगितले होते. त्यावर सदर कारवाई कधी पर्यंत करण्यात येणार आहे, असा मी प्रश्न विचारला होता. त्या प्रश्नाला उत्तर देताना गुरुवारपर्यंत कारवाई केल्याचे उत्तर देण्यात येईल, असे मंत्री महोदयांनी सांगितले होते. काल गुरुवार होता. पण काल या संबंधीचे उत्तर देण्यात आले नाही. आजचा शुक्रवारही गेला. श्री. वरवणकर यांच्या बाबतीत मी फक्त 68 लाख रुपयांच्या भ्रष्टाचारा बद्दलचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. परंतु लाचलुचपत प्रतिबंधक खात्याचे ए.सी.पी., अमरावती यांनी श्री. वरवणकर यांना अटक करण्याची परवानगी संचालकांकडे मागितलेली आहे. परंतु अद्याप त्यांना ती परवानगी देण्यात आलेली नाही. श्री. वरवणकर यांनी एक कोटी चार लाख रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे ए.सी.पी. यांच्या लक्षात आलेले आहे. शासनमार्फत त्यांच्या विरुध्दची कारवाई जाहीर करण्यात येत नाही, अशा प्रकारे त्यांना वाचविण्याचा जो प्रयत्न होत आहे, तो निषेधार्ह आहे.

सभापती महोदय, मी या सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री यांना विनंती करु इच्छितो की, माननीय मंत्री महोदय, श्री. बबनराव पाचपुते यांनी या संदर्भातील कारवाई जाहीर करण्यात येईल असे सांगितले होते. पण ती कारवाई अद्याप जाहीर केलेली नाही. त्यामुळे आता यानंतर संबंधित माननीय मंत्री महोदयांना या सभागृहात केव्हा बोलावणार आणि ते केव्हा उत्तर देणार? म्हणून माननीय मंत्री महोदयांनी घोषित केल्याप्रमाणे नक्की कारवाई केली जाईल, असे सभागृहाला आश्वासित करण्यात यावे.

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, त्याप्रमाणे आदिवासी विकास विभागाचे सन्माननीय मंत्री श्री. बबनराव पाचपुते यांनी सभागृहाला आश्वासित केले असेल तर त्याप्रमाणे कां झाले नाही याची माहिती घेऊन कारवाई करण्याच्या बाबतीत त्यांनी सभागृहाला जो शब्द दिलेला आहे तो पाळला जाईल.

---

..4.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

**पृ.शी.**: कापूस, सोयाबीन व धान उत्पादक शेतकऱ्यांना द्यावयाचे अर्थसहाय्य .

**मु.शी.**: कापूस, सोयाबीन व धान उत्पादक शेतकऱ्यांना द्यावयाच्या अर्थसहाय्याच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री. पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

सभापती महोदय, विदर्भातील, मराठवाडयातील आणि उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर या वर्षी जे गंभीर संकट आले आहे, त्याबद्दल या अधिवेशनाच्या सुरुवातीलाच शासनाने दोन हजार कोटी रुपयांची मदत देण्याचे आश्वासन दिले होते. हे अधिवेशन संपण्यापूर्वी त्या दोन हजार कोटी रुपयांची मदत कशा प्रकारे दिली जाईल हे सांगण्याचे मी आश्वासन दिले होते, त्या संदर्भातील निवेदन मी या ठिकाणी करु इच्छितो.

सभापती महोदय, चालू वर्षी मोसमी पावसाचे उशिरा आगमन होऊन कापूस, सोयाबीन व धान या खरीप पिकांची उशिरा पेरणी झाली होती. तसेच संपूर्ण पावसाळयात पावसाचे झालेले अनियमित वितरण आणि राज्याच्या काही भागांमध्ये पिकांच्या संवेदनशील वाढीच्या काळामध्ये काही कालावधींकरिता अवर्षणाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सदर पिकांच्या उत्पादकतेमध्ये घट आली आहे. त्याचप्रमाणे, शेतीतील पीक उत्पादनाशी निगडित कृषी निविष्ठांच्या भावामध्ये वाढ झाल्याने राज्यातील शेतकऱ्यांचा सदर पिकांचा उत्पादन खर्च वाढल्यामुळे आणि सद्य:स्थितीत सदर पिकांना मिळणारे कमी बाजारभाव लक्षात घेता, शेतकऱ्यांच्या हाती येणारे उत्पन्न असमाधानकारक आहे.

सदर नैसर्गिक आपत्तीमुळे कापूस, सोयाबीन व धान उत्पादक शेतकऱ्यांच्या निव्वळ उत्पन्नात घट झाल्यामुळे बाधित शेतकऱ्यांना रुपये दोन हजार कोटी इतके अर्थसहाय्य देण्याचा निर्णय या पूर्वीच मी सभागृहात घोषित केला आहे, त्यावेळी मी आश्वासन दिल्याप्रमाणे आज या मदतीविषयीचा शासन निर्णय घेण्यात आला आहे. त्यातील महत्वाच्या तरतुदी खालीलप्रमाणे आहेत:

1. कमाल 2 हेक्टर मर्यादेपर्यंत प्रती हेक्टरी कापसास रु.4,000/-, सोयाबीन प्रति हेक्टरी रु. 2000/-, धान प्रती हेक्टरी रु. 2000/- या प्रमाणे घोषित करण्यात येत आहे.

2. मदतीचे प्रमाण किमान रुपये 500/- राहील. तीनही पिकांची मिळून कमाल क्षेत्र मर्यादा प्रति खातेदार 2 हेक्टरपर्यंत राहील.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण. . .

3. गत दहा वर्षातील उत्कृष्ट तीन वर्षांची सरासरी उत्पादकता प्रमाणभूत मानून, प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोगांमध्ये उत्पादकतेच्या आकडेवारीच्या आधारे, 25 टक्के व त्याहून अधिक घट असणाऱ्या तालुक्यात सोयाबीन व धान पिकांना मदत देण्यात येईल.

4. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती मार्फत महसूल विभागाकडून प्रत्यक्ष निधी वितरण होईल.

5. निधीचे वाटप शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर होईल.

वरील अर्थसहाय्य एका अत्यंत विशिष्ट परिस्थितीत करण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला स्थैर्य एका प्रभावी पीक विमा योजनेच्या माध्यमातूनच व्हावे हा जास्त व्यावहारी मार्ग आहे. म्हणून निसर्ग व बाजार या दोन्हीच्या लहरीपणावर मात करण्यासाठी उत्पन्नाची हमी देणारी पीक विमा योजना राबविण्याबद्दल राज्य शासन प्रयत्नशील राहणार आहे.

आमच्या असेही निदर्शनास आले आहे की, भात, कापूस, साखर व कांदा यांच्या निर्यातीवर होणाऱ्या बंदीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होतो. केंद्र शासनाचे धोरण शेती पिकांच्या निर्यातीसाठी अधिक सुसंगत राहील याकरिता मी माननीय पंतप्रधान व माननीय खाद्य मंत्री यांच्या संपर्कात आहे. पश्चिम विदर्भातील बिगर बासमती भातावरील निर्यात बंदी उठविण्यात यावी, कांद्यावरील किमान निर्यात मूल्याचे (MEP) चे बंधन कायम स्वरुपी उठवावे, या संबंधी राज्य शासन प्रयत्नशील आहे. याबद्दल आजच मी केंद्रीय खाद्य मंत्र्यांबरोबर संपर्क साधलेला असताना त्यांनी (MEP) उठविण्याचा सकारात्मक निर्णय घेण्याबद्दल मला सांगितलेले आहे. उत्पन्नाच्या हमी स्वरुपात शेतकऱ्यांच्या मालाला योग्य बाजारपेठ मिळावी, यासाठी आपल्या राज्याने कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यात दुरुस्ती आणलेली आहे. खाजगी उद्योजक शेती मालाच्या बाजारपेठेत उतरावेत यासाठी आमचे प्रयत्न आहेत. मधले दलाल कमी करणे व शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा हेही पुढील काळात कटाक्षाने पाहिले जाणार आहे. अन्न सुरक्षा कायदा सध्या केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे. त्या अंतर्गत गहू, तांदूळ व भरड धान्याची स्थानिक खरेदी करुन स्वस्त धान्य दुकानांमार्फत सवलतीच्या दराने विक्री करण्यास केंद्र शासनाची परवानगी मिळावी याकरिताही राज्य शासन प्रयत्न करीत आहे.

..6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण. . .

या वर्षी उद्‌भवलेल्या विशिष्ट स्थितीत, आपल्याला ही उपाययोजना करावी लागत आहे. तथापि, कोरडवाहू शेतीला स्थैर्य प्रदान करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्यासंदर्भात मी यापूर्वीच या सभागृहात निवेदन केले होते. त्यासंबंधी काही योजना मी या ठिकाणी जाहीर करु इच्छितो.

**<u>कोरडवाहू शेतीला स्थैर्य प्रदान करण्याकरिता कायमस्वरुपी उपाययोजना</u>**

कोरडवाहू शेती निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबित असून पावसावर आधारित सुमारे 83 टक्के शेत जमिनीवर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची उत्पादकता बागायती क्षेत्रातील शेती करणाऱ्या शेतकऱ्यांपेक्षा खूपच कमी आहे. या कारणामुळे एका हेक्टरला येणारा खर्च जिरायत व बागायती जमिनीवर सारखा असल्याने, प्रती क्विंटल मागे येणारा खर्च कोरडवाहू जमिनीला बागायती जमिनीपेक्षा बराच जास्त आहे. बाजारभाव कमी झाल्यास कोरडवाहू जमिनीत उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना काही वेळा प्रती क्विंटल आलेल्या खर्चापेक्षा प्रती क्विंटल भाव कमी मिळतो या कारणाने कोरडवाहू क्षेत्रात असलेले शेतकरी अनेक वेळा आर्थिक अडचणीत सापडतात.

वरील परिस्थितीवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याकरिता पुढील 5 वर्षांसाठी सुमारे रु.10 हजार कोटी नियतव्यय असलेला एक महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला जाईल.

या योजनेची सविस्तर आखणी व अंमलबजावणी करण्याकरिता 'कोरडवाहू शेती मिशन' (Dryland Farming Mission ) ची स्थापना केली जाईल. या कार्यक्रमाची सविस्तर रुपरेषा ठरविण्याकरिता एका तांत्रिक समितीची स्थापना राज्य शासन करेल. या समितीने पुढील तीन महिन्यात या विषयी अभ्यास करुन आपला सविस्तर अहवाल सादर करावयाचा आहे. या कार्यक्रमाची व्याप्ती 12 व्या पंचवार्षिक योजनेमध्ये निधीची उपलब्धता लक्षात घेऊन ठरविण्यात येईल. हा कार्यक्रम कोरडवाहू शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यास राज्य शासन कटिबध्द आहे. धन्यवाद.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, पॅकेज वाढवून मिळेल अशी अपेक्षा होती पण माननीय मुख्यमंत्र्यांनी ते वाढवून दिलेले नाही. शेतकऱ्यांच्या ज्या अपेक्षा होत्या त्या पूर्ण झालेल्या नाहीत. मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण इतके तोकडे पॅकेज दिले आहे की, भात उत्पादक शेतकऱ्याला एकरी 800 रुपये सुध्दा येत नाहीत. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याची आज तीच स्थिती आहे. कापूस उत्पादक शेतकरी तर पूर्ण संपलेलाच आहे. आपण आता अडीच एकराला 4 हजार रुपये देणार आहात. म्हणजे एकराला 1500 ते 1600 रुपयांपर्यंत मिळतील. शेतकऱ्याच्या एका एकरामध्ये 2 क्विंटल सुध्दा पीक झालेले नाही. आता 2 क्विंटलला आपण एकरी 1800 रुपये देणार ही रक्कम इतकी तोकडी आहे की, शेतकरी पुढची पेरणी सुध्दा करु शकणार नाहीत.

शेतकरी ज्यावेळी हे पॅकेज आणावयास तालुक्याच्या ठिकाणी जातो त्यावेळी त्याला बँकेमध्ये खाते उघडण्यासाठीच एक हजार रुपये लागतात आणि त्याला गावावरुन शहराच्या ठिकाणी यावयाचे असेल तर त्याची एक ट्रीप 100 ते 150 रुपयांची होते. त्यामुळे या पॅकेजमधून त्यांच्या हातामध्ये किती पैसे पोहोचणार आहेत ? आपण दिले पण अर्धवट दिले. दिल्याबद्दल धन्यवाद पण हे देऊनही उपयोगाचे होणार नाही. उपयोगाचे होईल एवढे जरी शेतकऱ्याला दिले असते तरी ते योग्य झाले असते. आमची अपेक्षा किमान हेक्टरी 5 हजार रुपये मिळावेत अशी होती. ही रक्कम वाढवून मिळेल अशी आशा निर्माण झाली होती पण ती वाढवूनही मिळालेली नाही आणि अपेक्षेएवढे सुध्दा मिळालेले नाही. आता विदर्भातील कापसाची अवस्था वाईट होऊन कापसाचा भाव तीन हजार रुपयांपर्यंत खाली येणार आहे. व्यापारी लोक वाट पाहात होते. आता कापसाचा भाव 2700 रुपये क्विंटल सुध्दा होऊ शकतो. उद्यापासून कापसाचे भाव 400 ते 500 रुपये खाली येतील आणि आता यापुढे शेतकऱ्यांच्या कापसाची लूट होईल. त्यामुळे हे पॅकेज शेतकऱ्यांच्या सोयीचे झालेले नाही. ही बाब कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्यासारखी आहे, त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखी आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 2 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर झाल्यानंतर ते अत्यंत अल्प आहे असे आम्ही त्याचवेळी म्हटले होते. परंतु माननीय मुख्यमंत्री महोदय, मी आपल्याकडून अपेक्षा व्यक्त केली होती. कोरडवाहू भागातील या शेतकऱ्यांकरिता आपण काय धोरणात्मक भूमिका मांडता याकडे माझे लक्ष होते. मी असेही म्हणालो की, आज पैसे कमी दिले तरी चालतील परंतु आपण कायम स्वरुपी काय धोरणात्मक भूमिका मांडता हे मी पाहात होतो. 20 टक्के बोनसचा मी आग्रह धरला होता त्याबाबत आपण असे म्हणाला होता की, त्याबाबत पुढच्या वर्षी विचार करु. पण त्या बाबतीत घोषणा होणे आवश्यक होते की, पुढच्या वर्षापासून जो काही भाव असेल त्यावर सरकार 20 टक्के बोनस जो पूर्वी देत होते तो चालू करण्यात येईल. अशा प्रकारची घोषणा झाली असती तरी त्यामुळे कोठे तरी थोडासा आधार मिळाला असता.

याच सभागृहामध्ये खतांच्या संदर्भात ज्यावेळी प्रश्न उपस्थित केला होता त्यावर या सभागृहामध्ये जवळजवळ सहा तास चर्चा झाली होती. त्या वेळेला संबंधित मंत्री महोदयांनी यापुढे जी सबसिडी दुकानदारांना थेट जाते ती आम्ही शेतकऱ्यांच्या खात्यावर देऊ आणि मग त्यांनी पाहिजे तसे खत विकत घ्यावे असे धोरण जाहीर केले होते पण त्याची पुनरावृत्ती आपल्या निवेदनामध्ये झालेली नाही. बी-बियाणांच्या संदर्भात त्यांची फसवणूक होते त्यामुळे त्यांना स्वस्त दरात बी-बियाणे कसे द्यावयाचे या संदर्भातील धोरण सुध्दा आम्हाला कळलेले नाही. आता आपण 10 हजार कोटी रुपये पाच वर्षांकरिता राखून ठेवलेले आहेत. त्या संदर्भात आता तज्ज्ञ समिती नेमणार आहात. यापूर्वी आम्ही विधानसभेच्या कार्यवाहीचा जो वृत्तांत वाचला तो अत्यंत दुर्दैवी आहे. विदर्भातील कोरडवाहू शेतकऱ्याला आणखी 25 वर्षे पाणी मिळणार नाही याचा व्यवस्थित बंदोबस्त झाल्याचे आम्ही कालच्या सर्व वर्तमानपत्रांमध्ये वाचले. मी त्याच्या खोलामध्ये जाऊ इच्छित नाही. आपण या पूर्वीच पाणी विकलेले आहे. मागचे विधेयक मंजूर करताना ते आपण सोडून दिले होते. शेतीच्या पाण्याला जे प्रथम प्राधान्य होते ते आपण बदलले. आज आपल्या धोरणाप्रमाणे कोरडवाहू शेतकऱ्याकरिता समिती नेमणार आणि मग ती तज्ज्ञ समिती जे काही सांगेल त्यावरुन सगळे निर्माण होईल. म्हणजे आता पाच वर्षे शेतकऱ्यांनी आत्याबाईच्या मिशा मोजत बसावयाच्या आणि उद्ध्वस्तेत जीवन जगावयाचे ही बाब अत्यंत गंभीर आहे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

आजच मी कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न उपस्थित केला. कांदा उत्पादक शेतकरी आमदाराला फोन करुन सांगतो की, मी आत्महत्या करतो. तो आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतो पण त्याच्या सुदैवाने आमदार श्री. शिरिष कोतवाल यांनी वेळीच लक्ष दिल्यामुळे तो वाचला आणि आता रुग्णालयात आहे. ही परिस्थिती या राज्यामध्ये असताना आपल्या सारख्या मुख्यमंत्र्यांकडून लोकांच्या खूप अपेक्षा होत्या. कारण मागचे मुख्यमंत्री शेतकऱ्यांना शिव्या घालत फिरत होते. मी असे म्हणाल्याबद्दल मला माफ करा. शेतकरी कापसामध्ये दगड घालतो, पाणी टाकतो, बनवाबनवी करतो, तो आळशी आहे, तो विड्या फुंकत बसतो, तो तंबाखू चोळत बसतो, अशा प्रकारची शेतकऱ्यांबद्दलची विद्वत्तापूर्ण मते आमच्याकडे मुख्यमंत्र्यांनी मांडली होती. त्यांनी हे सगळे मांडले होते. तेही आम्ही सहन केले. आम्हाला आपल्याकडून अपेक्षा होती. पण यामध्ये शेतकऱ्यांचा घोर अपमान झालेला आहे, निराशा झालेली आहे आणि म्हणून आता याबद्दल काय म्हणणार ? आजच्या चहापाण्याचे निमंत्रण आपण दिले आहे. आपल्या सहीचे पत्र आहे. माननीय सभापतींचा आदर नेहमीच असतो. परंतु आम्हाला चहापाण्याला येता येणार नाही. आता आरडाओरड करावयाची, सभा बंद पाडावयाची, ते श्रेय आम्हाला नको आहे. आम्ही शेतकऱ्यांकरिता आक्रोश करुन आपली सभा बंद पाडली याचे श्रेय आता आम्हाला नको आहे. तुमची सभा तुम्हाला लखलाभ होवो. धन्यवाद. आम्ही या संदर्भात आपला निषेध नोंदवतो. मी नवीन माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विनंती करतो की, विदर्भाच्या शेतकऱ्यांकरिता सभात्याग व्हावा. तशी अपेक्षा मी आपल्याकडून व्यक्त करतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, विरोधी पक्ष नेता म्हणून माझा आज पहिला दिवस असल्यामुळे या निमित्ताने शेतकऱ्यांना काही तरी मिळेल असे वाटले होते. Where there is a will, there is a way. However, where there is no will, there are surveys, committees, sub-committees. असे जे आम्ही म्हणतो ते आज खरे झाले आहे. ज्यावेळी चर्चा झाली त्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी आम्ही वस्त्रोद्योग धोरण घोषित करु. ते धोरण आपल्या निवेदनामध्ये

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विनोद तावडे ....

कोठेही आलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे पुढे जाऊन या शेतकऱ्यांकरिता लाँग टर्म कसा उपयोग होईल याबाबत काही तरी घोषित करावयास पाहिजे होते. तसे यामध्ये काहीच दिसत नाही. आपण दोन हेक्टरची मर्यादा घालत आहात आणि त्यांना जे काही मिळणार आहे त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना पुन्हा पेरणी करण्यासाठी बियाणे घेणे सुध्दा अवघड होऊन जाईल. अधिवेशन संपत असताना यातून काही तरी मिळेल अशी शेतकऱ्यांची जी अपेक्षा होती ती फोल ठरलेली आहे. आपण शेतकऱ्यांविषयी जी भूमिका घेतलेली आहे ती आम्ही पूर्णपणे अमान्य करतो. त्याचा आम्ही पूर्ण निषेध करीत सभात्याग करतो.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभात्याग करतात )

---

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ.शी./मु.शी.**: सत्रकाळातील कामकाजाचा आढावा

**सभापती** : हिवाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

एकूण बैठकीची संख्या - 11 एकूण काम - 67 तास 40 मिनिटे

मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ - 15 मिनिटे

अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ - 5 तास

प्रत्यक्षात झालेले कामकाज - 62 तास 25 मिनिटे

रोजचे सरासरी कामकाज - 5 तास 40 मिनिटे

<u>तारांकित प्रश्न</u>

एकूण आलेले तारांकित प्रश्न - 3527 कार्यवाहीसाठी घेतलेले तारांकित प्रश्न - 2979

स्वीकृत प्रश्न 1256 सभागृहात तोंडी उत्तरित झालेले तारांकित प्रश्न 55

<u>नियम 93 सूचना --</u>

एकूण प्राप्त झालेल्या सूचना -136, स्वीकृत सूचनांची संख्या 41, चर्चा झालेल्या सूचना 10

<u>लक्षवेधी सूचना --</u>

प्राप्त झालेल्या सूचना -1121, मान्य झालेल्या सूचना 214 चर्चा झालेल्या सूचना - 26

विशेष उल्लेखाच्या मांडण्यात आलेल्या सूचना - 78

<u>नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा</u> - प्राप्त झाल्या 10 , मान्य झाल्या 10 , चर्चा झाल्या 2

शासकीय विधेयके संमत- 14 ( परिषद 2 - सभा 12 )

अर्धा तास चर्चा - प्राप्त झाल्या 177 मान्य झाल्या 119 चर्चा झाल्या 3

अशासकीय ठराव - चर्चा झालेल्या सूचनांची संख्या 3 .

अंतिम आठवडा प्रस्ताव - एका प्रस्तावावर चर्चा झाली

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ.शी./मु.शी.**: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

**सभापती** : मी खालील घोषणा करतो :-

"माननीय राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, महाराष्ट्र विधान परिषदेचे पुढील अधिवेशन गुरुवार, दिनांक 15 मार्च, 2012 रोजी, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात यावे.

---

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सत्र समाप्तीसंबंधी घोषणा

**सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपले आहे. आता मी सत्र-समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा आदेश वाचून दाखवितो.

"भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2) उपखंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी के.शंकरनारायणन्, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सत्र संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

( यानंतर राष्ट्रगीत झाले. )

( सायंकाळी 6 वाजून 36 मिनिटांनी सत्र संस्थगित झाले. )

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही